# बेडकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र

वासुदेव
विश्वनाथ
बेडेकर

श्यामला प्रकाशन

REFBK-0011613
तमसो मा ज्योतिर्गमय

# बेडेकर

जीवन-वृत्तांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............



श्री. वासुदेव विश्वनाथ वेडेकर

# बेडेकर

जीवन–वृत्तांत

लेखक

वासुदेव विश्वनाथ बेडेकर

किंमत चार रुपये

REFBK-0011613

REFBK-0011613

तमसो मा ज्योतिर्गमय

श्यामली प्रकाशन, मुंबई ७

© सर्वाधिकार सुरक्षित

**प्रथम मुद्रण :**

२६ जानेवारी १९६१
१० माघ १८८२

**मुद्रक :**

**शरद कृष्णाजी सापळे**
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
मोरबाग रोड
नायगांव
मुंबई १४

**प्रकाशक :**

**वि. म. फणसे**
श्यामला प्रकाशन
६ अ, गिरगांव रोड
मुंबई ७

श्रीगजानन प्रसन्न

# अर्पण पत्रिका

माझ्या आजीनें माझे अगदी लहान पणा पासून दहावे वर्षापर्यंत बाबुवाडि-तांच्या व इतर उपदेशपर गोष्टी मला सांगितल्या, तसेंच माझे मनावर चांगले संस्कार केले. ते अनुभवा अंती मला उपयुक्त व मार्गदर्शक ठरले आहेत. त्या सर्वांचें स्मरून अत्यंत आदरानें व नम्रतेनें तिला हा मी लिहिलेला दादांच्या, धंद्याच्या व माझ्या वृत्तांत प्रेमानें अर्पण करीत आहें.

वासुदेव विश्वनाथ बेडेकर

गुरुवार ता. २८।९।१९८९

अनुक्रम ........ ........ दि: ........ ........
क्रमांक ........................ नों. दि: ........................

# पु र स्का र

१९१४ सालांतली गोष्ट. मुगभाटांत शांतारामाच्या चाळीच्या तळमजल्यावर एका चिमुकल्या जागेंत श्री. विश्वनाथराव बेडेकर यांनीं आपलें किराणा मालाचें दुकान थाटलें होतें. त्यांच्या हाताखालीं त्यांचा तेरा वर्षांचा वासुदेव नांवाचा मुलगा पुड्या बांधून देण्याचें काम करी. हे बेडेकर कोंकणांतून पोट भरण्यासाठीं मुंबईला आलेले. पण बरीच खटपट करूनहि त्यांचा कोठें नीट जम बसेना. शेवटीं हें दुकान सुरू केलें. त्यांत उधारी वाढत चालली. बाजारचें देणें अडीच हजार आणि वसूल न होणारें येणें चार पांच हजाराच्या घरांत! कसा चालायचा धंदा या तऱ्हेनें?

वासुदेवाचें नांव आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्यें घातलें होतें. त्याचा नंबर नेहमीं वर असे. पण दुकानांत मदतनीस हवा म्हणून दुसरी इयत्ता होतांच वडिलांनीं त्याला शाळेंतून काढलें. त्याच्या शिक्षणाला येथेंच पूर्णविराम मिळाला. एवढेंच नव्हे, त्याला विसावें वर्ष लागतें तोंच मोडकळीला आलेल्या या दुकानाचा सर्व भार एकट्या वासुदेवावर सोंपवून ते कोंकणांत आपल्या गांवीं रहावयास गेले.

स्वत: जवळ ना पैसा, ना शिक्षण, ना कोणी पाठीराखा अशा संकटांत सांपडलेल्या वासुदेवाच्या हातून हें दुकान पुढें कसें चालायचें? या परिस्थितीवर कोणती तोड सांपडणार? अशा माणसाला जगांत डोकें वर काढायला वाव तरी कितीसा? पहावें त्या बाजूला अंधार! पण त्या तशा बिकट अवस्थेशीं झगडत कसाबसा स्वत:चा गुजारा चालविणारे वासुदेवराव आज मुंबईत बारा चाळींचे मालक झाले आहेत!! त्यांनीं स्थापन केलेली कंपनी आज सालीना लाखो रुपयांचा व्यापार करीत आहे आणि त्यांचे नांव मसाल्याचें प्रमुख महाराष्ट्रीय कारखानदार म्हणून सर्वत्र मशहूर झालें आहे!!

वासुदेवरावजीचें हें यश अत्यंत कौतुकास्पद व अपूर्व आहे. "केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंचि पाहिजे" या समर्थांच्या उक्तीचेंच ते एक चालतें बोलतें प्रतीक होत. प्रयत्नाची कास धरूनच त्यांनीं हा उत्कर्ष संपादन केला. ते संकटाला डगमगले नाहींत, कष्टाला कंटाळले नाहींत व तशी वेळ येतांच साहस करायला कचरले नाहींत. त्यांची व्यापाराची तऱ्हा अत्यंत सचोटीची व ग्राहकाला संतुष्ट राखण्याकडे सदैव लक्ष. धंदा यशस्वी करण्यास आवश्यक असेच हे गुण. पण वासुदेवरावजींनी जो एवढा

अपूर्व भाग्योदय करून घेतला, त्याचें इंगित त्यांनीं आपल्या किराणा दुकानाला दिलेली तयार मसाल्याची जोड हें कुणाच्याहि सहज लक्षांत येईल.

हे मसाले प्रत्येक गृहिणी आपल्या गरजेप्रमाणें स्वतःच्या घरीं करत असते, खाना-वळींना तर ते पुष्कळच लागतात. त्यांचे कष्ट वांचवून त्यांना आयते कुटलेले चांगल्या प्रतीचे मसाले पुरवावयाचे ही वासुदेवरावजींनीं काढलेली नवीन कल्पना. ती यशस्वी ठरली. मसाल्याच्या जोडीला पापड, लोणचींहि पुरविण्याचें काम बेडेकर कंपनीनें हातीं घेतलें. मागण्या वाढत चालल्या, तसतशी कंपनीची भरभराट होत चालली व त्यांतूनच तिनें आजचें स्पृहणीय स्थान प्राप्त करून घेतलें.

कोणताहि धंदा अथवा व्यवसाय ही एक समाजाची सेवाच असते. आणि ती सेवा मनापासून व काळजीपूर्वक करणाऱ्यांचे समाजहि योग्य चीज केल्याशिवाय रहात नाहीं. हाच सिद्धांत वासुदेवरावजींच्या चरित्रावरून कोणासहि दिसून येईल.

स्वतःच्या परिश्रमानें कुठल्याहि क्षेत्रांत मोठें यश मिळविणाऱ्यांचें चरित्र म्हणजे एक अत्यंत चटकदार व स्फूर्तिदायक ग्रंथ असतो. आणि ही हकीकत स्वतः त्या व्यक्तीनें लिहिली असल्यास ती विशेषच परिणामकारक होऊं शकते. अशा व्यक्तीनें इतर कांहीं लेखन केलें नसलें अथवा साहित्याच्या प्रांताशीं त्याचा क्वचित्‌च संबंध आला असला, तरी त्यामुळें मोठेसें बिघडत नाहीं. कारण त्या व्यक्तीच्या आयुष्यांतील निरनिराळ्या घटना, त्याला आलेले विविध अनुभव व त्यानें झुंज दिलेलीं संकटें हे सर्व प्रसंग मुळांतच इतके चित्तवेधक असतात कीं, ते रोचक करण्यासाठीं निराळा "मसाला" मुळींच लागत नाहीं. उलट साध्यासुध्या घरगुती भाषेमुळेंच हें लेखन जास्त आकर्षक व वाचनीय होऊं शकतें. कारण त्यांत सत्यदर्शन असतें, जिव्हाळा असतो आणि बोधामृतहि असतें. श्री. वासुदेवराव बेडेकर यांच्या लेखणींतून उतरलेला प्रस्तुत जीवन–वृत्तांत या प्रकारचा आहे. मराठी भाषेंतील चरित्र–ग्रंथात ही एक फार चांगली व उपयुक्त भर घातल्याबद्दल श्री. अण्णासाहेबांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करूं इच्छितों.

या पुस्तकाचें खरें महत्त्व आकलन होण्यासाठीं आपल्या सद्यःस्थितीकडेहि थोडें पहावयास हवें. आपला महाराष्ट्र बुद्धिप्रधान, निर्भय व तेजस्वी वृत्तीच्या लोकांचा देश म्हणून ओळखला जातो. त्यानें इतिहासांत गाजवलेला पराक्रमहि तसाच अपूर्व आहे. पण हा पराक्रम व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत प्रकट करण्यासाठीं महाराष्ट्रानें यापुढें सरसावलें पाहिजे. त्याशिवाय आपला निभाव लागणें अशक्य.

हें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. कारण इतर गुजराथी, मारवाडी, सिंधी वगैरे जमाती ज्याप्रमाणें या क्षेत्रांत पिढ्यान् पिढ्या मुरल्या आहेत, त्याप्रमाणें आपली स्थिति नाहीं. त्यांच्याप्रमाणें महाराष्ट्रीयांना व्यापार–धंद्याचें बाळकडू मिळालें नसतें. पूर्वानुभवाचा हा अभाव त्यांना साहजिकच फार नडतो. त्यांना भेडसावणारी ही एक

बाब, तर कुठलाहि धंदा करायला वाटणारी लाज हा त्यांच्यापुढचा दुसरा बागुलबोवा. नोकरीइतका प्रतिष्ठितपणा व्यापाराला नाहीं. हा समाजाचा घातुक ग्रह यापुढें त्याच्या मनांतून लवकर दूर झाला पाहिजे. श्री. अण्णासाहेबांचेंच चरित्र पाहिलें तर त्यांनीं आपल्या उद्योगाला सुरुवात केली तेव्हां 'मसाले कुटणें व लोणचीं घालणें हा काय धंदा आहे!' अशी त्यांची हेटाळणी करण्यास पुष्कळांनीं कमी केलें नाहीं, असें दिसून येतें.

ही वृत्ति हळुहळू मावळत चाललेली दिसते, ही सुदैवाची गोष्ट. तथापि ज्याप्रमाणें बेडेकरांनीं साध्या मसाल्याच्या पुडींतून स्वतःचा उत्कर्ष गांठला, त्याप्रमाणें समाजाच्या अनंत गरजांचें विशाल क्षेत्र इतर तरुणांपुढें मोकळें आहे. त्यांत न कचरतां उत्साहानें शिरण्यास प्रस्तुत चरित्र त्यांस खात्रीनें प्रेरणा देऊं शकेल. अशा पुस्तकांचा हाच खरा उपयोग असतो.

श्री. अण्णासाहेबांनीं लिहिलेला हा जीवन–वृत्तांत त्यांच्या स्वतःच्या षष्ट्यब्दि-पूर्तीच्या व संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाचे प्रसंगीं प्रकाशित होत आहे, हा अतिशय समयोचित योग. या समारंभांत श्री. अण्णासाहेब व सौ. रखमाबाई या उभयतांची रौप्यतुला होणार आहे. 'जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी ॥' या तुकोबाच्या वचनाप्रमाणें त्यांचें हें सत्कार्य! या दान केल्या जाणाऱ्या रुप्याची प्रत्यक्ष किंमत किती होईल याची मला कल्पना नसली, तरी या जीवन–वृत्तांताच्या रुपानें होणाऱ्या त्यांच्या साहित्यिक देणगीची किंमतहि त्याहून कमी भरेल असें मला वाटत नाहीं. कारण या पुस्तकापासून स्फूर्ति मिळालेल्या तरुणांतून आणखीहि लाख मोलाचे कांहीं बेडेकर पुढें येण्याचा संभव आहे त्यांचीच महाराष्ट्राला खरीखुरी गरज आहे.

१४-१-६१ शं. वा. किर्लोस्कर

मराठी
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

# प्रास्ताविक

**मी** एकदां सहज दुकानांत बसलों असतां एक बरेच जुने ओळखीचे गृहस्थ मला भेटले व बोलतां बोलतां अजून किती वर्षें सर्व्हिस आहे असें विचारतां, 'अहो सर्व्हिस खलास, दोन वर्षांपूर्वीच रिटायर्ड झालों व तेंहि तीन वर्षें एक्सटेन्शन मिळून. सध्या मला साठावें वर्ष सुरू आहे' असें त्यांनीं मला उत्तर दिलें.

त्यानंतर मी माझ्या वयाचा हिशेब केला. तेव्हां मलाहि एकोणसाठावें वर्ष त्याच दिवशीं लागत असल्याचें माझ्या लक्षांत आलें. ती श्रावण शुद्ध तृतिया होती; व मी वनांतून पार पडलों होतों. ( एकावन्न ते अठ्ठावन याला वन म्हणतात. )

कांहीं लोक साठ वर्षें झालीं कीं षष्ठयब्दिपूर्ति म्हणून शांत करतात, तशी आपणहि केल्यास काय हरकत आहे, असा विचार त्यावेळीं माझ्या मनांत आला व त्याच वेळीं, वडिलांचें कांहीं तरी टिकाऊ असें स्मारक आपल्या हातून व्हावें असेंहि वाटलें. नंतर विचार करतां करतां आपण आपली या शांतिबरोबर सुवर्णतुला जरी जमण्यासारखी नसली तरी रौप्यतुला करावी का? माझी सौभाग्यवती माझा संसार दक्षतेनें व शहाणपणानें माझ्याबरोबर चाळीस वर्षें करीत आहे तर, तिचीहि रौप्यतुला कां करूं नये! तीहि आतां वनांत आलेली आहे, म्हणजे तिलाहि एकावन्नावें वर्ष चालू आहे, असेंहि विचार एका पाठोपाठ मनांत आले.

त्यानंतर उभयतांची रौप्यतुला करण्याचा विचार ठरविला व उभयतांची तुला करण्यांत कांहीं धार्मिक अडचणी किंवा लोकापवाद येण्याचा संभव आहे कीं काय, म्हणून विचारवंत व अनुभवी अशा पुण्यशील माणसांना पत्रें पाठवून त्यांचीं मतें विचारतां तींहि अनुकूलच आलीं, म्हणून मी उभयतांची रौप्यतुला करण्याचा संकल्प कायम केला.

त्यानंतर मनांत आलें कीं, आम्हीं जरी फारसे मोठे नसलों तरी माझे कांहीं अनुभव लोकांना उपयुक्त होतील, निदान आपल्या कुटुंबियांना तरी ते कळतील ना! बस पुरे. म्हणून मी वडिलांचा, त्यांनीं स्थापन केलेल्या धंद्याचा व माझा वृत्तांत लिहिण्याचें निश्चित केलें.

## वृत्तांत लिहिण्याचा निश्चय

वडील स्वर्गवासी झाले त्या वेळेपासून अशा तऱ्हेचा वृत्तांत लिहिण्याचें माझ्या मनांत होतेंच. दोन चार वेळां तसा मी प्रयत्नहि केला होता व मधून मधून कोणी तरी मासिकवाले मुलाखत म्हणा, चरित्र म्हणा असें कांहीं तरी विचारून ते आपल्या मासिकांतून छापतहि होते. पण ज्यावेळीं ते विचारतात त्यावेळीं आपण सर्वच कांहीं त्यांना सांगूं शकत नाहीं व तेवढें ते छापणारहि नाहींत. कांहीं वेळां तर विपर्यस्तहि माहिती छापली जाते तें निराळेंच.

असें होत असल्यामुळें आपण स्वस्थ चित्तानें वृत्तांत लिहून काढावा असें मनाशीं ठरवून मागचे थोडे थोडे लिहिलेले वृत्तांत वाचावयास घेतले. तेव्हां प्रत्येक वेळीं तपशिलांत थोडाफार फरक झालेला दिसला. म्हणून पुन्हा पहिल्यापासून लिहिण्यास सुरुवात केली. पण पुन्हांहि तसेंच होऊं लागलें; म्हणून आमचा दुसरा मुलगा चि. श्रीधर, जो नुकताच आपलें म्हैसूर येथील शिक्षण संपवून परत घरीं आला होता, त्याला मी सहज विचारलें कीं, मी आपला वृत्तांत लिहिण्याचा विचार करीत आहें पण मला तें नीटसें जमत नाहीं; तरी मी सांगेन तसें लिहून घेण्याचें तुला जमेल कां ? तेव्हां तो एकदम 'हो' म्हणाला व त्यानंतर व्यास मुनींनीं महाभारत जसें प्रत्यक्ष गणपतीकडून प्रत्येक श्लोक समजून घेऊन लिहावयाचा अशी कबुली करून लिहून घेतलें, त्याप्रमाणें श्रीधर-कडून मी सांगेन तें त्यानें समजून घेऊन लिहिण्याचें कबूल करून घेऊन मी कार्यास प्रारंभ केला. त्याप्रमाणें त्यानें माझ्या सांगण्याप्रमाणें हा वृत्तांत लिहून घेतला आहे.

माझ्या वाचनांत आतांपर्यंत जे वृत्तांत आले त्या वृत्तांतांची सर जरी या वृत्तांताला येण्यासारखी नसली तरी पण तो अगदींच क्लिष्ट व कंटाळवाणा होणार नाहीं असें मला वाटतें. माझ्या कांहीं मित्रांचे व नातेवाईकांचेंहि मत अनुकूल पाहून हा वृत्तांत छापण्यास देण्याचें मी धाष्ट्य करीत आहें.

जरी माझ्या नातलगांचें व स्नेह्यांचें मत या आत्मचरित्राच्या बाबतींत अनुकूल झालें असलें तरी वाचकांनीं मात्र तें वाचूनच आपलें मत बनवावें.

मला दुकानदारीचे जमाखर्च व पत्रव्यवहारापलीकडे लिहिण्याचा अनुभव नाहीं व मी अद्याप इतर असें कांहींच लिहिलेलेंहि नाहीं. म्हणून या वृत्तांतांत कांहीं वैगुण्य अगर कमीपणा किंवा असलेंच कांहीं तरी अयोग्य असें असल्यास वाचकांनीं मला उदार अंतःकरणानें क्षमा करावी.

माझ्या आठवणीप्रमाणें व पडताळे पाहून वडिलांपासून नातवंडांपर्यंत ज्या ज्या पत्रिका माझ्या संग्रहांत आहेत, त्यांच्या सहाय्यानें कोणत्या सालीं काय काय गोष्टी घडल्या ते ते दिवस नक्की ठरवून बहुतेक तारखा दिल्या आहेत; ज्या तारखांचे खुलासे मला मिळाले नाहींत, त्या त्या वेळीं सालाच्या सुरुवातीस, अथवा अखेरीस असें लिहिलें आहे. वृत्तांत लिहितांना तो पुष्कळदा स्मरणाप्रमाणेंच लिहावा लागतो हें वेगळें सांगावयास नकोच.

वडिलांच्या स्वर्गवासामुळें माझ्या मनाला जो धक्का बसला त्यामुळें मला असें कांहीं तरी लिहून ठेवण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें १९५२ च्या सुरुवातीपासून १९६० ऑगस्टच्या २३ तारखेपर्यंत स्मरणपूर्वक केलेल्या नोंदी समोर घेऊन तारीख २४ ऑगस्ट १९६० ( श्रावण वद्य ९ शके १८८२ ) रोजीं हा वृत्तांत लिहावयास घेतला व नोव्हेंबर १९६० अखेर पूर्ण केला आहे. सन १९१० पर्यंतचा इतिहास माझ्या आजीनें वेळोवेळीं मला सांगितल्याप्रमाणें स्मरणपूर्वक लिहिला आहे.

या वृत्तांतांतील गाभा बरोबर आहे. तारखा क्वचित् इकडे तिकडे होण्याचा संभव आहे.

मुंबई
३० नोव्हेंबर १९६० }

वा. वि. बेडेकर

# मनोगत

माझे परमपूज्य वडील तीर्थरूप विश्वनाथ पर्शराम बेडेकर, यांनीं ज्या धंद्याची स्थापना केली व जो आतां व्ही. पी. बेडेकर आणि सन्स (प्रायव्हेट) लिमिटेड या नांवानें चालू आहे, तो धंदा व मी स्वतः यांच्या जीवन-वृत्तांताची माहिती पुढील पिढ्यांतील नातवंडांपतवंडादिक वंशजांना कळावी व या धंद्यामागें किती तपश्चर्या आहे याची कल्पना त्यांना यावी, या उद्देशानें हा वृत्तांत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. याचा उपयोग इतरहि होतकरू धंदेवाल्यांना व सर्वसामान्य वाचकांनाहि होण्याचा पुष्कळच संभव आहे.

माझे पणजोबा ती. त्रिंबक सदाशिव बेडेकर यांचें व्यावहारिक व संस्कृत शिक्षण झालेलें असूनहि ते व्यापार करीत. त्यांच्या व्यापारासंबंधींची माहिती माझी आजी मला नेहमीं सांगत असे. मी आजीजवळ वयाच्या दहाव्या वर्षापर्यंतच होतों. पण त्या लहान वयांतहि ती माहिती ऐकून आपणहि आपल्या पणजोबाप्रमाणें व्यापार करावा असें मला नेहमीं वाटत असे.

आमच्या वडिलांनीं स्थापन केलेला मूळ धंदा किराणामालाचा होता; व त्या रूपानें त्यांनीं आम्हांला धंदा करावयास मुंबईत शांतारामाची चाळ, मुगभाट येथें जागेची निर्मिती करून दिली होती.

माझ्या पणजोबांच्या व्यापारासंबंधाची जी माहिती माझी आजी वेळोवेळीं मला सांगत असे, त्यावरून स्फूर्ति घेऊन, तसेंच आपल्या भावंडांना नोकरीसाठीं दुसऱ्या ठिकाणीं जावें लागूं नये व सर्व भावांचा समावेश याच धंद्यांत व्हावा म्हणून मी आमच्या मूळ किराणामालाच्या धंद्याला मसाले, लोणचीं, पापड इत्यादि वस्तु विकण्याची म्हणजेच कारखानदारी स्वरूपाची जोड दिली. त्या माझ्या कल्पनेप्रमाणें माझ्या भावांचा तर समावेश या धंद्यांत झालाच व मुलांचा समावेशहि होत आहे. तसेंच पुढील पिढ्यांतील वंशजांचाहि समावेश करून घेण्याइतकें या धंद्याला जगभर अफाट क्षेत्र आहे.

या वृत्तांताच्या वाचनानें पुढील पिढ्यांना स्फूर्ति मिळून त्या या धंद्याशींच समरस व्हाव्यात व या मसाले, लोणचीं, पापड इत्यादि भारतीय पद्धतीच्या खाद्यवस्तूंचा जगभर प्रसार करून त्यांनीं नांवलौकिक व संपदा मिळवावी अशी माझी हा वृत्तांत लिहिण्यामागील सुप्त इच्छा आहे.

माझ्या कुटुंबियांप्रमाणेंच या वृत्तांताच्या वाचनानें इतरहि होतकरू धंदेवाल्यांना चाकरीऐवजीं स्वतंत्र धंद्याच्या रूपानें आपल्या पायावर उभे राहूं इच्छिणाऱ्या माझ्या देशबांधवांना कांहीं उपयोग झाला, थोडी स्फूर्ति मिळाली, तर तें मी माझें भाग्यच समजेन.

या ठिकाणीं कै. हरि नारायण आपटे यांनीं एका इंग्रजी कवीच्या कवितेचें केलेलें भाषांतर नमूद करावें असें वाटतें. ही कविता जुन्या मराठी शाळाखात्याच्या पांचव्या पुस्तकांत होती.

उठा उठा, तर निजूं नका !
' होईल कैसें ' म्हणूं नका
कशाहि विघ्ना भिऊं नका
दीर्घोद्योगा सोडूं नका
' धीर धरी तो गंभीर ' असें शिका शिकारे विसरूं नका

कविता साधी, सोपी आणि सरळ आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाच्या जीवनांत याहून दुसरें कांहीं सूत्र नाहीं. मी स्वतःला तरुण पिढीला संदेश देण्याएवढा मोठा समजत नाहीं; माझ्या या जीवन-वृत्तांताचाहि तो उद्देश नाहीं. परंतु माझ्या वयोमानाप्रमाणें जे मला माझ्या मुलांमुलींसारखे आहेत, त्यांना 'दीर्घोद्योगी व्हा म्हणजे यशोधन प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाहीं.' हाच माझा संदेश आहे.

मुंबई
१ जानेवारी १९६१

वा. वि. बेडेकर

# अनुक्रमणिका

**पुरस्कार** पृष्ठ सात – नऊ

**प्रास्ताविक** पृष्ठ अकरा-बारा

**मनोगत** पृष्ठ तेरा–चौदा

**१ थोडा पूर्वेतिहास** पृष्ठ १ ते ८

गोवळ गांवांतील ब्राह्मण घराणीं (२); आमचे पूर्वज (२); बेडेकर घराणें (३); तिसरें व मूळ घराणें आमचें (४); आमच्या मूळ घराण्यांतील माणसें (४);

**२ आमचे पणजोबा** पृष्ठ ९ ते १७

वडिलांचे व काकांचें शिक्षण (१२); वडिलांची व्यवसायाला सुरुवात (१३); दादांनीं दुकान घेतलें (१५); भांडवल दादांचें–धंदा तिघांचा (१६); भागिदारीचा धंदा नको (१७);

**३ माझा जन्म व बाळपण** पृष्ठ १८ ते २५

माझें मुंबईत आगमन (१९); शांतारामाच्या चाळींत दुकान (२०); रोखीने माल आणण्याचा प्रघात (२१); शिक्षणाला कायमची रजा (२१); आईचा स्वर्गवास नि दादांचें दुसरें लग्न (२३); "फ्लू" तापावरील जुना उपाय (२४);

**४ माझा विवाह** पृष्ठ २६ ते ३३

जबाबदारी वाढल्याची जाणीव ( २७ ); मसाले कुटण्यास सुरुवात ( २८ ); दादांनीं दुकानांतून लक्ष काढून घेतलें ( २९ ); उधारीवर उपाय योजना ( २९ ); यांच्याकडून पैसे कसे वसूल होणार ? ( ३० ); सचोटीनें धंदा करण्याची इच्छा ( ३१ ); पत्रकाचा योग्य तोच परिणाम ( ३१ ); उधारी बंद झाल्यावर... ( ३२ ); स्वच्छ मालाला गिऱ्हाईक फार ( ३३ );

**५ धंद्याचा विस्तार** पृष्ठ ३४ ते ४१

मुगभाटांतील दुकानाची दुरुस्ती ( ३४ ); कारखान्याच्या जागेला नोटीस ( ३५ ); दादरची तिसरी शाखा ( ३५ ); कोटांतील शाखा ( ३६ ); ठाकुरद्वार शाखेला नोटीस ( ३७ ); भागीदारी व लिमिटेड कंपनीमध्यें रूपांतर ( ३९ );

लिमिटेड कंपनींत रूपांतर ( ३९ ); माझ्यावर झालेली पोलीस केस ( ऑगस्ट १९४२ ) ( ४० );

**६ स्वातंत्र्य प्राप्तीनंतर—!** पृष्ठ ४२ ते ५२

कारखान्यासाठीं जागेची खरेदी ( ४३ ); १९४८ ते ६० पर्यंत घडलेल्या घटना ( ४३ ); आमच्या धंद्यांतून दिलेल्या ठळक देणग्या ( ४६ ); राजापूरचें सूतिकागृह ( ४७ ); महेश्वरच्या देवळाच्या जीर्णोद्धार वडिलांचें लहानसें स्मारक ( ४८ ); महेश्वरावर लघुरुद्र ( ५० ); अडचणीचें अकल्पित निवारण ( ५० ); कोंकणवासी पूरपीडितांना सहाय्य ( ५१ );

**७ आमचीं घरें** पृष्ठ ५३ ते ६६

त्याच घराचें नूतनीकरण ( ५४ ); आमचीं दादरचीं घरें ( ५४ ); पहिल्या घरबांधणीला प्रारंभ ( ५५ ); गोवळच्या घराची पुनर्रचना ( ५६ ); योग्य कामगार वर्गाची निवड ( ५७ ); घरबांधणी मजुरीच्या पद्धति ( ५८ ); कामगार सुखी तर घर सुखी ! (५८); लोकांचें भाकित खरें ठरलें (५९); दुसरी मालमत्ता (६०); सर्वांचीं प्रतिकूल पडलेलीं मतें ( ६२); रकमेच्या उभारणीचे प्रयत्न (६३); तीन चाळींचे आम्हीं मालक बनलों ( ६३ ); दुसऱ्या इमारतीच्या कामास प्रारंभ (६४); बारा चाळींच्या मालकीचें भाग्य ( ६५ );

**८ आमच्या रहावयाच्या जागा** पृष्ठ ६७ ते ७०

मातोश्रीचें निधन ( ६७ ); घरमालकाची जागा खालीं करण्याची नोटीस ( ६८ ); वाढत्या संसारासाठीं जागेची सोय ( ७० );

**९ आमचा माल तयार करण्याच्या जागा** पृष्ठ ७१ ते ७६

आजारांतून लोणच्याची मूळ कल्पना ( ७१ ); आंब्याच्या लोणच्यास सुरुवात ( ७२ ); इटालियन लिंबाचें लोणचें ( ७४ ); आमच्या लोणच्याला पारितोषिक ( ७४ ); पापडांचें उत्पादन ( ७४ ); बोट धंद्यांत बसलेली खोट ( ७५ ); फिल्ड इंजिनियरिंग कंपनी ( ७५ ); नोकर वर्गासाठीं तरतूद ( ७६ );

**१० माझे कांहीं वैद्यकीय अनुभव** पृष्ठ ७७ ते ८३

ऑपरेशनवर आलें होतें; पण लोणच्यावर निभावलें ! ( ७७ ); त्रयस्थ गिऱ्हाईक पण मित्राहून मित्र ( ७८ ); कोळणीच्या रूपानें धन्वंतरीच भेटला ? ( ७८ ); मांडीला धांवरें झालें ! ( ७९ ); सापसंधीच्या पाळाचा गुण ! ( ८० ), बॅ. जयकरांना आलेला औषधाचा गुण ( ८० ); पाव मण म्हणजे किती शेर ! ( ८१ ); खसखशीच्या बोंडाचा प्रताप ( ८१ ); कॉलऱ्यावरचें औषध ! ( ८२ );

**११ लहानपणच्या आठवणी** पृष्ठ ८४ ते ९२

बोली केली होतीस; मग आलास कां ? ( ८४ ); आपला हात उताणा नको, उपडाच असला पाहिजे ! ( ८५ ); वडील घराण्याचा अक्षतीचा मान ( ८५ );

आमची वारणी गाय ( ८५ ); आजीनें सांगितलेली दादांची आठवण ( ८६ ); दादूभटजींचा व्यापार ( ८६ ); एका दिडकींत मिर्च्या, कोथिंबीर, आलें, लिंबू ( ८७ ); पहिला नंबर; पण जागा तिसरी ! ( ८७ ); सर एक भोपळा नसून एकावर दोन भोपळे आहेत ! ( ८८ ); काका घरचा पुतण्या वाळायचाच ! (८८); जळत्या चितेजवळ काढलेली एक रात्र ( ८९ ); छबिन्याची सोय; पण रहाण्याची गैरसोय ( ९० ); ति. दादांचा द्वितीय संबंध ( ९१ ); आजारीपणांतच कोंकणचा प्रवास ( ९१ );

## १२ मोठेपणाच्या आठवणी पृष्ठ ९३ ते ११७

माझ्या लग्नाची आठवण ( ९३ ); शंभर वर्षांनंतर आलेला महालक्ष्मी पूजनाचा योग ( ९४ ); दादा गांवीं रहाण्याचें 'महत्त्वाचें कारण' ( ९४ ); मसाल्याच्या जाहिरातीस प्रारंभ ( ९४ ); गोविंदाचा झालेला रामराम ! ( ९४ ); भुताटक्या बापट ( ९५ ); आश्चर्यकारक अपघात ( ९६ ); भुताटकीचा समजूतदारपणा (९७); सत्तेनें घर असावें असें कां वाटलें ? ( ९८ ); पुणेरी टांगेवाल्याचा अनुभव ( ९९ ); हेजीबकाकांचा प्रेमळ पाहुणचार ( ९९ ); पुणेंकर, पण खरा मार्गदर्शक ! ( १०० ); गृहस्थधर्म ( १०१ ); मुक्या प्राण्यांचें मार्गदर्शन ( १०२ ); गजाननाचें लग्न ( १०२ ); नवरा मिरजेला, बायको कोल्हापुरास ( १०३ ); होडी जरा थांबवायला सांगा ! (१०३); दुकानदारींतले चोरांचे अनुभव (१०४); भाडेकरूंच्या पेंचांतून सुटका ( १०५ ); गिरनार आणि द्वारकेची यात्रा ( १०६ ); चित्तपावन संघाची सभा (११०) गांधींचा खून आणि ब्राह्मणांवर संकट (१११); आम्ही सारे भाऊ वेगळे असूनहि एकत्र आहोंत ! (११३); मुंबईच्या गोदींत झालेला स्फोट (११३); सासूबाईंना देवाघरची चिठ्ठी ! ( ११५ ); सासूबाईंची देवाघरची चिठ्ठी पुन्हां परतली ( ११६ );

## १३ संकीर्ण आठवणी पृष्ठ ११८ ते १२४

सत्संगतीचा लाभ (११८ ); अण्णा प्रश्न बाघ ( ११८ ); सात मुलींनंतर मुलगा झाला ( ११९ ); प्रश्न बघण्याचा नाद सुटला ( १२० ); जेवून खाऊन नोकरी ( १२० ); जुनी दुकानदारी व जुनीं गिऱ्हाईकें ( १२१ ); धंदेवाल्यांना समाजांत कमी मान ( १२१ ); घरीं नाहीं तें दारींहि नाहीं ( १२२ ); दक्षिणी दुकानदारांवर अविश्वास ( १५२ ); एका अजब वाण्याची गोष्ट ! ( १२३ ); वाण्याचें बिल आपलें कायमच ( १२४ );

## १४ माझ्या हातून घडलेली लोकसेवा पृष्ठ १२५ ते १२९

जळितांना मदत ( १२५ ); आयुर्विद्या प्रसारक मंडळास सहाय्य ( १२६ ); गोवळ बंदराची डागडुजी ( १२७ ); आसाम जलप्रलय सहाय्य ( १२७ );

व्यापार धंद्यांत पिढ्या गेल्या पाहिजेत ( १२७ ); आमच्या बेडेकर कुटुंबाची वंशावळ ( १२९ );

१५ आमच्या कुटुंबांतील व्यक्ति पृष्ठ १३० ते १४४

माझी आजी ( १३० ); बाई [माझी चुलत चुलती] ( १३१ ); आमचे काका व काकू ( १३२ ); दादा [माझे वडील] ( १३३ ); माझी आई ( १३५ ); माझी सावत्र आई [पार्वतीबाई] ( १३५ ); सीताराम ( १३७ ); गोविंदा [नाना] ( १३८ ); दुसरा बंधु बाळू ( विष्णु ऊर्फ आबा ) ( १३९ ); गजानन [भाऊ] ( १३९ ); रमेश ऊर्फ काका ( १३९ ); सौ. रमा ( १४० ); सौ. सुशिला ( १४० ); सौ. विजया ( १४० ); माझी सौभाग्यवती ( १४० ); प्रभाकर ( १४१ ); माझे मुलगे ( १४२ ); माझ्या मुली ( १४२ ); मधली मुलगी मीनाक्षी ( १४२ ); धाकटी मुलगी सुनंदा ( १४३ ); सौ. सुधा ऊर्फ शैलजा ( १४३ ); सौ. मंदा ऊर्फ सौ. पद्मजा ( १४३ ); नातवंडें ( १४३ );

१६ निकटवर्तीयांचे दोन शब्द पृष्ठ १४५ ते १५१

ती. अण्णांबद्दल मला काय वाटतें ? ( १४५ ); आमचे अण्णा ( १४६ ); सासूबाईंचे आशीर्वाद ( १४७ ); जिवलग मित्रांचा पाठिंबा ( १४८ ); प्रिय मित्राच्या पुत्राचें पत्र ( १५० ); श्रीगुरुजी काशिनाथ शास्त्र्यांचे आशीर्वाद ( १५० );

१७ उपसंहार पृष्ठ १५२ ते १५६

आपलीं घरें स्वतः बांधावींत ( १५३ ); व्यापाराचा उत्कर्ष हाच राष्ट्रोत्कर्ष ( १५४ ); व्यावसायिक नातें निर्माण करा ! ( १५५ ); राष्ट्रीय वृत्ति आणि आस्तिक्य-दृष्टि ( १५५ ) कल्पकतेची जोड हवी ! ( १५५ );

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३२५४८ विः
नों: दिः

# थोडा पूर्वेतिहास

आमचें बेडेकर घराणें मूळ देवाचें गोठणें येथील असून घराण्याचा व्यवसाय शेती व संस्कृत शिकून पुराण सांगण्याचा असे. देवाचें गोठणें हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यांत राजापुरापासून ५–६ मैलांवर आहे. या गांवांत फार प्राचीन असें श्री. भार्गवरामाचें मंदिर असून तें ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांना इनाम आहे. या गांवांत आमची कांहीं जमीन कूळ कायदा होईपर्यंत होती. आतां त्या जमिनी कुळांच्या नांवानें लागल्या आहेत.

आमचे पूर्वज इ. स. १७५० ते ५५ च्या सुमारास गोवळ येथील सुभेदार श्रीमंत रेडीज यांच्या बोलावण्यावरून गोवळास आले. श्रीमंत रेडीज यांना गोवळच्या आजुबाजूचीं नऊ गांवें इनाम होतीं. त्या गांवांची वसुली करावयाची व हिशोब ठेवावयाचे हा त्यांचा व्यवसाय होता व त्याबद्दल ‘ सुभेदार ’ अशी पदवी होती. त्यांचा वाडा चार चौकड्यांचा असून तो केमळ्याचा ( गवती ) होता. त्यांच्या दारांत पाटाचें पाणी सदैव भरपूर येत असे. ते गडगंज श्रीमंत होते. सध्या त्यांचे कोणीहि वंशज गोवळ गांवांत नाहींत व त्यांचे घरभाट शेजें या नांवाचें आमच्याकडे खरेदीनें वही-वाटीस आहे.

इ. स. १७५० ते ५५ च्या आसपास गोवळ येथील श्रीमहेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार श्रीमंत रेडीज यांनीं केला. त्यांनीं त्यावेळीं देवालयापुढें सभामंडपहि बांधला होता. त्या देवाचे ( श्रीमहेश्वराचे ) पुजारी जरी गुरव होते, तरी पुराण सांगण्याकरितां म्हणून आमच्या पूर्वजांना श्रीमंत रेडीज यांनीं निरंतर योगक्षेम चालविण्याचें आश्वासन देऊन मोठ्या सन्मानानें वाजत गाजत पालखींतून गोवळास आणलें होतें; तेव्हांपासून बेडेकर घराण्याचें वास्तव्य गोवळास आहे.

गोवळ हें गांव जैतापूर–राजापूर खाडी किनारीं राजापुरापासून तीन मैलांवर आहे. गांवाची लांबी खाडी किनारीं सुमारें चार मैल व रुंदी सुमारें दीड मैल आहे. गांवांत मळे जमिनी पुष्कळ असून त्या सुपीक व दुपिकी आहेत. या गांवांत पूर्वी फारच जंगल होतें. राजापूर टोंकाकडील अर्ध्या गांवाला ‘वरचें गोवळ’ व उरलेल्या भागाला वन असें नांव आहे. या गांवांत श्रीमहेश्वराच्या देवळाशिवाय नवलादेवी, रामेश्वर व मारुती अशींहि दुसरीं देवळें आहेत. अलिकडील काळांत मारुतीच्या देवळांतच

विठोबा रखुमाईची स्थापना केलेली असून श्रीदत्तात्रेयाच्या पादुकांची स्थापना लहानसें देवालय बांधून श्री. पांडुरंग गोपाळ परांजपे यांनीं आपली मातोश्री व चुलती यांच्या स्मरणार्थ केली आहे.

## गोवळ गांवांतील ब्राह्मण घराणीं

आमचे पूर्वज गोवळ गांवीं येण्यापूर्वी बखले व ठाकूरदेसाई अशीं दोन ब्राह्मण घराणीं या गांवांत होतीं.

श्री. बखले हे श्रीमंत रेडीज यांचे कारभारी व ठाकूरदेसाई हे कारकून. बखले हे कोणत्या गांवाहून आले याची मला माहिती नाहीं. सध्यां त्यांचे वंशज नागपूर येथें धनतोलींत स्वतःच्या घरांत राहातात. माझी सावत्र बहीण गंगू हिच्या ( ऑल इंडिया रिपोर्टरचे मालक आप्पासाहेब चितळे यांच्या ) घराशेजारींच श्री. बखले यांचें घर आहे. सध्यां गोवळ येथें त्यांचे कोणीहि वंशज राहात नाहींत. परंतु श्री महेश्वराच्या दर्शना-करितां माझ्या आठवणींत दोन-चार वेळां त्या कुटुंबांतील कोणी तरी गोवळाला येऊन गेलेले आहेत.

श्री. ठाकूरदेसाई हे राजापूर तालुक्यांतीलच कळसवली गांवाहून आले. अजून त्यांचे एक वंशज श्री. पांडुरंग जनार्दन ठाकूरदेसाई हे सहकुटुंब याच गांवांत सुखासमाधानानें राहात आहेत. पण गेल्या वर्षापासून तेहि कांहीं उद्योगधंद्याकरितां बाहेर गेले आहेत. त्यांचे वडील बंधू श्री. बंडोपंत ठाकूरदेसाई हे पुणे ते मुंबई असा “ प्रवाशी ” म्हणून कांहीं उद्योगधंदा करितात. त्यांच्या धंद्यांत त्यांना मदत करण्यासाठीं सध्यां श्री. पांडुरंगपंत हे पुण्याला असतात. ठाकुरदेसाई हे पूर्वी कायम गोवळ येथें राहात नसत, येऊन जाऊन असत.

आमचें घराणें गोवळ येथें आल्यानंतर शेवडे, बापट, लेले, काळे, साठे, रानडे, परांजपे, गोसावी ( जोशी ) गोखले, महाजन अशीं सुमारें तीस पस्तीस घराणीं तेथें स्थायिक होण्यासाठीं आलीं होतीं. त्याशिवाय तिल्लोरी कुणबी, सोनार, सुतार, कुंभार, न्हावी, भंडारी, तेली, वाणी, महार व चांभार ज्ञातीचीं मिळून सुमारें दोनशें घरें आमच्या या गांवांत होतीं.

## आमचे पूर्वज

आमचे पूर्वज गोवळ गांवीं आल्यानंतर त्यांनीं श्रीमहेश्वराच्या मंदिरांत पुराण सांगण्याचा व्यवसाय सुरू केला. त्या काळांत लागवडीसाठीं सुभेदारांकडून जमिनी मिळत. कांहीं काळानें आतां जेथें आमचें घर आहे, त्याच जागेंत आमच्या पूर्वजांनीं राहण्यासाठीं घर बांधलें. घरालगतच नदी किनाऱ्याला कांहीं शेतजमिनीहि घेतल्या व शेतीचाहि उद्योग ते करूं लागले. आमच्यामागून आलेल्या ग्रामस्थांपैकीं कांहींचीं घरें आमच्या घरालगतच होतीं. पण त्यांना लागवडीसाठीं मिळालेल्या शेतजमिनी खालच्या गोवळांत ( वनांत ) होत्या. शेतांत लागवड केल्यानंतर रोज रात्रीं पावसांतून घरीं येणें हें

त्रासाचें वाटल्यावरून त्यांनीं खालचे गोवळांत बैलपाडे बांधण्यासाठीं म्हणून मांगर (गोठे) बांधले. व बैलपाडे तेथें बांधून रात्रीं ते वस्तीस घरीं येत. पुढें घरीं वस्तीस येणेंहि त्रासाचें वाटल्यावरून तेहि तिकडेच राहूं लागले व मांगरांचींच पुढें घरें झालीं. सध्यां वरच्या गोवळांत बेडेकर, देसाई, गोसावी (जोशी) अशीं तीनच ब्राह्मण घराणीं असून बाकी सर्व ब्राह्मण वस्ती खालच्या गोवळांत आहे.

आमची शेती घरालगत व खालच्या गोवळांत अशी दोन्ही ठिकाणीं असल्यामुळें आमचे पूर्वज घरींच राहून दोन्हीकडील शेती करीत. घरानजिकच्या शेतांत पेरणी करून तें रोप काढून त्याचे तराफे बांधून ते नदीच्या वाहणींत सोडीत. त्या तराफ्यांवर एक मनुष्य बसे व तो तराफा इष्ट स्थळीं शेतावर ओढून घेऊन तेथें लावणी लावीत.

त्या काळांत शेती भरपूर पीक देत असे, सरकार धारा धान्याच्या रूपांत असे व दोन तीन वेळ जेवणाव्यतिरिक्त इतर कसलाच फारसा खर्च नसे. त्या काळांतील सर्व ग्रामस्थ सुखी व समाधानी असत. कोणाला कांहीं अडचण असल्यास ते एकमेकांच्या सोईनें भागवीत. त्या काळांत आमचा गांव सुखी व समृद्ध होता.

## बेडेकर घराणें

बऱ्याच वर्षांच्या वास्तव्यानंतर कुटुंबविस्तार वाढल्यामुळें, त्याच ठिकाणीं तीन चार घरें झालीं. या सर्वांचाच निर्वाह शेतीवर होण्यासारखा नव्हता, म्हणून प्रत्येक घरांतून कांहीं पुरुष आपल्या कुटुंबासह देशावर कऱ्हाड, मिरज, सोलापूर, ग्वाल्हेर या गांवीं गेले व तेथें स्थायिक झाले. तसेंच उत्तर कोकणांत पनवेल व आपटें येथें कांहीं कुटुंबें गेलीं. त्यांपैकीं आपटें येथील घराणें अगदीं शेवटीं गेलेलें असून ते माझे चुलत आजोबाच होते. तदनंतर गोवळ गांवांत बेडेकरांचीं फक्त तीनच घराणीं शिल्लक राहिलीं होतीं. त्यापैकीं श्री. सखारामपंतांच्या घराण्यांत आतां कोणी नाहीं. दुसरें व्यंकाजीपंतांचें; सध्यां त्यांचे एक नातू ती. दत्तोपंत हे आपल्या मातोश्री व कुटुंबासह गोवळ येथेंच राहतात. त्यांच्या मातोश्रींचें वय ९० वर्षांच्या आसपास असून प्रकृति उत्तम आहे. ती. दत्तोपंत हे शेती व गांवांतच दुकानदारी करून आनंदानें व सुखासमाधानानें गोवळांतच रहात आहेत. त्यांचे मुलगे व पुतणे कांहीं मुंबईत व इतरत्र रहात असून ते सर्व सुस्थितींत आहेत. त्यांपैकीं दामोदर वामन या पुतण्यानें हैद्राबाद येथें स्वतःचें घर बांधलें असून ते पर्शुराम पॉटरी व इतर कांहीं कंपन्यांचे एजंट आहेत.

दुसरे एक पुतणे विद्याधर नारायण हे डॉक्टर असून, ठाण्याला रहातात. त्यांनीं आपल्या वडिलांच्या नांवानें एक मोठी इमारत बांधली असून ते जनरल हॉस्पिटल व सूतिकागृह चालवितात व त्याच इमारतींत ते राहातात.

सदर डॉक्टर विद्याधर नारायण बेडेकर हे मुंबईतील दानशूर व कर्तबगार तसेच धडाडीचे व्यापारी श्री. के. ग. तथा बाबुराव जोशी (ज्ञानसागर लिथो प्रेसचे मालक)

यांचे जामात होत. त्यांची प्रॅक्टिसहि चांगली आहे. तसेंच त्यांच्या हाताला यशहि चांगलें आहे. याशिवाय दत्तोपंतांचे आणखी चार पांच पुतणे मुंबईत रहात असून, ते नोकरीपेशांत व सुस्थितींत आहेत.

## तिसरें व मूळ घराणें आमचें

आमचें घर हें गोवळला आलेलें मूळ घराणें आहे. परंतु सध्यां आम्हांपैकीं कोणीच तेथें राहात नाहीं. १९५१ सालीं वडील व १९५२ सालीं माझी सावत्र आई स्वर्गवासी झाल्यानंतर आमच्याकडे स्वयंपाकाला असलेली बाई श्रीमती चंद्राक्का ठाकूर व गडी गंगाराम खांबल अशीं दोघें तेथें राहात असत.

वडील व मातोश्रीच्या हयातीपर्यंत आम्हां बंधूंपैकीं चि. बाळू व चि. गजानन यांपैकीं कोणी तरी वडिलांजवळ कायमचे असत. वडील व मातोश्रीच्या निधनानंतर दोघे बंधूंहि मुंबईला आले व येथील आमच्या मसाले, पापड, लोणचीं या धंद्यांतच समरस झाले. यापैकीं बाळू हा मुगभाटच्या दुकानांत व गजानन हा कोटांतल्या दुकानांत कामें करतात.

श्री. चंद्राक्काकाकू या वृद्ध झाल्यामुळें आपल्या मुलीकडे घोपेश्वर येथें राहावयास गेल्या व गंगाराम हा पन्हळें येथील आपली शेती करण्यास गेला व चैत्र शुद्ध प्रतिपदा तारीख १ एप्रिल १९५८ सोमवार शके १८७९ पासून शेढें येथील महादेव गणेश सोहोनी यांस सहकुटुंब घरच्या देवांची पूजा, श्री महेश्वराचा नैवेद्य, परसूं–परड्याची व घराची देखरेख करण्याकरितां म्हणून पांच वर्षांच्या बोलीनें पगारी नोकर ठेवला आहे. पांच सहा मण भात पिकणारी जमीन आमच्या ताब्यांत असून तिची लागवड करून तींत पिकणारें भात त्यानें वापरावें. याशिवाय त्याची शेढें येथें शेती आहेच, तिचीहि लागवड तोच करतो.

सध्यां आम्ही कोणी तरी मधुनमधून गांवीं येऊन जाऊन असतों. आमचें घरभाट, परसूं, शेतें व पांचसहा मण पिकाची भातजमीन आमच्या ताब्यांत राहिली असून बाकीच्या शेतजमिनी कूळकायद्यानें कुळांच्या नांवानें लागल्या आहेत. आमच्या ताब्यांत असलेल्या जमिनींत स्वतः वडिलांनीं बरींच झाडें लाविलेलीं असून कांहीं कलमेंहि लाविलेलीं आहेत. याशिवाय पडवें गांवांतहि आमचीं २५–३० हापूस पायरीचीं कलमें आहेत. दादांनीं लाविलेल्या झाडांत बरीचशी सागवान, आंबे, फणस वगैरे आहेत.

## आमच्या मूळ घराण्यांतील माणसें

आमच्या घराण्यांपैकीं ती. वासुदेवशास्त्री हे आपटें येथें गेले. त्यांचा मुलगा कृष्णाजीपंत. कृष्णाजीपंतांना तीन मुलगे. थोरले नारायणराव उर्फ तात्यासाहेब; यांनीं आपल्या शेतीच्या जमिनींत पुष्कळच वाढ केली. दुसरे हरिभाऊ, हे चित्रकार (आर्टिस्ट) होते. तिसरे गणपतराव ऊर्फ गंपू. तात्यासाहेबांचा मुलगा त्रिंबकराव ऊर्फ नानासाहेब हे वकिलीपर्यंत शिकलेले असून, चिरनेरच्या जंगल सत्याग्रहांत भाग घेतल्या-

मुळें त्यांच्यावर सरकारनें खटला भरला होता. परंतु सुदैवानें त्यांतून ते सहीसलामत सुटले. सध्यां ते काँग्रेसचे एक चांगले कार्यकर्ते आहेत. तिसरे गणपतराव ऊर्फ गंपू हे सध्यां कूळकायद्याच्या तडाख्यांतून वांचलेली शेती करतात व आपटें येथें एक भाताची गिरणीहि चालवितात.

गंपू व हरिभाऊ यांचे मुलगेहि उच्चशिक्षित असून उद्योगधंद्यानिमित्त बाहेरगांवीं असतात. हें घराणें चांगलेंच सधन आहे. त्यांच्या भातपिकाच्याच जामना साडेतीनशें एकरांच्या आसपास होत्या. दीडशें एकर जंगल व कांहीं गवताचे डोंगरहि त्यांचे आहेत. एकंदरींत त्यांच्या जमिनी विपुलच होत्या. पण बऱ्याचशा शेतजमिनी कूळकायद्यामुळें आतां त्यांच्या ताब्यांत नाहींत.

दुसरे सदाशिवपंत ऊर्फ आप्पा यांना एक मुलगा रामचंद्र व एक मुलगी कुशी आत्या. कुशी आत्या अजून हयात असून त्यांचें वय ८० वर्षांच्या आसपास आहे. त्या कुलाबा जिल्ह्यांतील माजगांव येथें आपल्या यजमानांसह राहतात. त्यांचें घर पूर्वी गोवळांतच होतें. रामचंद्रपंतांना मुलगा नाहीं. मुलगी अंबूताई देवाचे गोठण्याला असते तिलाहि मूलबाळ नाहीं.

तिसरे पर्शरामपंत माझे आजोबा. यांना दोन मुली व दोन मुलगे. पहिल्या मुलीचा वंश पुढें नाहीं. दुसऱ्या मुलीचा नातू हा आमच्याच दुकानांत असतो. त्याचें नांव आनंदा बाळकृष्ण परांजपे व नात फायनलपर्यंत शिकली असून अजून अविवाहित आहे.

धाकटे चिरंजीव गोपाळराव ऊर्फ काका. यांना दोन मुलगे व एक मुलगी. मुलगी श्री. पिंपळखरे यांना दिलेली असून ते सध्यां सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा संसारप्रपंच ठीक चालू असून, त्यांना सुना व नातवंडेंहि आहेत.

गोपाळरावांच्या दोन मुलांपैकीं धाकटा लक्ष्मण हा लहानपणीं आंकडी येत असल्यामुळें अशक्त आहे. थोरला राजाराम याचें शिक्षण वगैरे झालें नसल्यामुळें दोघेहि अविवाहित असून पोटापुरता उद्योग करून आपला उदरनिर्वाह चालवितात. १९१२ सालीं वडील व मी त्यांच्याकडून बाहेर पडल्यानंतर त्यांचा व आमचा संबंध सुटला. त्यानंतर या मुलांना धंद्यांत नोकरीला ठेवण्याचा मी प्रयत्न केला, पण मला त्यांत यश आलें नाहीं.

आमची काकू मार्गशीर्ष शुद्ध १० शुक्रवार तारीख २८ नोव्हेंबर १९४१ रोजीं स्वर्गवासी झाली व काका फाल्गुन वद्य ३० बुधवार तारीख १४ मार्च १९४५ रोजीं स्वर्गवासी झाले. माझे वडील व काका हे दोघे सख्खे भाऊ. हे जर एका विचारानें व एके ठिकाणीं राहिले असते तर सध्यां आमच्याबरोबर त्यांचे मुलगे राजाराम व लक्ष्मण हेहि राहिले असते. पण काकूचा स्वभाव आपल्यापुरताच पाहण्याचा असल्यामुळें तें शक्य झालें नाहीं, वरील दोघां मुलांचे अति लाडामुळें शिक्षण झालें नाहीं व शिक्षण

न झाल्यामुळें, उद्योगधंदाहि नीटसा मिळत नाहीं. त्यामुळें नेहमींच त्यांना हलाखींत दिवस काढावे लागतात व तें एक माझ्या मनाला शल्यच आहे. लहानपणीं काकूनें त्यांच्या मनांत आमच्याबद्दल जो विकल्प उत्पन्न केला त्यामुळें त्यांना अजूनहि आमच्याबद्दल आपुलकी वा आदर वाटत नाहीं.

१९१२ सालीं माझे काका व वडील दूर झाल्यानंतर पुन्हां एकत्र येण्याचा योग आमची आई दुकानांत असतांना व काकू गांवीं गेली असतांना आणला गेला होता, पण तें काकूला समजतांच तिनें तें मोडून काढलें व पुन्हा एकत्र येण्याचें त्यानंतर कधींच जमलें नाहीं.

काकू स्वर्गवासी होण्याच्या सुमारास ती आजारी असतांना, तसेंच काकाहि स्वर्गवासी होण्याच्या पूर्वी ते आजारी असतांना आम्ही उभयतांनीं त्या दोघांची विचारपूस, औषधपाणी व खर्चाची व्यवस्था केली. पण तीं दोघ स्वर्गवासी झाल्यावर मात्र संबंध जे दुरावले ते दुरावलेच. प्रभू इच्छा !

आमचे वडील हे थोरले चिरंजीव ती. विश्वनाथपंत ऊर्फ दादा यांना आम्हीं एकंदर सात मुलगे. पैकीं प्रथम संबंधाचे आम्ही पांचजण व एक मुलगी. सर्वांत वडील मी (वासुदेव), दुसरा सीताराम, गोविंदा, कृष्णा, विष्णु व मुलगी बहिणा. आम्हां बंधूंपैकीं सीताराम हा वयाच्या अकराव्या वर्षी स्वर्गवासी झाला व कृष्णा हा अगदीं लहानपणींच दीड वर्षांचा असतांना स्वर्गवासी झाला.

आमची बहीण बहिणा ही ठाण्याच्या दत्तोपंत काळे यांना दिली होती. तिला एक मुलगा व दोन मुली झाल्यावर ती स्वर्गवासी झाली. आमच्या वडिलांच्या द्वितीय संबंधाचे मुलगे दोन गजानन व रमेश व मुली सहा. थोरली गंगू ही नागपूरला चितळे यांच्याकडे दिली होती. ती १९५० सालीं स्वर्गवासी झाली. तिला मुलें नाहींत. दुसरी सौ. लीला ही हर्णैच्या श्री. जोशी यांच्याकडे दिली असून ते सध्यां आमच्याच वाडींत मालिनी ब्लॉकमध्यें राहातात. तिला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें आहेत. तिसरी सौ. शांता हिला अंजनवेलचे दामुआण्णा आपटे यांच्या मुलाला दिली असून तिला दोन मुली आहेत. ती ठाण्याला राहते. चौथी सौ. कमल ही पुण्याच्या श्री. भाऊसाहेब परांजपे यांच्या मुलाला दिली आहे. तिला एक मुलगी आहे. ती गणेशखिंडींत राहते. बाकीच्या दोघी प्रभा व उषा अजून अविवाहित असून शिकत आहेत. आम्ही पांचहि भाऊ आमच्याच निरनिराळ्या दुकानांत कामें करतों.

मुलांमध्यें थोरला मी वासुदेव. माझें शिक्षण इंग्रजी दोन इयत्ता झालेलें असून मला सध्यां सात मुलें आहेत. अगदीं पहिला मुलगा प्रभाकर हा पांचसहा वर्षांचा होऊन स्वर्गवासी झाला. आतां मोठा मुलगा त्रिंबक ऊर्फ बंडू. याचा विवाह साखरी आगरचे श्री. सीतारामपंत पाटणकर यांची थोरली मुलगी सुधा हिच्याबरोबर झाला असून त्यांना अलका व संध्या या दोन मुली आहेत. त्याचें शिक्षण बी. कॉम., बी. ए. एलएल. बी. पर्यंत झालेलें आहे. तो दुकानांत मॅनेजरचें काम करीत आहे.

दुसरा श्रीधर. याचा विवाह आंबवचे श्री. विष्णु नारायण पोंक्षे यांची थोरली मुलगी मंदाकिनी हिच्याबरोबर झाला असून, त्यांना संजय हा एक मुलगा आहे. याचें शिक्षण बी. एस्‌सी. व नंतर म्हैसूरला ए. सी. एफ. टी. आर. आय. असें झालें आहे. त्या परीक्षेंत त्याचा दुसरा नंबर आला आहे.

तिसरा सुरेश हा अजून अविवाहित असून आर्टस् कॉलेजांत शिकत आहे. त्यानें एन्. सी. सी. इन्फंट्रींत भाग घेतला असून त्याला बी. सर्ट व कार्पोरलशिप मिळाली आहे. चौथा वसंत हाहि अजून अविवाहित असून कॉलेजांत विज्ञान (सायन्स) शिकत आहे. तीन मुलींपैकीं थोरली सौ. यशोमती उर्फ ताई ही दहावीपर्यंत शिकलेली असून तिला देवगड तालुक्यांतील जामसंडे या गांवच्या चि. अनंतराव भिडे यांना दिली आहे. यांची त्याच गांवांत हापूस आंब्याच्या कलमांची बरीच लागवड असून ते गांवींच राहतात. त्यांना अनील, प्रकाश व दिलीप असे तीन मुलगे आहेत. अनील व दिलीप हे जामसंड्यालाच घरीं राहत असून तेथील शाळेंत शिक्षण घेत आहेत. मघला प्रकाश हा आमच्याकडे मुंबईसच राहत असून येथील चिकित्सक शाळेंत शिकत आहे.

मघली मीनाक्षी ही कॉलेजमध्यें एम्. ए. ला असून तिचा विवाह दादर येथील कापडाचे व्यापारी शहाडे आठवले आणि कंपनीचे मॅ. डा. श्री. कृष्णराव आठवले यांचा मोठा मुलगा चि. रामचंद्र उर्फ राजाराम यांच्याबरोबर २४ ऑक्टोबर १९६० रोजीं झाला. गेल्या विजयादशमीला शुक्रवार तारीख ३० सप्टेंबर १९६० रोजीं ठाणें येथें कोपनेश्वर मंदिरासमोरच आठवले आणि आठवले कं. या नांवानें दोघां भावांनीं कापडाचें दुकान सुरू केलें आहे. त्यांचें शिक्षण बी. टेक्सपर्यंत झालेलें आहे.

धाकटी सुनंदा ऊर्फ बेबी ही एस्. एन्. डी. टी. कॉलेजमध्यें इंटर आर्टस् शिकत असून अजून अविवाहित आहे.

माझा भाऊ व दादांचा दुसरा मुलगा गोविंदा ऊर्फ नाना याचें शिक्षण पहिल्या इयत्तेपर्यंत झालेलें असून याचा विवाह राजापूर तालुक्यांतील पडवें येथील कै. धोंडोपंत दीक्षित यांच्या मुलीबरोबर झाला असून त्यांना विमल या नांवाची एकच मुलगी आहे. ती विवाहित असून डॉक्टर पटवर्धन यांना दिलेली आहे. त्यांना एक मुलगी व एक मुलगा आहे. ती सध्यां आमच्या बेडेकर सदन नं. ६ माहीम येथें राहाते.

तिसरा भाऊ—बाळू ऊर्फ विष्णु याचेंहि शिक्षण इंग्रजी पहिलीपर्यंतच झालेलें आहे. याचा प्रथम विवाह पडवें येथीलच स्व. विनायकराव बापट यांच्या मुलीशीं झाला होता. पण त्यांना सुधा या नांवाची एकच मुलगी झाल्यावर त्याची प्रथम पत्नी स्वर्गवासी झाली. द्वितीय विवाह कुंभवडें येथील श्री. गणपतराव वेलणकर यांची मुलगी धारी (सौ. सुशीला) हिच्याबरोबर झाला असून त्यांना तीन मुलगे व एक मुलगी आहे. मोठा मुलगा अशोक याची मुंज झाली आहे. धाकटे मोहन व अरुण ही मुलें शाळेंत शिकत आहेत.

चौथा भाऊ चि. गजानन उर्फ भाऊ हा माझा सावत्र भाऊ. याचें शिक्षण इंग्रजी पांच इयत्तेपर्यंत झालेलें असून याचा विवाह दिवे आगर येथील श्री. महादेव चिंतामण उर्फ अण्णासाहेब बापट यांची दुसरी मुलगी शांता हिच्याबरोबर झाला असून त्यांना दोन मुलगे व दोन मुली आहेत. मोठा मुलगा विश्वास व सर्वांत धाकटा महेश व मधल्या दोन मुली विद्या व गीता. पैकीं विश्वास व विद्या शाळेंत शिकत आहेत.

पांचवा भाऊ रमेश उर्फ काका हा एस्. एस्. सी. पास झाला असून अजून अविवाहित आहे. गेल्याच जूनपासून तोहि आमच्याप्रमाणेंच दुकानांत काम करूं लागला आहे. सध्यां तो परळच्या दुकानांत कामाला जात असतो.

---

अनुक्रम ........................ विः ....................
क्रमांक ........................ नोंः दिः ....................

# २ आमचे पणजोबा

ती. त्रिंबक सदाशिव बेडेकर हे आमचे पणजोबा. यांचा जन्म इ.स. १८०९ साली झाला. त्यांचें व्यावहारिक व संस्कृत शिक्षण बरेंच झालेलें होतें. ते त्या काळीं व त्या भागांत सूज्ञ व विद्वान म्हणून समजले जात. त्यांचें कुटुंब देवाचे गोठण्याचे आपटे घराण्यांतील होतें. त्यांनीं पुराणिकाचा व्यवसाय न करितां व्यापार केला. त्यांच्या व्यापाराचें स्वरूप कुलाबा जिल्ह्यांतून आपल्या गांवीं भाताची आयात करून त्याची विक्री करावयाची असें होतें. कुलाबा जिल्ह्यांत भाताचें पीक भरपूर व आमच्या प्रांतात तें कमी म्हणून त्यांचा हा व्यापार किफायतशीर होई. भात आणण्याकरितां त्यांनीं स्वतः दोन गलबतेंहि बांधिलीं होतीं. मुख्यत्वेंकरून कुलाबा जिल्ह्यांतील आपटे व पनवेल येथूनच भात आणण्याचा त्यांचा प्रघात असे तिकडे गलबतें भात भरण्यास जाते वेळीं इकडील कांहीं माल, माचे झोंपाळे, चौरंग, पाट, हातविणीच्या तागी गोणी, पालें व कणगी वगैरे माल त्यावरून ते पाठवीत.

गोवळचे शेजारील पन्हळें गांवीं तागापासून हातविणीनें गोणी व पालें तयार होत असत. गिरणीच्या गोणी त्यावेळीं नव्हत्या. या गोणी व पालें चांगली मजबूत व टिकाऊ असत. एका गोणाची किंमत गोणभर भात व त्या गोणभर भाताची किंमतहि रुपया बारा आणेच असे.

त्या गोणींचा उपयोग तिकडील लोकांना भातें सांठविण्याकरितां होत असे. गोणींची एकावर एक अशी थपी लागत असल्यामुळें थोड्या जागेंत जास्त भाताचा समावेश होई. या गोणी बरींच वर्षे वापरता येत. इतक्या त्या टिकाऊ व मजबूत असत. असा त्यांचा व्यापार कांहीं वर्षे चालल्यानंतर त्यांनीं तिकडेच भात घिरडून (भरडून) त्याची करड करून आणण्यास सुरुवात केली.

त्या काळीं गलबतांत खालीं पालें हांथरून त्यावर सुटेंच भात भरून आणीत. व खंडीभर भाताच्या जागेंत त्याची करड केल्यामुळें सव्वापट ते दीडपट मावे. यालाच मी कारखानदारी म्हणतों. कारखानदारी म्हणजे एका प्रकारच्या मालाचें दुसऱ्या प्रकारच्या मालांत रूपांतर करणें व तेंच ते करीत.

आमच्या पणजोबांना तीन मुलगे व सात मुली. मुली लग्नें होऊन आपापल्या सासरीं गेल्या. मुलांपैकीं थोरले वासुदेव शास्त्री. हे संस्कृत शिकून पुराण सांगण्याचा व्यवसाय

करून शिवाय व्यापारांतहि पणजोबांना मदत करीत. मधले सदाशिवपंत. यांचें शिक्षण फारसें झालेलें नसून त्यांचा स्वभावहि तापट होता. ते गोवळ येथेंच शेती करीत.

धाकटे पर्शरामपंत हे माझे आजोबा. यांचें शिक्षण घरींच पंतोजींकडून झालेलें होतें. ते पणजोबांना व्यापारांत चांगलीच मदत करूं लागले होते. त्यांनीं आपट्याहून भाताची करड गोवळला पाठविण्याचा व गोवळचा माल तिकडे विकण्याच्या कामांत पणजोबांना चांगलेंच सहाय्य केलें. त्या काळीं आठ महिने व्यापार व चार महिने घरीं अशी पद्धत असे. कारण पावसाळ्यांत चार महिने गलबतांची वाहतूक बंद असे.

त्या काळांत आगबोटी अगर इतर वाहतुकीचीं साधनें नव्हतीं. एखाद्याला जावयाचें असलें म्हणजे एकतर गलबतांतून नाहीं तर पायीं जावें लागत असे. आमच्या आजीनेंहि गलबतांतून आपट्याचा प्रवास केला होता. त्या काळीं सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना जाज्वल्य असल्यामुळें गलबतांचे मुक्काम ठरलेले असत. साधारणपणें गलबतें रात्रीं हाकारून सकाळीं ठरलेल्या टप्प्याला पोंचत. तेथें किनाऱ्याला उतरून नजीकच्या गांवांतील मंदिरांत स्नानसंध्या, जेवणखाण वगैरे करून संध्याकाळीं पुन्हां गलबतें हांकारीत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुढचा टप्पा. या टप्प्यांना वरवीं असें म्हणत. साधारणपणें चारपांच दिवसांत गलबत आपट्याला पोंचे.

आमची पणजी जयंतीबाई या स्वर्गवासी झाल्यानंतर पणजोबांनीं व्यापारांतील आपलें लक्ष कमी केलें. आपटें येथील व्यापार थोरले चिरंजीव वासुदेवशास्त्री व धाकटे पर्शरामपंत यांच्या स्वाधीन केला व गोवळच्या व्यापारांत आमच्या शेजारच्या घरांतले श्री. व्यंकाजीपंत बेडेकर यांना भागींत घेतलें. ती. पर्शरामपंतानीं आपटें येथें राहण्याकरितां घर व कांहीं शेतजमिनी विकत घेतल्या व भाताच्या धंद्याबरोबरच देवघेवीच्या व्यवहारासहि सुरुवात केली. पण चातुर्मासांत घरीं येणें मात्र दोघांहि भावांनीं सोडलें नाहीं. याच सुमाराम वासुदेवशास्त्री यांचे चिरंजीव कृष्णाजीपंत हेहि शिक्षण पुरें करून व्यापारांतच लक्ष घालूं लागले. त्यानंतर पणजोबांनीं आपलें लक्ष पूर्णपणें काढून घेतलें व ते संन्यस्त वृत्तीनें राहूं लागले.

संन्यस्त वृत्तींतील त्यांची दिनचर्या म्हणजे पहाटे चार वाजतां उठून घराजवळच्याच तळ्यावर थंड पाण्याचें स्नान, त्यानंतर देवपूजा सूर्यनमस्कार व इतर आन्हिकें यांतच ते दुपारपर्यंतचा वेळ घालवीत.

दुपारीं भोजन झाल्यावर थोडी विश्रांती घेऊन संस्कृत व धार्मिक ग्रंथांचें वाचन व विद्वान मंडळीबरोबर ते चर्चा करीत.

ते दुपारीं एकदां जेवीत. संध्याकाळीं संध्या झाल्यावर पाटावरून उठण्यापूर्वी कांहीं फळफळावळ पुढें आल्यास ते त्याचें सेवन करीत. इतर कांहींहि संध्याकाळीं खात नसत.

ते त्या काळांत सूज्ञ व विद्वान म्हणून गणले जात; त्यामुळें लांबलांबची विद्वान मंडळी त्यांच्याबरोबर धर्माविषयीं चर्चा करण्याकरितां आमच्या घरीं येऊन रहात. त्यांनीं मिळविलेल्या संपत्तींतून दानधर्महि पुष्कळच केला. असा कांहीं काळ घालविल्या-नंतर इसवी सन १८९३ सालीं मुलांचीं वांटपें करून कायमचे काशीला राहण्यासाठीं जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

मधला मुलगा सदाशिवपंत हा फार तापट असल्यामुळें त्यांची पणजोबांनीं फारखत करून टाकलीच होती. आतां फक्त दोघां मुलांच्याच वांटण्या करावयाच्या होत्या. त्या वाटण्याचे कच्चे कागदपत्रहि त्यांनीं तयार केले. त्यांत आमचे आजोबा पर्शरामपंत यांना आपटे येथील घर जमिनी व तिकडचा व्यापार देण्याचें ठरवून वासुदेवशास्त्री यांना गोवळचें घर व जमिनी देण्याचें ठरविलें होतें. परंतु विधिघटना तशी नव्हती.

पणजोबांची एक चुलत भावजय कऱ्हाडजवळ एका खेड्यांत राहात असे. तिला मूल नसून तिचा वृद्धापकालहि झाला होता व तिनें गोवळला येण्याची इच्छा व्यक्त करणारें पत्र पाठविलें होतें. तिची वृद्धापकाळांतील इच्छा पुरी व्हावी म्हणून आमचे आजोबा पर्शरामपंत हे तिला आणण्याकरितां गणपती झाल्यावर भाद्रपद वद्यांत कऱ्हाडला गेले. त्या काळांतला प्रवास कांहीं पायीं तर कांहीं बैलगाडींतून करावा लागे. तशांत पावसाळ्याचे दिवस. आजोबा तिचे घरीं टेंभू येथें पोचल्यावर प्रवासाच्या दगदगीनें आजारी झाले. त्यांतच त्यांना अतिसाराचा विकार होऊन भाद्रपद वद्य १४ शके १८०७ इसवी सन १८८५ रोजीं त्यांचें तेथेंच देहावसान झालें. हा बेडेकर कुटुंबावर मोठा वज्राघातच झाला. त्यावेळीं त्यांना दोन मुली व एक अडीच वर्षांचा मुलगा असून दुसरा मुलगा अजून गर्भावस्थेंतच होता. त्याचा पुढें तीन महिन्यांनीं जन्म झाला.

कर्त्या मुलाच्या अकालीं स्वर्गवासामुळें, पणजोबांचें मन फारच उद्विग्न झालें व वाटपाचे विचार मागें पडले. उद्योगधंदा तर चाललाच पाहिजे म्हणून वडील मुलगा वासुदेवशास्त्री व नातु कृष्णाजीपंत यांच्या ताब्यांत पणजोबांनीं आपटें येथील सर्व व्यवहार दिला व गोवळचा व्यापार व्यंकाजीपंतांवर सोंपविला.

पुढें कांहीं वर्षांनंतर थोरल्या नातीचा विवाह केल्यावर आपण स्वतः काशीस जाऊन उर्वरित आयुष्य तेथेंच घालविण्याचा विचार नक्की करून त्यांनीं काशीला जाण्याची तयारी केली व ४ एप्रिल १८९३ रोजीं वाटपपत्र केलें. त्यांत पणजोबांनीं आपटें येथील मिळकत स्वकष्टार्जित असल्यामुळें तेथील सर्व मिळकत व्यापार व बहुतेक रोकड वडील मुलगा वासुदेवशास्त्री व नातू कृष्णाजीपंत यांना दिली.

धाकटी सून भागिर्थीबाई हिचें कोणी पाहणारें नसल्यामुळें व तिला रोख रकमेचें संरक्षण करतां येणार नाहीं हें लक्षांत घेऊन दोन मुलांच्या नांवानें मिळून चौतीसशें रुपये, गोवळचें घर व गोवळचीच शेतजमीन दिली व मुलगे सज्ञान होईपर्यंत त्या चौतीसशें रुपयांचें व्याज दरसाल शेकडा पावणेचार रुपयेप्रमाणें द्यावें असें ठरवून

ती रक्कम आपटेकरांकडेच ठेविली व त्या रकमेचें व्याज सालोसाल यांना मिळावें असें ठरवून व आपल्याबरोबर एक पाठी आलेली मुलगी मथुताई ताम्हनकर हिला घेऊन पणजोबांनीं पुन्हां काशीला जाण्याचा विचार नक्की केला.

परंतु आमच्या आजीला तिची व तिच्या मुलांची पोटापाण्याची व्यवस्था काय केली आहे, याची माहिती नव्हती. म्हणून पणजोबा आपल्या मुलीसह काशीला जावयास निघाले त्यावेळीं तिनें माझ्या व माझ्या मुलांबाळांच्या पोटापाण्याची काय व्यवस्था केली आहांत असें मोठा धीर करून विचारलें.

तेव्हां पणजोबांनीं केलेली व्यवस्था तिला सांगितली व तुझे मुलगे सज्ञान होईपर्यंत हें तुम्हांला पुरेल व त्यानंतर माझा आशीर्वाद मी तुम्हांला देत आहे तो तुमच्या उपयोगी पडेल, असें सांगून त्यांनीं काशीला जावयास निघतांना आजीला व मुलांना आशीर्वाद दिले. त्यांनीं ठेवलेली रोकड जरी कधींच संपली असली तरी त्यांच्या आशीर्वादाचें फळ मात्र आम्हांला अजून मिळत आहे व त्यांचा आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशीं आहे अशी आमची भावना आहे. याचें कारण ते एक ऋषीमुनींप्रमाणेंच होते. त्यानंतर ते आपल्या मुलीला–मथुबाई ताम्हनकर हिला बरोबर घेऊन काशीला गेले.

त्यांची वागणूक पूर्वकाळांतील एखाद्या ऋषीमुनीप्रमाणेंच असे. काशींत दोन तीन वर्षे तपःसाधनेंत घालविल्यावर वयाच्या ८७ व्या वर्षी १८९६ च्या फाल्गुनांत त्यांनीं आपला देह ठेविला. त्यांच्या अंतकाळानंतरहि त्यांच्याबरोबर गेलेली त्यांची मुलगी कांहीं दिवस काशींत होती. नंतर ती परत आली. वासुदेवशास्त्री हे यापूर्वीच स्वर्गवासी झाले होते.

## वडिलांचें व काकांचें शिक्षण

पणजोबा आपल्या मुलीसह काशीला गेल्यानंतर मुलांच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी आजीवरच पडली. त्या काळीं शिक्षणासाठीं शाळा नव्हत्या. मुलांचें शिक्षण घरींच पंतोजी ठेवून होत असे. आमच्या वडिलांच्या व काकांच्या शिक्षणाकरितां मोरोपंत शेणवी यांना शिक्षक ( पंतोजी ) म्हणून ठेवलेले होतेच. त्यावेळची शिक्षणाची पद्धत म्हणजे श्रीपासून अकरकी एकोत्र्यांपर्यंत सर्व उजळणी, लिहिणें वाचणें मोडी व बाळबोध अक्षर वळविणें व तें वळविण्यासाठीं जुन्या बखरी व लिखितें लिहून काढणें. तोंडचे हिशेब, गणित वगैरे असे.

त्या काळांत स्लेटपाट्या नव्हत्या; धूळपाटीवरच शिक्षणाचा श्रीगणेशा होई. धूळपाटी म्हणजे बसण्याच्या लांकडी पाटावर बारीक धूळ पसरून त्यावर पंतोजी अक्षरें काढून देत व तीं लांकडी सुळ्यांनीं गिरवावयाची असत. श्रीपासून ज्ञपर्यंतचीं अक्षरें म्हणजे धुळाक्षरें म्हणून ओळखलीं जात व तीं धूळपाटीवरच शिकावयाचीं असत. अलीकडील शिक्षणाची पद्धत त्यावेळीं खेड्यांतून अस्तित्वांत आलेली नव्हती.

दादांचे वरीलप्रमाणें सर्व शिक्षण पुरें झालें व काकांना शालेय शिक्षण देण्याकरितां दादांनीं राजापुरास ठेवलें. राजापुरास मराठी चार इयत्ता शिक्षण पुरें झाल्यावर त्यांना इंग्रजी शिक्षणासाठीं पुढें रत्नागिरीला पाठविलें. दादांचें शिक्षण मात्र गांवांत शाळा नसल्यामुळें पुढें झालें नाहीं. दादांची मुंज पणजोबा घरीं असतांनाच झाली होती. पणजोबा काशीला गेल्यानंतर दुसऱ्या वहिणीचें लग्न व काकांची मुंज दादांनीं केली व त्यांचें स्वतःचें लग्नहि त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी देवाचे गोठण्याची एक वाडी घोडेपई येथील रामचंद्रपंत लेले यांच्या मुलीशीं झालें.

काकांचें मराठी शिक्षण राजापुरास व इंग्रजी ३।४ इयत्ता शिक्षण रत्नागिरी येथें झाल्यावर त्यांचा विवाह त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी गोवळचेच एक खोत श्री. रामचंद्रपंत गोखले यांच्या मुलीबरोबर इ. स. १९०१ च्या माघ महिन्यांत झाला व त्याच वर्षी श्रावण शुद्ध तृतीया शनिवार तारीख १७ ऑगस्ट १९०१, शके १८२३ रोजीं माझा जन्म झाला. माझ्यां बारशाच्या दिवशीं काकू माहेराहून आली होती, तिला पाठराखणी म्हणून सौ. सत्यभामाबाई गोखले या आलेल्या होत्या. योगायोगानें पुढें त्याच माझ्या सासूबाई झाल्या. नंतर दोनतीन वर्षांनीं काका उद्योगासाठीं म्हणून मुंबईला वैद्याच्या वाडींतील आपली चुलत बहीण सौ. कुशीताई हिच्याकडे गेले व सदाशिव गल्लींतील काळे मास्तर यांच्या शाळेंत त्यांना दरमहा दहा रुपये पगारावर मास्तरची नोकरी मिळाली. तेव्हांपासून ते अखेरपर्यंत मुंबईसच राहिले.

## वडिलांची व्यवसायाला सुरुवात

काकांच्या विवाहानंतर आमचे वडील आपटेकर बेडेकरांकडे त्यांच्या व्यापार धंद्यांत आपला समावेश होईल कां तें पहाण्याकरितां आपट्याला गेले होते. पण आपटेकरांनीं भाताचा व्यवहार बऱ्याच वर्षांपूर्वी बंद केला होता. फक्त शेती व सावकारी हा धंदा चालू ठेवला होता. तरी पण चार सहा महिने वाट पाहून तेथें कांहींच जमेना म्हणून दादा परत घरीं आले. त्यानंतर दादांनीं गांवांतच रामभाऊ खोतांच्या घराजवळ एक भुसारी मालाचें दुकान सुरू केलें. पण बहुतेक विक्री उधारीनेंच व्हावयाची व उधारी लवकर वसूल व्हावयाची नाहीं. त्यामुळें तें दुकान त्यांनीं शेवटीं बंद केलें; नंतर सवाईवर भात देण्याचा व्यवसाय त्यांनीं करून पाहिला. तो थोडा फार यशस्वीहि होऊं लागला व भाताची वाढहि १०-१२ खंडीपर्यंत झाली होती त्याचबरोबर थोडीशी सावकारीहि सुरू केली. परंतु पुढें एक दोन वर्षें नापिकीचीं गेल्यामुळें भातहि वसूल होईनासें झालें व सावकारींतहि पुष्कळशी घटच लागली. यावेळेपर्यंत मात्र पणजोबानीं ठेवलेली पुंजी बहुतेक संपत आली होती. त्यानंतर वडिलांची एक मावशी सांगली येथें रहात होती. तिनें बोलावल्यावरून वडील सांगलीला गेले व तेथून भाजी खरेदी करून मुंबईला पाठविण्यास त्यानीं सुरुवात केली; परंतु तो धंदा परावलंबी म्हणून त्यांतहि जम बसला नाहीं म्हणून दादा मुंबईला आले व सांगलीहून लोणी मागवून तें विकण्यासाठीं

त्यांनीं कांदेवाडींत एक दुकानहि घेतलें; परंतु लोणी ही नाशवंत वस्तु असल्यामुळें वेळेवर न खपल्यास त्यांतहि नुकसान होऊं लागलें म्हणून तेंहि दुकान दादांनीं सोडून दिलें व ते पुन्हां गांवीं परत आले.

वडिलांचे एक मामा कोल्हापुरास भिक्षुकी करीत. त्यांनीं बोलावल्यावरून कोल्हापुरास दादा गेले व तेथेंहि कांहीं उद्योग मिळविण्याचा प्रयत्न केला. पण तेथेंहि त्यांना यश मिळालें नाहीं.

वडिलांचें आजोळचें गांव जें कोळें तेथील श्री. गोविंदराव गोखले यांचा गणपतीच्या मूर्ति व मातीचीं चित्रें बनविण्याचा कारखाना सदाशिव गल्लींत नेने यांच्या घराच्या तळमजल्यांत होता. गणपतीबरोबरच ते मातीच्या चित्रांचे कांहीं देखावे बनवून गणेश चतुर्थीपासूनच त्या चित्रांचें प्रदर्शन त्याच जागेंत भरवीत व तें प्रदर्शन पाहण्यासाठीं लोकांची रीघ लागे. गोखले कुटुंबाचा उदरनिर्वाह या दोन गोष्टींवर उत्तम प्रकारें चाले. दिवाळी होतांच ते आपलें प्रदर्शन बंद करीत व पुढील वर्षाकरितां गणपती व चित्रांची सामुग्री जमविण्यास सुरुवात करीत. हें प्रदर्शन बंद होण्याच्या सुमारासच इ. सन १९०९ सालीं दादा मुंबईला आले. गोखले यांचें हें प्रदर्शन वऱ्हाड भागांत नेलें तर चांगली प्राप्ति होईल अशी दादांना कल्पना आली व त्यांनीं याबाबत श्री. गोखले यांच्याबरोबर विचारविनिमय केला व त्यानंतर तें मातीच्या चित्रांचें प्रदर्शन वऱ्हाडांत नेण्याचें त्यांनीं ठरविलें. वाटेंत कांहीं मोडतोड झाल्यास त्यांची दुरुस्ती करण्यासाठीं त्यांच्याकडील एक मनुष्यहि बरोबर घेऊन व तीं मातीचीं चित्रें घेऊन दादा प्रथम उमरावतीस गेले. यावेळीं खर्चवेच वजा जातां होणारा नफा दोघांनीं वाटून घ्यावा, असें ठरलें होतें.

उमरावतीस गेल्यावर चित्रांची जरूर ती दुरुस्ती व रंगरंगोटी करून श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्तें या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें व तें दाखविण्यास सुरुवात झाली. त्या भागांत हें एक नाविन्यच असल्यामुळें तेथील जनतेनें या प्रदर्शनाचें चांगलेंच स्वागत केलें. नंतर चार पांच महिन्यांनीं ते परत चित्रांसह मुंबईला आले. या खेपेला प्राप्ती जरी फारशी नव्हती तरी कर्जांत भर पडली नाहीं व थोर थोर मंडळींच्या ओळखीदेखी झाल्या.

परत आल्यावर कांदेवाडींतील वळसंकर या नांवाच्या एका पेढीवर वडिलांनीं जमाखर्च लिहिण्याची नोकरी धरली. परंतु त्यांचें मन त्या नोकरींत रमलें नाहीं. त्यांना स्वतंत्र धंदा करण्याची आवड होती. महिन्याभरांतच त्यांनी पेढीवरची नोकरी सोडून दिली. त्या पेढीसमोरच कांदेवाडींत कृष्णाजी हरी (अण्णा) बेडेकर यांचें किराणामालाचें दुकान होतें. त्यांचा व दादांचा चांगलाच स्नेह होता. दादा बेडेकर व तेहि बेडेकरच. शिवाय ते आमच्या पट्ट्याचेच तारळचेच बेडेकर होते. त्यांचा वृद्धापकाळ झाल्यामुळें एखादा हुशार मनुष्य चालक म्हणून ठेवून ते स्वतः गांवीं राहावयास जाणार होते. गांवीं जातेवेळीं दादांना दुकानांत भागीदार म्हणून घेऊन

व कांहीं दिवस धंद्याची माहिती करून देऊन त्यांनीं गांवीं रहावयास जावें असें ठरलें होतें. तसें ठरल्यानंतर १९१० च्या चैत्रांत दादा पुन्हां घरीं आले व वैशाखांत माझ्या वयाच्या नवव्या वर्षी त्यांनीं माझी मुंज केली. नंतर जेष्ठांत सोडमुंज करून आगबोटी सुरू झाल्यावर आमच्या गांवचे खोत व दादांचे स्नेही श्री. बळवंतराव (बाळाकाका) ठाकूर देसाई व दादा मिळून मुंबईला आले. यावेळीं अण्णा बेडेकर यांच्या दुकानांत भागीदारी मिळेल या उमेदीनेंच दादा मुंबईला आले होते.

## दादांनीं दुकान घेतलें

दादा व बाळाकाका हे दोघे घरून निघाले ते दुसरे दिवशीं पहाटे मुंबई बंदरांत उतरले. त्या दिवशीं बोट नेहेमीपेक्षां बरीच लवकर आल्यामुळें गाड्या घोडीं धक्क्यावर आलेलीं नव्हतीं. म्हणून दोघेहि आपापलें सामान घेऊन गांवांत येण्यासाठीं रस्ता चालूं लागले. श्री. बाळाकाका कामत कंपनीच्या चाळींतील आपल्या एका नातेवाईकाकडे गेले व आमचे काका झावबाच्या वाडींतील १९ नंबरच्या चाळींत राहात असत त्यांच्या बिऱ्हाडीं दादा गेले. काकांकडे प्रातःर्विधी व स्नान करून कांदेवाडींतील अण्णा बेडेकर यांना भेटण्याकरितां दादा त्यांच्या दुकानीं गेले.

अण्णांची भेट झाल्यानंतर दादांना असें समजलें कीं अण्णांनीं आपले मेहुणे हरिभाऊ काळे व भाचे गणपतराव बोडस या दोघांना दुकानांत ठेवून घेतलें असून आतां दादांना ठेवून घेण्याचा त्यांचा विचार नाहीं. हें समजल्यावर दादांची फारच निराशा झाली.

दादा सांगलीला असतांना पुण्यांतील सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर फाटक वालचंद आणि कंपनीमध्यें कामाला असलेल्या एका मुकादमाशीं त्यांची ओळख झाली होती व त्यानें तुम्हाला जरूर लागल्यास पुण्याला या म्हणजे फाटक वालचंद कंपनींत तुम्हाला नोकरी देववीन असें दादांना सांगितलें होतें. त्यांच्याकडे नोकरीसाठीं जाण्याचा दादानीं बेत केला. व तसें काकांना त्यांनीं सांगितलें. तेव्हां काका दादांना म्हणाले, 'आतां तुम्ही मुंबईसच कांहीं तरी उद्योगधंदा पहा. बाहेर कोठें लांब जाऊं नका.' यावेळीं काकांनीं काळेमास्तरांकडील नोकरी सोडली होती व भायखळा येथील रिचर्डसन आणि क्रुडास या कंपनींत नोकरी धरली होती व त्यांना तीस रुपये पगार मिळत होता व लक्ष्मीबाईच्या १९ नंबरच्या चाळींत दरमहा चार रुपये भाड्याची स्वतंत्र खोलीहि त्यांनीं घेतली होती. तेथेंच दादा मुक्कामाला होते.

काकांनीं मुंबईसच उद्योगधंदा पहा असें सांगितल्यावर दादांनीं मुंबईतच कांहीं उद्योग मिळविण्याची खटपट सुरू केली व पुण्याला जाण्याचा विचार रहित केला.

पुढें कांहीं दिवसांनीं अशी माहिती दादांना समजली कीं मुगभाटांतील शांतारामाच्या चाळींत एक किराणा मालाचें चालू दुकान विकावयाचें आहे व चौकशीकरतां तें दुकान आपल्याला मिळण्यासारखें आहे असें त्यांना दिसून आलें. परंतु दुकान विकत घेण्याकरितां व तें पुढें चालविण्याकरितां लागणाऱ्या भांडवलाचा प्रश्न दादांपुढें उभा राहिला.

त्यावेळीं आमचे एक ग्रामस्थ श्री. पांडूदादा परांजपे हे पेंडसे यांच्या वाडींत राहात असत. ते दादांचे बाळपणापासूनचे स्नेही होते. त्यांचा इमारती लांकडें चिरून देण्याचा धंदा होता. त्यांना दादांनीं ही दुकानाची हकिगत सांगितली. तेव्हां दोन भागिदार मिळून तिघांनीं भांडवल घालून तें दुकान विकत घेण्याचें ठरविलें. या दुकानाची पूर्वपीठिका अशी होती. ठाकुरद्वारच्या जितेकरवाडींतील वचपाळ या नांवाचे एक कच्छी गृहस्थ या दुकानाला मालाचा पुरवठा करीत व या दुकानचे पूर्वीचे मालक (हे भिक्षुक गृहस्थ असून पुष्कळ लोकांचे उपाध्ये होते) तो माल आपल्या यजमानांत विकीत. वचपाळचें देणें व गिऱ्हाईकांकडील वसुली या दोघांचीहि जबाबदारी घेऊन त्यांना मालकी हक्का-बद्दल आठशें रुपये द्यायचें ठरलें होतें.

## भांडवल दादांचे–धंदा तिघांचा

भांडवल घालणाऱ्या दोन भागीदारांनीं पंधराशें ते सोळाशें रुपये तरी उभे करावयास हवे होते. त्यापैकीं आठशें रुपये दादा व आठशें रुपये दुसरे भागिदार घालणार होते. दादांनीं आपटेकराकडून दोनशें रुपये व एक स्नेही डॉक्टर मराठे या नांवाचे; म्युनिसिपालिटींत डॉक्टर होते; त्यांच्याकडून सहाशें रुपये मिळून आठशें रुपये दुकानाच्या मूळ मालकाला देऊन आश्विनांत १९१० ऑक्टोबरमध्यें दुकान विकत घेतलें. परंतु भागिदारांकडून घातले जाणारे आठशें रुपये त्यांना आपल्या धंद्यांतून काढतां न आल्यामुळें त्यांच्याकडील रुपये आले नाहींत. व चालू माल खरेदी-करितां लागणारा रोख पैसा जवळ नसल्यामुळें व बाजाराची माहिती पण नसल्यामुळें वचपाळकडूनच माल आणावा लागे. त्याच्याकडून माल उधार मिळे पण किंमत जरा जास्त पडे व विक्री सर्व उधारीचीच असे. त्यामुळें उधारी वसूल होईल त्याप्रमाणें पैसे वचपाळकडे भरावयाचे व विक्रीकरितां त्याच्याकडूनच माल आणावयाचा असेंच धंद्याचें स्वरूप झालें. त्यांतच उधारी वेळेवर वसूल होईना व दोघेहि भागीदार ठरल्याप्रमाणें दरमहा उचल मात्र करूं लागले. वचपाळकडची बाकी बरीच वाढली. त्यामुळें तो माल द्यायला काकूं करूं लागला.

तेव्हां अशा परिस्थितींत दादांनीं कसे तरी इकडून तिकडून पैसे गोळा करून दोन वर्षें रेटलीं. अशीं दोन वर्षें गेल्यावर भागीदारी पुरे असें दादांना वाटूं लागलें. कारण भागिदारांनीं या दोन वर्षांत भांडवल म्हणून कांहींच रकम न देतां होणाऱ्या नफ्यापोटीं म्हणून बऱ्याच रकमेची, उचल मात्र केली. भांडवल काय तें फक्त दादांचें व तेंहि कर्ज काढून घातलेलें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे केवळ नफ्याचेच भागीदार होते, व नफ्यापेक्षांहि बऱ्याच जादा रकमा त्यांनीं उचलल्या होत्या. अशा परिस्थितींत दुकानाला कर्जहि बरेंच झालें व उधारीहि नीट वसूल होईना. तेव्हां आतां भागीदारी पुरे असें ठरवून दादा दुकानासाठीं दुसरी जागा शोधण्याच्या खटपटीस लागले व त्यांना जागाहि सदाशिव गल्लींतील बोहोऱ्याच्या चाळींत मिळाली व दादांनीं दुकानांतील सामान त्या जागेंत नेलें.

## भागिदारीचा धंदा नको

त्यानंतर भागिदारांना जर तुम्हाला भागीदारी पाहिजे असेल तर कांहीं तरी भांडवल घेऊन या, किंवा पगारी नोकरीस रहा असें दादा सांगत होते; परंतु भागिदारांनीं व जोगळेकर वकील यांच्या सांगण्यावरून त्यांनीं दादांचें कांहींच न ऐकतां उलट सर्व गिऱ्हाईकांत फिरून आम्ही तिघेहि भागीदार एकाच वेळीं पैसे घेण्यास आलों तरच तुम्ही दुकानचे पैसे द्या, एकट्या बेडेकरांना पैसे देऊं नका असें त्यांनीं सर्व गिऱ्हाईकांना सांगितलें; त्यामुळें जवळ जवळ तीन हजार रुपये उधारी अडकून पडली व वचपाळचें देणें मात्र दादांच्या अंगावर चढलें.

आतां दुकानांत दादा एकटेच राहिले. बाजारची माहिती नाहीं, जवळ पैसा नाहीं, पहिली उधारी अडकलेली व दुकानांत फारसा माल नाहीं अशा परिस्थितींत दादा सांपडले. जो कांहीं माल होता त्यांतूनच चार दोन रुपये विक्री येत असे. अशा आपत्तीच्या वेळीं श्री. अण्णासाहेब सावे यांच्याकडून शें-दीडशें रुपये व कांदेवाडींतील एका दाणेवाल्याकडून शें-दीडशें रुपये घेऊन जुम्मा मशिदीसमोरील मिरची गल्लींतून माल आणण्यास दादांनीं सुरुवात केली व पूर्वींच्याच गिऱ्हाईकांना नवीन दुकान म्हणून माल देणें सुरू केलें. श्री. अण्णासाहेब सावे यांच्याकडून नेहमींच आम्हाला सहाय्य मिळत असें.

दादांच्या दोघां भागिदारांनीं आतांपर्यंत जी उचल केली होती तिच्याबाहेर त्यांना आणखी थोडे पैसे देऊन जोगळेकर वकिलांच्याच सल्ल्यानें जुन्या दुकानाची भागीदारी दादांनीं संपवून टाकली व दुकानाची येण्यादेण्यासह सर्व कायदेशीर जबाबदारी स्वतःवर घेतली. यावेळीं त्यांच्यावर सुमारें पांच ते सहा हजार रुपये कर्जाचा बोजा होता.

त्यावेळीं आमचीं गिऱ्हाईकें म्हणजे नवीवाडीपासून खेतवाडीपर्यंत स्वतःच्या घरांत राहणारीं सधन व खानदानी अशा पाठारे प्रभु, खत्री, सारस्वत, पांचकळशी वगैरे ज्ञातींतील होतीं. त्यावेळची दुकानदारीची पद्धत म्हणजे दररोज सकाळच्या वेळीं कांहीं गिऱ्हाईकांच्या घरीं जाऊन त्यांना जरूर असलेल्या मालाची यादी आणावयाची व तो माल त्यांना पोंचवावयाचा. रोज दुपारीं माल खरेदीकरितां बाजारांत जावयाचें. हें सर्व काम एकट्या दादांच्यावरच पडे. त्यामुळें दुकान बराच वेळ बंदच ठेवावें लागे. शिवाय सदाशिव गल्लीला गिऱ्हाईकांचें वळण त्यावेळीं नव्हतें. त्यामुळें दुकानावर रोकड विक्री फारशी होईना. अशा परिस्थितींत सुमारें सात आठ महिने सदाशिव गल्लींत काढून शांतारामच्या चाळींत पिंपळाजवळ जागा मिळाल्यामुळें त्या जागेंत दादांनीं १९१३ च्या आषाढांत दुकान आणून तेथें तें सुरू केलें.

# ३ माझा जन्म व बाळपण

**माझा** जन्म श्रावण शुद्ध तृतिया शके १८२३ ता. १७ ऑगस्ट १९०१ शनिवार रोजीं गोवळ येथें संध्याकाळीं गुरें परतणीच्या वेळीं झाला. माझे पणजोबा स्वर्गवासी झाल्याला यावेळीं सुमारें साडेपांच वर्षें झालीं होतीं.

वयाच्या पांचव्या वर्षी माझी धूळपाटीवरील शिक्षणास सुरुवात झाली. धुळाक्षरें, बाराखड्या, व थोडीशी उजळणी वगैरे झाल्यावर आमच्या गांवांतील नुकत्याच सुरू झालेल्या बनांतील शाळेंत श्री. बर्वे मास्तर यांच्या हाताखालीं सहाव्या–सातव्या वर्षी पहिल्या इयत्तेंत माझें नांव दाखल करण्यांत आलें. वरीलप्रमाणें अभ्यास मी आधींच घरीं पुरा केला असल्यामुळें अपुरी ( बिगारी ) ही यत्ता मला सुटली. ही शाळा आमच्या गांवांत खरी पण आमच्या घरापासून दोन मैलांवर बनांत असल्यामुळें व घरून तेथें रोज दोन वेळां जाणें येणें त्या लहान वयांत जमण्यासारखें नसल्यामुळें ( कारण शाळा दोन वेळची होती ) बनांतील आमचे उपाध्ये श्री. दादुभटजी काळे यांच्या घरीं माझी राहण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा असल्यामुळें शेतीचें काम आटपून घरीं येण्यास त्यांना उशीर होई. साहजिकच जेवणाच्या व शाळेच्या वेळा जमत नसत. त्यांतून इतक्या लहान वयांत व प्रथमच मी घराबाहेर राहिलेला, त्यामुळें तीनचार महिन्यांत माझी तब्येत बिघडली व घरीं परत यावें लागलें. नंतर दिवाळी झाल्यावर मी पुन्हां त्याच शाळेंत गेलों. यावेळीं माझी बनांतील राहण्याची सोय श्री. पांडुदादा परांजपे यांच्याकडे दादांनीं केली होती. परंतु मी पुन्हां आजारी पडल्यामुळें पहिल्या इयत्तेची परीक्षा न देतांच परत घरीं आलों. या आजारीपणांत माझे दोनचार महिने गेले. त्यानंतर पुन्हां माझें घरींच पंतोजीकडून शिक्षण सुरू झालें.

दोन वर्षांत राहिलेली अकरकी एकोत्रीपर्यंतची उजळणी, लिखितें लिहिणें व वाचणें, तोंडचे हिशोब व चालचलाऊ गणित एवढें माझें शिक्षण झाल्यानंतर वयाच्या नवव्या वर्षी १९१० सालीं वैशाखांत माझी मुंज व ज्येष्ठांत सोडमुंज झाली व बोटी सुरू झाल्यावर श्री. बाळाकाका ठाकूर यांच्याबरोबर दादा उद्योगधंद्यासाठीं म्हणून मुंबईला गेले. १९११ सालीं राज्यारोहणाच्या वेळीं मी सुमारें महिनाभर शाळेंत गेलों. यावेळीं मी बर्वे मास्तरांच्या घरींच राहत होतों. त्यावेळीं मला एक बहीण ( बहिणा ) व एक भाऊ ( सीताराम ) होता. दादा मुंबईला गेल्यानंतरच्या दिवाळींत आणखी एक भाऊ झाला.

त्याचें नांव गोविंदा. दादांना मुंबईंतच उद्योगधंदा मिळाला असल्यामुळें १९११ च्या चैत्रांत आमची आई, माझा धाकटा भाऊ गोविंदा याच्यासह मुंबईला गेली व काकू घरीं आली, त्यावेळीं गोविंदा फक्त सहा महिन्यांचाच होता.

## माझें मुंबईंत आगमन

आम्हां भावंडांत गोविंदा हा भाग्यवान. कारण त्यानें आमच्या आधीं मुंबई पाहिली. त्यावेळीं आमची बिऱ्हाडाची जागा बदलून लक्ष्मीबाईच्या वडाजवळच्या चाळींत दादा व काका आईसह रहावयास आले. त्यावेळीं ती चाळ नवी बांधलेली असून तीन खोल्यांच्या एका गाळ्याला फक्त दहा रुपये भाडें होतें. मागें पुढें गॅलरी व मोरींत नळ होता. सर्वच भाडोत्री नवीन आलेले होते. कोणाकडेच लहान मुलें नव्हतीं, त्यामुळें सहा महिन्यांचा गोविंदा सर्वांचा आवडता झाला होता. त्यानंतर आश्विन शुद्ध १० ला १९११ सालीं आमच्या गांवचे गणेश भटजी बापट यांच्याबरोबर मी प्रथमच, काकू, तिचा मुलगा राजाराम, गणेशभटजींचा मुलगा नाना व वामन दादू काळे अशीं एकूण सहा माणसें निघून द्वादशीला मुंबईला आलों. त्यावेळीं रेकले या नांवानें (अशा तऱ्हेचीं वाहनें अजून बडोद्याला आहेत) ओळखल्या जाणाऱ्या, दोन बैलांनीं चालणाऱ्या, रथासारख्या दिसणाऱ्या अशा गाड्या असत. त्या गाड्यांत मध्यें पाय सोडून माणसें बसत व सामान थोडें आंत पायाजवळ व कांहीं गाडीच्या माथ्यावर ठेवीत. त्यावेळीं मोदी बंदर येथें भेंडीजवळ बोटी लागत असत.

तेथून झावबाच्या वाडींत लक्ष्मीबाईच्या चाळीपर्यंत व पुढें काळबादेवीवरील आंग्रे यांच्या वाड्यापर्यंतचें भाडें फक्त दहा आणे पडलें होतें. आम्हांला आमच्या झावबाच्या वाडींतील बिऱ्हाडांत सोडून गणेश भटजी आपल्या मुलांसह आंग्रे वाड्यांत आपल्या बिऱ्हाडीं गेले. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं काका मला भाई जीवनजी गल्लींतील प्रभु सेमिनरी स्कूलमध्यें घेऊन गेले. त्या शाळेंतील श्री. देसाई मास्तर यांनीं माझें वय पाहून मला मराठी चौथ्या इयत्तेंत बसविलें व माझें शिक्षण सुरू झालें.

पुढें वार्षिक परीक्षा झाल्यावर मी एप्रिल महिन्यांत काकूबरोबर घरीं गेलों व आई मुंबईला आली. मी सुट्टी संपण्याच्या सुमारास म्हणजे मे महिन्याच्या २४–२५ तारखेस एका सोबतीबरोबर परत मुंबईला आलों व जूनपासून आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या आंग्रेवाडींतील हायस्कुलांत पहिल्या इयत्तेंत जाऊं लागलों.

आई दिवाळीपर्यंत राहून घरीं गेली व काकू मुंबईला आली. त्याच वेळीं म्हणजे १९१२ मध्यें दिवाळीनंतर दादांनीं दुकानाची जागा बदलून तें नव्या सदाशिव गल्लींतील जागेंत नेलें होतें. पुढें कांहीं दिवस आम्ही दोघें काकांकडे राहिल्यानंतर दादांना रात्रीं जेवावयास येण्यास उशीर होऊं लागला व तें न जमून दादा शेवटीं खाणावळींत जेवावयास जाऊं लागले. त्यानंतर मी महिना दोन महिने काकांकडे होतों. परंतु माझेंहि तेथें रहाणें जमूं शकलें नाहीं व माझी राहण्याची व्यवस्था दादांनीं

गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६ मधील नानासाहेब रानडे यांच्या घरीं केली व त्याच चाळीच्या तळमजल्यांतील दादा मुकादमांच्या खानावळींत जेवणाची सोय केली. एप्रिल १९१३ मध्यें इंग्रजी पाहिलीची परीक्षा देऊन उन्हाळ्याच्या सुट्टींत मी गांवीं गेलों. दादांची मिरजेची मावशी १९१२ सालच्या माघांत गोवळला आमच्या घरीं आली होती. तिनें शाळेंत घालण्यासाठीं माझा धाकटा भाऊ सीताराम याला आपल्याबरोबर मिरजेला नेला होता. तेथें तो आजारी झाला व तिच्या मुलानें त्याला मिरजेहून मुंबईला आणून आमच्या सदाशिव गल्लींतील दुकानांत पोंचवलें. दादांनीं पुढें तीन चार दिवस त्याला काकांकडे ठेवून एका सोबतीबरोबर बोटीनें गांवीं पाठविलें. त्यानंतर खाजणावरील आमच्या मामांनीं मुलांना शिकविण्यासाठीं एक पंतोजी ठेविले होते तेथें त्याला १९१३ च्या मे महिन्यांत शिकण्यासाठीं पोंचवून मी परत आलों व मे महिन्याच्या २५ तारखेस मी व विष्णु लेले घरून निघून २९ तारखेस मुंबईला पोचलों व शाळा सुरू झाल्यावर शाळेंत जाऊं लागलों.

## शांतारामाच्या चाळींत दुकान

आषाढांत सदाशिव गल्लींतून शांतारामाच्या चाळींत पुन्हां दुकान आणण्याच्या वेळीं सर्व सामान आणण्याचें कंत्राट एका रामा नांवाच्या हमालाजवळ दादांनीं ठरविलें. तेथून सामान भरून हमालाजवळ देण्यास दादा होते व नव्या दुकानांत सामान उतरून घेण्यास त्यांनीं मला सांगितलें. परंतु हमालाबरोबर त्या दुकानावरून या दुकानावर येण्यास कोणी नव्हतें. वाटेंत जर एखादा हमाल मुद्दाम 'रस्ता चुकला' तर काय करणार अशी शंका आम्हां दोघांच्या मनांत उद्भवली; तोंच देवाच्या गोठण्याचे दत्तोपंत गोखले नांवाचे एक गृहस्थ दादांच्या खास परिचयांतले सहज म्हणून दुकानावर आले. तेव्हां दादांनीं त्यांना सांगितलें कीं, 'मी दुकान बदलीत असून येथील सामान त्या दुकानीं न्यायचें आहे, हमालाबरोबर बाबू येईल व तेथें सामान उतरून घेईल. प्रत्येक वेळीं दुकान बंद करून यावयास नको म्हणून सर्व सामान त्या दुकानांत नेऊन होईपर्यंत तुम्ही तेथें बसून रहा. तास दोन तासांत सर्व सामान तेथें जाईल.' कारण हमाल चार पांच होते. त्यांनीं तें लगेच कबूल केलें. याप्रमाणें ७–८ फेऱ्या करून सर्व सामान या दुकानांत आणलें. लगेच कांटा लावणें, स्टॅंड उभा करणें, डबे जागच्या जागीं लावणें इत्यादि कामें त्या हमालांच्या मदतीनें रात्रीं ८–८॥ पर्यंत आटोपलीं. रात्रीं मी परत रानड्यांकडे गेलों व दादा खाणावळींत गेले. दुसऱ्या दिवसापासून तेथील दुकानांत विक्री करण्यास सुरुवात झाली.

या जागेंत १९१३ सालच्या जुलैच्या अखेरीस (आषाढांत) दुकान सुरू झालें. ते १९४१ च्या श्रावणापर्यंत त्याच जागेंत होतें. त्या सालीं त्याच चाळीच्या मालकांनीं शेजारींच नव्या बांधलेल्या इमारतींत पुन्हां दुकान बदललें. ती जागा इमारतीसह १९४३ च्या ऑक्टोबरमध्यें आम्ही खरेदी केली व त्याच इमारतीवर दोन मजले घेऊन १९५१ जूनपासून आम्ही सर्व कुटुंबीय आनंदानें व सुखसमाधानानें येथें रहात आहोंत. एक

भाऊ मात्र जवळच्या दुसऱ्या चाळींत रहात आहे. अशा रीतीनें दुकानाशीं माझा प्रथम संबंध सदाशिव गल्लींतील दुकानांतून शांताराम चाळींतील दुकानांत माल आणण्याच्या निमित्तानें आला.

## रोखीनें माल आणण्याचा प्रघात

नव्या जागेंत दुकान आणल्यानंतर मागील उधारी वसूल करण्यासाठीं दुकान बंद करून सकाळचा बहुतेक वेळ दादांना गिऱ्हाईकांना भेटण्यांत घालवावा लागे. त्याचप्रमाणें दुपारच्या जेवणाच्या वेळींहि दुकान बंद ठेवावें लागे. परंतु इतकें करूनहि उधारी वसूल होईना व दुकान बंद असल्यामुळें रोख विक्रीलाहि मुकावें लागे. उधारीचीं सर्व गिऱ्हाईकें खानदानी व घरंदाज होतीं खरीं पण त्यांच्याकडील पैसा वेळेवर मिळेनासे बघून उधारी वसुलीकडचें लक्ष कमी करून सर्व दिवस दुकान उघडें ठेवण्याचा प्रयत्न दादांनीं सुरू केला. दुपारीं एक दोन तास माल खरेदीला बाजारांत जाण्यापुरतेंच ते दुकान बंद ठेवूं लागलें. यामुळें रोख विक्रीची वाढ झाली व या विक्रीतून बाजारांतून रोखीनेंच माल आणण्याचा प्रघात दादांनीं सुरू केला.

दुपारीं दुकान बंद ठेवावें लागूं नये याकरितां दादांनीं दोनचार वेळां नोकर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. ठाकुरद्वारला विद्यारामभाईच्या वाडींत आमचे एक गिऱ्हाईक श्री. कमळाकरपंत पिटकर हे रहात. त्यांची बायको बाळंतपणासाठीं गांवीं गेल्यामुळे ते हातीं जेवण करून जेवीत. घरीं नीटपणें जेवण करणें जमत नसल्यामुळें त्यांनीं व दादांनीं मिळून दुकानांतच हातीं जेवण करण्यास सुरुवात केली. मी रोज संध्याकाळीं शाळा सुटल्यावर दुकानांत येत असे व सुट्टीच्या दिवशीं दुकानांतच असे. १९१४ च्या सुरुवातीपासून मामा रानडे यांच्याकडे रहाण्याचें सोडून मी दुकानांतच येऊन राहिलों. समजेल तें काम करावें, अभ्यास करावा व जेवून शाळेंत जावें असा माझा क्रम चालू होता. पुढें एप्रिलमध्यें इंग्रजी दुसरीची परीक्षा झाल्यानंतर वास्तविक सुट्टीचा मी घरीं जावयाचा परंतु त्यावेळीं दादा मला म्हणाले, 'आतां अभ्यास व शाळा पुरे, घरींहि जाऊं नको दुकानचेंच काम करण्यास शीक' म्हणून घरीं न जातां १९१४ च्या एप्रिलपासून मी दुकानांतच काम करावयास लागलों.

## शिक्षणाला कायमची रजा

पुढें शाळा सुरू झाल्यावर माझें शाळेंत जाणें जमलें नाहीं. अभ्यास चांगला असल्यामुळें व नंबर नेहमीं दुसरा तिसरा रहात असल्यामुळें वर्गशिक्षक श्री. भागवत व दुसरे शिक्षक श्री. फणसे शाळा सुरू झाल्यानंतर मी शाळेंत गेलों नाहीं म्हणून जूनमध्यें दादांना मुद्दाम भेटावयास आले व 'अशा अभ्यासांत हुषार असलेल्या बुद्धिवान मुलाला शाळेंतून काढूं नका,' असें त्यांनीं दादांना सांगितलें. परंतु त्यांना दादांनीं सर्व परिस्थिति समजावून सांगितल्यावर ते तरी काय बोलणार? माझें कल्याण चिंतून व आशीर्वाद

देऊन ते निघून गेले. अशा प्रकारें इंग्रजी दुसरी यत्ता पास झाल्यावर माझी शाळा सुटली ती कायमचीच.

शाळा सोडून एप्रिल १९१४ मध्यें वयाच्या १३ व्या वर्षी जो मी धंद्याशीं निगडीत झालों तों आजतागायत तेंच काम करीत आहें. यावेळीं धंदा ठीक होता. विक्रीहि होत असे पण ती उधारीची फार व रोखीची थोडी.

परंतु बरेचसे नवीन ग्राहक नोकरीवाले होते. ते दरमहा पगाराच्या दिवशीं बिलें चुकतीं करीत. कांहीं जुनीं गिऱ्हाइकेंहि येऊं लागलीं होतीं. मी दुकानांत असल्यामुळें वसुलीला जाण्यासहि दादांना वेळ मिळूं लागला. उधारीहि थोडी थोडी वसूल होऊं लागली. या वसुलीच्या मदतीनें १९१४ च्या मध्याला वचपाळ दाणेवाल्याचें देण्यांतून आम्ही मुक्त झालों. परंतु बाजारची उधारी, धंद्यासाठीं लोकांकडून घेतलेले पैसे व धंदा सुरू करण्यापूर्वीं झालेलें देणें अशा एकंदर ४–५ हजार रुपये देण्यामुळें आमचीं मनें नेहमीं अस्वस्थच असत.

१९१४ च्या ऑगस्टमध्यें पहिलें जागतिक युद्ध सुरू झालें. त्यामुळें बाजार भावांत वाढ होऊं लागली. यावेळीं गोवळला आजी, आई, बहीण ( बहिणा ); व गोविंदा अशीं चार माणसें होतीं. सीताराम आजोळीं शिकत होता. त्यांच्या पोटापुरतें भात तेथें येई. वरकड खर्च, कपडा वगैरेसाठीं व सरकारदस्त लावण्यासाठीं रोख पैसे पाठवावे लागत. पण तेहि आम्हाला वेळेवर पाठवितां येत नसत. त्या काळीं साळवटी लुगडीं २–२॥ रुपयाला मिळत पण तीं दरसाल घेण्यापुरती सुद्धां आमची ऐपत नव्हती. आजी घरचा प्रपंच कसा तरी चालवीत असे.

मामाकडील पंतोजी गेल्यामुळें सीताराम घरीं आला. आतां आजी, सीताराम व गोविंदा अशीं तिघें घरीं राहूं लागलीं. यावेळीं धंदा ठीक चालला असल्यामुळें पुन्हां एक नोकरहि ठेवला होता. तो व मी दुकानांतच झोंपत असूं.

विद्यारामभाईच्या वाडींतील श्री. कमळाकरपंत पिटकर सहा महिन्यांची शिलकी रजा घेऊन जातांना 'आम्ही परत येईपर्यंत भाडें भरून तुम्ही रहा' असें सांगून व खोली आमच्या ताब्यांत देऊन ते गांवीं गेले. त्या खोलींत सुमारें सहा, महिने राहिल्यानंतर कमळाकरपंत परत आले. तेव्हां त्यांची खोली त्यांच्या ताब्यांत देऊन दिवाळीपूर्वी दादा आईला घरीं पोचवून आले. येतांना बहिणाला त्यांनीं परत आणलें. कमळाकरपंतांची जागा परत दिल्यामुळें मी, बहिणा व दादा दुकानांतच राहूं लागलों. याच सुमारास नवीन ठेवलेला नोकरहि नोकरी सोडून गेला. त्या काळाप्रमाणें बहिणीचें वय लग्नायोग्य झालें असल्यामुळें दादा, तिच्या लग्नाच्या खटपटीस लागले. ठाणें येथील श्री. दिनकरपंत काळे यांचे ज्येष्ठ चिरंजीव दत्तोपंत यांच्याबरोबर तिचें लग्न वैशाख शुद्ध पंचमी ७ मे १९१६ रोजीं झालें. यावेळीं आईचे दिवस भरल्यामुळें मुलीच्या लग्नाला ती येऊं शकली नाहीं व योगायोग असा कीं त्याच दिवशीं आई गोवळ येथें प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव विष्णु ( बाळू ) असें ठेवलें.

## आईचा स्वर्गवास नि दादांचें दुसरें लग्न

पुढें दादा व मी दोघेच हातीं जेवण करून राहूं लागलों. पुन्हां आश्विनांत आई मुंबईला आली होती. परंतु ती चैत्र शु॥ ३ शके १८३९ रोजीं स्वर्गवासी झाली. त्याचें आम्हांला फारच दुःख झालें व आम्ही निराशेच्या दरींत फेकले गेलों.

आम्ही आधींच कर्जापायीं टेकीला आलों होतों. बहिणीच्या लग्नासाठीं एका सद्-गृहस्थाकडून दोनशें रुपये उसने घेतले होते; त्यांतले कांहींच परत देतां आले नव्हते. त्यांतच आई स्वर्गवासी झाल्यामुळें दादांचा व माझाहि धीर अगदींच खचून गेला व आम्हाला जिणें असह्य होऊन गेलें.

यावेळीं बाळू फक्त अकरा महिन्यांचा होता. त्याला अत्यंत लहान वयांतच मातृवियोग सहन करावा लागला. आजीला आई स्वर्गवासी झाल्याचें पत्र गेलें होतेंच. तें पत्र पोंचतांच मोठ्या दुःखित अंतःकरणानें, निराशेनें व पोळलेल्या मनःस्थितींत मुंबईला येऊन, ती बाळूला घेऊन घरीं गेली. सीताराम, मी व दादा येथेंच राहिलों. पुढें महिनाभर सीताराम सुट्टींत गांवीं जाऊन आला. मनें दुःखानें पोळलेलीं, डोक्यावर देण्याचा भार मोठा यामुळें आम्ही कसे तरी दिवस काढीत होतों. यावेळीं माझें वय १६ व सीतारामचें ११ होतें.

पुढें १९१७ च्या मार्गशीर्षांत दादांचें दुसरें लग्न झालें. दुसरें लग्न होऊन दादा मुंबईला परत आल्यावर आतां देण्यांतून कसे पार पडावें हा घोर आम्हांला लागला. परंतु आम्ही अतिशय काटकसरीनें वागून देण्याची थोडी थोडी फेड करीत होतोंच. त्यामुळें देण्याचा बोजा थोडा थोडा कां होईना, पण कमी होण्याच्या मार्गाला लागला होता.

वडिलांचें दुसरें लग्न झाल्यावर कांहीं मतभेद झाल्यास माझ्या भावंडांची जबाबदारी मी माझ्यावर घेतली होती. त्यामुळें नफ्याचें प्रमाण वाढण्याच्या दृष्टीनें धंद्यांत कांहीं तरी बदल करावे, असें मला वाटूं लागलें.

कारण धंद्यांतील चढाओढीमुळें फायद्यांतील प्रमाण फारच अल्प असे व खर्चाचें प्रमाण वाढणारें होतें. म्हणून बाजारीच कां होईना उंची तिखट, हळद, धनें, जिरें, गरम-मसाला वगैरे आणून त्यांचें मिश्रण करून तिखटाचा मसाला म्हणून मी तयार करूं लागलों. माल उंची व चोख असल्यामुळें लोकांना तो पसंतहि पडूं लागला व खपूंहि लागला. यावेळीं मसाला २८ तोळ्यांच्या एका शेराला चार आणे या भावानें आम्ही विकत असूं व आम्हाला त्यांतहि भरपूर फायदा होई.

पुढें माघांत १९१९ मध्यें दुसरी आई मुंबईला आली व सीतारामची मुंज झाली. पण महिन्या दीड महिन्यांतच मुंबईला कॉलऱ्याची सांथ सुरू झाली. त्यावेळीं

पहिल्याच तडाक्याला सीताराम कॉलऱ्यानें आजारी झाला व तडकाफडकीं एका दिवसांतच स्वर्गवासी झाला.

## फ्लू तापावरील जुना उपाय

सीताराम गेल्यामुळें आमचे हातपाय पुन्हां मोडल्यासारखे झाले. १९१८-१९ मध्यें प्रथम डेंग्यूफीवर व नंतर एन्फ्ल्यूएन्झाची सांथ सुरू झाली. पहिल्या साथींत फारशीं माणसें जाया झालीं नाहींत. परंतु दुसऱ्या साथींत माणसें जाया होण्याचें प्रमाण अतिशय वाढूं लागलें. सुरुवाती सुरुवातीला डॉक्टर लोकांनाहि याच्यावर औषधयोजना सुचत नव्हत्या. पण लवकरच ते बाह्योपचार म्हणून मोहरीची पावडर व अळशीचें पीठ या दोन वस्तूंचा उपयोग पुढीलप्रमाणें करावयास सांगूं लागले.

आमच्याकडे कुटलेले पदार्थ मिळतात म्हणून वरील कुटलेल्या वस्तूहि आमच्याकडे मिळतात कीं काय याची चौकशी कांहीं गिऱ्हाइकें करूं लागलीं. मोहरीच्या पावडरचा उपयोग :—पातेल्यांत कोमट पाणी घेऊन त्यांत थोडी मोहोरीची पावडर टाकून आंत पाय बुडवून आजाऱ्यानें बसावयाचें व अळशीचें पीठ पाण्यांत शिजवून त्यानें छाती शेकावयाची. यावेळीं बाजारांत या वस्तु चोख मिळत नसत. म्हणून मोहोरी व अळशी कुटून त्यांची भुकटी करण्यास मी सुरुवात केली. त्याचा खप भरमसाट वाढूं लागला. बहुतेक डॉक्टर बेडेकरकडून मोहोरीची पावडर अगर अळशीचें पीठ आणावयास सांगत. कारण या दोन वस्तू आमच्या दुकानांत चोख मिळतात हें कुलाब्यापासून पारल्यापर्यंत बऱ्याच डॉक्टरांना माहीत झालें होतें. त्यामुळें या वस्तूंचा खप त्या वर्षी बेसुमारच झाला.

अळशी व मोहोरी कुटण्याच्या मेहनतीमुळें व आम्ही दुकानांतच रहातों हें माहीत असल्यामुळें रात्रीं बेरात्रीं गिऱ्हाइकें येत. त्यामुळें होणाऱ्या जागरणानें आम्ही दोघे बापलेक आजारी पडलों. मला ताप येऊं लागला व खोकलाहि झाला. एकदां बाजारांतून परत येतांना मी वाटेंत चक्कर येऊन पडलों. रस्त्यांतील लोकांनीं मला शुद्धीवर आणून एका दुकानांत बसविलें. त्यावेळीं माझ्याबरोबर दुकानचे कांहीं जिन्नस व खिशांत कांहीं पैसेहि होते. परंतु पैसे वा जिन्नस कांहींहि न जातां मी सुखरूप परत आलों व दादांना सांगितलें कीं मी कांहीं दिवस हवा पालटण्याकरितां घरीं जातों. माझ्या प्रकृतीची काळजी वाटल्यावरून दादांनीं मला घरीं जाण्यास परवानगी दिली व १९१९ भाद्रपद शु. १२ ला मी कोंकणांत जाण्याकरतां पावसाळीं बोटीनें रवाना झालों व आजीच्या प्रेमळ शुश्रुषेमुळें, तसेंच कोंवळ्या कोवळ्या कांकड्या व दहीं दूध भरपूर मिळाल्यामुळें शरीरांतील उष्णता कमी होऊन मला बरें वाटलें. हा ताप व खोकला भागवठ्याचा होता. पूर्ण बरा होऊन मी दहा बारा दिवसांनीं मुंबईला परत आलों.

विष्णु नांवाचा आईचा एक भाऊ तिच्या लग्नानंतर आमच्या दुकानांत नोकरीसाठीं राहिला होता. त्याला एकदां मी कांहीं काम सांगितलें. त्यानें तें करण्याचें नाकारलें. दादा त्यावेळीं दुकानांत नव्हते. तो सख्खा मेहुणाच असल्यामुळें दादांचा

कलहि थोडा त्याच्याकडेच होता. त्याचे व माझे कामावरून बरेच वेळां मतभेद होत. मला असें वाटे कीं मी सांगितलेलें काम त्यानें करावें व त्याला असें वाटे कीं त्यानें सांगितलेलें काम मी करावें. यावेळीं मी त्याला एका गिऱ्हाइकाकडे जिन्नस पोंचविण्यास सांगितला होता. तें काम न ऐकतां त्यानें मला तूं नेऊन पोंचव म्हणून सांगितलें. परंतु त्याला गल्ल्यावर बसवून जाणें सोईचें नसल्यामुळें तूंच नेऊन पोंचव असें मी त्याला म्हणालों. तेवढ्यांत दादा आले. त्याचा स्वभाव एकंदरींत चमत्कारिक असल्याचे आमच्या निदर्शनास आलें होतें. त्यामुळें शेवटीं त्याला नोकरीच सोडून जावें लागलें. तो मोठा आणीबाणीचा क्षण होता. त्यावेळीं जर मी नरमाईनें वागलों असतों तर तो धंद्याच्या प्रगतीला एक मोठा अडथळाच झाला असता.

## ४ माझा विवाह

**आजीच्या** वृद्धापकाळामुळें तिच्याजवळ कुणी तरी मनुष्य हवें व मुंबईलाहि कुणी तरी जेवण करण्यासाटीं हवें म्हणून माझें लग्न करण्याचें दादांनीं ठरविलें. त्याप्रमाणें दादा आजारीपणांत घरीं गेले असतांना आजी दादांना म्हणाली कीं, तात्या गोखले यांची मुलगी बावूला करावी ( त्यांचें घर आमच्या गांवांतच आहे.) या मुलीच्या लहानपणीं दादा एकदां तात्यांच्याकडे गेले असतां मुलीची आई त्यांना सहज म्हणाली होती कीं, ही आपली सून बघून ठेवा व तें मलाहि माहीत होतें. पुढें तात्यांच्या कानावर माझें लग्न करीत असल्याचा विचार गेला तेव्हां त्यांनीं दादांना पत्र पाठविलें कीं तुम्ही मुलाचें लग्न करतां असें ऐकतों, तरी मी कार्तिकांत मुंबईला येईपर्यंत मुलाच्या लग्नाचें कोठें नक्की करूं नये.

परंतु तात्यांना त्यांच्या स्नेही मंडळींनीं अनुकूल सल्ला दिला नाहीं. कारण मी लहानपणीं दिसण्यांत किरकोळ व सात–आठ वर्षें खाण्याजेवण्याचे हाल होत असल्यामुळें प्रकृतीहि दिसण्यांत अशक्त दिसे. घरांत आई सावत्र, सांपत्तिक स्थिति सामान्यच. त्यामुळें 'मुलगा' या दृष्टीनें मी त्यांच्या स्नेह्यांना पसंत नव्हतों. परंतु त्यांतलेच एक स्नेही श्री. पांडुरंग परांजपे हे आपली मुलगी करून घेण्याबद्दल दादांना गळ घालीत होते. परंतु तो संबंध दादांना तितकासा पसंत नव्हता. त्यांच्या मुलीला मंगळ असल्यामुळें व मला मंगळ नसल्यामुळें तो संबंध जुळलाहि नाहीं. परंतु त्या मुलीचें लग्न दुसऱ्या स्थळाबरोबर जमल्यावर तिच्या लग्नाकरितां मात्र मी त्यांच्या घरीं गोवळला गेलों होतों. त्याच लग्नाला तात्यांचे दुसरे एक स्नेही श्री. लक्ष्मणराव परांजपे हे आलेले होते. त्यांनीं मात्र तुमच्या मुलीकरितां हा मुलगा पसंत करण्यास हरकत नाहीं, असें तात्यांना सांगितलें. नंतर मी मुंबईला आल्यावर दादा घरीं गेले असतां तात्यांच्या मुलीबरोबर लग्न नक्की करून मुंबईला परत आले. पण त्यावेळीं लग्नतिथी निश्चित ठरली नव्हती. वैशाख शुद्ध ९ चा मुहूर्त ठरवावा असें मनाशीं योजून दादा चैत्र अखेर पुन्हां घरीं गेले. मनाशीं योजिल्याप्रमाणें मुहूर्त नक्की केल्याचें पत्र चैत्र वद्य ३०, १८ एप्रिल १९२० रोजीं तुला येईल व तें येतांच दुकान बंद करून ५००–६०० रुपये रोख घेऊन आणि बहीण व गोविंदाला बरोबर घेऊन तूं वैशाख शुद्ध १ सोमवार ता. १९ च्या बोटीनें नीघ असें दादांनीं मला सांगितलें होतें.

तेव्हां गांवीं जाण्याचा बेत नक्की करून बहिणीला आणण्याकरितां संध्याकाळीं सहा वाजतां दुकान बंद करून मी ठाण्याला गेलों. बहिणीच्या सासऱ्यांना सर्व हकीकत सांगितली.

पण अगोदर सूचना दिलेली नसल्यामुळें त्यांनीं वहिणीला पाठवली नाहीं. पण आयत्या वेळीं चक्का आणून व श्रीखंड करून त्यांनीं मला केळवण मात्र केलें. रात्रीं ११ वाजतां मी परत आलों. सामानाची बांधाबांध संध्याकाळींच करून ठेविली होती. आमचे एक स्नेही हरिभाऊ परांजपे यांना याची माहिती होतीच, त्यांनीं दुसऱ्या दिवशींच आम्हाला ( मी व गोविंदा ) जेवणास बोलाविलें. त्यांनींहि मला केळवण केलें होतें.

## जबाबदारी वाढल्याची जाणीव

हरिभाऊ यांच्याकडे जेवून दुपारीं १२ च्या बोटीनें निघून गोविंदा व मी मंगळवारीं घरीं पोंचलों. दुसऱ्या मंगळवारीं ता. २७ एप्रिल १९२० वैशाख शु. ९ शके १८४२ रोजीं सायंकाळीं आमचा विवाह झाला. अगदीं लहानपणीं ठरलेले व जिची ओढ वाटत असे अशा मुलीबरोबर माझा विवाह झाल्यामुळें मनाला एक प्रकारची प्रसन्नता वाटूं लागली व कामधंदा करण्यासहि हुरूप वाटूं लागला. तसेंच जबाबदारी वाढल्याची जाणीवहि उत्पन्न झाली. यावेळीं आमचें कर्जहि बरेंच आटोक्यांत आलें होतें व धंदाहि बरा चालूं लागला होता. लग्नानंतर सोमवार तारीख ३ मे वैशाख १५ ला आम्ही घरून निघून बुधवार तारीख ५ मे १९२० रोजीं दादा, मी, आमची एक चुलत चुलती व गोविंदा अशीं मुंबईला आलों. बोट त्या दिवशीं फारच उशीरां म्हणजे दुपारीं २–२।। वाजतां मुंबई बंदरांत आली. त्यावेळीं आम्हांला कांहींच वाहन मिळेना. बऱ्याच वेळानें एक खटारा मिळाला, त्यांतून आम्हीं दुकानांत ३।। वाजतां आलों. दुकानच्या मागील दरवाजानें आम्हीं दुकानांत गेलों. नळ आलेले नसल्यामुळें पाणी मिळण्याची सोय नव्हती. तसेंच त्या काळीं बोटींत कांहीं खाण्याचीहि पद्धत नसे. त्यामुळें आम्हां सर्वांनाच अतिशय भूक लागली होती. म्हणून वाडींतील भाऊ वैशंपायन या नांवाच्या एका गृहस्थाकडून दोन तांबे पाणी आणून स्टोव्हवर चहा करून प्यालों. ज्या स्टोव्हवर आम्हीं चहा करून प्यालों तो स्टोव्ह अगदीं लहान होता. हातीं जेवण करतेवेळीं शेगडी पेटवतांना होणारे आमचे हाल पाहून तो श्री. दादासाहेब खांडेकर यांनीं आम्हांला वापरण्यास दिला होता.

नंतर १५–१६ दिवस दुकान बंद असल्यामुळें केरकचरा काढून दुकानाची झाडझूड केली व नळ आल्यावर स्नानें करून आमटीभात करून जेवलों व बोटीच्या प्रवासानें फार थकल्यामुळें झोपलों. पहांटे उठून स्नान करून दुकान उघडल्यावर प्रथम साखरेला गिऱ्हाईक आलें व त्यानें एक शेर साखर मागितली. साखर देऊन पैसे घेतांना त्याच्याकडून चार आणे घेतले. तेव्हां त्याला आश्चर्य वाटून त्यानें आणखी एक शेर साखर घेतली. असें दोन चार गिऱ्हाईकांनीं केल्यावर साखरेचा भाव कदाचित् वाढला असावा असा मला संशय आला. तेव्हां शेजारच्या दुकानांत एका गिऱ्हाईकामार्फत चौकशी करविली तेव्हां साखरेचा भाव सहा आणे शेर झाल्याचें समजलें. म्हणून बाजारांत जाऊन चौकशी करतां साखरेचा भाव बराच वाढला असून ती आतां सहा आणे शेर विकण्याइतकी महाग झालेली होती असें दिसून आलें. त्याचप्रमाणें तुपाचाहि भाव वाढला असून तोहि

१० आण्यांवरून चौदा आणे ते रुपयापर्यंत गेल्याचें समजलें व चौकशी अंतीं आणखीहि आमच्याकडे जादा शिल्लक असलेल्या वस्तूंपैकीं ५–६ वस्तूंचे भाव वाढले असल्याचें दिसून आलें.

त्यानंतर आम्ही बाजारभावाप्रमाणें जिन्नस विकण्यास सुरुवात केली. यावेळीं आमच्या दुकानांत साखरेच्या सहा गोणी व तुपाचे आठ डबे पूर्वीच्या भावानें आणलेले शिल्लक होते. अनपेक्षित रीत्या भावांत झालेल्या वाढीमुळें मी घरीं जातेवेळीं जे जिन्नस आणून ठेवले होते त्यांत चांगलाच नफा झाला. लग्न होऊन आल्यानंतर हा अनपेक्षितपणें झालेला लाभ पाहून हें लग्न झाल्याचें लक्षण चांगलें वाटूं लागलें व धंद्यांतहि मन प्रसन्नतेनें रमूं लागलें.

## मसाले कुटण्यास सुरुवात

आम्ही मसाले घरीं कुटण्यास जेव्हां प्रथम सुरुवात केली, तेव्हां फक्त गोडा मसालाच आम्ही घरीं कुटीत होतों व त्याच्या खपांतहि आतां वाढ होऊं लागली होती. तसेंच तिखट, हळद या वस्तूहि आम्ही चोख्या व उंची आणीत असल्यामुळें त्यांचाही खप वाढूं लागला होता. माल खरेदीकरतां १९१५ सालापासूनच मी बाजारांत जाऊं लागलों होतों व आई स्वर्गवासी झाल्यावर दादांचें मन उदास झाल्यामुळें बहुतेक खरेदीचें काम माझ्यावरच येऊन पडलें होतें. मी माल खरेदी करावयास लागल्यापासून दुकानांतील जिनसांत बरीच वाढ केली होती व यामुळें यथाक्रम विक्रींत व नफ्यांतहि वाढ होत गेली होती. आतां लग्न होऊन संसाराची जबाबदारी वाढल्यामुळें माल खरेदीच्या कामांत तसेंच मसाले बनविण्याच्या कामांतहि मी जास्त लक्ष देऊं लागलों. तसेंच कोणतीहि वस्तु आणतांना ती दोनचार व्यापाऱ्यांकडे नमुने पाहून व भावाचा काळजीपूर्वक तपास करून व शक्यतों उंची जिनसा आणावयाचा प्रघात मी चालू केला व त्याहि निवडून साफ करून विकण्याची प्रथा सुरू केली. माझें लग्न झाल्यानंतर पहिल्या श्रावणांत आजीचें पत्र आल्यावरून मी घरीं गेलों होतों. त्यावर्षी गणपती घरीं करून मी मुंबईस परत यावयाचा. परंतु पुढें सौभाग्यवतीची महालक्ष्मीची पूजा व्हावयाची होती. ती घरांतच करून मी दसऱ्यानंतर मुंबईला परत आलों. या सुमारास मी घरीं असतांना घरदुरुस्तीसाठीं म्हणून कांहीं झाडें व चारपांचशें काठी भादवी तोडून ठेवली होती. यंदा घराची दुरुस्ती करणें आवश्यक असल्यामुळें दिवाळी होतांच दादा त्याकरितां घरीं गेले व त्यांनीं घराची दुरुस्ती केली. त्यावेळीं मी व गोविंदा दुकानांत होतों व जेवण करून घालण्यास चुलत चुलती होती. गोविंदा शाळेंत जात असल्यामुळें दुपारीं तो शाळेंत गेल्यावर मला बाहेर जावयाचें झाल्यास दुकान बंद करून जावें लागे. म्हणून मी शांताराम या नांवाचा नोकर ठेवला. परंतु तो पूर्वी नाटक कंपनींत असल्यामुळें दुकानच्या कामांत त्याचें मन रमेना व तो चार सहा महिन्यांत नोकरी सोडून गेला. घराची दुरुस्ती पुरी झाल्यावर १९२१ च्या चैत्रांत दादा मुंबईला आले. कामाचा ताण

बराच पडल्यामुळें माझी प्रकृती पुन्हां बिघडली होती व दादा आल्यावर हवा पालटण्यासाठीं घरीं जावें असें मी योजिलें होतें पण घरदुरुस्तीकरतां पांच–सहाशें रुपये देणें झाल्याचें दादांनीं सांगतांच मी घरीं जाण्याचा बेत रहित केला.

## दादांनीं दुकानांतून लक्ष काढून घेतलें

दिवाळी होतांच दादा पुन्हां घरीं गेले. या दिवाळीत बाजारचे सर्व हिशोब वर्षांतून निदान एकदां तरी दिवाळींत चुकते करावे असें आम्ही ठरविलें होतें. त्यावेळीं आजीचाहि वृद्धापकाळ झाला होता. म्हणूनहि दादांना घरीं रहाणें अवश्य होतेंच. तसेंच मसाले कुटून विकण्याचें त्यांना न आवडल्याचेंहि कारण होतेंच. या सर्व कारणांमुळें दादा १९२१ सालीं घरदुरुस्ती करण्यासाठीं जे घरीं गेले तेव्हांपासून ते घरींच राहूं लागले. मधून मधून दोनदोन चारचार महिने ते मुंबईला येत व आमच्यावर देखरेख ठेवून व कांही धंद्याबाबत सल्ला देऊन पुन्हां ते घरीं जात. पुढें १९२१ च्या दिवाळीला दादा घरीं गेल्यानंतर पुन्हां मी एकटाच दुकानांत राहिलों. म्हणून १९२२ च्या जानेवारींत हरी बोडस याला नोकरीस ठेवला. हा मात्र आमच्या दुकानीं चांगलाच रुळला व तीस वर्षें नोकरी करून ९ सप्टेंबर १९५२ रोजीं स्वर्गवासी झाला! त्याच्या बायकामुलांना आम्ही त्यांच्या पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठीं म्हणून दहा हजार रुपये दिले. १९२२ च्या पावसाळ्यांत धंद्याबाहेर कर्जांपैकीं फक्त एकाचे २०० रु. देणें राहिले होते तेहि पाठवून दिले व आम्ही आतां धंद्याव्यतिरिक्त इतर कर्जांतून मुक्त झालों.

## उधारीवर उपाययोजना

त्या दिवाळीला त्या पूर्वींच्या वर्षीं ठरविल्याप्रमाणें जमलेले सर्व पैसे बाजारचे देण्यापैकीं दिले. तरीपण दोन अडीच हजार रुपये बाजारचें देणें राहिलेंच व वसुलीहि चार ते पांच हजारांच्या आसपास होती. अशा परिस्थितींत वसुलीच्या रकमेचें बारकाईनें निरीक्षण करतां यांतील बरीचशी वसुली बुडितच जाण्यासारखी असून थोडेच पैसे वसूल होतील असें दिसून आलें. म्हणून उधारीच्या बाबतींत कांहींतरी उपाययोजना करावी असें माझ्या मनाला वाटूं लागलें. दिवाळी होतांच दादा व आई मुंबईला आलीं. त्यावेळीं दादांच्यापुढें हा वसुलीसंबंधीं विचार मांडतांच त्यांनाहि त्याबद्दल थोडा विचार उत्पन्न झाला. माझें मत असें होतें कीं यांतलीं वेळेवर पैसे न देणारीं गिऱ्हाईकें बंद करावीं व जीं महिनेमाल पैसे देणारी आहेत तेवढीच गिऱ्हाईकें ठेवावीं. परंतु दादांना ती गोष्ट पसंत पडली नाहीं. ते म्हणाले कीं आपलीं उधारीचीं जीं गिऱ्हाईकें आहेत तीं नेहमीं आपल्याकडे येणारच व तेवढी विक्री होणारच. तीं जर सोडलीं तर धंदा कसा चालेल? मी नाहीं का सदाशिव गल्लींत स्वतंत्र दुकान सुरू केल्यावर त्यांच्याकडे पूर्वींच्या बाक्या असूनसुद्धां नवीन दुकान म्हणून माल देण्यास सुरुवात केली! दादांच्या या युक्तिवादानें त्यावेळीं गिऱ्हाइकें बंद करण्याचा विचार रहित झाला. पुढें दादा गांवीं गेल्यावर कांहीं उधारीचीं गिऱ्हाइकें बंद करण्याच्या योजनेकडे माझे विचार पुन्हां झुकूं

लागले. म्हणून प्रत्येक गिऱ्हाइकाची बारकाईनें छाननी केली. तेव्हां मला असें दिसून आलें कीं, कांहीं गिऱ्हाइकांना ते जरी जन्मभर दरमहा पैसे देत राहिले तरी दुकानाची बाकी फेडतां येणार नाहीं. निम्म्यांहून जास्त गिऱ्हाइकें या नमुन्याचीं दिसलीं व त्यांच्याकडील येणें रकमा चार हजार रुपयेपर्यंत होत्या. हे चार हजार रुपये जवळ जवळ बुडितच आहेत असें मला दिसून आलें. नमुन्यादाखल एकदोन उदाहरणें देतों.

## यांच्याकडून पैसे कसे वसूल होणार?

एक गृहस्थ शाळामास्तर असून त्यांना दरमहा ३० रु. पगार मिळे. त्यांतून ११ रुपये भाडें जाई. त्यांचे दोन पुतणे हायस्कूलमध्यें शिकत होते व तीं नवराबायको या चौघांचा खर्च भागवून आमचे पैसे देणार कसे? आमच्या दुकानांत त्यांचें महिना १०–१२ रुपये बिल होई व त्यांतील ५–७ रुपये ते देत. त्यांतच ते आजारी झाले व दोन महिने त्यांना कांहींच बिल देतां आलें नाहीं. त्यांच्या नांवावर शंभर रुपयांच्या आस-पास बाकी होती. तसेंच दुसरें एक उदाहरण फणसवाडींत राहणाऱ्या एका गिऱ्हाइकाचें. त्यांचे दोन भाऊ कॉलेजांत शिकत होते. तीं नवराबायको व दोन मुलें. दरमहा त्यांना साठ रुपये पगार मिळे. त्यांतले वीस बावीस रुपये भाडेंच जाई. त्यांच्या नांवावर दोनशें रुपये बाकी होती. इतर खर्च भागवून ते ही बाकी फेडणार कसे? दरमहाचें बिलहि त्यांना पुरें देतां येत नसे व मूळ बाकींत दरमहा वाढच होई.

आदल्याच वर्षीं आम्हीं वर्षांतून एकदां तरी बाजारचीं बिलें चुकतीं करावीं असें ठरविलें होतें. या वर्षीं घेतलेल्या जमाखर्चाच्या आढाव्यावरून बाजारचें देणें दोन हजार रुपयेच होतें. व येणें एकंदर चार पांच हजार रुपये होतें. पण त्यापैकीं जवळ जवळ चार हजार रुपये बुडितच दिसल्यावरून अशीं निम्मी गिऱ्हाइकें तरी बंद करावीं अशी पुन्हां माझ्या मनानें उचल घेतली व मी एक पत्रक लिहून काढलें. त्यांत मी असें लिहिलें होतें कीं, चालू महिन्याचें बिल जे पुरे देतील, त्यानांच पुढील महिन्याचा माल देऊं. एरवीं त्यांनीं यादी पाठवूं नये. कारण जवळ जवळ निम्मी गिऱ्हाइकें चालू महिन्याचें बिलहि पुरें देणारीं नव्हतीं. तें पत्रक मी त्या गिऱ्हाइकांना वाचावयास दिलें. त्यावरून त्यांना माझ्याबद्दल थोडासा राग आला व "आम्ही कोठें पळून जातों काय? आम्ही पैसे देऊं, पैसे कांहीं आम्ही बुडविणार नाहीं" असें ते म्हणूं लागले. यांत अशींहि कांहीं गिऱ्हाइकें होतीं कीं ज्यांच्या घरीं एकदोन दिवसाआड कांहीं जिनसा पाहिजेत कां असें विचारायला जावें लागे व ते जिन्नस घरीं पोंचवावे लागत. मग महिना भरल्यावर हिशोब करण्याकरितां म्हणून त्यांच्याकडे दोनचार खेपा माराव्या लागत. हिशोब केल्यावर अमुक जिन्नस आम्ही आणलाच नाहीं, अमक्याचा भावच जास्त लावला असें करून त्यांतून ते रुपया बारा आणे कापीत. १०–१२ रुपयांत रुपया बारा आणे कापले म्हणजे जवळ जवळ सर्वच फायदा निघून जाई व दहा रुपये जमा करा असें सांगत. अशा वेळीं मूळची शेंदीडशे रुपये

बाकी व चालू महिन्याचे राहिलेले एक दोन रुपये मिळून येणें बाकी वाढेच. त्यामुळें हें पत्रक काढण्याचा माझा ठाम निश्चय झाला होता.

### सचोटीनें धंदा करण्याची इच्छा

त्याचें कारण म्हणजे आम्ही जरी कर्जबाजारी होतों तरी आमची बुद्धि सचोटीनें व पापभीरू वृत्तीनें धंदा करण्याची होती. आम्ही ब्राह्मण असल्यामुळें तेल, तूप, साखर, गूळ, मीठ आदि वस्तूंची विक्री करणें ही रसविक्रय व वाणिज्य वृत्ति आम्हांला धर्मबाह्य होती. ब्राह्मणाचा व्यवसाय म्हणजे वेदविद्येचें व इतर शिक्षण घेऊन तें दुसऱ्यांना शिकवावयाचें, परंतु आम्ही या वाणिज्य वृत्तीमध्यें पडलों. तो धंदा तरी सात्विकपणानें सचोटीनें व परमेश्वराला स्मरून करण्याची आमची इच्छा असे. त्यामुळें गिऱ्हाइकानें रुपया दोन रुपये कापलेले मला आवडत नसे. प्रत्येक उधारीची विक्री करतेवेळीं हा जिन्नस मला कोणी सांगितला व तो मी कोणाच्या हातांत दिला हें आम्ही चोपडींत लिहून ठेवीत असूं व दर महिन्याच्या पहिल्या तारखेला तपशीलवार आंकडे देत असूं. असे तपशीलवार आंकडे देऊनहि कांहीं गिऱ्हाइकें वरीलप्रमाणें पैसे कापीत व पैसेहि पुरे देत नसत. त्यामुळें बाकी वाढत जात असे, याचें मला फार वाईट वाटे. त्यांतच लढाई संपल्यावर बाजारभावांत जो उतार सुरू झाला होता, त्यामुळें वस्तूंचे भाव कमींतकमी होत जाऊं लागले. कांहीं गिऱ्हाइकें तीनचार महिने हिशोब न करतां चार महिन्यांनीं पहिल्या महिन्याचा हिशोब करायला घेत. मध्यंतरीं भावामध्यें थोडा फरक झालेला असे व तसा ते आम्हांला सांगत. त्यांना जर सांगितलें कीं समजा हा जानेवारीचा आंकडा आहे व तुम्ही मेमध्यें हिशोब करतां, तर ज्या दुकानदाराकडे तुम्ही भावाची चौकशी केलीत त्याच दुकानदाराला या वस्तूचे जानेवारींत काय भाव होते ते विचारून या. पण ते म्हणत 'आम्हांला काय गरज आहे, त्यांचा भाव असा आहे, तुमचा भाव जास्त आहे.' तेव्हां पैसे त्यांच्याकडे अडकल्यामुळें ते देतील ते पैसे घेऊन स्वस्थ बसावें लागे. आमच्या दुकानांत रोख घेणाऱ्या गिऱ्हाईकाला व उधार घेणाऱ्या गिऱ्हाईकाला एकच व सारखा भाव असे. राहिलेल्या निम्म्या गिऱ्हाईकांपैकीं बहुतेक लोक महिनेमाल पैसे चुकते करीत व त्यांच्या नांवावर बाकीहि फारशी नसे. त्यांतलीं सुमारें दहा बारा गिऱ्हाइकें तर अशीं होतीं कीं, जीं महिन्याचा पगार झाल्यावर घरीं जावयाच्या आधीं आमच्या दुकानावर येऊन बिल देऊन मग घरीं जात. त्यापैकीं दोनचार गिऱ्हाइकें तर पगाराचें पाकीटच देऊन ठेवीत. त्या पाकिटांतील पैसे मोजून आम्हीं त्या पाकिटावर मांडून ठेवीत असूं. असे जादा आलेले पैसे बाजारांत देऊन माल आणण्यास आम्हांस उपयोगी पडत. या गिऱ्हाइकांची दुकान बाकी जमा करून राहिलेले पैसे दोन तीन दिवसांनीं इतर थोडी वसुली झाली म्हणजे त्यांचे त्यांना आम्ही परत करीत असूं. अशा तऱ्हेनें आमच्याबद्दल सहानुभूति व प्रेम बाळगणारींहि कांहीं गिऱ्हाइकें होतीं.

### पत्रकाचा योग्य तोच परिणाम

वरील पत्रक पाहिल्यानंतर कांहीं गिऱ्हाइकें कीं ज्यांना महिन्याचेहि पैसे पुरे देतां

येत नव्हते तीं बंद झालीं. असे दोनचार महिने गेल्यावर पुन्हां असें एक पत्रक काढलें कीं, दरमहाचें बिल व मागील बाकीपैकीं निदान पांच रुपये तरी दिल्याशिवाय पुढली यादी पाठवूं नये. तसेंच कांहीं जिन्नस पाहिजे कां हें विचारण्याकरितां मनुष्य घरीं येणार नाहीं. दुकानांत येऊन सांगितल्यास फार तर माल घरीं पोंचवण्याची व्यवस्था करूं. त्यावेळींहि आणखी कांहीं गिऱ्हाइकें सुटलीं. यानंतर पुन्हां चार महिन्यांनीं दिवाळीच्या सुमारास ( १९२३ सालीं ) त्यांच्या खात्यावर असलेल्या बाकीपैकीं निम्मे पैसे तरी चुकते केल्याशिवाय दिवाळीनंतर 'आम्ही माल देणार नाहीं, असें एक पत्रक काढलें. त्यांत असें कारण नमूद केलें होतें कीं, आम्ही मूळ स्वतःचे भांडवलदार दुकानदार नव्हेत. लोकांचें कर्ज काढूनच आम्ही धंदा सुरू केला व कालावधीनें तें कर्ज फेडावें लागलें. त्यामुळें मूळ भांडवली पैसा संपला व बाजारचे व्यापारी आपली बाकी दिवाळीच्या वेळीं चुकती करायला सांगतात व चार पांच हजार रुपयांचें येणें असूनहि दोन अडीच हजार रुपये बाजारचें देणें आम्हांला चुकतें करतां येत नाहीं. वर्षांतून एकदां तरी सर्व देणें चुकतें व्हायला बाकी वसुलीशिवाय दुसरा मार्ग नाहीं. म्हणून दिलगिरीनें हें पत्रक काढावें लागत आहे.' हें पत्रक दाखविल्यावर बऱ्याचशा गिऱ्हाइकांमध्यें नाखुषी उत्पन्न झाली व कांहींनीं 'हें पत्रक अजून रद्द करा असे आम्हीं एकदम पैसे कसे देणार ?' असें मला सांगितलें. ती वेळ मात्र माझ्या कसोटीची होती. परंतु पत्रक रद्द करण्याच्या मोहाला बळी न पडतां ( कारण त्यांत बरीचशीं जुनीं गिऱ्हाइकें सुटत होतीं. ) मी त्या पत्रकालाच चिकटून राहिलों. आतां मात्र आमचीं बाकी न देणारीं सर्व गिऱ्हाइकें सुटलीं व सुमारें तीन चार हजारांची ठोकरहि आम्हांस बसली. कारण त्या गिऱ्हाइकांपैकीं पुष्कळांचे पैसे वसूल झाले नाहींत. परंतु हें केव्हां तरी घडणारच होतें याची मला कल्पना होती. वेळेवर पैसे देणारीं गिऱ्हाइकें मात्र कायम होतीं व पुढें आणखी बाकी वाढून दरसाल बुडितखात्यांत जाणाऱ्या जास्त बाक्यांपासून आम्ही बचावलों. आतां बरीचशी गिऱ्हाइकें कमी झाली व विक्रीहि कमी होऊं लागली. पण नवीन कोणाचेंच खातें ठेवायचें नाहीं असा कायम निश्चय मात्र मी केला होता व त्याप्रमाणें एकहि नवीन खातें आम्ही चालू केलें नाहीं. त्यावेळच्या चालू खात्यांपैकीं रेल्वेचें ऑडिट डिपार्टमेंट दिल्लीला गेलें, त्यांत कांहीं खातीं कमी झालीं. कांहीं खातीं गिरगांवांतील मंडळी जागा सोडून दादर, विरार, पारले वगैरे उपनगरांत रहायला गेल्यामुळें कमी झालीं. कांहीं सेवानिवृत्त होऊन आपापल्या गांवीं रहावयास गेले; कांहीं मृत झाले व असें होतां होतां १९३०-३२ पर्यंत उधारीचें असें एकहि गिऱ्हाईक राहिलें नाहीं. अपवादात्मक म्हणून एकदोनच गिऱ्हाइकें राहिलीं होतीं.

### उधारी बंद झाल्यावर...

१९२३ च्या दिवाळीनंतर बरीचशीं उधारीचीं गिऱ्हाइकें सुटल्यामुळें साहजिकच विक्रीचें प्रमाण कमी झालें. परंतु जीं गिऱ्हाइकें राहिलीं होतीं, त्यांच्या उधारींत बूड

येऊन नुकसान होणार नाहीं हा आत्मविश्वास होता. प्रत्येक गिऱ्हाइकाकडे सकाळीं माल विचारायला जाणें, पुन्हां तो माल पोंचविणें, पैशाचा हिशोब करायला जाणें हे व्यापहि नाहींसे झाले होते. त्यामुळें मनाला एक प्रकारचा हुरूप वाटूं लागला. म्हणून धंद्यांत आतां काय सुधारणा कराव्यात म्हणजे रोखीचीं गिऱ्हाइकें वाढतील याचा विचार मी करूं लागलों. त्याकरितां म्हणून बाजारचा प्रत्येक जिन्नस साफ करून विकण्याची प्रथा मी सुरू केली. त्यावेळीं असें एक उदाहरण घडलें. अडीच शेर बेदाणा मी बाजारांतून आणला होता. त्या प्रत्येक बेदाण्याला काडी होती व तीमुळें बेदाणा स्वच्छ व उठावदार दिसत नव्हता म्हणून तो मी साफ करण्यास घेतला. त्या कामाला मला दोन दिवस लागले. परंतु प्रत्यक्ष वजनाच्या दृष्टीनें विचार करतां अडीच शेर बेदाण्यांत दोन तीन तोळ्यांहून जास्त घट लागली नाहीं. म्हणजे लक्षांत घेण्याजोगी ही घट नव्हती. मुळांत जिन्नस आणतेवेळीं शक्यतों उंची व कचरा कमी असलेला जिन्नस आणण्याकडे मी लक्ष देऊं लागलों. असे उत्तम जिन्नस विकूं लागल्यामुळें रोकड विक्रींतहि भरपूर वाढ होऊं लागली. मसाल्याचा खप वाढता होताच. लोणचें थोड्या थोड्या प्रमाणांत खपूं लागलेंच होतें व आतां पापड, मेतकूट असे आनुषंगिक पदार्थहि बनविण्यास सुरुवात केली. एक नोकर व मी मिळून एका दिवसांत जास्तींत जास्त दोन पायलीपर्यंत पापड बनवीत असूं. हे पापड लाटण्यास सुकें पीठ वापरावें लागे व त्यामुळें तें सुकलें कीं पापड वांकडे होत. दोन पायलीचे पापड ठेवण्यास पांच सहा डबे लागत. धंदेवाईक दृष्टीनें हें थोडें गैरसोईचें होतें व पापडांचा खपहि वाढूं लागला होता. म्हणून पापड करण्याच्या पद्धतींत बदल करून ते तेलावर लाटण्यास सुरुवात केली, पापड बनविण्याकरितां स्वतंत्र माणसेंहि ठेवलीं. अशा क्रमानें धंद्याचा व्याप थोडा थोडा वाढत चालला.

### स्वच्छ मालाला गिऱ्हाईक फार

मसाले, लोणचीं, पापड वगैरे वस्तु विकायला सुरुवात केल्यामुळें व इतर किराणा वस्तूहि चोख व साफ करून विकूं लागल्यामुळें त्यांचा खपहि झपाट्यानें व भरपूर होऊं लागला व नफ्याचें प्रमाण वाढल्यामुळें १९२५ च्या दिवाळीला बाजारचे सर्व हिशोब धनत्रयोदशीला संपूर्ण चुकते केले व त्यानंतर मध्यंतरीं दिवाळी-पर्यंत लागणारे जिन्नस आम्ही रोखीनेंच आणले व त्या वर्षी लक्ष्मीपूजन आम्ही शांत मनानें व संपूर्णपणें निष्कर्जी होऊन केलें. १९२६ च्या जूनपासून गोविंदा शाळेंतील अभ्यास संपवून दुकानांतच काम करूं लागला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३०५५६ वि: ५२३
क्रमांक ८५८ नों: दि: ७।५।६७

# ५ धंद्याचा विस्तार

आतां आमचा धंदा उत्तम चालत होता. गिऱ्हाईक खूष असे व सर्वांना माल पसंत पडत असे. गिऱ्हाईक वाढत चालल्यानें एका दुकानांत किती गिऱ्हाइकांचा समावेश होणार म्हणून दुसरें दुकान सुरू करावें असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. एका दुकानच्या दरवाजांतून जेवढीं गिऱ्हाइकें आमच्याकडे येऊं शकतील त्याच्यापेक्षां दुसरें दुकान झालें तर आणखी तेवढींच गिऱ्हाइकें आपल्याला सांभाळतां येतील या भावनेनें आणखी एक दुकान काढावें असें माझ्या मनानें घेतलें व मी त्या प्रयत्नाला लागलों. कारण गोविंदा व मी आम्ही दोघे दोन दुकानें सांभाळूं शकलों असतों. तेवढ्यांत अशी एक संधीहि आली. आतां सध्यां जें आमचें ठाकुरद्वारीं दुकान आहे, त्याच जागेंत आमच्याच गांवचे श्री. नरुकाका काळे यांचें अशाच मालाचें दुकान होतें. त्यांची पत्नी स्वर्गवासी झाल्यावर व त्यांची स्वतःची प्रकृति बिघडल्यामुळें ते जे बाहेरगांवीं गेले ते पुन्हां आलेच नाहींत. म्हणून एक वर्षभर वाट पाहून त्या जागेच्या ट्रस्टींनीं कोर्टामार्फत तें दुकान आपल्या ताब्यांत घेतलें व दुकानांतलि सामानाचा लिलांव केला. ती जागा घेण्याची संधि मी दवडली नाहीं. राहिलेलें भाडें त्यांच्या ज्ञातीच्या ट्रस्टींनीं घेऊन तें दुकान आम्हाला दिलें व त्या ठिकाणीं आम्हीं दुसरें दुकान १९२८ मध्यें सुरू केलें. आतां आमचीं दोन दुकानें झालीं व दोन्ही दुकानचे दोन दरवाजे मिळून दुप्पट गिऱ्हाइकांचा समावेश होऊं लागला. विक्रींतहि बरीच वाढ झाली.

## मुगभाटांतील दुकानाची दुरुस्ती

१९२८ च्या माघांत प्रभाकरचें मावंदें व चि. गोविंदाचें लग्न होऊन आम्ही मुंबईला आल्यानंतर व ठाकुरद्वार येथें दुकान चालू केल्यावर मुगभाटमधील मूळ दुकानाला, ती चाळ दुरुस्त करावयाची असल्यामुळें घरमालकांकडून तें दुकान खालीं करण्याची नोटीस मिळाली. त्याप्रमाणें सर्व भाडोत्री व दुकानदारहि दुसरीकडे गेले, पण आम्हांला सोयीस्कर जागा न मिळाल्यामुळें आम्ही जाऊं शकलों नाहीं. चाळ दुरुस्त करणाऱ्या मिस्त्रीला भेटून मी त्याला विचारलें कीं, "तुम्ही चाळ कशी दुरुस्त करणार ?"

तेव्हां त्यानें सांगितलें कीं, "सर्व चाळ पाडणार नसून जें जें लांकूड सामान खराब झालें असेल तेवढें लांकूड सामान बदलून दुरुस्ती करणार व तेंहि एका टोंकाकडून दुसऱ्या टोंकाकडे दुरुस्त करीत नेणार." म्हणून आम्ही घरमालकांना भेटून "आमच्या दुकानाकडचा भाग दुरुस्त होईपर्यंत पलीकडची एक जागा आम्हांला कांहीं दिवस वापरावयास द्या" अशी विनंती केली. घरमालकांनीं ती विनंती मिस्त्रीच्या मतानें

मान्य करून एक जागा मध्यें सोडून पलीकडची जागा आम्हांस वापरावयास दिली. आम्ही सर्व सामान त्या जागेंत आणून आमची जागा दुरुस्तीसाठीं घरमालकांच्या ताब्यांत दिली. त्या जागेंत ४–५ महिने काढल्यावर आमची मूळ जागा दुरुस्त झाली व आम्ही परत त्या जागेंत आलों. याच सुमारास २२ फेब्रुवारी १९२९ रोजीं माझा सावत्र भाऊ गजानन याचा जन्म झाला. त्याच सुमारास मुंबईंत हिंदु मुसलमानांचा दंगा सुरू झाला. त्याची आम्हांला फारच भीति वाटूं लागली व आम्ही सर्वच भाऊ मुंबईंत, जर कांहीं कमीजास्त झालें तर घरचें कुटुंब फार संकटांत येईल, म्हणून गोविंदा व बाळू या दोन भावांना सोबतीबरोबर बोटीनें गांवीं पाठविले. सर्व बायकामंडळी कोंकणांतच होती. मी एकटाच हातीं जेवण करून जेवूं लागलों. नोकर जरी जेवायला बाहेर होते तरी रात्रीं झोंपण्यास एकदोन नोकर आमच्या बिऱ्हाडीं असत. त्यांची मला सोबत होती. या दंग्याच्या वेळीं संध्याकाळीं ६ ते सकाळीं ६ अशी कर्फ्यू ऑर्डर ( संचारबंदी ) सरकारनें जारी केली होती. याच सालीं गुरुवार ता. ३१ ऑक्टोबर, १९२९ शके १८५१ आश्विन वद्य चतुर्दशीस माझी आजी स्वर्गवासी झाली व आमचा मागच्या पिढींतील दुवा गळून पडला.

## कारखान्याच्या जागेला नोटीस

त्यानंतर जयराम कानजीच्या चाळींतील आमच्या मसाले दळण्याच्या कारखान्याला १९३० सालीं जागा खालीं करण्याबद्दल घरमालकांकडून नोटीस मिळाली व ती जागा खालीं करून पांजरपोळ पहिल्या गल्लींत आम्ही आपला मसाला दळण्याचा कारखाना घेऊन गेलों. याच सालीं १३ जून १९३० रोजीं आम्हाला पहिली मुलगी झाली. तिचें नांव यशोमती ऊर्फ ताई.

## दादरची तिसरी शाखा

गुरुवार पौष शु. १२ शके १८५२, जानेवारी १९३१ च्या पहिल्या तारखेला दादर ( बी. बी. ) स्टेशनसमोरील पाटील टेरेसमध्यें आम्ही आमचें तिसरें दुकान सुरू केलें. परंतु ४–५ महिन्यानंतर त्या चाळीचे व्यवस्थापक व त्याच इमारतीत हॉटेल असलेले श्री. आस्पिजर इराणी यांनीं आम्हांला घरमालकांकडून दुकान खालीं करण्याची नोटीस देवविली. कारण त्यांचे हॉटेलांत असलेल्या गृहोपयोगी वस्तूंपैकीं कांहीं आमच्याहि दुकानांत विक्रीला असत. त्या घरमालकाकडे आम्ही पुष्कळ रदबदली केली. पण त्याचा कांहींच उपयोग न झाल्यामुळें ती जागा खालीं करून जवळच्याच रानडे रोडवरील गंगानिवासमध्यें मार्गशीर्ष शु. ४ शके १८५४, गुरुवार ता. १ डिसेंबर १९३२ रोजीं आम्ही आपलें दुकान नेलें. त्यावेळीं आम्हांला एकच गाळा मिळाला होता. पुढें आषाढ शु. ४ शके १८६० ता. १ जुलै १९३८ रोजीं शेजारचा आणखी एक गाळा मिळाला. तो घेऊन हें दुकान दोन गाळ्यांचें केलें.

सोमवार ता. ७-११-३२ कार्तिक शु. १० रोजीं चि. बंडू ( त्रिंबक ) चा जन्म झाला.

## कोटांतील शाखा

दादर शाखा गंगा निवासमध्यें नेऊन तेथील धंदा सुरळीत चालू झाल्यानंतर रविवार ३० ऑक्टोबर १९३२ कार्तिक शु. १ शके १८५४ रोजीं कोटांत बझारगेट स्ट्रीटमध्यें चौथें दुकान सुरू झालें. ती जागा लहानच होती. पण विक्री चांगली होई. एक वर्षाच्या आंतच २६ ऑक्टोबर १९३३ गुरुवार कार्तिक शु. ८, शके १८५५ रोजीं एकाएकीं अनपेक्षित रीत्या २४ तासांत जागा खालीं करण्याची घरवाल्याची नोटीस आम्हांला तेथें मिळाली. तिचें कारण आमच्या दुकानासमोर सीताराम शिंपी या माणसाचें एक शिवणकामाचें दुकान होतें. त्याच्या घरमालकानें ती इमारत विकावयास काढली होती व त्या इमारतीची मागणी या सीताराम शिंप्यानें केली. आपला भाडोत्रीच आपली इमारत विकत घ्यायला निघाला याचा त्या मालकाला फार राग आला व शिंप्यानें मागणी केल्याबरोबर लगेच मालकानें त्याला २४ तासांत जागा खालीं करण्याची नोटीस दिली. शिंप्यानें त्याच रात्रीं आमच्या दुकानच्या घरमालकाकडून आमचे व शेजारील दोन मिळून तीन गाळे घेण्याचें ठरवून आम्हां तिघां दुकानदारांना २४ तासांच्या आंत दुकान खालीं करण्याच्या नोटिसा देवविल्या. आमच्या घरमालकाला सीताराम शिंप्याचें बरेंच कर्ज असल्यानें त्या भिडेमुळें त्यांनीं आम्हाला नोटिसा दिल्या. आमच्या दुकानचा मनुष्य दुकान न उघडतां ती नोटीस घेऊन धांवत घाबरत आम्हाला सांगण्यास आला. ती नोटिस पहातांच मी ताबडतोब घरमालकाला जाऊन भेटलों. परंतु त्यानें आपला अगतिकपणा माझ्या नजरेस आणल्यावर लगेच नोटिसीप्रमाणें दुकान ताब्यांत देण्याचें ठरवून मी दुसरी जागा शोधण्यास सुरुवात केली. सीताराम शिंप्याला पण बरोबर घेतलें व सर्व बझारगेट स्ट्रीट पाहिला. पण तेथें दुकान रिकामें नव्हतें व रिकामें होण्यासारखें पण नव्हतें. नंतर त्याच्या बाजूच्याच होळी चकला या गल्लींत एक नवीनच घर बांधलेलें असून तळमजल्यावरील जागेंत घरमालकांचें मोटर गॅरेज करावयाचें होतें. त्या गॅरेजचा दरवाजा बसवून झाला होता व आंतून लादी बसवीत कडिये बाहेर येत होते. गाडी आंत चढण्याकरितां शेवटच्या उतरत्या दोन तीन लाद्या लावायच्या होत्या. ही जागा मिळेल तर पाहूं असा विचार करून या उतरत्या लाद्या बसवायचें जरा थांबवा, आम्हीं घरमालकाला विचारून येतो असें त्या कडयांना सांगितलें व पांचव्या मजल्यावर जाऊन घरमालकाला भेटलों व त्यांच्याजवळ त्या जागेची मागणी केली. ही जागा भाड्यानें द्यावयाची नसून स्वतःच्या मोटर गॅरेजकरतां बांधली आहे असें त्यांनीं सांगितलें. परंतु ‘ तुम्ही भाडें काय द्याल ’ असें त्यांनीं विचारलें. तेव्हां ‘ तुम्ही मागाल तें देऊं ’ असें मी म्हणालों.

त्यांनीं ४५ रु. भाड्याची मागणी केली. तें कबूल करून आम्ही आगाऊ भाडें त्यांना देऊन व कच्ची पावती घेऊन मालकांसह खालीं आलों. आम्ही सांगितल्याप्रमाणें उतरत्या लाद्या लावण्याचें त्या कडिये लोकांनीं थांबविलेलें होतें. त्यांना आम्ही सरळ लाद्या लावण्यास मालकांकडून सांगविलें व दुपारीं २–३ वाजेपर्यंत सरळ लाद्या लावून

जागा आमचे ताब्यांत देण्याचें त्यांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें मी घरीं येऊन जेवून व बाजारांतील कामें करून तीन वाजतां २–४ गडी माणसांसह तेथें हजर झालों. लादी वगैरे बसवून पुरी झाली होतीच. तसेंच मालकानें दुकान आमच्या ताब्यांत दिलें. बझारगेट-मधील आमचें दुकान एकतर लहान होतें व त्यांत मालहि माफक होता. फर्निचर वगैरे फारसें बनविलेलें नव्हतेंच.

या नव्या जागेंत लगेच पूजा वगैरे करून त्या दुकानाचा माल नव्या जागेंत आणण्यास ४ वाजतां सुरुवात करून ६ वाजतां तें काम संपवून ६ वाजतां दुकान मालकांच्या ताब्यांत दिलें. कारण त्या शिंप्याला आठच्या आंत आपली जागा खालीं करून द्यावयाची होती. अशा तऱ्हेनें चोवीस तासांऐवजीं बारा तासांतच त्या दुकानाची जागा खालीं करून मालकांच्या ताब्यांत दिली.

वास्तविक कायद्याचें पाठबळ घेतलें असतें तर आम्हांला एक महिना त्या जागेंत काढतां आला असता. परंतु माझ्या वृत्तींत तसें नसल्यामुळें दुसरी जागा मिळतांच १२ तासांत ती जागा खालीं करून दिली. पण जागा जर न मिळती तर त्या दुकानचें सामान आमच्या मुगभाट येथील दुकानीं आणून ती जागा आम्ही मालकाच्या ताब्यांत दिलीच असती. केव्हांहि घरमालकाविरुद्ध वागावयाचें नाहीं असा माझा स्वभावच आहे.

त्याप्रमाणें आठ वाजतां त्यानेंहि आपलें दुकान खालीं करून मालकांच्या ताब्यांत दिलें. ही जागा प्रथम लहानच म्हणजे १५′×१०′ होती. १ मार्च १९५१, गुरुवार, माघ व. ८ शके १८७२ रोजीं तेथील मालकांनीं दुकानच्या पाठचा चौक व त्याच्या मागील तेवढीच गुदामाची जागा आमच्या दुकानाला योग्य भाडें घेऊन जोडून दिली आहे.

## ठाकुरद्वार शाखेला नोटीस

वरील नोटिसींतून मोकळे झाल्यानंतर आमचें ठाकुरद्वारचें दुकान खालीं करण्या-बद्दल ट्रस्टींकडून आम्हांला एक महिन्याची नोटीस मिळाली.

ही इमारत अतिशय जीर्ण झालेली होती. ती नवीन बांधणें अत्यावश्यकच होतें. परंतु ठाकुरद्वार रस्त्याला दुकान मिळणार कसें? या विवंचनेंत आम्ही पडलों. पण परमेश्वरी कृपेनें याहि अडचणींतून मार्ग निघाला. या इमारतीच्या शेजारच्या नव्या झालेल्या इमारतींत सोभाराम लालजी नांवाच्या गुजराती ब्राह्मणाचें किराणा मालाचें दुकान होतें. या दुकानाला साठ रुपये भाडें होतें. हें भाडें जास्त वाटल्यावरून ते ही जागा सोडून शेजारींच एका जुन्या चाळींत ४० रु. भाड्याच्या जागेंत गेले. तें दुकान आम्हांला १ मार्च १९३५ रोजीं काळ्यारामाच्या ट्रस्टींकडून ताबडतोब भाड्यानें मिळालें व जरी या नोटिसीची मुदत एक महिना होती तरी त्यापूर्वींच आम्ही ती जागा ट्रस्टींच्या ताब्यांत दिली. ही इमारत संपूर्ण पायासकट नवी बांधण्यांत आली. तें काम पुरें झाल्यानंतर त्यांच्या ट्रस्टींनीं आमची जागा आम्हांला परत दिली व डिसेंबर १९३५ मध्यें त्या जागेंत आम्ही परत आपलें सामान नेलें.

ही जागा फारच लहान म्हणजे १०'×६' ची होती. पुढें जुलै १९४८ मध्यें पाठचा कांहीं मोकळा भाग आमच्या दुकानांत ट्रस्टींनीं सामील करून दिला. लगेच सोभाराम लालजी आपल्या दुकानांत परत आले.

आम्हांला एकंदर सहा जागांना सहा नोटिसा मिळाल्या खऱ्या व जवळजवळ ४–५ वर्षें अतिशय मनस्ताप सुद्धां सहन करावा लागला पण परमेश्वरी कृपेनें रहात्या जागेपासून दुकानासह सर्व जागा पूर्वींपेक्षां सरस मिळाल्यामुळें आम्हांला मानसिक समाधान चांगलेंच लाभलें व त्यावेळीं मनाची अशीहि खात्री झाली कीं जर आपण सत्यधर्मानें वागलों तर परमेश्वर आपल्या पाठीशीं असतो. मुंबईसारख्या शहरांत घरमालकांनीं दुकानासाठीं व राहण्यासाठीं इमारती बांधून ठेवल्या होत्या. म्हणून आम्हांला जागा मिळत गेल्या. त्यांनीं जर इमारती बांधलेल्या नसत्या तर आम्ही कांहीं प्रत्येक वेळीं घरें बांधूं शकलों नसतों. म्हणून घरमालकांच्या मर्जीविरुद्ध कधींहि वागावयाचें नाहीं असा माझ्या मनाचा कल असल्यामुळें परमेश्वरानें प्रत्येक वेळीं मला सरसच जागा मिळवून दिल्या.

१९३५ सालीं सुपारीबाग रोडवर कैंप कंपनीच्या समोर आमची पांचवी शाखा आम्ही सुरू केली. पण नंतर ती जागा गैरसोईची वाटल्यावरून १९३६ च्या मार्चमध्यें तें दुकान बंद करून पोयबावडी येथें माणकेश्वर मंदिराच्या बाहेर १५ एप्रिल १९३६ चैत्र व. ८ बुधवार शके १८५८ रोजीं दुकान सुरू केलें. आतां आमचीं एकंदर पांच दुकानें सुरू झालीं. त्यानंतर आणखी दुकानें वाढविण्याचा विचार मात्र तहकूब केला.

२१ फेब्रुवारी १९३५ ला श्रीधरचा जन्म झाला. १९३५ व ३६ साल पांचांहि दुकानांची स्थिरस्थावर करण्यांत घालविलें.

एकंदर सहा जागांना नोटिसा मिळाल्यामुळें जरी आम्हांला प्रत्येक जागेच्या बदली चांगली जागा मिळाली होती तरी अतिशय मनस्ताप सहन करावा लागल्यामुळें आणखी दुकानें वाढविण्याचा विचार मी सोडून दिला.

१९३८ सालीं दादरला दोन घरें बांधलीं व १९३९ मध्यें गोवळचें घर नवीन बांधलें. १ ऑगस्ट १९३९ रोजीं मालिनी ब्लॉकमध्यें रहावयास गेलों. १ सप्टेंबर १९३९ ला दुसरें जागतिक युद्ध सुरू झालें. १९४० च्या ४ ऑक्टोबरला आमची तिसरी मुलगी सुनंदा हिचा जन्म झाला व ५ मार्च १९४१ ला माझी सावत्र बहीण गंगू हिचा विवाह झाला.

१ ऑगस्ट १९४१, श्रावण शके १८६३ मध्यें आमचें पिंपळाखालील दुकान सीताराम ब्लॉक ( आतां बेडेकर सदन नं. ३ ) या जागेंत आलें.

## बेचाळीसची पळापळ

१९४२ च्या पळापळीमध्यें आमचीं सर्व माणसें आम्ही गांवीं पाठविलीं होतीं. मी एकटाच मुंबईला राहिलों होतों. या वर्षी आम्ही आंब्याच्या ऋतूमध्यें अगदीं लहानांत

लहान भांड्यांतूनसुद्धां लोणचें भरून ठेवलें होतें. परंतु लोक जसे बाहेर पळाले होते तसे २० जून नंतर लोकांचें आगमन पुन्हां सुरू झालें. पण लोणच्याचे आंबे मिळायचे बंद झाले व आमच्याकडील वर्षाच्या बेगमीचें घातलेलें लोणचेंहि लवकरच संपणार अशीं चिन्हें आम्हांला दिसूं लागलीं. म्हणून तोतापुरी, पायरी, हापूस, रायवळ जे आंबे बाजारांत मिळतील ते घेऊन आम्ही लोणच्याचें काम सुरूच ठेवलें. हिंदुस्थानांत कोठें ना कोठें तरी आंबे मिळत. आम्हांला आंब्यांचा पुरवठा करणाऱ्या दलालांना आम्ही अशी वर्दी दिली कीं, हिंदुस्थानच्या कुठल्याहि भागांत आंबे मिळाले तरी पडेल तो भाव देऊन आणा. आंबे सहाजिकच फार महाग पडत. २८ पौंडाच्या मणाला १५ रु. पासून २५–३० रुपयांपर्यंत आंब्याचा भाव पडूनहि आम्ही लोणच्याचा भाव वाढविला नाहीं. पूर्वीचा ६ आणे रत्तलाचाच भाव कायम ठेवला. याचें कारण आजपर्यंत आमच्याकडील लोणचें विकत घेऊन लोकांनीं आमचें पोषण केलें परंतु यंदा ते इथें नव्हते व घरांतील भांडींकुंडींहि गांवीं ठेवून आले होते. कित्येक लोक हातीं जेवण करून जेवीत. त्यांना यंदा लोणच्याची उणीव भासूं नये कारण ते यंदाच लोणचें बनवूं शकले नव्हत. म्हणून कमींत कमी एक वर्षापर्यंत ६ आणे रत्तल या भावानेंच आम्ही सबंध वर्षभर लोणचें विकीत होतों. रोज नवें लोणचे मिळत असल्यामुळें त्या वर्षी लोणचेंहि बेसुमार खपलें.

## भागीदारी व लिमिटेड कंपनी मध्यें रूपांतर

४२ च्या आश्विनांत दादा मुंबईला आले होते. त्यावेळीं त्यांना असें वाटलें कीं, मुलांच्या धंद्यांतील हितसंबंधासाठीं कांहीं तरी योजना करून ठेवावी. म्हणून ते आप्पासाहेब चितळ्यांना भेटले व त्यांच्याशीं वाटाघाटी करून कायद्याला धरून हा प्रश्न सोडविण्याचें त्यांनीं ठरविलें. ती योजना ठरवितांना त्यांत कांहीं अडचणी होत्या. त्या अशा– थोरला मुलगा ( म्हणजे मी ) बरीच वर्षें ( २८ ते ३० ) दुकानांत प्रत्यक्ष काम करीत होतों व धंद्याला मसाले, लोणचीं, पापड, बनविण्याची जोडहि मीच दिली होती. दुसरा गोविंदा हाहि माझ्या खालोखाल बरींच वर्षें ( १४ ) काम करीत होता. बाळूलाहि दुकानांत काम करायला लागून ६–७ वर्षें झालीं होतीं. यानंतर मागचे दोन मुलगे गजानन व रमेश यांचेंहि संरक्षण पाहण्याची जबाबदारी दादांच्यावर होती. म्हणून कायद्याच्या कक्षेंत बसूनहि प्रत्येकाला योग्य मोबदला मिळावा या दृष्टीनें त्यांनीं एक योजना आंखली. ती म्हणजे सर्वप्रथम त्यावेळच्या आपल्या एकंदर इस्टेटीची वांटणी करणें. त्यांत म्हणजे आम्ही पांच मुलगे पहिले तीन व दुसरे दोन व आपण उभयतां दोघें मिळून सात भाग करून सर्व मिळकतीचे सात समान हिस्से केले. म्हणजे त्यावेळीं प्रत्येकाला समान हिस्सा मिळालेला आहे.

## लिमिटेड कंपनीत रूपांतर

यानंतर दुसरी योजना त्यांनीं खालीलप्रमाणें केली:— या धंद्याचें स्वरूप लिमिटेड कंपनी या नांवानें करून आम्ही ३ मुलगे व आपण स्वतः मिळून या

धंद्यांत जितकीं वर्षें काम केलें त्या प्रमाणांत प्रत्येकाला शेअर देण्याचें ठरविलें. शेअर्सची किंमत प्रत्येकानें आपल्या हिश्श्यांतून द्यावयाची होती. म्हणजे कंपनी लिमिटेड झाल्या-पासूनच्या होणाऱ्या नफ्यातोट्यांत प्रत्येकाला त्याच्या शेअरप्रमाणें नफातोटा मिळावयाचा होता. परंतु ३१ ऑक्टोबर १९४२ पर्यंत जरी कोणीहि कितीहि वर्षें काम केलेलें असलें अगर नसलें तरी प्रत्येकाला समसमान हिस्सा मिळालेला होता. अशा तऱ्हेनें पहिल्यानें १ नोव्हेंबर १९४२ रोजीं भागीदारीची कंपनी व नंतर १ मार्च १९४३ पासून व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लिमिटेड असें नांवांत रूपांतर करण्यांत आलें. तेव्हांपासून या लिमिटेड कंपनीच्या नांवानें सर्व धंदा व स्थायिक मालमत्ता आहे.

लिमिटेड कंपनीची स्थापना झाल्यानंतर आमचें दुकान असलेली मुगभाट-मधील शांतारामच्या चाळींतील प्रॉपर्टी विकत घेण्याचें साटेंखत ३ जून १९४३ रोजीं आम्ही केलें. व २५ ऑक्टोबर १९४३ रोजीं खरेदीखत पूर्ण होऊन आमचें मुख्य दुकान असलेली इमारत व त्याचेबरोबर तिच्या पाठीमागच्या दोन इमारती आमच्या मालकीच्या झाल्या.

यापूर्वी १९४२ सालच्या ११ ऑक्टोबर (आश्विन शुद्ध १ शके १८६४) रोजीं चि. वसंतचा जन्म झाला.

धंद्याचा व्याप बराच वाढूं लागल्यामुळें दुकानचा एक गाळा आम्हांला कमी पडूं लागला. आमच्या शेजारील हॉटेलवाले श्री. देवाप्पा पांडुरंग कामत यांच्याकडे डबल गाळा व त्याच्यामागील एक खोली भाड्यानें होती. पण श्री. देवाप्पा यांना ' जर आमचें म्हणणें योग्य वाटलें तर राजीखुषीनें त्यांतील एक गाळा तुम्ही आम्हांला देऊं शकाल काय ? ' अशी मी विनंती केली. त्यानंतर त्यांनीं आपल्या बंधूंना विचारून आमची गैरसोय होत असलेली प्रत्यक्ष त्यांना दिसत असल्यामुळें उभयतां बंधूंनीं प्रेमानें, खुलासमाधानानें व आनंदानें एक गाळा आम्हांला देण्याचें कबूल केलें. आम्हांलाहि आनंद झाला व लवकरच आम्ही त्यांतील एक गाळा आमच्या गाळ्याला जोडून घेतला व तेव्हांपासून म्हणजे बुधवार माघ शु. १ शके १८६५, २६ जानेवारी १९४४ पासून आमचें मुगभाटांतील मुख्य हें दोन गाळ्याचें झालें.

या दुकानाची जागा दोन गाळ्याची व विस्तृत असल्यामुळें दुकानाच्या व्यापाराची योग्य ती वाढ झाली.

## माझ्यावर झालेली पोलीस केस (ऑगस्ट १९४२)

कांहीं दिवसांपूर्वी मी टेबलावर लिहीत बसलों असतांना एक गृहस्थ टेलिफोन करण्यासाठीं आले होते. त्यावेळीं आमच्या टेबलावरील दोन फाउंटन पेनें चोरीस गेलीं असल्यामुळें बाहेरच्या माणसाला टेलिफोन करण्यास देऊं नये असें आमचें सर्वानुमतें ठरलें होतें. म्हणून त्यांना मी म्हटलें कीं ' थोड्या वेळापूर्वी आमच्या टेबलावरील दोन फाउंटन पेनें चोरीला गेलीं आहेत म्हणून सध्यां कांहीं दिवस बाहेरच्या माणसाला टेलिफोन करावयास द्यावयाचा नाहीं असें आम्हीं ठरविलें आहे म्हणून निदान आजचा दिवस तरी

दुसरीकडून कुठून तरी टेलिफोन करा.' त्यावेळीं टेलिफोनला पैसे पडत नसल्यामुळें सबंध दिवस सारखा टेलिफोन करणाऱ्या लोकांचा सुळसुळाट असे. मी त्यांना 'आजचा दिवस दुसरीकडून टेलिफोन करा' असें सांगतांच त्या गृहस्थानें उद्धटपणें जरा अपशब्द बोलून 'तूं काय समजला आहेस, पाहून घेईन' असा दम देऊन ते गृहस्थ निघून गेले. त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न मी केला. परंतु कांहींच ऐकून घ्यायची त्यांची तयारी नव्हती. त्यानंतर कांहीं दिवसांनीं १९४२ च्या श्रावणांत मी नव्या चोपड्यांची यादी करीत असतांना ते गृहस्थ टेलिफोन करण्याच्या मिषानें हातांत एक पुडी घेऊन आले व जरा खोंचक आवाजांत, 'बेडेकर शेट, टेलिफोन करूं का' असें मला म्हणाले. तेव्हां मी जरा बाजूला झालों व त्यांना टेलिफोन करण्यास दिला. एवढ्यांत साध्या कपड्यांतील पोलिस वर चढले व त्यांनीं माझे खांदे धरले व ती पुडी दाखवून ही खडीसाखर तुम्ही विकली असें म्हणून माझ्या सदऱ्याच्या खिशांतून एक रुपयाची नोट काढून दाखविली व सर्व दुकानाची झडती घेऊन ते मला आग्रीपाडा पोलिस स्टेशनवर घेऊन गेले. एवढ्यांत तिथें असलेल्या ऑफिसरनें कागदावर कांहीं मजकूर लिहून त्यावर मला सही करण्यास सांगितलें. परंतु 'तो मला वाचून दाखवा; बरोबर असेल तर मी सही करतों' असें म्हटल्यावर त्यांनीं मला वाचून दाखविलें. घडलेली वस्तुस्थिति व त्यावर लिहिलेला मजकूर यांत पुष्कळच विसंगति असल्यामुळें 'जर सही करावयाची असेल तर मी सांगतों त्याप्रमाणें मजकूर लिहा व मी त्याखालीं सही करतो;' असें म्हणतांच त्यांनीं मला सांगितलें कीं 'याच कागदावर सही करा.' तेवढ्यांत एक मोठे पोलिस ऑफिसर त्याचवेळीं तेथें आले व मला 'सही कां करीत नाहीं' असें त्यानीं विचारलें. तेव्हां 'हा लिहिलेला मजकूर खरा नसल्यामुळें मी सही करीत नाहीं.' जर खरा मजकूर लिहिला तर मी सही करण्यास तयार आहे, असें मी त्यांना सांगितलें. नंतर त्यांनीं मला सही करण्याची जबरदस्ती केली नाहीं. कांहीं वेळानंतर, 'आतां तुम्हांला घरीं परत जाण्याची इच्छा असली तर कुणाला तरी जामीन रहायला बोलवा व तारखेच्या दिवशीं कोर्टांत हजर व्हा;' असें ते ऑफिसर म्हणाले. त्यावर मी दुकानावर टेलिफोन करून हरी केशव गोखले यांच्याकडील अनंतराव जोशी यांना जामीन रहाण्यास बोलाविलें व मी जामिनावर सुटून आलों.

त्यानंतर सुमारें १० महिन्यांनीं त्या केसचा निकाल होऊन माझें म्हणणें कोर्टाला ग्राह्य वाटल्यावरून माझी निर्दोष म्हणून सुटका झाली. परंतु हे दहा महिने पोलीस केस असल्यामुळें आपलें म्हणणें कितीहि खरें असलें तरी सरकारी वकिलाच्या तपासणी-उलटतपासणींत तें शेवटपर्यंत टिकेल काय अशी सारखी धास्ती वाटे. हे वकील लोक उलट सुलट प्रश्न विचारून बुचकळ्यांत पाडतात व कुठें तरी शब्दांत पकडतात. त्यामुळें हे १० महिने माझे अतिशय मनस्तापांत जाऊन शरीराचें वजनहि जवळ जवळ २० पौंड कमी झालें. परंतु केसचा निकाल अनुकूल लागल्यामुळें आजी जें म्हणे कीं, 'खऱ्याला मरण नसते व सत्याचा केव्हां तरी जय होतोच' याची मला प्रचीति आली.

# ६ : स्वातंत्र्य प्राप्तीनंतर—!

**१९४५ सालीं** लढाई बंद होऊन तिचें पर्यवसान ब्रिटिशांचा जय होण्यांत झालें तरीहि ते आंतून फारच खिळखिळे झाले होते. तारीख ८ ऑगस्ट १९४२ रोजीं महात्मा गांधीनीं ब्रिटिश सरकारला हिंदुस्थान सोडून जाण्यास फर्माविलें होते. तीहि एक प्रकारें शांततेची लढाईच होती. त्या लढाईत शेवटीं ब्रिटिश सरकारनें १५ ऑगस्ट १९४७ रोजीं अप्रत्यक्ष पराभवच पत्करला असें म्हटलें तर तें चुकीचें होणार नाहीं.

हें स्वराज्य मिळण्यापूर्वी सुमारें एक वर्षभर या देशांतील मोठमोठ्या शहरांतून व मुंबईतहि हिंदुमुसलमानांचे दंगे चालू होते. मुंबईतला दंगा भाद्रपद शु. ३, २९-८-४६ रोजीं सुरू होऊन जवळ जवळ वर्षभर चालू होता. १९४२ सालीं महात्मा गांधींनीं सुरू केलेल्या या लढाईत कांहीं समझोता करावा असे प्रयत्न सुरू झाले व परिणामीं १४ ऑगस्ट १९४७ श्रावण वद्य ३० रोजीं रात्रीं १२ वाजतां स्वराज्य देण्याचें ठरविण्यांत आलें व मुस्लिम लोकांनीं सवतासुभा केल्यामुळें भारताचा कांहीं भाग निराळा करून देऊन त्यांनाहि निराळें राज्य देऊन त्याचें नामाभिधान 'पाकिस्तान' असें ठरविण्यांत आलें. १४ तारखेच्या संध्याकाळपर्यंत हें स्वराज्य देण्याचा आपला शब्द इंग्रज लोक पाळतीलच यांवर लोकांचा विश्वास बसत नव्हता. तरीपण १५ तारखेला सरकारनें प्रसिद्ध केल्याप्रमाणें इतरांप्रमाणें आम्ही आमच्या सर्व दुकानांना सुटी दिली होती.

रात्रीं १२ वाजल्यानंतर नभोवाणीवरून ब्रिटिशांनीं स्वराज्य दिल्याचें व आपल्या पुढाऱ्यांनीं तें घेतल्याचें घोषित केल्यावर मनाला एक प्रकारचा आनंद झाला व त्या आनंदाप्रीत्यर्थ ता. १५ रोजीं पांचहि दुकानच्या सर्व नोकरांना मुगभाटच्या दुकानांत बोलावून आम्हीं एक संमेलन भरविलें, त्यावेळीं आमचे जाहिरात एजंट व खेळगडीकार श्री. का. रा. पालवणकर यांना बोलावून त्यांच्या अध्यक्षतेखालीं आमच्या सर्व नोकरांना अल्पोपहार व एक महिन्याचा पगार बक्षीस म्हणून दिला. अशा तऱ्हेनें १५ ऑगस्ट हा दिवस आम्ही आमच्या नोकर माणसांसमवेत आनंदानें साजरा केला. कारण इतिहासकाळांत अशा तऱ्हेची स्वराज्य मागणें व तें देणें अशी घटना घडलेली ऐकण्यांत व वाचनांत आलेली नव्हती. मला संधि आली असतांना तिच्यावर झडप घालून

ती हस्तगत करण्याची एक संवय आहे. त्या संवयीला धरुनच आमच्या नोकरवर्गाला एक महिन्याचा पगार बोनस व अल्पोपहार देऊन मी ती संधि हस्तगत केली पण इतर व्यापारी, कारखानदार, मिलमालकांनीं मात्र वर्तमानपत्रांत बराच ऊहापोह झाल्यावर व नोकरवर्गानें मागणी केल्यावर महिन्या पंधरा दिवसांचा पगार देऊन बोळवण केली.

## कारखान्यासाठीं जागेची खरेदी

आमचे कारखाने जशी जरूर पडेल तसे आम्ही निर्माण करीत गेल्यानें ठिक-ठिकाणीं विखुरलेले होते. त्यांचें एकत्रिकरण करण्याकरितां म्हणून एक मोठा कारखाना एकाच जागीं बांधावयाचा विचार होता. म्हणून १ सप्टेंबर १९४७ रोजीं शीतळा देवी टेंपल रोड, माहीम येथें एक १५–१६ शें वारांचा प्लॉट खरेदी केला. परंतु कारखान्याचा आराखडा मंजूर होऊन बांधकाम सुरू होण्यापूर्वीच नगर योजनेमुळें तो आमचा आराखड्याचा भाग 'रेसिडेन्शियल एरिया' मध्यें घालण्यांत आल्यामुळें त्या जागेवरती आम्हांला कारखाना बांधतां आला नाहीं.

त्यानंतर आम्ही अजूनहि कारखान्यासाठीं स्वतःची इमारत बांधून त्यांत कारखान्यांचें एकत्रिकरण करूं शकलों नाहीं व एकत्रीकरणाचें ध्येय असल्यामुळें व आमचा मसाले दळण्याचा कारखाना हा जड उद्योगधंद्यांमध्यें बांधला पाहिजे असें संबंधित अधिकाऱ्यांनीं ठरविल्यामुळें कुर्ला, अंधेरी रोडवर 'हेवी इंडस्ट्री एरिया 'मध्यें एक जागा घेण्याचें नक्की केलेलें असून त्याचें आतां खरेदीखतहि झाल आहे.

त्यानंतर १९५१ सालीं माहीमच्या जागेवर ती 'रेसिडेन्शीयल एरिया' ठरल्यामुळें ४०५९०९ रु. खर्च करून त्यावर भाड्यानें देण्यासाठीं दोन इमारती बांधल्या व त्यांत सध्यां भाडेकरू राहात आहेत.

## १९४८ ते ६० पर्यंत घडलेल्या घटना

* ३० जानेवारी १९४८ रोजीं दिल्ली येथें आपले सन्मान्य नेते महात्मा गांधीजी यांचा ते प्रार्थनेला जात असतेवेळीं एका इसमानें खून केला. त्या खुनानंतर महाराष्ट्रांत ब्राह्मण ज्ञातीचीं शेकडों घरें जाळण्यांत आलीं.

* आमची थोरली मुलगी चि. यशोमती ( ताई ) हिचा विवाह ता. १९-६-४९ रोजीं जेष्ठ वद्य ८ रोजीं झाला.

* पौष शु. ११ शके १८७१ ता. ३० डिसेंबर १९४९ रोजीं माझे जिवलग मित्र माधवजीभाई हे स्वर्गवासी झाले.

* २७ जानेवारी १९५० रोजीं नागपूर येथें माझी सावत्र बहीण सौ. गंगूताई ही आपल्या श्वशुरगृहीं स्वर्गवासी झाली.

* ९ जून १९५० रोजीं सौ. लीलाचा विवाह झाला.

* पौष शु. ५ शके १८७२, शुक्रवार ता. १२–१–५१ रोजीं सदन नं. ३ व ४ या इमारतींवर आम्हाला स्वतःला राहण्यासाठीं मजला बांधण्याचा मुहूर्त केला.

* २१ फेब्रुवारी १९५१ रोजीं माझा सावत्र भाऊ चि. गजानन व मोठा मुलगा चि. बंडू ( त्रिंबक ) यांचे विवाह झाले.

* नंतर २० जूनला गोविंदाचें व माझें कुटुंब सदन नं. ३ व ४ या इमारतीवर घेतलेल्या नव्या मजल्यावर रहावयाचा मुहूर्त करुन त्या जागीं आम्ही राहूं लागलों.

* १४ सप्टेंबर १९५१ भाद्रपद शु. १४ रात्रीं साडेदहा वाजतां गोवळ येथें आमचे परमपूज्य पिताजी ती. दादा हे स्वर्गवासी झाले. यत्किंचितहि दुसऱ्याकडून सेवा करून न घेतां हृदयाच्या आजारानें ते स्वर्गवासी झाले.

* १६–१–१९५२ रोजीं घोडपदेव येथील मसाले दळण्याच्या कारखान्याची शेड भुईभाड्यानें विकत घेतली.

* ९ सप्टेंबर १९५२ भाद्रपद व. ६ रोजीं माझी सावत्र आई पार्वतीबाई या स्वर्गवासी झाल्या व याच दिवशीं आमचे जुने नोकर हरिभाऊ बोडस हेहि आपल्या गांवीं स्वर्गवासी झाले.

* १ फेब्रुवारी १९५३ रोजीं माहीम येथील प्लॉटवर कारखाना होऊं न शकल्या-मुळें बेडेकर सदन नं. ६ ह्या इमारतीचें बांधकाम पुरें होऊन भाडेकरू रहावयास आले.

* ज्या माझ्या प्रियतम आजीला हें जीवनचरित्र मी अर्पण केलें आहे तिचें स्मारक म्हणून २०–४–१९५३ रोजीं सहा हजार रुपये राजापूर म्युनिसिपालिटीला देणगी देऊन राजापूर येथें भागिर्थीबाई पर्शराम बेडेकर या नांवानें सूतिकागृह बांधलें आहे.

* १ जून १९५३ रोजीं माहीमच्या प्लॉटवरील दुसऱ्या इमारतीचें बांधकाम पुरें होऊन बेडेकर सदन नं. ७ मध्यें भाडेकरू रहावयास आले.

* ८ एप्रिल १९५४, गुरुवार, चैत्र शु. ६ शके.१८७६ रोजीं पहांटे ४ ते ५ च्या दरम्यान आमचे जिवलग मित्र ती. दादासाहेब हेजीब यांच्या सुशील पत्नी सौ. सत्यभामाबाई ह्या बऱ्याच दिवसांच्या आजारानें स्वर्गवासी झाल्या. फाल्गुन व. ३०, ता. ३ एप्रिल रोजीं त्यांना भेटण्याकरतां आम्हीं पुणें येथें गेलों होतों. मी त्यांना मातोश्री समान मानीत असे. त्यांची निधनवार्ता मला टेलिफोननें गुरुवारीं सकाळीं ८ वाजतां समजली व त्यानंतर मला कांहीं सुचेनासें झालें. नंतर बंडू व मी असें मोटारनें ताबडतोब पुण्याला गेलों व त्यांच्या अस्थि आळंदी येथें इंद्रायणी नदींत हेजीब काकांसह जाऊन पोंचविल्या. आमच्या कुटुंबाला त्यांचा फार मोठा आधार वाटत असे व त्याहि नेहमींच आमच्याकडे प्रेमळ दृष्टीनें पहात असत. त्या गेल्याचें दुःख आम्हांला आमची आई गेल्याइतकेंच जाणवलें.

* १९५४ च्या विजयादशमीला ७ ऑक्टोबर रोजीं माझी पहिली नात चि. विजयालक्ष्मी ऊर्फ अलका हिचा जन्म झाला व पुढल्या पिढीला सुरुवात झाली म्हणजे आमच्या पणजोबांपासून ही सहावी पिढी सुरू झाली.

* १९५५ मध्यें सदन नं. ५ ही आमची अगदी सर्वांत जुनी चाळ दुरुस्त करण्यास घेतली. ती १९५५ च्या डिसेंबरला पुरी झाली.

* १९५५ सालीं गोवळ गांवीं बंदर बांधलें व घराला गिलावा केला.

* १३ मे १९५५ रोजीं आमची बहीण चि. शांता हिचा व २३ मे १९५५ रोजीं आमची दुसरी बहीण चि. कमल हिचा विवाह झाला.

* २९-११-१९५५ रोजीं शांताराम वाडींतील आणखी पांच चाळींचें साटेखत केलें. २ ऑगस्ट १९५७ रोजीं त्यांचें खरेदीखत पूर्ण होऊन त्या चाळी आमच्या मालकीच्या झाल्या व आतां एकूण पाऊण वाडी आमच्या मालकीची झाली.

* १-३-१९५६ रोजीं लोणचें घालणें व ठेवणें यासाठीं स्वतंत्र जागा कस्तुरचंद मिल कंपाऊंडमध्यें दोन गाळ्याची भाड्यानें घेतली.

* २८-३-१९५६ रोजीं गोविंदाची मुलगी चि. विमल हिचा विवाह डॉ. पटवर्धन यांचेबरोबर झाला.

* १९५७ च्या जानेवारी ते मार्च गोवळ येथील श्रीमहेश्वराच्या मंदीराला वासे, दांडली व कौलें घालून जीर्णोद्धार केला. त्याचप्रमाणे सबंध मंदिरास त्रिपुरासह रेती सिमेंटचा गिलावा केला.

* ९ जून १९५७ रोजीं माझा दुसरा मुलगा चि. श्रीधर याचा विवाह झाला. त्याच सुमारास फ्लूची सांथ जोरांत सुरू होती.

* १९५८ च्या फेब्रुवारी-मार्च मध्यें श्रीमहेश्वर मंदिराला ऑईलपेंट केला व गांवांतील एकूण एक माणसांना व पईपाहुण्यांना प्रसाद म्हणून अन्नसंतर्पण केलें. सुमारें दोन हजार पानें जेवलीं.

* स्वतंत्र कारखाना उभारण्याकरितां कुर्ला-अंधेरी रोडवर मोहिली गांवीं जागेच्या खरेदीचें साटेखत केलें.

* चैत्र शु. १ शके १८८० पाडव्याचे दिवशीं जुनी निशाणकाठी मोडली होती; त्या जागीं नवीन निशाणकाठी उभी केली व त्याच दिवसापासून महादेव गणेश सोहोनी याला सहकुटुंब आमचे गोवळचे घरीं दरमहा तीस रुपये पगारावर पांच वर्षांच्या बोलीनें घराची देखरेख करण्यासाठीं नोकर म्हणून ठेवला. त्यानंतर पंधरावीस दिवसांनीं आमची पूर्वीची स्वयंपाकीण चंद्राकाकाकू व गडी गंगाराम हीं आपापल्या घरीं गेलीं.

* ८ ऑक्टोबर १९५८ भाद्रपद व. १० शके १८८० बुधवार रोजीं आमची दुसरी नात जयलक्ष्मी हिचा जन्म झाला.

* त्यानंतर ११ नोहेंबर १९५८ रोजीं आश्विन वद्य ३० रोजी श्रीमहालक्ष्मी व महासरस्वती पूजनाचे दिवशीं रात्रीं ३ वाजून ७ मिनिटांनी चि. संजय ( श्रीधरचा मुलगा ) हा मला नातू झाला. माझ्या पुढल्या पिढींतील हा पहिला पुरुष जन्मला.

* १९५९ च्या ३१ ऑक्टोबरला नेहेमींप्रमाणें आमचें व्यापारी वर्ष पुरें होऊन १ नोव्हेंबर पासून नवीन वर्ष सुरू होत असे. ते या वर्षापासून बदलून ३१ डिसेंबर १९५९ पर्यंत १४ महिन्यांचें करून या पुढील वर्ष १ जानेवारी १९६० ते ३१ डिसेंबर १९६० असें करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें केलें. त्याकरितां प्रथम इन्कम–टॅक्स ऑफिसची परवानगी घेतलेली होती.

* ७ नोव्हेंबर १९५९ ते ९ डिसेंबर १९५९ हा एक महिना अंबिका ट्रॅव्हल सर्व्हिसच्या यात्रेच्या डब्यांतून तीन धाम यात्रा आग्रा ते पक्षीतीर्थ अशीं आम्हीं उभयतांनीं केली. प्रयाग, काशी, गया, जगन्नाथ, व रामेश्वर मिळून तीन धाम यात्रा होते. यात्रेहून परत आल्यानंतर एक आठवड्यानें गंगापूजन केलें. यापूर्वी द्वारका, सोमनाथ, डाकूर ही एकधाम यात्रा आम्हीं उभयतांनीं केलेली होती. मिळून आमची चार धाम यात्रा पूर्ण झाली आहे.

* चि. श्रीधर याची परीक्षा होऊन त्याचें म्हैसूर येथील रहाणें संपत असल्यामुळें नातू संजू व सूनबाई सौ. मंदा यांचेसह आम्हीं उभयतां २६ जुलैला निघून २७ च्या रात्रीं म्हैसूरला पोंचलों. श्रीधरची परीक्षा २९ जुलैला पुरी झाल्यावर ३० जुलै रोजीं हळेबिडु, बेलूर व श्रवणबेळगोळ्याचे गोमटेश्वर हीं स्थानें पाहिलीं. ३१ रोजीं सोमनाथ-पूर, शिवसमुद्रम्, व कुदेरु (श्रीधरचा मित्र श्री. श्रीकंठस्वामी याचें गांव) येथें जाऊन रात्रीं बंदीपूर येथें वस्तीस राहिलों. सकाळीं सरकारी ट्रकनें जंगलांत फिरून जंगली श्वापदें पाहिलीं व नंतर एक वाजतां उटीला पोंचलों. व उटीला दासप्रकाशच्या हॉटेलमध्यें जेवण करून ३ वाजतां तेथून निघून रात्रीं ९ वाजतां म्हैसूरला परत आलों. नंतर म्हैसूरला एक दिवस राहून मंगळवारीं रात्रीच्या गाडीनें परत मुंबईला येण्यासाठीं निघालों. वाटेंत जोग (गिरसप्पा) चा धबधबा पाहिला. तेथून हुबळीला आलों. सिद्धारूढ स्वामींचें दर्शन करून व दोन दिवस तेथें मुक्काम करून पुण्याला हेजीब काकांकडे आलों व तेथें एक दिवस मुक्काम करून ९ ऑगस्ट १९६० रोजीं मुंबईला परत आलों.

* २७ एप्रिल ते १ मे पर्यंत आमच्या गल्लींत संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा आनंद व्यक्त करण्यासाठीं शिवजयंति उत्सव व संयुक्त महाराष्ट्र स्थापना दिन चांगल्या तऱ्हेनें पार पडला. आमच्या दुकानच्या बाजूच्या कोपऱ्यांत शिवाजीचा पुतळा बसविला होता. नंतर यंदाचा आमच्या वाडींतील श्रीगणपतीचा हीरक महोत्सव फार मोठ्या थाटानें माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें उद्‍घाटन होऊन फार मोठ्या प्रमाणावर २६ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत साजरा झाला.

* २७ ऑक्टोबर रोजीं चि. मीनाक्षीचा विवाह चि. रामचंद्रपंत (श्री. काका-साहेब आठवले यांचे चिरंजीव) यांचे बरोबर थाटानें पार पडला.

### आमच्या धंद्यांतून दिलेल्या ठळक देणग्या

आमच्या धंद्यांतून वेळोवेळीं ज्या ठळक देणग्या निरनिराळ्या कार्यासाठीं म्हणून आम्ही दिल्या तें आम्ही आमचें सामाजिक कर्तव्य समजतों. त्यांत दानाचा वा पुण्य

जोडण्याचा भाग मुळींच नाहीं असें म्हणणें योग्य नाहीं. तथापि परमेश्वर जशी ज्यावेळीं बुद्धि देईल त्याप्रमाणें स्वयंस्फूर्तीनें या घटना घडत गेल्यामुळें माझ्या आयुष्यांत मला माझीं दुःखें विसरून समाधान मिळत गेलें आहे. दिलेलें दान वा केलेली सेवा सांगू नये, पण ज्या कृत्यांच्या द्वारें ज्या जनताजनार्दनानें आम्हाला मोठेपण दिलें, त्या जनताजनार्दनाची चाकरी करण्याचें आम्हाला भाग्य लाभलें त्याचा आनंद न सांगणेंहि गैरच. म्हणूनच प्रौढी म्हणून नव्हे तर माझ्यासारख्या अशिक्षित माणसाकडून परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें जी कांहीं थोडीबहुत माझ्या बांधवांची सेवा घडली ती येथें मी नमूद करीत आहें.

| | | |
|---|---|---|
| रु. १,००० | रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी | १७–१–४६ |
| रु. ५,००० | चित्पावन ब्राह्मण संघ | २१–४–४७ |
| रु. ५,००० | आयुर्विद्या प्रसारक मंडळ | १५–११–४८ |
| रु. १,००० | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय | १२–३–४९ |
| रु. १,०६१ | ब्राह्मणसभा सूतिकागृह | १३–१२–४९ |
| रु. ५,००० | आसाम भूकंप व जळपीडित | २८–८–५० |
| रु. ६,००० | राजापूर सूतिकागृह | २०–४–५३ |
| रु. ५०१ | रत्नागिरी जिल्हा जलप्रलय निवारण फंड | २५–७–५३ |
| रु. १,१११ | प. पू. गोळवलकर गुरुजी श्रद्धानिधि | २३–३–५६ |
| रु. १,००० | रत्नागिरी जि. पूरग्रस्त सहाय्य निधी | १४–७–५८ |
| रु. १,५१५ | संगमेश्वर जि. रत्नागिरी पूर सहाय्य निधि | १५–१०–५८ |
| रु. २,५०० | राजापूर पूरग्रस्त सहाय्यक निधी | १९–९–५८ |

( इतर ५०० रुपयांचे खालील देणग्यांचा नामनिर्देश केलेला नाहीं. )

## –राजापूरचें सूतिकागृह :

दादा स्वर्गवासी झाले त्यावेळीं दादांचें दिवसवार करण्याकरितां आम्हीं घरीं गेलों असतांना राजापूरची कांहीं मंडळी, अण्णा पाध्ये, डॉ. सरखोत वगैरे आम्हांस भेटावयास आली होती. त्यावेळीं सहज बोलण्यावरून बोलणें निघतां 'राजापूर येथें नगरपालिकेला एक सूतिकागृह बांधावयाचें असून त्याकरितां आपण वडिलांचें स्मारक म्हणून कांहीं रक्कम दिल्यास त्या सूतिकागृहाच्या इमारतीला आपल्या वडिलांचें नांव देतां येईल' असें त्यांनीं सांगितलें. परंतु त्यावेळीं तो विषय मी ऐकून घेतला व या बाबतींत मागाहून विचार करूं' असें त्यांना आश्वासनहि दिलें.

पुढें वडिलांचें स्मारक जर करावयाचें तर तें मुंबईला करणें योग्य, कारण मुंबईला त्यांच्या नांवानें धंदा चालू आहे व मुंबईत त्यांना ओळखणारीं माणसेंहि खूप आहेत, म्हणून दादांच्या नांवें स्मारक करण्याचा विचार तहकूब करून जिनें आमचा व वडिलांचाहि लहानपणीं अतिशय अडीअडचणीं व कष्ट सोसून सांभाळ केला व व्यापारधंदा

करण्याचें बीज आमच्या मनांत रुजवलें, त्या आमच्या आजी (श्रीमती भागिर्थीबाई) यांच्या नांवानें हें स्मारक केल्यास इष्ट होईल म्हणून त्या सूतिकागृहाकरितां आवश्यक रक्कम रुपयें सहा हजार देऊन ' श्री. भागिर्थीबाई पर्शराम बेडेकर ' सूतिकागृह असें त्या संस्थेचें नामकरण करून हें स्मारक केलें आहे.

वडिलांचे स्मारक करण्याचा विचार तूर्त तहकूब ठेवून पुढें केव्हां तरी पाहूं असें त्याचवेळीं मनांत ठरवून ठेवलें.

## महेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार – वडिलांचें लहानसें स्मारक

दादा १९५१ सालीं स्वर्गवासी झाल्यानंतर प्रत्येक वर्षी गणपतीकरितां मी श्रावण अखेर गांवीं जात असें, व सातव्या दिवशीं गणपती पोंचवून वडिलांचे श्राद्धाकरितां पुन्हां मुंबईला येत असे. असाच १९५४ सालीं गणपतीला घरीं गेलों असतांना दत्तूकाका म्हणाले कीं, महेश्वराच्या देवळाकडे तूं पाहिलेंस कां ? एकदां त्याची अवस्था तूं पाहून ये. म्हणून मी देवळांत गेलों. छपराकडे पाहतांच तें अगदीं मोडकळीला आलेलें दिसलें पुष्कळ रिपा मोडल्या असून नळे कसेबसे एकमेकांच्या आधारानें वर आहेत व कांहीं ठिकाणचे पडलेहि होतें. तेव्हां या मंदिराची दुरुस्ती करणें अगदीं अत्यावश्यक असल्याचें माझ्या नजरेस आलें. पण त्यावेळीं मला श्राद्धाकरितां मुंबईला येण्याची उतावीळ असल्यामुळें सातव्या दिवशीं गणपती पोचवून मी मुंबईला आलों. १९५५ सालीं गणपतीकरितां लवकर घरीं गेलों. त्यावेळीं श्री. महेश्वराला गाऱ्हाणें घालून व कौल लावून विचारणा केली कीं, या देवळाची दुरुस्ती आम्ही करूं कां ? व महेश्वरानें तशी परवानगी दिल्यानंतर मी देवळाचें दुरुस्तीकरितां २५–३० वासे व सर्व दांडली पाडण्याकरितां म्हणून ७–८ सागवान व ४–५ शिवणी तोडल्या व चिरकामे बोलावून गणपतीचे सुमारास वासे व दांडली चिरूनहि घेतली व गणपती पोंचवून मी नेहमींप्रमाणें मुंबईलाहि आलों. राजापुरचे पाटणकर यांना गलबतें सुरू झाल्यानंतर तुमचीं कौलें आलीं म्हणजे त्यांपैकीं ४००० कौलें व २५० कोनें आमच्या बंदरांत उतरण्याबद्दल सूचना दिली.

दिवाळीनंतर कौलें आल्यावर नाना गोसावी, पांडु देसाई व दत्तूकाका यांनीं गडी माणसें करून सर्व कौलें महेश्वराचे देवळाजवळ नेऊन ठेवण्याची व्यवस्था केली व आमच्या घरीं सुतार लावून तोडून ठेवलेलीं दांडली वासे रंधा मारून साफ करण्याची व्यवस्था करवली. देवळावरील नळे व रीप काढून घेण्याची व्यवस्था करण्यास श्री. नाना गोसावी व दत्तूकाका यांनाच सांगितलें होतें त्याप्रमाणें त्यांनीं तीं काढून ठेवली. त्यानंतर १९५६ च्या संक्रांतीनंतर मी घरीं गेलों व सुतार बोलावून सर्व वाशांची पहाणी केली. जे वासे बिघडले होते ते नवे बसविले. तरीहि कांहीं वाशांची तूट पडलीच. पण आतां आयत्या वेळीं झाड तोडून चिरलेले वासे टिकणार नाहींत म्हणून मंडपाचे सामानापैकीं बाटे व खांब हें चिरून त्यांतून कांहीं वासे काढले. शिवाय आमच्या घरांत माळ्याखालीं कांहीं आडवी ठेवलेल्या लांकडांतूनहि वासे काढून, ते देवळाला बसवून वाशांचें काम पुरें केलें. त्यानंतर दांडली मारून कौलेंहि चढवून झालीं. दांडली मार-

ण्याचें काम चालू असतांना देवळांत कांहीं ठिकाणीं भोमे आलेलीं आढळलीं व वाळवीहि पुष्कळ ठिकाणीं घरें करून आलेली नजरेस आली. म्हणून सर्व देवळाला आंतून बाहेरून रेती सीमेंटचें प्लॅस्टर करावें म्हणजे पुढें वाळवीचा प्रादुर्भाव होणार नाहीं म्हणून राजापूर येथें सीमेंट मिळण्याची शक्यता आहे काय याचा तपास केला. तेव्हां घर बांधण्यासाठीं सीमेंट देण्याची व्यवस्था सरकारकडून होत असल्याचें समजलें पण मंदिर म्हणून सीमेंटचा परवाना देण्याची व्यवस्था नव्हती. पण सार्वजनिक काम या सदराखालीं परवाना व सीमेंटहि जरूर तेवढें मिळण्याची व्यवस्था झाली. त्यानंतर रेती पैदा करण्याची आवश्यकता भासली. म्हणून आमच्या घराखालील नदींतच ती काढण्याची व्यवस्था केली. परंतु त्या रेतीचा पुरवठा व्हावा तसा होईना म्हणून सीमेंट व रेती या दोन्ही वस्तु राजापूरहूनच आणवून व जरूर तीं माणसें कामाला लावून सर्व देवळाला आंतून बाहेरून व त्रिपुरालाहि रेतीसीमेंटचा गिलावा करून घेतला. पहिल्यानें गिलावा ओला असतांना ऑईलपेंट लागत नसल्यानें चुन्याचा रंग देऊन देऊळ दुरुस्तीचें सर्व काम पुरें करून व त्याच वेळीं देवळाजवळील पाटाचें पाणी सांठविण्याचा देवाचा हौदहि दुरुस्त करून घेतला, तसेंच मंदिराच्या बाहेर जी चिऱ्याची फरशी होती त्यांतले कांहीं चिरे उंचसखल झाले होते, त्याला फडकणी मारून ( तासून ) ती फरशीहि सपाट केली.

२२–३–१९५६ रोजीं श्री. गोळवलकर गुरुजी यांना त्यांच्या एकावन्नाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रद्धानिधीमध्यें एक अल्पशी देणगी म्हणून ११११ रु. दिले.

त्या वर्षीहि पावसाळ्यांत पुन्हां गणपतीकरितां मी सौभाग्यवतीसह घरीं गेलों होतों व गणपती झाल्यावर मुंबईला परत आलों. दिवाळी झाल्यानंतर महेश्वराच्या मंदिराला ऑईलपेंटची सर्व सामुग्री गलबतावरून रवाना करून देऊन मी पुन्हां १९५८ च्या सुरुवातीस संक्रांत झाल्यानंतर महेश्वर मंदिराला ऑईलपेंट करण्याकरितां म्हणून गांवीं गेलों. देऊळ स्वच्छ झाडून व साफसूफ करून व श्री महेश्वराची परवानगी घेऊन ऑईलपेंट लावण्याच्या कामास सुरुवात केली. ऑईलपेंटचें काम चालू असतांनाच या कामाप्रीत्यर्थ प्रसाद म्हणून कांहींतरी अन्नसंतर्पण व्हावें अशी मनांत इच्छा उत्पन्न झाली. त्याप्रमाणें त्या प्रयत्नाला मी लागलों. आमच्या गांवाच्या आजूबाजूच्या मिळून कांहीं ब्राह्मण मंडळींनीं एक संघ स्थापन केलेला आहे. त्या संघाची सभा कण्हेरी येथें श्री. आंबेकर यांच्या घरीं भरलेली असतांना त्या सभेपुढें हा जेवणावळीचा विषय मांडला व साधारण किती पान होईल याचा अंदाज करतां १२००–१५०० पान होईल असा अंदाज मिळाला. परंतु पत्रावळी मिळविण्यापासूनहि प्रत्येक बाबतींत प्रतिकूलता असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें व प्रतिकूलतेवर मात करणें हा एक माझा स्वभावधर्मच असल्यामुळें या जेवणावळीबाबत सर्व अडचणी प्रथम समजावून घेतल्या. त्यांत त्या संघांतील एक वृद्ध गृहस्थ श्री. बाळाकाका देसाई यांनीं शरीरश्रमाच्या बाबतींत आपण स्वतः व संघाचे सर्व सभासद संपूर्ण सहकार्य देऊं, असें आश्वासन दिलें. त्यानंतर मी अन्नसंतर्पणाचा विचार नक्की करून एक एक अडचणी

दूर करण्याच्या मार्गास लागलों. सर्व अडचणींचें निवारण करून ऑईलपेंटचें काम पुरें झाल्यावर मंदिरासमोरची निशाणकाठी आमच्या घरून वाजत गाजत नेऊन व रंगरंगोटी करून १९५८ च्या चैत्र शु. १ ला पहिल्यानें उभी केली. यावेळीं गांवांतील बायकामुलांसह सर्व ब्राह्मणमंडळी व २००–४०० कुळवाडीमंडळी उपस्थित होती. निशाणकाठीं उभी केल्यानंतर प्रसाद म्हणून सर्वांना पेढे वांटले या निशाणकाठीकरितां लागलेलें सागाचें झाड आमच्या परसवांतील मोठ्यांत मोठें व अगदीं सरळ असलेलें पावसाळ्यांत भाद्रपद महिन्यांत तोडून व साल काढून ठेवलेलें होतें.

## महेश्वरावर लघुरुद्र

त्यानंतर दुसऱ्या दिवशीं श्रीगणपतीवर अथर्वशीर्षांचीं १२१ आवर्तनें करून श्री महेश्वरावर लघुरुद्र करविला व लघुरुद्र झाल्यावर सर्व ब्राह्मणांना दोन दोन रुपयेप्रमाणें दक्षिणा दिली व त्या दिवशीं आमच्या गांवांतील सर्व ब्रह्मवृंदांना पैपाहुणे व स्त्रिया मुलांसकट प्रसाद म्हणून त्या प्रांतांत लोकांना प्रिय असलेलें पक्वान्न नारळाचा रस व वडे यांचें भोजन दिलें. दुसऱ्या दिवशीं अर्ध्या गांवाच्या तिल्लोरी कुणबी व इतर सर्व मंडळींना प्रसाद म्हणून रसवड्यांचेंच जेवण झालें. तिसऱ्या दिवशीं अर्ध्या गांवांतील राहिलेले लोक व हरिजनांसह सर्वांचें रसवड्याचें भोजन झालें. वृद्धपणामुळें व अपंग-पणामुळें वा इतर कांहीं अडचणींमुळें जीं कांहीं ५–२५ माणसें मंदिरांत जेवावयास येऊं शकलीं नव्हती, त्यांना वाढलेलीं पानें घरीं पाठवून दिलीं. त्याचप्रमाणें कांहीं मुस्लिम मंडळी आली होती त्यांनाहि पानें वाढून दिलीं. अशा तऱ्हेनें सोमवार ते गुरुवार मिळून ४ दिवसांमध्यें सुमारें दोन हजार लोकांना श्रीमहेश्वराच्या कृपेनें प्रसाद म्हणून अन्नसंतर्पण झालें.

## अडचणींचें अकल्पित निवारण

यांत कांहीं प्रामुख्यानें येणाऱ्या अडचणी मन अस्वस्थ करणाऱ्या होत्या. त्यांचें निवारण श्रीमहेश्वरानें मोठ्या अकल्पित रीतीनें केलें. त्यातलें एक उदाहरण असें. ब्राह्मण मंडळींना पात्रावर चार आणेप्रमाणें दक्षिणा ठेवावयाची होती व पुरेशी मोड माझ्याजवळ नव्हती म्हणून सकाळींच तीस रुपये देऊन राजापूरला मोड आणण्याकरितां मनुष्य पाठविला होता. जेवणावळ सुरू होईपर्यंतहि मोड घेऊन तो मनुष्य आला नाहीं म्हणून मी जवळ असलेली मोडच दक्षिणा म्हणून ठेवण्यास सुरुवात केली. शेवटची पावली ठेवून मी वांकलेला उभा झालों तोंच त्या माणसानें मोडीची पुडी माझ्या हातांत दिली व त्यानंतर मी सगळ्यांना दक्षिणा ठेवली. त्यावेळीं माझ्या-प्रमाणेंच सर्व जेवणाऱ्या मंडळींना आश्चर्य वाटलें कीं शेवटची पावली ठेवल्यावर मध्यें थोडाहि वेळ न जातां मोड कशी तयार झाली ? अशाच तऱ्हेनें इतर अडचणी निवारण झाल्या होत्या.

११५९३

ब्राह्मण भोजन झालें त्या दिवशीं म्हणजे द्वितीयेला संध्याकाळीं श्री. ताम्हनकरबुवा यांचें सुश्राव्य कीर्तन झालें व ह्या समारंभाप्रीत्यर्थ पालखी काढून तिच्या मंदिराभोंवतीं प्रदक्षिणा झाल्या.

या अन्नसंतर्पणाच्या वेळीं कांहीं मित्रमंडळींकडून सहस्र भोजन घालण्याची कल्पना सुचविण्यांत आली होती. एक तर सहस्र भोजन होणें कठीण व दुसरें कारण सहस्र भोजनांत फक्त ब्राह्मण भोजनच होतें. पण या अन्नसंतर्पणामध्यें गांवांतील एकूण एक स्त्रीपुरुषांना या भोजनाचा लाभ घेतां आला. याबद्दल मला व आमच्या कुटुंबांतील सर्व मंडळींना अत्यंत समाधान लाभलें.

अन्नसंतर्पणाच्या वेळीं सबंध मंदिर लतापल्लवांनीं सुशोभित करण्यांत आलें होतें व हें अन्नसंतर्पण चालू असतांना अगदीं वृद्धांत वृद्ध लोकहि असें म्हणत कीं यापूर्वी कधींहि या महेश्वराच्या पोवळीवर ( फरशीवर ) कोणी जेवला असल्याचें ऐकिवांत नाहीं, तेथें आज दोन हजार माणसें जेवलीं हें म्हटलें तर आश्चर्यच घडलें आहे. ब्राह्मण भोजनाच्या दिवशीं लघुरुद्रासाठीं दोन रुपये दक्षिणा व अगदीं लहान मुलांपासून स्त्रिया पुरुषांसह सर्वांना भोजन दक्षिणा म्हणून पावली पावली ठेवली होती.

या देऊळ दुरुस्तीचा एकूण सर्व खर्च आम्हां बंधूंना दुकानामधून वेळोवेळीं मिळत आलेल्या बोनसच्या रकमेंतून केलेला होता. त्याचप्रमाणें या मंदिरांत वडिलांच्या नांवाचें स्मारक म्हणून ' ती. कै. विश्वनाथ पर्शराम बेडेकर यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ वासुदेव विश्वनाथ बेडेकर आणि बंधू यांनीं या मंदिराचा जीर्णोद्धार १९५६ सालीं केला आहे.' अशी पाटी लावली आहे.

ज्या मंदिरांत पुराण सांगण्याकरितां म्हणून श्रीमहेश्वराच्या प्रेरणेनें सुभेदार रेडीज यांनीं आम्हांला सुमारें दोनशें वर्षांपूर्वी गोवळ गांवीं आणलें त्याच मूळ घराण्यांतील बेडेकर यांच्या वंशजांना या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची बुद्धि श्रीमहेश्वरानें दिली व शक्यताहि दिली याबद्दल आम्हांला फारच समाधान वाटत आहे.

१९५५ सालीं या मंदिराची दुरुस्ती चालू केली त्यावेळीं बनांतील श्रीरामेश्वराच्या देवळाच्या छपराचा कांहीं भाग नादुरुस्त झाला होता. त्याचाहि नळा व कामट्या काढून व कांहीं बिघडलेले वासे नवीन घालून त्यावर दांडली मारून व मंगलोरी कौलें चढवून त्या मंदिराचाहि जीर्णोद्धार आमच्या हातून झाला आहे.

बेडेकर घराणें गोवळांत आल्यापासूनच्या दोनशें वर्षांच्या काळांत या मंदिराची दुरुस्ती बेडेकर घराण्याकडूनच होत आलेली होती; व याहि वेळीं आमच्या हातून झालेलीं दुरुस्ती साधारणतः शंभर वर्षें तरी टिकेल अशी अपेक्षा आहे.

## कोंकणवासी पूरपीडितांना सहाय्य

१९५८ च्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत राजापूर व संगमेश्वर या भागांत अतिवृष्टि होऊन नद्यांना फार मोठे पूर आले. त्यामुळें फार लोकांचीं घरें पडलीं

व सामानसुमान् वाहून गेले. या पूरपीडित लोकांना सहाय्य करण्यासाठीं सर्वप्रथम जनसंघातर्फे रत्नागिरी जिल्हा पूरग्रस्त सहाय्यक समितीला १४ जुलै रोजीं एक हजार रुपये दिले व ह्यानंतर संगमेश्वर तालुक्यांतील पुरामुळें नुकसान झालेल्या लोकांना दोन आठवड्यांच्या रेशनमधील तांदूळ रेशन दुकानदारांकडून आमच्या खर्चानें देवविलें. त्याकरितां १६५० रु. लागले. तसेंच राजापूर येथील पुरामुळें नुकसान झालेल्या लोकांना एक आठवड्याचे तांदूळ सरकारी रेशनखात्याकडे शिल्लक नसल्यामुळें बाजारच्या भावानें मिळणारे तांदूळ श्री. कृष्णाजी हरि पाटणकर यांच्यामार्फत विनामूल्य देवविले. त्याकरितां २५०० रु. लागले. मिळून एकुण राजापूर व संगमेश्वर या दोन तालुक्यांतील पूरपीडितांच्या सहाय्याकरितां ५१५० रु. खर्च केले. हें सहाय्य करतेवेळीं संपूर्णपणें जातीभेदातीत दृष्टि ठेवलेली होती.

# ७ आमचीं घरें

१९२० सालीं वैशाख शु. ९ ला माझें लग्न झाल्यानंतर मी मुंबईला आलों होतों. परंतु श्रावणांत पुन्हां घरीं गेलों होतों. त्यावेळीं आजीनें धंद्याच्या परिस्थितीसंबंधीं माझ्याजवळ विचारपूस केली. तेव्हां तिला एकंदर परिस्थिति सांगितल्यावर, तिनें 'घर अगदीं मोडकळीस आलेलें असून यंदा जर तें दुरुस्त केलें नाहीं, तर पुढल्या पावसाळ्यात या घरांत राहतां येणार नाहीं;' असें मला सांगितलें. मी तोंपर्यंत घराच्या छपराकडे कधीं पाहिलेंच नव्हतें. छपराकडे पाहिल्यावर मला असें दिसून आलें कीं, घराचे बरेचसे वासे मोडलेले आहेत. ओमणाच्या कामट्याचे अगदीं तुकडे तुकडे झालेले आहेत व नळे कसे तरी एकमेकाला धरून राहिले आहेत. त्यांतला एखादा केव्हां पडेल याचा नेम नव्हता. हें सारें पाहून मी या वस्तुस्थितीचें तीर्थरूप दादांना पत्र पाठविलें. तें पत्र वाचल्यावर 'मी दिवाळी झाल्यावर घरीं येईन व यंदा घराची दुरुस्ती करीन. त्याकरितां वांसे, काठ्या लागतील त्या तोडून ठेव;' असें दादांनीं मला लिहिलें. दादांनीं लिहिलेलीं झाडें व ४००–५०० कोंड्याच्या काठ्या मीं घरीं असतांनाच भाद्रपदांत तोडून घेतल्या. (झाडें व काठ्या भाद्रपदांत तोडल्यास तीं टिकाऊ होतात. नाहींतर तीं बरडून जातात) व दसऱ्यानंतर मी मुंबईला निघून आलों. दिवाळी होतांच दादा घरदुरुस्तीसाठीं घरीं येण्याच्या तयारीला लागले. दिवाळींत झालेली विक्री व त्या सुमारास झालेली वसुली बाजारच्या देण्यांत सर्व खर्च झाली होती. म्हणून दादा घरीं यावयाला निघाले त्यावेळीं दुकानांत फारशी रोकड शिल्लक नव्हती. घरदुरुस्तीसाठीं ५००–६०० रुपये तरी लागणार होते. निघतेवेळीं दुकानांत असलेले रोख पैसे व एका दुकानदाराकडून दीडशें रुपये उसने घेऊन दादा घरीं गेले. ज्या गृहस्थांकडून रुपये उसने घेतले होते त्यांना ते पैसे दादा घरदुरुस्तीचें काम आटोपून मुंबईला आल्यावर परत द्यायचें ठरलें होतें. आम्हांला त्यानें दीड रुपया मितीनें पैसे उसने दिले होते. पण त्याला दुसऱ्या एकानें जास्त व्याज देण्याचें कबूल केल्यामुळें त्यानें ते रुपये एका आठवड्यांतच परत मागितले पण माझ्याजवळ पैसे शिल्लक नसल्यामुळें व रोख विक्रीचे पैसे माल खरेदीस लागत असल्यानें मला त्यांचे पैसे देणें अशक्य झाले, तरीपण माल खरेदी थांबवून चार दिवसांतच विक्रीच्या पैशांतून त्यांचे सर्व पैसे व्याजासह दिले. दीड रुपया मितीप्रमाणें दीडशें रुपयांचें एका महिन्याला सव्वा दोन

व सामानसुमान् वाहून गेले. या पूरपीडित लोकांना सहाय्य करण्यासाठीं सर्वप्रथम जनसंघातर्फे रत्नागिरी जिल्हा पूरग्रस्त सहाय्यक समितीला १४ जुलै रोजीं एक हजार रुपये दिले व ह्यानंतर संगमेश्वर तालुक्यांतील पुरामुळें नुकसान झालेल्या लोकांना दोन आठवड्यांच्या रेशनमधील तांदूळ रेशन दुकानदारांकडून आमच्या खर्चानें देवविलें. त्याकरितां १६५० रु. लागले. तसेंच राजापूर येथील पुरामुळें नुकसान झालेल्या लोकांना एक आठवड्याचे तांदूळ सरकारी रेशनखात्याकडे शिल्लक नसल्यामुळें बाजारच्या भावानें मिळणारे तांदूळ श्री. कृष्णाजी हरि पाटणकर यांच्यामार्फत विनामूल्य देवविले. त्याकरितां २५०० रु. लागले. मिळून एकूण राजापूर व संगमेश्वर या दोन तालुक्यांतील पूरपीडितांच्या सहाय्याकरितां ५१५० रु. खर्च केले. हें सहाय्य करतेवेळीं संपूर्णपणें जातीभेदातीत दृष्टि ठेवलेली होती.

७

# आमचीं घरें

१९२० सालीं वैशाख शु. ९ ला माझें लग्न झाल्यानंतर मी मुंबईला आलों होतों. परंतु श्रावणांत पुन्हां घरीं गेलों होतों. त्यावेळीं आजीनें धंद्याच्या परिस्थितीसंबंधीं माझ्याजवळ विचारपूस केली. तेव्हां तिला एकंदर परिस्थिति सांगितल्यावर, तिनें 'घर अगदीं मोडकळीस आलेलें असून यंदा जर तें दुरुस्त केलें नाहीं, तर पुढल्या पावसाळ्यात या घरांत राहतां येणार नाहीं;' असें मला सांगितलें. मी तोंपर्यंत घराच्या छपराकडे कधीं पाहिलेंच नव्हतें. छपराकडे पाहिल्यावर मला असें दिसून आलें कीं, घराचे बरेचसे वासे मोडलेले आहेत. ओमणाच्या कामट्याचे अगदीं तुकडे तुकडे झालेले आहेत व नळे कसे तरी एकमेकाला धरून राहिले आहेत. त्यांतला एखादा केव्हां पडेल याचा नेम नव्हता. हें सारें पाहून मी या वस्तुस्थितीचें तीर्थरूप दादांना पत्र पाठविलें. तें पत्र वाचल्यावर 'मी दिवाळी झाल्यावर घरीं येईन व यंदा घराची दुरुस्ती करीन. त्याकरितां वांसे, काठ्या लागतील त्या तोडून ठेव;' असें दादांनीं मला लिहिलें. दादांनीं लिहिलेलीं झाडें व ४००–५०० कोंड्याच्या काठ्या मीं घरीं असतांनाच भाद्रपदांत तोडून घेतल्या. (झाडें व काठ्या भाद्रपदांत तोडल्यास तीं टिकाऊ होतात. नाहींतर तीं बरडून जातात) व दसऱ्यानंतर मी मुंबईला निघून आलों. दिवाळी होतांच दादा घरदुरुस्तीसाठीं घरीं येण्याच्या तयारीला लागले. दिवाळींत झालेली विक्री व त्या सुमारास झालेली वसुली बाजारच्या देण्यांत सर्व खर्च झाली होती. म्हणून दादा घरीं यावयाला निघाले त्यावेळीं दुकानांत फारशी रोकड शिल्लक नव्हती. घरदुरुस्तीसाठीं ५००–६०० रुपये तरी लागणार होते. निघतेवेळीं दुकानांत असलेले रोख पैसे व एका दुकानदाराकडून दीडशें रुपये उसने घेऊन दादा घरीं गेले. ज्या गृहस्थांकडून रुपये उसने घेतले होते त्यांना ते पैसे दादा घरदुरुस्तीचें काम आटोपून मुंबईला आल्यावर परत द्यायचें ठरलें होतें. आम्हांला त्यानें दीड रुपया मितीनें पैसे उसने दिले होते. पण त्याला दुसऱ्या एकानें जास्त व्याज देण्याचें कबूल केल्यामुळें त्यानें ते रुपये एका आठवड्यांतच परत मागितले पण माझ्याजवळ पैसे शिल्लक नसल्यामुळें व रोख विक्रीचे पैसे माल खरेदीस लागत असल्यानें मला त्यांचे पैसे देणें अशक्य झाले. तरीपण माल खरेदी थांबवून चार दिवसांतच विक्रीच्या पैशांतून त्यांचे सर्व पैसे व्याजासह दिले. दीड रुपया मितीप्रमाणें दीडशें रुपयांचें एका महिन्याला सव्वा दोन

रुपये व्याज द्यावयाचें होतें. तथापि आठ-दहा दिवसांच्या व्याजाबद्दलहि त्यानें माझ्याकडून सव्वा दोन रुपये घेतले. दादा मुंबईंत नसल्यामुळें अगतिक होऊन मला ते द्यावे लागले. दादा घरीं गेल्यावर मी तोडून ठेवलेल्या झाडांचे वासे त्यांनीं चिरून घेतले, पण ते ओले असल्यामुळें ते तसेच घालावे कीं नाहीं हीं शंका उत्पन्न झाली. म्हणून दादांनीं सुताराचें मत घेतलें .तीं झाडें अतिशय जुनाट असल्यामुळें हे वासे घातल्यास चालतील असें सुताराचें मत पडल्यामुळें दादांनीं घर उलगडलें. घर उलगडल्यावर असें दिसून आलें कीं चिरून झालेले वासे तर पुरणार नाहींतच, पण आणखी कांहीं वारेंहि बिघडलेलीं निघालीं म्हणून दादांनीं आणखी कांहीं झाडें तोडलीं व चारपांच महिन्यांत घराची दुरुस्ती पूर्ण झाल्यावर दादा मुंबईत परत आले.

### त्याच घराचें नूतनीकरण

१९२१ सालीं मूळ घराची दुरुस्ती अशा प्रकारें केली गेली. पुढें २५ सालीं चुलतीचें घरहि ती वारल्यामुळें या घरांत सामील करून घेतलें होतें. पण एवढें मोठें घर होऊनहि कांहीं महत्त्वाच्या गैरसोयी शिल्लकच राहिल्या होत्या. स्वयंपाकघर पश्चिमेकडील बाजूस झाल्यामुळें त्यांतील धूर सर्व घरभर जाई व घराच्या कोणत्याहि भागांत बसलें तरी तेथें धूर येई. विटाळशीला बसण्यासाठीं व झोंपण्यासाठीं सोईस्कर अशी जागा नव्हती. त्याचप्रमाणें घरगड्यालाहि घरांत झोंपण्यास स्वतंत्र जागा नव्हती. स्वयंपाकघराची पडवी एका बाजूनें फारच ठेंगणी झाली होती. त्यामुळें चुलीजवळ गेलें कीं डोकें छपराला आपटे. १९३६ च्या सुरुवातीस मी घरीं गेलों होतों त्यावेळीं हें सहज दादांजवळ बोललों. तेव्हां दादा म्हणाले कीं, मला जसें जमलें तसें मी घर बांधलें, आतां तुम्हांला आणखी कांहीं सोई करावयाच्या असतील तर तुम्हांला हवें तसे वाडे बांधा. हें बोलणें पौष शु. १२, ता. ५ जानेवारी १९३६ रोजीं सकाळीं ९ ते १० च्या दरम्यान झालें. व ११ वाजतां मी घरून मुंबईला येण्यास लॉंचीनें निघालों. परंतु तो घराचा विषय मात्र माझ्या डोक्यांत राहिला.

### आमचीं दादरचीं घरें

दुसऱ्या दिवशीं मी मुंबईला पोंचलों. आमच्या गांवापासून बोटीपर्यंत लॉंचची सोय झाली असल्यामुळें आतां दोन दिवसांत मुंबईला येतां येत असे. मी मुंबईला आल्यावर दुकानांत बसलों असतांना गोवळच्या घरासंबंधीचें दादांचें व माझें झालेलें बोलणें मी गोविंदाला सांगत होतों तेवढ्यांत आमचेच एक भाऊबंद अंतुकाका बेडेकर तेथें आले. त्यांनीं दलाल झक्कास बाबुराव यांना बेडेकरांना घर घ्यावयाचें आहे असें ‘गोवळांत’ हा शब्द गाळून सांगितलें. तासाभरांतच झक्कास बाबुराव दुकानांत हजर झाले व विकाऊ घरासंबंधीं आम्हांला माहिती देऊं लागले. त्यांना मी पुष्कळ समजावून सांगितलें कीं, आम्हांला मुंबईला घर घ्यावयाचें नसून गोवळचें घर पुन्हां बांधावयाचें आहे, पण त्यांनीं तें कांहींच ऐकून न घेतां आपलेंच घोडें पुढें दामटीत नेलें व ‘आधीं बघा, पसंत पडलें तर घ्या, नाहींतर नका घेऊं, मी पुन्हां साडेदहा वाजतां येतों व

तुम्हांला घरें दाखवितों ' असें सांगून ते निघून गेले. सांगितल्याप्रमाणें ते आपली मोटार घेऊन हजर झाले. त्या वेळपर्यंत आमचें जेवणखाण आटोपलेलें होतेंच. नवीन दुकानें घेण्याचा विचार जरी आम्ही १९३५-३६ मध्यें रद्द केला होता तरी कांहीं तरी स्थायिक प्रॉपर्टी येथें करावी असे विचार मनामध्यें घोळत होते; म्हणून घरें पाहण्याची चालत आलेली संधि वायां न दवडतां बाबुरावांबरोबर आम्ही ( मी व गोविंदा ) निघालों. त्यांनीं आम्हांला दुपारीं चार वाजेपर्यंत कांहीं बाहेरून, कांहीं घरांत जाऊन मिळून सुमारें पंधरा सोळा घरें दाखविलीं. त्यांत दादरला सध्यां आमचें ज्या ठिकाणीं घर आहे त्या ठिकाणीं मागें एक घर व त्यांत खाणावळ व पुढें चार पांच दुकानें अशी असलेली व अगदीं मोडकळीस आलेली जागा पाहून सुद्धां त्या जागेंत गेल्यावर मनाला एक प्रकारची प्रसन्नता उत्पन्न झाली. त्याच दिवशीं रात्रीं १० वाजतां श्री. बाबरेकर यांच्या कृष्ण सिनेमाजवळील घरीं गोखले सॉलिसिटरमार्फत एक आण्याच्या स्टॅम्पवर कच्चा करारनामा आम्ही त्या जागेबाबत केला.

## पहिल्या घरबांधणीला प्रारंभ

शनिवार ता. ३० जानेवारी १९३७ रोजीं या घराचें पक्कें ॲग्रीमेंट केलें व त्याच दिवशीं रात्रीं १० वाजतां गोवळ येथें सुरेशचा जन्म झाला.

१७ मे १९३७ रोजीं खरेदीखत पुरें झालें. त्याच दिवसीं घरबांधणीचा मुहूर्त संध्याकाळीं ६ वाजतां केला. नंतर पूर्वीच्या भाडेकरूंना नोटिसा देऊन जागा खाली करून जुनें काटसामान नेऊन जागा सपाट करून देण्याचें कंत्राट ५०० रुपयांना दिलें. त्या जागीं घर बांधण्याचें कंत्राट मोतीचंदला दिलें. बांधकामाला सुरुवात जूनमध्यें झाली. हीं दादरचीं आमचीं घरें १९३८ मार्चअखेर बांधून पुरीं झालीं. या घराच्या बांधकामाच्या सुरुवातीस आमचे एक स्नेही श्री. माधवजी जोशी या गुजराती गृहस्थांनीं आपले स्वतःचे १०००० रुपये दिले होते. याशिवाय आम्ही एका सावकाराकडून ५० हजार रुपये कर्जाऊ म्हणून त्याच घरावर घेतले होते. तरीहि कंत्राटदाराचे ८००० रुपये बाकी देणें राहिलेंच. एकूण या घराकरितां दीड लाख रुपये खर्च आला. यांतलें ६८००० रुपये देणें वरीलप्रमाणें झालें परंतु हें देणें घरावर असल्यामुळें घराच्या भाड्यांतून द्यावयाचें होतें. म्हणून त्याची आम्हांला विशेष फिकीर वाटली नाहीं.

सहावें जॉर्ज यांचा ज्या दिवशीं राज्याभिषेक झाला तो दिवस घराच्या वास्तुशांतीलाहि उत्तम होता. त्यामुळें आम्ही त्या दिवशींच वास्तुशांत केली व चैत्रशुद्ध प्रतिपदा १९३८ च्या गुढीपाडव्यापासून आम्ही भाडोत्री लोकांना रहावयास जागा दिल्या. अशा तऱ्हेनें ६८,००० रुपयांचा बोजा घेऊनसुद्धां आम्ही मुंबईतील एक दुकानदार होतों, तसेच घरमालकहि झालों. त्या वर्षी १९३८ च्या दिवाळीपर्यंत मोतीचंदचे ८००० रुपये फेडून आम्ही त्यांतून मोकळे झालों. माधवजींचे १० हजार रुपये ज्यावेळीं आम्हांला सवड होईल त्यावेळीं देऊन चालण्यासारखें होतें. सावकाराला ५० हजार रुपयांबद्दल गहाणखताच्या अटीप्रमाणें एक वर्ष फक्त व्याजच द्यावयाचें होतें. (साडेचार टक्क्याप्रमाणें)

या इमारतीचें दरमहा ११०० भाडें येत होतें व १९३९ च्या एप्रिलपर्यंत आम्हांला मुद्दल परत करायचें नव्हतें. म्हणून १९३८ मध्यें गोवळचें घर बांधायचें नक्की करून त्या उद्योगाला मी लागलों. या सर्व रकमा आम्ही १९४२ सालअखेरपर्यंत परत केल्या. माधवजींचेहि १०,००० रुपये आम्ही त्यानंतर दिले आणि तदनंतर आम्ही सर्वस्वी कर्जमुक्त झालों.

## गोवळच्या घराची पुनर्रचना

या घराचें काम सुरू असतांना गोवळच्या घरासंबंधींचे विचार माझ्या डोक्यांत चालू होतेच. त्या घराची पुनर्रचना करण्यासाठीं पूर्वतयारी करावी म्हणून मी भाद्रपदांत घरीं गेलों. साधारणपणें घर कसें बांधावयाचें याचा आराखडा मी तयार केला होताच. तो आराखडा दादा व घरच्या इतर मंडळींना समजावून सांगितला व तो त्यांच्या पसंतीला उतरतांच गोविंदाचे श्वशुर धोंडोपंत दीक्षित यांनाहि रूपरेखा सांगितली. ही एकंदर योजना ऐकून त्यांना हें काम जवळ जवळ अशक्यच वाटलें. कारण तेथें प्रतिकूलता फार. या घराकरितां एकंदर दहा हजार चिरे, सोळा दरवाजे, चोवीस खिडक्या व सोळा फडताळें व शिवाय बोध, खुंट्या, फळ्या वगैरे सामानाची यादी पाहून हें काम ४–५ वर्षांच्या आंत पुरें होणार नाहीं असें त्यांचें मत पडलें. ते स्वतः इमारती लाकडाचा धंदा करीत. ते कायम कोंकणांत राहणारे असल्यामुळें अशा प्रकारचें घर बांधावयाला किती वेळ लागेल याची त्यांना आजुबाजूच्या उदाहरणांवरून कल्पना होती. अशा प्रकारें तीनचार मंडळींना बोललों असतां प्रत्येक जण या गोष्टीचा बाऊ करून निरनिराळ्या अडचणींचे डोंगर उभे करूं लागला. घर उलगडल्यावर पावसाळ्यापर्यंत जर तें पुरें झालें नाहींतर पावसाळ्यांत मोठा दुर्धर प्रसंग आला असता. या सर्व मंडळींच्या बोलण्यावरून सगळ्या अडचणींची मला कल्पना आली व या अडचणींवर मात करण्याची जबरदस्त इच्छा मनांत उत्पन्न झाली.

घराच्या उपयोगास येतील अशीं झाडें ( साग, फणस, वगैरे ) मी भाद्रपद वद्यांत तोडलीं व धोंडोपंतांचा इमारती लांकडें चिरून देण्याचा धंदा असल्यामुळें खिडकी, दरवाजा व फडताळें यांना लागणाऱ्या लांकूड सामानाचीं मापें त्यांना दिलीं, व नंतर मी मुंबईला आलों. दिवाळी झाल्यावर मी पुन्हां घरीं गेलों. या घराकरितां आम्हांला ३ प्रकारच्या आकाराच्या मिळून एकंदर १० ते १२ हजार चिऱ्यांची आवश्यकता होती व हे मिळविणें मोठें बिकट काम होतें. ते मिळविण्यासाठीं पाहणी करण्याकरितां मी निघालों.

जैतापूरच्या चिरे काढणाऱ्या लोकांना भेटून ते यावर्षी किती चिरे देऊं शकतील याची चौकशी केली. तेव्हां त्यांना एका वर्षांत जास्तींत जास्त फक्त ३००० चिरे देतां येतील असें समजलें. ते मला पुरेसे नसल्यानें मी त्यांचा नाद सोडून दिला. नंतर मी कशेल या गांवच्या चिरे काढणाऱ्या लोकांना भेटलों. त्यांनीं मोठ्या शिकस्तीनें एका वर्षांत २ हजार चिरे काढून देण्याचें कबूल केलें. तेहि मला पुरेसे नसल्यानें मी त्यांचाहि नाद

सोडला. त्यानंतर आमच्या घरापासूनच एक दीड मैलावर मोठा कातळ आहे तेथून चिरे काढून आणावे याकरितां त्या कातळाची पाहणी केली. पण एकंदरींत चिरे काढणें व डोक्यावरून वाहून आणणें याचा विचार करतां तेंहि जमण्यासारखें नाहीं याची खात्री पटली. नंतर राजापूरला दोन कंत्राटदार हातिवल्याहून चिरे काढून आणणारे भेटले. त्यांतल्या एका कंत्राटदारानें मला लागतील तितके चिरे पुरविण्याचें आश्वासन दिलें. लगेच त्यांच्याजवळ त्यांसबंधीचें बोलणें नक्की करून एकंदर १२,००० चिऱ्यांची ऑर्डर त्यांना दिली व ते चिरे राजापूरला विकत घेणें, तेथून बोटींवर चढविणें व आमच्या बंदरांत उतरवून घेणें, त्याची थापी आमच्या घरानजीक लावणें एवढ्यांचें चिऱ्यांच्या किंमतीसह कंत्राट श्री. धोडोपंतांना २५ रु. शेंकडाप्रमाणें ठरवून टाकलें व मळ्यांतील कुळीथ काढून झाल्यावर म्हणजे फाल्गुन महिन्यापासून पाऊस पडेपर्यंत जेवढे जास्तींत जास्त चिरे येऊं शकतील तेवढे आणविण्यांस त्यांना सांगितलें. या तीन महिन्यांत सुमारें ७-८ हजार चिरे आले त्याचप्रमाणें खिडक्या व दरवाजांचे नक्की आकार ठरवून फणसाच्या व सागाच्या लांकडापासूनच चौकटी तयार करण्याची त्यांना सूचना दिली व पडवें गांवांतील सुतारांकडूनच हें काम करवून घेण्याचें ठरविलें.

## योग्य कामगारवर्गाची निवड

आतां राहिला कामगारवर्ग. हा कार्यक्षम व भरपूर संघटना असलेला मला हवा होता. म्हणून वेंगुर्ल्यापासून जयगडपर्यंत विहिरी व घरें बांधणारे कोण कोण कंत्राटदार आहेत याची मी चौकशी केली. त्यांत आडिवऱ्याचे तुकाराम सुतार व विनायक सुतार यांची निवड मी त्यांच्या एकंदर कामाच्या मिळालेल्या माहितीवरून केली. यामागें अशी भूमिका होती कीं हे एकतर जातीनें सुतार होते. त्यांच्या फैरीमध्यें २५ ते ३० माणसांची भरती होती व त्यांनीं निरनिराळ्या गांवांत मिळून एकंदर ७९ घरें बांधल्याचा पुरावा सादर केला होता. त्यांतून मला असें दिसून आलें कीं, हे लोक काम अर्धवट टाकून जाणारे नाहींत. यांचीं घरें आमच्या घरांपासून बारा चौदा मैल दूर असल्यामुळें त्यांना वरच्यावर घरीं जातां आलें नसतें.

दादर येथील घराची वास्तुशांति करून भाडोत्री भरून भाडें येण्याची व्यवस्था झाल्यानंतर, तसेंच दुकानच्या आंब्याच्या लोणच्याचें काम मेअखेर पूर्ण झाल्यानंतर ज्येष्ठांत गोवळच्या घराबद्दल योजना नक्की करण्यासाठीं मी घरीं गेलों. मुंबईहून निघण्यापूर्वी तुकाराम व विनायक सुतार यांना गोवळला येण्यासाठीं पत्र पाठविलें. त्याप्रमाणें मी घरीं गेल्यावर दुसऱ्या दिवशीं ते आमच्या घरीं आले. त्यांना घराचा सर्व आराखडा मी दाखविला व घर बांधण्याची सर्व योजना समजावून सांगितली.

घर बांधण्याच्या माझ्या अटी खालीलप्रमाणें होत्या. हें सर्व बांधकाम रेती सीमेंटमध्यें करावयाचें आहे. प्रत्येक चिरा सांधमोड लागला पाहिजे व एकदां भिंतीवर ठेवलेला चिरा कांहींहि अडचण आली तरी पुन्हां हलवावयाचा नाहीं. काम चालू

असतेवेळीं एका माणसाचा चिरा सांधमाड न लागतां चिऱ्यावर चिरा आला. त्यावेळीं मी त्याला ताबडतोब सूचना दिली कीं हा तुझा सांध्यावर सांधा आला. चिरा पुन्हां हलवावयाचा नाहीं. या मुख्य अटीमुळें त्याला तो काढतां येईना. त्यानें दुसरा चिरा लावला अर्थात् त्याचाहि सांध्यावर सांधा आला. तेव्हां मी त्याला विचारलें, हा तुला सांधा मोडतां कसा नाहीं आला? तो म्हणाला हा सांधा कसा मोडूं शकणार? चिऱ्यावर चिरा येणारच. म्हणून याला सांधमोडीची माहिती नसावी असें समजून त्या कामावर दुसरा मनुष्य ठेवला व त्याला चिरे तासण्याच्या कामावर पाठवला.

ती सांधमोड होण्याकरितां पहिल्यानें अर्धा चिरा लावून मग सबंध चिरा लावायला हवा होता व तेंच त्याला माहीत नसावें. घराला लागणाऱ्या सामानापैकीं तळ व पहिल्या मजल्याचे दरवाजे, बोध, खिडक्या व फडताळें हीं तेथें तयार झालींच होतीं. खुंट्या मी मुंबईहून व राजापुराहून नेल्याच होत्या. तक्तपोशीला मारण्याच्या फळ्या, एका पाख्याचे वासे व बहुतेक सर्व दांडली व लोखंडी सामान, खिळे, बिजागरें, स्क्रू इत्यादि मुंबईहून नेले.

### घरबांधणी मजुरीच्या पद्धति

तुम्ही कोणत्या पद्धतीनें काम करायला तयार आहांत याची मी प्रथम कंत्राटदारां-कडे विचारपूस केली. त्यांनी दोन पद्धति आम्हांला सांगितल्या. एक म्हणजे उक्ते मजुरीचें कंत्राट ठराविक रुपयांस ठरविणें. परंतु याच्यांत बांधकामांत कांहीं फरक झाल्यास मतभेद होण्याची शक्यता असते. दुसरी, जसें बांधकाम होईल तसें १०० हाताला खालील भावाप्रमाणें पैसे द्यावयाचे: जमिनीच्या खालीं होणाऱ्या पायाच्या कामाला १०० हाताला ८ रु. जमिनीपासून तळमजला पुरा होईपर्यंतचें सुमारें १० फुटांचें काम याला १०० हाताला १० रुपये त्यानंतर १० फुटांपासून २० फुटांपर्यंत होणारें काम याला १०० हाताला १२ रुपये. मी दुसरी पद्धत पसंत केली. पण त्यांनीं जे भाव सांगितले होते ते तितकेसे मला पसंत पडले नाहींत. कारण काम मिळविण्याच्या हेतूनें जरी त्यांनीं हे भाव सांगितले असले तरी आंबेकरांच्या घरांच्या अनुभवावरून या कामगारांना सुद्धां या भावांत विशेष फायदा सुटणार नाहीं असें मला वाटलें. कारण आंबेकरांच्या घराच्या पायाचें काम करणारे लोक पाया होतांच निघून गेले. वरचें काम करण्यास दुसरे कंत्राटदार आले. ते ७-८ फूट उंच काम करून निघून गेले व चौथ्या कंत्राटदारांनीं तें काम पूर्ण केलें होतें. तो काळ फार मंदीचा असल्यामुळें पोटापाण्याची व्यवस्था चालावी म्हणून वाटेल त्या कमी भावांत काम घेण्याची प्रवृत्ति कामगारांत होती.

### कामगार सुखी तर घर सुखी —!

जर कामगारांच्या पोटापाण्याची सोय व्यवस्थित झाली नाहीं तर तें घर आपल्या-लाहि यशालाभाला येणें कठीण म्हणून मीं त्यांना त्यांचा जास्तींत जास्त १२ रुपये हा पहिला चिरा लागल्यापासून शेवटचा चिरा लागेपर्यंत बांधकामाचा नक्की भाव देण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें दरवाजे, खिडक्या, छप्पर वगैरे सर्व सुतारकामाचे भाव ठरवून

दसऱ्यापूर्वी कांहीं थोडी माणसें येऊन दसऱ्याच्या दिवशीं चिरे तासण्याच्या कामाचा मुहूर्त करा असें मी त्यांना सांगितलें व इतर विचारविनिमय करून त्यांची रवानगी केली. मीहि दुसऱ्या दिवशीं खिडक्या, दरवाजे व फडताळें यांचें काम कुठपर्यंत आलें आहे त्याची पाहणी करण्याकरितां पडव्याला गेलों. खिडक्या, दरवाजे व फडताळे यांचें काम समाधानकारक चालू होतें. दरवाज्यांच्या बहुतेक चौकटी झाल्या होत्या व खिडक्यांच्या चौकटींना सुरुवात झाली होती. खिडक्यांचें काम त्यांत शिगा भरून पुरें झाल्यानंतर फडताळांचें काम सुरू करा असें त्यांना सांगून व घराचा मुख्य दरवाजा जो थोडा नक्षीदार करावयाचा असतो त्याच्याबद्दल सूचना देऊन मी घरीं आलों. ४–६ दिवस विश्रांति घेऊन मी मुंबईला परत आलों. नंतर आश्विनांत दिवाळीपूर्वी चि. बाळू याला घरीं पाठविलें. दिवाळी होतांच रहातें घर उलगडून त्यांतील लाकूड सामान व दगडमाती कुठें कुठें ठेवावयाची याच्या सूचना त्याला दिल्या. ठरल्याप्रमाणें बांधकामाच्या कंत्राटदाराची चार पांच माणसें येऊन दसऱ्याला त्यांनीं चिरे तासण्याच्या कामाची सुरुवात केली. यावर्षी आमच्या घरांत सौभाग्यवती व माझी सावत्र आई या प्रसूत व्हावयाच्या होत्या. पैकीं सौभाग्यवती १९ ऑक्टोबर १९३८ रोजीं वसूबारशीच्या दिवशीं प्रसूत होऊन मुलगी झाली. तीच मीनाक्षी. दिवाळी झाल्यावर जेवढें घर बांधावयाचें होतें तेवढ्या घरांतून बाकीच्या अर्ध्या घरांत माणसें रहावयास गेलीं. आई प्रसूत व्हावयाचीच होती ती पुढें कार्तिक वद्यांत प्रसूत झाली.

दिवाळीनंतर घर उलगडण्याच्या कामास सुरुवात झाली व कार्तिकअखेर घर उलगडून नळे, कौलें, लांकूडसामान, हें सर्व ठरलेल्या ठिकाणीं ठेवून बाळू मुंबईला निघून आला व मी मार्गशीर्ष शुद्ध १ ला बांधकाम सुरू करण्याकरितां म्हणून घरीं गेलों. तोपर्यंत तीन चार हजार चिरे तासून झाले होते. मळ्यांतील भातें कापून झाल्यावर १२ हजारापैकीं राहिलेले चिरेहि मळ्यांत आले होते.

मार्गशीर्ष शुद्ध ५ या दिवशीं पायाचा दगड बसविण्याचा मुहूर्त केला. त्याची पूजा करून, सर्व कामगारांना सुट्टी देऊन गोडजेवण व कांहीं बक्षिसी देऊन सर्व कामगारांना खुषी केलें व दुसऱ्या दिवसापासून बांधकामाला झपाट्यानें सुरुवात झाली. पाया होऊन पहिला दरवाजा बसविण्याचा मुहूर्त करून व मी मुंबईहून परत कधीं येणार व तोपर्यंत किती काम पुरें झालें पाहिजे हें ठरवून देऊन मी मुंबईला आलों. याप्रमाणें मी ८–१० दिवस घरीं व ८–१५ दिवस मुंबईत अशा खेपा मारीत होतों. कारण मला दुकानचें कामहि संभाळायचें होतें. गोविंदा व बाळू हे दोघे भाऊ दादर व ठाकुरद्वार दुकानावर गुंतलेले असत.

## लोकांचें भाकीत खोटें ठरलें

असें यथाक्रम काम चालू असतां काम झपाट्यानें वर चढूं लागलें. आजुबाजूला पुष्कळ लोकांनीं यंदा हें काम पुरें होणार नाहीं व पावसाळ्यांत यांची अडचण होणार असें भाकीत केलें होते. कारण चिरेबंदी घर बांधण्याची तिकडची पद्धत म्हणजे

पहिल्या वर्षी फक्त पाया बांधून तो पावसांत भिजूं द्यावयाचा. दुसऱ्या वर्षी तळमजल्याचें काम पुरें करून काम पाऊसभर भिजूं द्यावयाचें. वरचें छप्पर, आंतील जिना, माळा हें काम त्याच्या पुढच्या वर्षी. त्यामुळें कमींत कमी २-३ वर्षांच्या आंत हें घर बांधून पुरें होतच नसे. परंतु माझा संकल्प वैशाखापर्यंत हें काम संपूर्ण पुरें करून दुकानचें लोणचें घालण्याकरितां वैशाखाच्या सुरुवातीला मुंबईला हजर व्हावयाचा होता. कैरी खरेदीपासून लोणचें तयार होईपर्यंत व मसाले घालून पिंपें बंद करण्यापर्यंतची सर्व जबाबदारी माझ्यावर होती. घराचें काम चालू असतांना आजूबाजूच्या गांवचे पुष्कळ लोक घराचें काम पाहण्यास येत व थोडें आश्चर्य व्यक्त करीत व म्हणत कीं काम फारच झपाट्यानें चालू आहे. त्याप्रमाणें जोरांत काम चालून वैशाख शुद्ध ७ ला १९२९ मध्यें वास्तुशांत करून, कामगारांना बक्षिसी देऊन, त्यांचे पुरे हिशोब देऊन अगदींच अल्प राहिलेलें २-३ दिवसांचें काम पुरें करण्याची त्यांना सूचना देऊन मी त्याच दिवशीं संध्याकाळीं पांचच्या लॉंचनें मुंबईला यावयास निघालों.

मार्गशीर्ष शुद्ध ५ ला घराचें काम सुरू झालें तें वैशाख शुद्ध ७ ला पूर्ण झालें. यांत संक्रांत, शिवरात्र, होळी, पाडवा वगैरेसाठीं घेतलेल्या सुट्या वजा करतां त्यांनीं एकूण १२५ दिवस प्रत्यक्ष काम केलें.

पुढें वडील मंडळी सुखासमाधानांत या चिरेबंदी घरांत राहूं लागली. मधून मधून आम्हां भावांपैकीं कोणी तरी जाऊन येऊन असतच. नंतर १९५० च्या फेब्रुवारींत मी गांवीं गेलों असतां सार्वजनिक उपयोगाकरितां बंदरावर धक्का बांधला व त्याच वेळीं विहिरीवरील खोपटीहि दुरुस्त करून घेतली. आमच्या चिरेबंदी घरांतील भिंतींना बारीक बारीक खांचखळगे असल्यामुळें त्यांत कांहीं कीटक व प्राणी रहात. म्हणून घराच्या तळमजल्याच्या सर्व भागाला आंतून व माडीवर बैठकीची जागा व एक खोली तसेंच घराची पश्चिमेकडील व दक्षिणेकडील बाहेरची बाजू यांना रेती सीमेंटचा गिलावा करून घेतला व दिवाळीनंतर या केलेल्या गिलाव्याला ऑईलपेंटहि करून घेतला.

## दुसरी मालमत्ता

दादर येथें बांधलेल्या इमारतीच्या व्यवहारांतून आम्ही १९४२ अखेर मोकळे झाल्यानंतर व तें दलाल झक्कास बाबूराव यांना कळल्यानंतर एक दिवस ते मला भेटण्याकरितां आले व म्हणाले कीं तुम्हांला अतिशय सुंदर, अतिशय फायदेशीर व नांव ऐकल्यानंतर तुम्ही अतिशय खुप व्हाल अशी एक प्रॉपर्टी दीड लाखाच्या आसपास देतों. पण मी त्यांना म्हटलें कीं, " नुकतेच कुठें आम्ही मागच्या बोजांतून मोकळें होत आहोंत व आतां आम्हांला पैशाची सवड मुळींच नाहीं. फार तर ५-१० हजार रुपये आम्हांला आतां उभे करतां येतील. तरी या पांच दहा हजारांवर एवढा मोठा दीड लाखाचा बोजा कसा झेपणार ? म्हणून तूर्त या विषयावर विचार करणें आम्हांला शक्य नाहीं. तरीपण कुठची प्रॉपर्टी हें तुम्ही मला सांगितलेंत तर विचार करूं " तेव्हां ते असें म्हणाले कीं ही अगदीं गुप्त बातमी आहे फक्त तुम्हाला सांगतों. तुम्ही याचा कोठें बभ्रा

करूं नका. तुमचें दुकान असलेलीं व त्याच्या पाठीमागच्या दोन मिळून तीन इमारती मालकिणीनें विकण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें ती मला बोलली आहे. परंतु ही गोष्ट षट्कर्णी होतां कामा नये. तिचे यजमान भालचंद्रपंत हे आजारी असतांना त्यांना थोडेंबहुत कर्ज झालें आहे. मालिनी ब्लॉक व तुमचें दुकान असलेला सीताराम ब्लॉक या चाळी बांधतेवेळींहि त्या चाळींवर कांहीं बोजा झालेला आहे. प्रथम तिचा विचार ही सर्वच वाडी विकून टाकण्याचा होता. परंतु तिनें वाडीचे एकंदर चार भाग पाडले. दोन मुलांचे दोन, एक आपला व एक यजमानांचा. त्यांत हा भाग तिनें यजमानांचा ठरविला असून तेवढा भाग विकून झालेल्या कर्जांतून मोकळे होण्याचा तिचा विचार आहे. म्हणून ती हा भाग विकीत आहे. त्यावेळीं मला अशी शंका आली कीं, कोटांतल्या बझारगेटमधील आमच्या दुकानाला दुकान खालीं करण्याची २४ तासाची नोटीस मिळाली त्यावेळीं आमच्यासमोरच्या सीताराम शिंपी यानें मालकानें घर विकावयास काढलें असतां ते विकत घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. त्याचा परिणाम ती इमारत तर त्याला मिळाली नाहींच परंतु त्याऐवजीं २४ तासांत दुकान खालीं करून जाण्याची नोटीस मात्र त्याला मिळाली. तेव्हां त्यांनीं मला असें आश्वासन दिलें कीं, तुमच्या बाबतींत तसें मी घडूं देणार नाहीं. त्याकरितां करारनाम्यावर तुमची सही घेण्यापूर्वी चांगल्या वजनदार माणसांसमक्ष व त्यांच्या सही साक्षीसह तिची सही पहिल्यानें घेण्याची व्यवस्था करीन. त्यांतूनहि कांहीं संघर्ष निर्माण झाल्यास तिची समजूत घालून शांततेनें व प्रेमानें हा सौदा पुरा करण्याची काळजी मी घेईन. तरीपण मला धीर होईना. झक्कास बाबुराव माझ्या पाठीवर होतेच व त्यांचा आग्रहहि फार होता कीं पुन्हां असा मोका येणार नाहीं. तरी ही संधि तुम्ही दवडूं नका व विचारान्तीं मलाहि तें पटूं लागलें. म्हणून या बाबतींत गोविंदाचें काय मत आहे तें त्याला विचारलें. त्यानें अनुकूल मत दिलें नाहीं. नंतर दादांना पत्र पाठवून त्यांचें मत विचारलें. नंतर आप्पा-साहेब चितळे यांचें मत घेतलें. या तीनहि माणसांचीं मतें जीं मला महत्त्वाचीं वाटत होतीं तीं प्रतिकूल पडल्यामुळें श्री. आत्मारामपंत यांना ही प्रॉपर्टी विक्रीला निघाली आहे व तुम्हांला शक्यता आहे तेव्हां तुम्ही ती घ्यावी असें मी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु मागची चाळ या वाडींत सर्वांत पहिली बांधलेली असल्यामुळें ती फारच जुनी झाली होती व या चाळी विकत घेतल्याबरोबर त्यांची दुरुस्ती करणें आवश्यक होतें असें त्यांना दिसल्यावरून त्यांचें ही जुनी चाळ सोडून पुढील एकच चाळ दिली तर मी विचार करीन असें म्हणणें पडलें. त्यानंतर ही गोष्ट षट्कर्णी झालीच व दुसऱ्या एका पार्टीकरितां एक इंजिनियर चाळीची तपासणी करण्याकरितां त्या पार्टीबरोबर वाडींत आले व त्यांनीं प्रथम याच दोन चाळींची पाहणी केली.

घरमालकातर्फे त्यावेळीं कोणी मनुष्य हजर नसल्यामुळें या चाळी दाखविण्या-करितां मी त्यांच्याबरोबर गेलों. या दोन चाळी पाहिल्याबरोबर बाकीच्या चाळी पाहण्याकरितां बरोबर चला असें ते मला म्हणाले. तेव्हां त्यांना मी सांगितलें कीं या दोनच चाळी फक्त

विकावयाच्या आहेत. बाकीच्या विकावयाच्या नाहींत असें माझ्या ऐकण्यांत आहे. त्यानंतर ज्या पार्टीकरितां ते चाळीची पाहणी करण्यासाठीं आले होते त्यांची सर्व वाडी मिळाली तर घेण्याची इच्छा होती. नुसत्या दोनच चाळी घेण्याचा त्यांचा विचार नव्हता. हें बोलणें झाल्यावर या चाळींची एकंदर किंमत तुम्ही किती करतां असें मी त्यांना विचारलें तेव्हां त्यांनीं जास्तींत जास्त एक लाख रुपये किंमत होईल असें मला सांगितलें. परंतु जर तुमच्यासारखा म्हणजे याच चाळींत दुकान असलेला मनुष्य घेण्याचें ठरवील तर २०–२५ हजार रुपये जास्त. देण्यास हरकत नाहीं; असें त्यांचें मत पडलें. नंतर ते इतर चाळींची पाहणी न करतांच निघून गेले.

## सर्वांची प्रतिकूल पडलेलीं मतें !

प्रत्यक्ष वडील व जोडीदार भाऊ यांचीं मतें प्रामुख्यानें प्रतिकूल पडल्यामुळें व वडील त्यावेळीं गांवीं असल्यामुळें त्यांचें काय म्हणणें आहे तें ऐकून घेण्याकरितां व त्यांची समजूत घालण्याकरितां म्हणून मी गांवीं गेलों. कारण ही प्रॉपर्टी कीं जिच्यामध्यें आमचें मुख्य दुकान आहे व त्यावर मजला घेतला असतां आमची राहण्याची सोयहि त्याच इमारतींत होण्याची शक्यता असल्यामुळें अशी ही प्रॉपर्टी घ्यावी असें माझें ठाम मत झालें होतें. म्हणून गांवीं गेल्यावर माझ्या सर्व अपेक्षा वडिलांना समजावून दिल्या तरी त्यांचें मत अनुकूल दिसेना. तेव्हां त्यांची खातरजमा करून दिली कीं, (अर्थात तोंडीच) या इमारती घेण्यामुळें व हा व्यवहार जर सुरळीत उलगडला नाहीं तर या व्यवहारांत होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी मी माझ्या शिरावर घेईन व फायदेशीर ठरली तर तीं सर्वांची आहेच. अशी समजूत घातल्यावर "तुझ्या जबाबदारीवर हा व्यवहार कर; तुझ्या भावांना, मला अगर कुटुंबाला या बाबतींत कसलीहि तोशीस लागतां कामा नये; असें जर तुला नक्की कबूल असेल तरच हा व्यवहार कर;" असें त्यांनीं मला सांगितलें. त्यानंतर पडत्या फळाची आज्ञा असें समजून मी एक आठवड्यानें परत मुंबईला आलों व नंतर गोविंदाच्या मताची पुन्हां विचारणा केली. पण त्याचा विरोध विशेषसा ठाम स्वरूपाचा नव्हता असें मला दिसलें. म्हणून त्यानंतर दलाल झकास बाबूराव यांना 'मी हा सौदा करण्यास कबूल असल्याचें कळविलें; व पहिल्यानें करारनामा करण्याची व्यवस्था करा' असें मी त्यांना म्हणालों. त्यानंतर मालकीणबाई खंडाळ्याला गेल्या असतांना करारनाम्याचा कागद खंडाळ्याला नेऊन त्यावर दोन वजनदार माणसांच्या साक्षीनिशीं मालकीणबाईची सही घेऊन पंडित सॉलिसिटरांच्या ऑफिसांत दुपारीं ते आले व रुपये पंधरा हजारांचा चेक देऊन मी त्या करारनाम्यावर माझी सही केली. या वेळेपर्यंत २० हजार रुपये आमच्या खात्यावर बँकेंत जमा झाले होते. ॲग्रीमेंटवर सह्या करण्यापूर्वी त्या ॲग्रीमेंटच्या कागदावर आमचें नांव असल्यामुळें मालकिणीनें किंमत वाढवून १॥ लाखाऐवजीं १,९५,००० असा आंकडा त्या करारनाम्यावर घातला होता. हें आमचें ॲग्रीमेंट झालें. त्या सुमारास इमारतीचे भाव वाढले होते व पूर्वी जो १००० रु. भाड्याला एक लाख रुपये दर होता तो सहाशें रुपये पर्यंत चढला होता. परंतु या दोन इमारतींचें भाडें ९०० रु. च

होतें. त्या हिशोबानें दीड लाख रुपये किंमत बरोबर होती. परंतु माझ्या दृष्टीनें किंमत काय पडली यापेक्षां आपलें मुख्य दुकान असलेली जागा आपल्याला विकत मिळाली याकडे प्रामुख्यानें होतें. यामुळें किंमतीचा प्रश्न मी गौण समजलों. साधारणपणें मी धंद्यांत पदार्पण केल्यापासून कोणचीहि आलेली संधि वायां जाऊं न देण्याची माझी मनोवृत्ति असे व हा सौदा माझ्या दृष्टीनें ती एक संधीच होती. म्हणून मी ती वायां जाऊं दिली नाहीं.

## रकमेच्या उभारणीचे प्रयत्न

त्यानंतर आतां सौदा केला खरा पण रकमेची उभारणी केली पाहिजे म्हणून त्या उद्योगाला मी लागलों. दादरच्या इमारतीच्या वेळीं ज्याच्याकडून आम्ही रक्कम घेतली होती त्यांचा मनुष्य आमच्याकडे येऊन 'तुम्हांला कितीहि रक्कम पाहिजे असली तरी केव्हांहि रक्कम तयार आहे;' असें त्यानें मला आश्वासन दिलें. आमचे दुसरे एक महाराष्ट्रीय स्नेही श्री. नानासाहेब गुर्जर यांनींहि आपण रक्कम देऊं असें मला आश्वासन दिलें. या वेळपर्यंत वीस हजाराच्या आसपास रुपये माझ्याजवळ जमले होतेच. श्री. माधवजी जोशी व त्यांचे बंधू भवानीशंकर या दोघांनीं मिळून त्यांच्याजवळचे वीस हजार रुपये मला दिले व दरमहा एक हजार रु. भाडें येत असल्यामुळें व दुकानच्या नफ्यांतून पंधरा वीस हजार रुपये सहज जमण्याची शक्यता मला दिसून आली. म्हणून नानासाहेब गुर्जर यांच्याकडून ही प्रॉपर्टी मॉर्गेज करून त्यावर दीड लाख रु.घेण्याचें निश्चित केलें व या प्रॉपर्टीचें खरेदीखत व मॉर्गेज डीड एकाच वेळीं तयार करून ही प्रॉपर्टी १ लाख ९५ हजाराला विकत घेण्याचें धाडस मी केलें परंतु परमेश्वर कृपेनें हें एक धाडस न ठरतां तो एक व्यवहार ठरला व पुढें ५–६ वर्षांत या व्यवहारांतून आम्ही पूर्णपणें मोकळें झालों.

## तीन चाळींचे आम्ही मालक बनलों

अशा तऱ्हेनें या शांतारामाच्या वाडींतील तीन चाळींचे आम्ही मालक झालों. दादांनीं प्रथम धंदा याच शांतारामाच्या चाळींत १९१० च्या अखेरीस सुरू केला. त्यानंतर कांहीं दिवस सदाशिव गल्लींत दुकान न्यावें लागलें. पण १९१३ च्या आषाढांत पुन्हां आम्हीं शांतारामाच्या चाळींतच आलों. त्यानंतर १९४३ सालीं म्हणजे ३० वर्षांनीं या वाडींतील कांहीं चाळींचे आम्ही मालक झालों. परमेश्वरी लीला किती अज्ञात असते याचें हें उदाहरण आहे. या चाळी आमच्या मालकीच्या झाल्यानंतर त्यांना अनुक्रमें बेडेकर सदन नं ३, ४, ५. अशीं नावें दिलीं.

त्यानंतर १९५६ सालीं त्यांतील जुनी इमारत दुरुस्त करून ती अगदीं नव्यासारखी केली. याच वाडींतील सात ते बारा क्रमांकाच्या.चाळी १ ऑगस्ट १९५७ रोजीं दीड लाख रुपयांना खरेदी केल्या आहेत. माझ्या अपेक्षेप्रमाणें या नं. ३ व ४ चाळींवर मजले घेतले असून एक मजला मी व माझे कुटुंबीय वापरतों. दुसऱ्या मजल्यावर माझे दोन भाऊ रहातात. व दुरुस्त केलेल्या चाळींत एक भाऊ रहातो. अशा तऱ्हेनें हें केलेलें

धाडस माझ्या अपेक्षेप्रमाणें मला कांहीं तोशीस लागूं न देतां परमेश्वरानें यशस्वी केलें आहे.

त्यानंतर माहीम येथें आम्ही घेतलेली जागा लोकवस्ती विभागांतील ( रेसिडेन्शियल एरिया ) ठरल्यामुळें त्या प्लॉटवर राहण्याच्या इमारती बांधण्याच्या खटपटीस आम्ही लागलों होतों. आराखड्याप्रमाणें त्या जागेंत १२० डबल खोल्या एवढें बांधकाम होण्यासारखें होतें. परंतु नगरयोजनेमुळें १६०० वाराच्या प्लॉटवर एवढी इमारत बांधण्याची परवानगी मिळाली नाहीं. म्हणून दोन इमारती बांधण्याची खटपट पुन्हा सुरू केली. त्या प्रयत्नांना यश येऊन एका इमारतीचा आराखडाहि मंजूर झाला. एका इमारतीच्या बांधकामाइतक्या पैशाची व्यवस्था आमच्याकडे होती. कर्ज काढून दुसरी इमारत बांधण्यापेक्षां सध्यां एकच इमारत पुरे असें ठरवून एस. व्ही. आपटे आणि कं. यांचें टेंडर मंजूर करून इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली. तें बांधकाम बरेंचसें आटोक्यांत आल्यावर वडिलांचें वर्षश्राद्ध आल्यामुळें गणेश चतुर्थी होतांच ( १९५२ ) आम्ही घरीं जाण्याच्या तयारीस लागलों. त्याप्रमाणें सुवर्णपाटकी इंजिनियर यांना आम्ही १५ दिवस गांवीं जाऊन येत असल्याचें सांगितलें. दुसऱ्या इमारतीचा आराखडा ( प्लॅन ) तयार होतांच 'तो म्युनिसिपालिटीकडे पाठवूं कां' असें त्यांनीं मला विचारलें. त्यावर 'सध्यां आमच्याकडे एका इमारतीपुरतीच पैशाची व्यवस्था आहे; म्हणून सध्यां एकच पुरें' असें माझें मत मी त्यांना सांगितलें. कारण कारखाना बांधण्याचें ध्येय आमच्यापुढें प्रामुख्यानें होतें. तेव्हां त्यांचें असें मत पडलें कीं, प्लॅन पास होण्यास ४–६ महिने लागतील व त्यानंतरच्या वर्षांत अगदीं वर्ष अखेरसुद्धां बांधकाम सुरू केलें तरी चालेल. टाऊन प्लॅनिंगचे नियम सारखे बदलत असल्यामुळें इमारतीचा आराखडा आतांपासूनच पास करून घेतलेला असला तर कामाला पुढें केव्हांहि सुरुवात करतां येईल. त्यावर मी त्यांना 'प्लॅन पाठवा' पुढें सवडीप्रमाणें पाहूं, असें सांगून परत आलों व ठरल्याप्रमाणें पुणें कोल्हापूरमार्गें घरांतील सर्व मंडळींसह गांवीं निघून गेलों.

### दुसऱ्या इमारतीच्या कामास प्रारंभ

वडिलांचें श्राद्ध करून मुंबईला आलों त्या दिवशींच इंजिनियर सुवर्णपाटकी यांचा 'मला भेटून जा' असा फोन आला. काय काम आहे असें विचारतां आपण पाठविलेले प्लॅन पास होऊन आल्याचें त्यांनीं सांगितलें व त्यावेळीं जरी दुसऱ्या इमारतीकरितां पैशाची सवड नव्हती व व्याजाचे दर वाढल्यामुळें सावकाराचें कर्ज घेण्याची इच्छा नव्हती तरी भाडेकरूंकडून कांहीं ठराविक रकमा घेऊन व लोकांकडे येणें असलेल्या कांहीं रकमा परत घेऊन घरांचें काम आम्ही कसें तरी रेटूं असा मला विश्वास वाटला. म्हणून मी इंजिनियरांना Quantity खर्चाचा **अंदाज का**ढून टेंडर्स तयार करण्याची सूचना दिली. तेव्हां त्यांनीं सर्व तयार असल्याचें सांगितलें त्यानंतर मी टेंडर्स पार्टींना पाठविण्याची सूचना दिली. परंतु दोन दिवसांनीं आई स्वर्गवासी झाल्याची तार आल्यामुळें

मी अमुक अमुक कामाकरितां गांवीं जात आहे असें इंजिनियरांना टेलिफोननें सांगून मी गांवीं निघून गेलों.

आईचे दिवसवार करून दसरा झाल्यावर मी मुंबईला आलों त्यावेळीं टेंडर्स भरून आलेलीं तयार होतीं. आपटे यांचेंहि टेंडर होतें व प्रल्हाद दयाळजी शर्मा या नांवाच्या एका मारवाडी गृहस्थाचेंहि होतें. इतरहि टेंडरें होतींच. आपटे यांचा मी सध्यां अनुभव घेतच होतों व प्रल्हादजींचीं पूर्वींचीं कांहीं कामें माझ्या पहाण्यांत आलेलीं होतीं.

वास्तविक आपटे यांना काम दिलें असतें तर आम्हाला दोघांनाहि सोईचें पडलें असतें. त्याचवेळीं आपटे यांचीं इतर दोनतीन ठिकाणीं कामें चालू असल्यामुळें त्यांचें काम जरा हळू झालें असतें इतकेंच व प्रल्हादजींचें मात्र इतर कोठें काम चालू नसल्यामुळें त्यांना या एकाच कामावर लक्ष केंद्रित करतां येऊन त्यांचेकडून हें काम लवकर झालें असतें असें वाटले आणि प्रत्यक्षांतहि अनुभवाला आलें. म्हणून प्रल्हादजीचें टेंडर पास करून आश्विन १३ ( धनत्रयोदशी ) १९५२ रोजीं या इमारतीच्या पायाचा मुहूर्त केला. आपटे यांचें काम डिसेंबर १९५२ अखेर पुरें झालें व त्यांत ठेवलेल्या भाडेकरूंकडून ४ टक्के व्याजाच्या दरानें प्रत्येक दोन खोल्यांच्या गाळयास २,००० प्रमाणें डिपॉझिट घेऊन त्या इमारतींत २१ जानेवारी १९५३ रथसप्तमीचे दिवशीं वास्तुशांति वगैरे व्यवस्थित करून १ फेब्रुवारी १९५३ पासून भाडेकरूंना रहावयास जागा दिल्या.

वरील ठेवींच्या ( डिपॉझिटच्या ) योगानें पंचवीस तीस हजार रुपये आले. कांहीं इसमांकडे मिळून तीस पसतीस हजार रुपये येणें होतें. त्यांना पत्रें लिहून मागणी केल्यावर तेहि पैसे जमा झाले. प्रत्यक्ष या नव्या चाळींत रहावयास येणाऱ्या भाडेकरूंकडून प्रत्येकीं दोन हजार प्रमाणें ठेवी घेऊन याहि भाडेकरूंकडून साठ पासष्ट हजार रुपये आले व १ जून १९५३ पासून वास्तुशांति करून या चाळींतहि भाडेकरूंना रहावयास जागा दिल्या.

डिपॉझिटच्या शर्तींमुळें व्याज दर सहा महिन्यांनीं द्यावयाचें होतें. त्याप्रमाणें प्रत्येक सहामाहीला त्यांचें व्याजाची पोंच करून २ वर्षांनंतर प्रत्येकाच्या डिपॉझिटच्या पूर्ण रकमा परत केल्या. रकमा परत देतेवेळीं त्यांचे रुपये जसेच्या तसे व जागचे जागीं रहावें म्हणून एक महिना आगाऊ सूचना देऊन एका रकमेनें दिल्या. त्यामुळें प्रत्येक भाडेकरूचे पैसे इकडे तिकडे खर्च न होतां जसेच्या तसे शिल्लक राहिले. या चाळींना बेडेकर सदन नं. ६ व नं. ७ अशीं नांवें दिलीं आहेत.

## बारा चाळींच्या मालकीचें भाग्य

१९५५ चे सुरुवातीला आम्हीं १९४३ सालीं घेतलेल्या शांतारामवाडींतील तीन चाळींपैकीं सदन नं. ५ जी १०० वर्षांची जुनी चाळ होती तिची दुरुस्ती करण्यास

सुरुवात केली व तें काम १९५५ च्या डिसेंबरपर्यंत पुरें झालें. ती चाळ आतां अगदीं नव्यासारखी झाली आहे व आणखी शंभर वर्षें टिकायला मुळींच हरकत नाहीं. भाडेकरूंच्या दृष्टीनें त्यानाहि आतां शाश्वति निर्माण झाली आहे. या दुरुस्तीकरतां सुमारें सव्वा लाख रुपयापर्यंत खर्च झाला आहे.

याच शांतारामाच्या वाडींतील आणखी एका मुलाचा भाग १९५५ च्या मध्यावर विक्रीसाठीं निघाला. कारण ज्यांच्या वांटणीला ही प्रॉपर्टी आली होती ते अमेरिकेंत रहातात. तेथून या चाळीची व्यवस्था ठेवणें त्यांना जमण्यासारखें नसल्यामुळें त्यांनीं या चाळी विक्रीस काढल्या. मालक श्री. सुखटणकर यांनीं आम्हाला हाहि भाग देण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्या चाळीं विकत घेण्याचें साटेखत २९–९–१९५५ रोजीं आम्ही केलें. त्यानंतर खरेदीची सर्व व्यवस्था पार पाडून २ ऑगस्ट १९५७ रोजीं खरेदीखतानें त्या चाळी आमच्या मालकीच्या झाल्या. या चाळींपैकी पिंपळाजवळील सदन नं. १२ मध्यें १९१३ मध्यें जें दुकान शांताराम चाळींत आलें तीहि चाळ समाविष्ट आहे. म्हणजे माझ्या कारकीर्दींत १९१३ सालीं ज्या दुकानांत मी सदाशिव गल्लींतील दुकानांतून सर्व माल उतरवून घेतला होता ती चाळ व त्यानंतर ज्या आम्हीं या शांतारामाच्या नव्या चाळींत दुकान आणलें त्या चाळीसह शांताराम वाडींतील एकंदर आठ चाळीं आमच्या मालकीच्या झाल्या असून दादर येथील दोन व माहिम येथील दोन मिळून एकंदर बारा चाळींचे मालक होण्याचें भाग्य आम्हां बेडेकर कुटुंबियांना श्रीपरमेश्वर कृपेनें लाभलें आहे.

८

# आमच्या रहावयाच्या जागा

१९११ च्या चैत्रांत झावबाच्या वाडींतील १९ नंबरच्या चाळींत ती. काकांच्या खोलीमध्यें पहिल्याप्रथम आमची आई मुंबईला आली. हें आमचें मुंबईचें पहिलें बिऱ्हाड. त्यावेळीं बिऱ्हाडांत ती. दादा व काका, आई व गोविंदा अशी मंडळी होती. पण ही खोला फार लहान (एक गाळ्याची) असून तशांत नळाजवळची असल्यानें त्याचवेळीं अगदीं नवीन बांधलेल्या वडाजवळील लक्ष्मीबाईच्या चाळींतील तळांतील तीन गाळ्यांची खोली दरमहा दहा रुपये भाड्यानें काकांनीं घेतली. या खोलीला मागेंपुढें गॅलरी व मोरींत नळ होता. तेथें आम्हीं व आई सहा सहा महिने असे दोन वेळां राहिल्यानंतर तें आमचें बिऱ्हाड मोडलें. पुढें १९१५ पर्यंत आम्हीं कांहीं दिवस हातीं जेवण करून जेवीत होतों. पुढें १९१५ च्या एप्रिलमध्यें दादांचे स्नेही श्री. कमळाकरपंत पिटकर हे सहा महिन्यांची शिलकी रजा घेऊन आपल्या गांवीं रहावयास गेले. जातांना विद्यारामभाईच्या वाडींतील आपली खोली भाडें भरण्याच्या बोलीनें सहा महिन्यांकरितां त्यांनीं आम्हांस वापरावयास दिली. रहावयास स्वतंत्र जागा मिळाल्यामुळें दादांनीं आईला मुंबईस आणविली. बरोबर बहीणहि होती. सुमारें सहा महिने तेथें राहिल्यानंतर दिवाळीपूर्वी आईला गोवळला पोंचवून दादा आले.

## मातोश्रींचें निधन

पुढें श्री. पिटकर शांतारामाच्या चाळींत जागा मिळाल्यामुळें तेथें रहावयास आले. परंतु आजारी झाल्यामुळें पुन्हां ते रजेवर गेले. व जातांना ती जागा कांहीं महिने वापरण्यासाठीं त्यांनीं आम्हाला दिली. म्हणून १९१६ च्या अश्विनांत आईला सीताराम व बाळूसह मुंबईला आणून त्या शांताराम चाळींतील पिटकर यांच्या खोलींत आम्हीं राहूं लागलों. पुन्हां आमचें मुंबईचें बिऱ्हाड सुरू झालें. नंतर माघांत कमळाकरपंत परत आल्यामुळें त्यांची खोली त्यांना देऊन आम्हीं दुकानांत राहूं लागलों. दुकानांत महिना दोन महिने राहिल्यावर फाल्गुन व. १४ ला आईला ताप आला व चौथ्या दिवशीं तिच्या अंगावर देवी दिसूं लागल्या. व चैत्र शुद्ध ३ चे दिवशीं १९१७ सालीं आई आम्हांला सोडून गेली. व आम्ही निराशेच्या दरींत फेंकले गेलों १९१७ च्या चैत्रापासून १९२२ च्या चैत्रापर्यंत आम्हीं दुकानांत रहात होतों.

१९२१ च्या चैत्रांत आमच्या दुकानासमोरील माधवदास प्रेमजीच्या चाळींतील श्री. दामुअण्णा आपटे हे आपल्या वृद्धापकाळामुळें गांवीं गेले. जातेवेळीं मीं

येईपर्यंत माझी खोली तुम्हीं वापरा व भाडेंहि तुम्हींच भरा. जर मी पुन्हां परत आलों तर मी तेथें राहीन. नाहींतर खोली तुम्हाला देईन, असें सांगून त्यांनीं आपली जागा आम्हांस दिली. परंतु एक वर्षानंतर त्यांचें पत्र आलें कीं, मी नोकरी सोडली असून माझी खोली तुम्हीं आपल्या नांवावर करून घ्यावी. त्याप्रमाणें १९२२ च्या चैत्रांत ती खोली आम्हीं आपल्या नांवावर करून घेऊन व वैशाखांत सौभाग्यवतीला आणून आम्हीं उभयतां चुलत चुलती, गोविंदा व हरि बोडस ऐवढीं माणसें तेथें राहूं लागलों.

१९२८ ते १९३३ या काळांत आम्हाला एकंदर सहा नोटिसा मिळाल्या. त्यांतल्या तीन नोटिसा आमच्या निरनिराळ्या शाखांना, एक मसाल्याच्या कारखान्याला व एक माधवदास प्रेमजीच्या चाळीतील रहात्या जागेला होती. रहात्या जागेची नोटीस चौथी होती. ही नोटीस १९३३ च्या फेब्रुवारींत आम्हांला मिळाली. कारण अगदींच क्षुल्लक होतें. आमच्या दुकानच्या बाहेर दोन बाकडीं होतीं. दुकान उघडल्यावर उभें रहाण्याकरतां गिऱ्हाईकांना त्यांचा उपयोग होई. तीं बांकडीं लांकडीं असल्यामुळें प्रत्येक वर्षी होळींत जाळलीं जाऊं नयेत म्हणून होळीच्या दिवशीं रात्रभर त्यावर बसून पहारा करावा लागे. दर वर्षी आम्हीं दोन नोकरांना त्या बांकड्यांवर पहारा करण्यास ठेवीत असूं. यावर्षी होळीच्या दुसऱ्या दिवशीं मला कोंकणांत जावयाचें होते व आगबोटींत मला झोंपहि मिळाली असती. म्हणून बांकड्यांचें रक्षणाकरितां मी स्वतः रात्रभर बांकड्यावर बसून राहिलों होतों. दुकानासमोरच्या व आम्ही रहात असलेल्या माधवदास प्रेमजीच्या चाळींतील होळी रात्रीं १२ चे सुमारास संपल्यावर ५-७ मंडळी पत्ते खेळावयास बसली. रात्रीं ३ चे सुमारास त्यांनीं कॉफी बनविली. ती पिण्यास त्यांनीं मला बोलावल्यावरून मी कॉफी पिण्यास गेलों. व तेवढ्यापुरतें त्यांतल्याच दोन माणसांना बांकड्यावर बसविलें होतें. मी कॉफी पिऊन त्यांचेबरोबर चार डाव खेळावयास बसलों. व नंतर परत येऊन पुन्हां बांकांवर बसलों. व त्या दोघांना परत पाठवून दिलें.

## घरमालकाची जागा खालीं करण्याची नोटीस

दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें मी आगबोटीनें कोंकणांत निघून गेलों. मी कोंकणांतून परत आल्यावर आमची रहाती जागा खालीं करण्याबद्दल घरमालकांकडून आलेली नोटीस मला मिळाली. ती वाचतांच मी तर आश्चर्यचकितच झालों. पण मालकाची नोटीस मिळाल्यावर जागा तर त्यांच्या ताब्यांत पुढल्या एक तारखेपर्यंत दिलीच पाहिजे. म्हणून मी जागा पहायच्या खटपटीला लागलों. सुदैवानें दुकानच्या नजीकच जयराम कानजी या चाळींतील देवमास्तर हे पारल्याला रहायला गेलेले असून ती जागा अजून त्यांच्या ताब्यांतच आहे असें कळलें.

चौकशी करतां देवमास्तर जनरल पोस्टांत नोकरीला असतात असें समजल्यावरून मी त्यांना तेथें जाऊन भेटलों व जागेबद्दल विचारणा केली.

योगायोगानें त्यांचे आमचे संबंध चांगले असून ते आमच्या चांगल्या गिऱ्हाइकांपैकीं होते. त्यांनीं ती जागा मला देण्याचें कबूल केलें. पण ते जरा कचरत होते, त्याचें कारण पुढें आठवणींत दिलें आहे. जागा खालीं करण्याच्या ज्या सहासात भाडेकरूंनाहि घरमालकाच्या नोटिसा आल्या होत्या त्याचें कारण म्हणजे होळीच्या दिवशीं घरमालकाचें कांहीं लांकूडसामान होळींत जाळलें गेलें होते. त्या रात्रीं जे लोक जागे होते त्या सर्वांना चौकशी न करतां नोटिसा दिल्या गेल्या होत्या. वास्तविक जेवढे लोक आम्ही जागे होतों, त्यापैकीं मीं तर एक दुकानदार व बाकीचे नोकरी पेशाचे गृहस्थ होते. हे लोक आपले लाकूड सामान जाळतील कसे हा विचार न करतां त्या मालकाच्या मेथाजीनें अविचारानें नोटिसा दिल्या. हे मेथाजी त्याच चाळीत रहात होते. व त्यांना हें समजायला पाहिजे होतें. तरीपण त्यांनीं हें अविचाराचें कृत्य केलें खरें. माझ्याशिवाय नोटिसा मिळालेल्या इतर भाडेकरूंनीं मालकांना सत्य वस्तुस्थिती समजावून देऊन मालकाकडून नोटिसा रद्द करवून घेतल्या. परंतु मी देवमास्तरांची जागा घेतलेली होती. मेथाजीनें मला भेटून नोटीस रद्द केली असल्याचें सांगितले. परंतु ज्याअर्थीं मला तुमच्याकडून नोटीस मिळाली त्याअर्थीं मी आतां तुमच्या चाळींत रहायला तयार नाहीं. मी दुसरीकडे जागा घेतली असून आम्हीं तिकडे रहायला जाणार आहोंत, असें त्यांना मी सांगितलें. परंतु मालकाला आम्ही कोण हें समजलें असल्यामुळें तुम्हीं जागा सोडून जाऊं नका असा त्यानें मेथाजीमार्फत पुन्हां निरोप पाठविला. तो ऐकल्यावर आम्हीं स्वतः नव्या जागेंत रहावयास गेलों पण मालकाच्या शब्दांस मान देण्यासाठीं म्हणून आमच्याच दुकानचे कारकून श्री. लिमये यांना ती जागा रहावयाला दिली. श्री. लिमये हे स्वर्गवासी होईपर्यंत तेथेंच रहात होते. त्यानंतर आम्ही ती जागा सोडली. १९२२ चा चैत्र ते १९३३ च्या एप्रिलअखेर अकरा वर्षें आम्हीं माधवदास प्रेमजीच्या चाळींत बिऱ्हाड करून होतों. नंतर १९३३ च्या मे महिन्यांत जे जयराम काजीच्या चाळींत रहावयास आलों ते १९३९ च्या जुलै ३१ तारखेपर्यंत तेथेच रहात होतों.

१९३९ च्या वैशाखांत घराचें काम पुरें करून मी मुंबईला आलों त्यावेळीं आमच्या दुकानाच्या मागच्या बाजूस सुखठणकरांचीच मालिनी ब्लॉक या नांवाची इमारत बांधण्याचें काम सुरू होतें. जयराम कानजीच्या चाळींत जी खोली आमच्याकडे होती. तिच्या बाजूचीहि आणखी एक खोली आम्हांला मिळाली होती. तरी पण ती जागा आम्हांला पुरत नसे. १९३५ मध्यें बाळूचा विवाह झाला होता. आम्हां तीन भावांपैकीं दोघांचीं तरी कुटुंबें मुंबईला असत. आमचीं मुलें, सावत्र भावंडें व पैपाहुणा या सर्वांना ती जागा अपुरीच पडे. म्हणून त्या मालिनी ब्लॉकमध्यें राहण्याची जागा घेण्याच्या दृष्टीनें मी जागा पहावयास गेलों व ती जागा मला पसंत पडून दोन गाळ्यांच्या दोन जागा व एक खोली अशा पांच खोल्यांची जागा पहिल्या मजल्यावर

घेतली व १ ऑगस्ट १९३९ रोजीं त्या जागेंत आम्हीं रहावयासहि आलों. पुढें १ सप्टेंबरला दुसरें जागतिक युद्ध सुरूं झालें.

## वाढत्या संसारासाठीं जागेची सोय

जयराम कानजीच्या चाळींतून आम्हीं मालिनी ब्लॉकमध्यें रहावयास आल्यावर आम्हां तिघांहि भावांचीं लग्नें झालीं असल्यामुळें व चौथा भाऊ लग्नास झालेला असून त्याचें लग्नहि त्याच वर्षी करण्याचा विचार असल्यामुळें आमची रहाती जागा आम्हांला फारच अडचणीची वाटूं लागली. म्हणून आमचें दुकान असलेल्या सदन नं. ३ व ४ या इमारतींवर शक्य झाल्यास एकदोन मजले वाढवावेत असे मनांत विचार येऊं लागले व असे विचार मनांत येत असतांनाच सुवर्णपाटकी इंजिनियर यांना इमारतीची तपासणी करण्यासाठीं बोलाविलें. परंतु त्यावेळीं ते आजारी असल्यामुळें येऊं शकले नाहींत. त्या नंतर श्री. पंडित इंजिनियर हे सहज कांहीं कामाकरितां बर्वे प्लम्बर यांच्याबरोबर आमच्या घरीं आले होते. त्यांना मी इमारतीची पहाणी करण्यास सांगितलें. पहाणी केल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, या इमारतीच्या पायावर आणखी दोन मजले बांधतां येऊं शकतील. त्यानंतर तो आराखडा म्युनिसिपालिटीकडून मंजूर होऊन आल्यानंतर शुक्रवार, ता. १२-१-५१ पौष शु. ५ सकाळीं साडेनऊ वाजतां वर मजले बांधण्याचा मुहूर्त केला. यापूर्वी १९३९ सालीं गांवीं मी स्वतःच्या देखरेखीखालीं घर बांधलें होतें. म्हणून मुंबईंतहि आपल्याला घर बांधतां येईल का याचा अनुभव घ्यावा अशा विचारानें हे मजले बांधण्याचें काम स्वतःच्या देखरेखीखालीं माणसें लावून व कांहीं पोटकंत्राटें देऊन पुरें केलें. त्यावेळीं पोलाद व सीमेंटवर कंट्रोल असल्यामुळें बांधकाम पुरें होण्यास अपेक्षेपेक्षां जास्त वेळ लागला. तरी पण सर्व काम पुरें होऊन जून १९५१ मध्यें एक मजला पुरा करून आम्हीं या जागेंत रहावयास आलों. पावसाळा संपल्यानंतर दुसराहि मजला पुरा करून त्यांत भाऊ रहावयास आले. आम्हीं रहात असलेली मालिनी ब्लाकमधील जुनी जागा आमची वहीण सौ. लीला हीस (त्यांची पहिली जागा सरकारला देण्याच्या बदल्यांत) दिली. आमच्या पांच खोल्यांपैकीं दोन खोल्यांचा एक गाळाहि यावेळीं सरकारला द्यावा लागला.

९

# आमचा माल तयार करण्याच्या जागा

**मसाले**, लोणचीं आणि पापड या तीन वस्तु जरी प्रामुख्यानें आमच्या व्यापारांत असल्या तरी अगदीं सर्वांत प्रथम तिखट मसाला व तोहि बाजारांतूनच कां होईना; पण चोख आणलेल्या मालांतूनच बनविण्यास साधारणपणें १९१७–१८ सालीं आम्हीं सुरुवात केली. या वस्तू दळून विकणारे व्यापारी दळतेवेळीं मालांत मिसळ करीत नसत. दळून आणतेवेळीं तो माल चोख असे. त्यानंतर त्याच्यामध्यें मिसळ करून कमी भावाचा माल ते बनवीत. परंतु चोख हवा असणाऱ्यास चोखहि विकीत. आम्हीं चोख माल आणून त्याचा मसाला बनवीत असल्यामुळें त्या वेळचे कांहीं खानावळवाले, हॉटेलें यांना तो पसंत पडे. असें वर्ष दीड वर्ष चालविल्यावर खास ब्राह्मणांकरितां म्हणून गोडा मसाला हातीं कुटण्यास सुरुवात केली. कारण तिखट मसाला ब्राह्मणलोकांस फारसा पसंत पडत नसे.

परंतु दादांना मसाले घरीं कुटणें तितकेसें पसंत पडत नसे. म्हणून तो त्यांच्या अपरोक्ष कुटून ठेवावा लागे. पुढें वडील कोंकणांतील घरीं राहूं लागल्यानंतर मसाला दळण्याकरितां आम्हीं दोन यंत्रें बसविलीं व त्यावर गोडा मसाला दळून घेऊं लागलों. हा कारखाना प्रथम दुकानाच्या बाजूलाच पिंपळाखालीं होता. ती जागा अपुरी पडूं लागली म्हणून जयराम कानजीच्या चाळींत (मुगभाट क्रॉस लेन) अठरा इंची चक्की व सर्वांत लहान ‘ डिसीन्टिग्रेटर ’ अशीं दोन मशिनें बसविलीं व तेथें मसाल्याचें काम ठीक सुरूं झालें.

यावेळीं कांहीं मसाले आम्ही मसाले कुटणाऱ्या बायांकडून कुटून घेत होतों व कांहीं या कारखान्यांत दळत होतों. पुढें १९३० सालीं या कारखान्याच्या जागेला नोटीस मिळाल्यामुळें पांजरपोळ पहिल्या गल्लींत आम्हीं हा कारखाना नेला.

ही कारखान्याची जागा अपुरी पडूं लागल्यामुळें घोडपदेव येथें एक शेड भुई-भाड्यानें विकत घेऊन मिरची व इतर मोठ्या प्रमाणावर दळण्याचा माल घोडपदेव येथें व इतर माल पांजरापोळ येथें दळूं लागलों व सध्यां या दोनहि ठिकाणीं मसाले दळ-ण्याचें काम चालूं आहे. सध्यां आमच्या मसाला दळण्याच्या कारखान्यांत दोन डिसिन्टी-ग्रेटर व तीन चक्क्या आहेत.

## आजारांतून लोणच्याची मूळ कल्पना

१९२१ सालीं दादा घरदुरुस्तीसाठीं गांवीं गेले होते. ते परत येण्याच्या दरम्यान मी तापानें आजारी झालों. त्यावेळीं दादा आल्यानंतर घरीं हवापालटाकरितां जाण्याचेंहि

मी योजिलें होतें. परंतु घरदुरुस्तीसाठीं पांचसहाशें रुपये कर्ज झाल्याचें समजल्यावर मी तो बेत रद्द केला. पण यावेळीं ताप येत होता व तोंडाची चव अजिबात गेली होती. त्यामुळें कांहींतरी आंबट असें लोणचें खाण्याची इच्छा झाली. परंतु मागणार कोणाजवळ ? सहज दोनचार गिऱ्हाइकांजवळ असें बोलल्यावर दादांचे एक स्नेही श्री. भिकाजीपंत दाबके यांनीं दोनचार फोडी अगदीं जुनें व मुरलेलें लिंबाचें लोणचें आणून दिलें. व तें लोणचें मधूनमधून जेवायला घेऊन मी सुमारें महिनाभर पुरविलें. याचवेळीं मनांत अशी एक कल्पना आली कीं, कोणाला जर अशी लोणचें खाण्याची इच्छा झाली तर त्याला मिळावयाची सोय काय ? माधवबाग, भेंडीबाजार, ठाकूरद्वार, क्रॉफर्ड मार्केट इत्यादि ठिकाणीं बाजारी लोणचीं विकत मिळत; पण तीं कांहीं एवढीं चांगलीं नसत. त्यामुळें माझ्या मनांत सहज आलें कीं मसाल्याबरोबर आपण लोणचीं बनविण्यास पण सुरुवात करावी. म्हणून मी दोनशें लिंबें आणून लोणचें बनविलें. पण तें लोणचें तयार केल्यानंतर मुरून खाण्यायोग्य होण्यास चारसहा महिन्यांचा अवधि लागतों हेंहि नंतर समजून आलें. तें लोणचें चारसहा महिने मुरल्यानंतर विकण्यास सुरुवात केली. त्यावेळीं आम्हीं साधारणपणें दोन पैशाला एक लिंबू याप्रमाणें विकत असूं. तें लोणचें झराझर संपत आलें. म्हणून पुन्हां असेच दोनशें लिंबें आणून लोणचें घातलें. परंतु पहिलें लोणचें तर संपून गेलें व हें लोणचें तर मुरावयाचें होतें म्हणून त्यावेळीं लोणचें लवकर मुरून तयार होईल अशा तऱ्हेचा एक प्रयोग एका ओळखीच्या बाईच्या सांगण्यावरून करून बघितला. लिंबें थोडा वेळ उकळत्या पाण्यांत ठेवून किंचित् जरा शिजवून बाहेर काढून त्यांचें लोणचें बनवायचें. हें लोणचें लवकर तयार होई. पण मुरलेल्या लोणच्याची खरी चव त्याला येईना. म्हणून मनाशीं असें ठरविलें कीं, जुनें लोणचें संपलें म्हणजे नवीन करण्यापेक्षां एकदमच बरेंचसें बनवावें व खपेल तसें विकावें.

### आंब्याच्या लोणच्यास सुरुवात

असें एक दीड वर्ष झाल्यावर आंब्याचें लोणचेंहि घालण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रारंभाची हकिगत मोठी गंमतीची आहे. एक दिवस आमच्याकडे एक कोंकणचे श्री. विनायकराव फडके या नांवाचे एक गृहस्थ आले. त्यांनीं दुसऱ्या कोणाला तरी भेट देण्याकरितां म्हणून १०–१५ हिरवे आंबे आणले होते. पण ते गृहस्थ त्यांना न भेटल्यामुळें आमच्या दुकानांतच आंबे ठेवून ते गांवीं गेले. जातेवेळीं 'ते आंबे तुम्हांलाच ठेवा' असें ते म्हणाले. त्या आंब्यांचें आम्हीं लोणचें घातलें. श्री. विनायकराव पुन्हां मुंबईला आल्यानंतर तितकेच आंबे आम्हीं पुन्हां विकत आणून ज्यांना हे आंबे द्यावयाचे होते त्यांना ते देवविले व १९२२ च्या चैत्रांत आम्हीं लोणचें घातलें व तेव्हांपासून दरवर्षी आंब्याचें लोणचें घालण्यास आम्हीं सुरुवात केली. त्यावर्षी आम्हीं सुमारें दोन मण लोणचें घातलें होतें व तें लोणचेंहि लोकांना आवडून त्याचाहि खप सुरू झाला.

दोन चार वर्षे आम्हीं चर्नी रोड अगर नळबाजार येथेंच आंबे विकत घेत असूं. कांहीं वर्षांनंतर भायखळ्याहून आंबे आणून त्याचें लोणचें बनविण्यास सुरुवात केली. मध्यंतरीं गोविंदाचे श्वशुर श्री. धोंडोपंत दीक्षित हे गांवाहून लोणच्याकरितां कैरी आमच्याकडे पाठवीत असत.

भायखळ्याला आंबे खरेदीला जाण्यासाठीं पहांटे पावणेपांच वाजतां उठून शौचमुखमार्जन करून सव्वापांचची ट्रॅम मॅजेस्टिक सिनेमाजवळ पकडावी लागे व सहा वाजतां भायखळ्याला पोंचायला होई. पहिल्यानें कैरी अगदीं ताजी व मोठी कोणाची असेल ती पाहून घेण्याची माझी वहिवाट असे. आपल्याला पाहिजे तेवढी कैरी घेतल्यानंतर व्हिक्टोरियांत टाकून ती दुकानांत घेऊन यावयाचें व स्नान करून दोन तीन माणसांसह आंबे कापावयास बसावयाचें. फक्त जेवणापुरतें घरीं जाऊन लगेच कैरी कापावयास सुरुवात करून ८-९ वाजेपर्यंत फोडी कापून फोडींत मसाला मिसळून पिंपांत तें लोणचें भरून ठेवावयाचें अशी माझी कामाची पद्धत असे.

चैत्र व वैशाख हे दोन महिने आंब्याचें लोणचें व ज्येष्ठ-आषाढ या दोन महिन्यांत लिंबाचें लोणचें आम्ही घालीत असूं. असें कांहीं वर्षे चालल्यानंतर एका वर्षी आमचें आंब्याचें लोणचें दिवाळीनंतरच संपत आलें. त्यावेळीं आमची आई मुंबईला आलेली होती. तिच्याजवळून आंबोशीचें लोणचें घालण्याची माहिती करून घेऊन कांहीं दिवस आंबोशीच्या लोणच्यावरच चालविलें. एक वर्ष इटालियन जांबरीं लिंबाच्या प्रत्येक लिंबू कागदांत गुंडाळलेलें व प्रत्येक पेटींत पांचशें लिंबें अशा नमुन्याच्या पंचावन्न पेट्या मुंबईला चुकून आल्या होत्या. वास्तविक त्या इटालींतून लंडनच्या स्टीमरवर चढावयाच्या होत्या. पण त्या नजरचुकीनें मुंबईच्या बोटीवर चढल्या होत्या.

त्यांच्यांतील दहापंधरा लिंबें बरोबर घेऊन दोनतीन गृहस्थ मला दाखविण्यासाठीं एका श्रावणांत आमच्या दुकानीं आले. मी तो लिंबाचा नमुना पाहिला. त्या लिंबाचा रंग पिवळा जर्द असून त्याला संत्र्यासारखा वास येत होता. प्रत्येक लिंबाचें वजन साधारणपणें ८ ते १० तोळे होतें. लिंबू पाहिल्यानंतर व त्याचा वास घेतल्यानंतर या लिंबाचें लोणचें घातल्यास तें लोकांना आवडेल कीं नाहीं याच्याबद्दल शंका उत्पन्न झाली. त्यांतलीं दोनतीन लिंबें मी कापून पाहिलीं. आंतूनहि रंग तांबूस व वास मधुर येत होता. पण चव मात्र अगदीं आंबट होती. याचें लोणचें जर आम्ही घातलें तर चालूं शकेल असें मला वाटूं लागलें.

तुम्ही आणखी कोणाला दाखविलेंत कां, असें त्यांना विचारतां मुंबईतील जवळ जवळ सगळ्या लोणचेंवाल्यांना आम्हीं हीं लिंबें दाखविलीं. परंतु कोणीहि घेण्यास तयार नाहीं. व त्यांतील बऱ्याच जणांनीं तुमचें नांव आम्हांस सांगितलें; म्हणून आम्हीं तुमच्याकडे आलों आहोंत, असें ते म्हणाले.

## इटालियन लिंबाचें लोणचें

त्यानंतर भाव ठरवून माल आणण्यास सांगितलें. त्यानंतर दोनतीन तासांतच ते लॉरी भरून पेट्या घेऊन आले. माल आल्याबरोबर तो मोजून घेऊन सर्व पैसे त्यांना रोख दिले. आमचें आंब्याचें व लिंबाचें लोणचें घालून झालें होतें; व आमच्याकडे एकहि रिकामें पिंप शिल्लक नव्हतें. त्यानंतर पिंपाची ऑर्डर देऊन व मसाला तयार करून दुसऱ्या दिवशीं त्यांचें लोणचें घालण्यास सुरुवात केली. तिसरे दिवशीं लोणचें घालून पुरें झाले. प्रत्येकीं एक खंडी वजनाचीं पांच पिंपें भरलीं. त्यानंतर दोनतीन दिवसांनीं त्या आगबोटींतील एक युरोपियन ऑफिसर आम्हीं त्या लिंबाचें काय केलें हें पाहण्यासाठीं आला होता. त्याला आम्हीं घातलेलें लोणचें दाखविलें. तें पाहून त्यानेंहि माझ्या या धाडसाबद्दल कौतुक केलें. कारण हीं लिंबें मुंबईतील कोणीहि लोणचींवाला घेण्यास तयार नव्हता. व तीं टाकून देण्याशिवाय त्यांच्यापुढें दुसरा मार्ग नव्हता. लंडनला हे लिंबू चार पेन्सला एक याप्रमाणें विकलें जात असल्याचें त्यानें मला सांगितलें. पुढें सहा महिनेपर्यंत आम्हीं तीं पिंपें तशींच पॅक ठेवलीं व सहा महिन्यांनंतर सहज उघडून पाहिलें तर लोणचें मुरलेलें नव्हतें. साल कडकच होती. म्हणून आणखी चार महिने ठेवून म्हणजे घातल्यापासून सुमारें दहा महिन्यांनीं पुढें त्याच्या विक्रीला आम्हीं सुरुवात केली. योग असा कीं, त्यांतील जवळ जवळ निम्में लोणचें आमच्या लंडनच्या एजंटाकडे गेलें. व तेथील लोकांना तें अतिशयच आवडलें. त्याचप्रमाणें आमच्या दुकानावर जें लोणचें विकलें गेलें तें खाल्लेलीं गिऱ्हाईकें पुढें आठ दहा वर्षेंपर्यंत त्या लोणच्याची आठवण काढीत, इतकें तें लोणचें चवदार झालें होतें.

त्यानंतर आमच्या लोणच्याचा खप वाढत्या प्रमाणांत असून १९६० सालीं आंब्याचें पंचवीसशें बंगाली मण व लिंबाचें चौदाशें बंगाली मण एवढें यंदाचें लोणचें घातलेलें आहे.

## आमच्या लोणच्याला पारितोषिक

जुलै १९५९ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय आंबा प्रदर्शनांत आमच्या आंब्याच्या लोणच्याला पहिलें बक्षीस मिळालें आहे. आपल्या भारतांतील लोकांना आमचीं लोणचीं अतिशय आवडत असून परदेशांत ज्या ज्या गांवीं आमचीं लोणचीं गेलीं त्या त्या देशांतलि स्थानिक जनतेलाहि आमचीं लोणचीं फार आवडत आहेत व परदेशांतून आमच्या लोणच्याना वाढत्या मागण्या आहेत. जास्तींत जास्त दूर म्हणजे कॅनडा देशापर्यंत आमचीं लोणचीं विक्रीसाठीं जात असतात. इतर कोणत्याहि लोणचीवाल्यापेक्षां आमच्या लोणच्याचें भावहि कमी आहेत.

## पापडांचें उत्पादन

पूर्वीं कांहीं वर्षें आम्हीं स्वतःच दुकानांत पापड बनवीत होतों. परंतु त्याचाहि खप फार वाढल्यामुळें ते बनविण्याकरितां स्वतंत्र माणसें ठेवलीं आहेत. मसाले,

लोणच्याप्रमाणेंच आमचे पापडहि चवदार व खुसखुशीत असतात व त्यांची परदेशांतील मागणीहि चांगलीच वाढत आहे. इतर आनुषंगिक वस्तु म्हणजे फेण्या, कुर्डया, सांडगे, तळणीच्या मिरच्या, मेतकूट, डांगर, कुळीथ पीठ, भजी पीठ, अनरसा पीठ, चकली, कडबोळीं, भाजणी, करंजीं पुरण अशा वस्तु आम्हीं बनवीत असून त्यांचाहि खप चांगलाच वाढत आहे. आम्हीं बनविलेल्या कोणत्याहि वस्तु अगदीं योग्य व माफक किंमतीतच आम्हीं विकत असतों व अनुभवांतीं गिऱ्हाईकांनाहि त्याची खात्री पटतेच.

## बोट धंद्यांत बसलेली खोट

१९४९ सालीं कोंकण नॅव्हिगेशन 'कंपनी' या नांवाची एक स्टीमर कंपनी मुंबईत स्थापन झाली. त्या कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनीं अतिशय भीड घालून मला त्यांच्या डायरेक्टर बोर्डावर घेतलें. त्या कंपनीनें 'सदाफुली' व 'गुलछडी' या नांवाच्या दोन लॉंचीस रेवस–धरमतरला पाठविण्यासाठीं म्हणून विकत घेतल्या. कांहीं दिवसांनंतर कंपनीचें मूळ चालक श्री. मुणगेकर हे निघून गेले. त्यानंतर कांहीं काळ कंपनी चालली. परंतु भाग भांडवलाची ( शेअर कॅपिटल ) जमवाजमव नीटपणें न झाल्या-मुळें ती कंपनी जवळ जवळ बुडल्यासारखीच आहे. आगबोट कंपनी हा फार भांडवलाचा धंदा असल्यामुळें, डायरेक्टर बोर्डांतील डायरेक्टर स्वतः विपुल पैसा घालण्यास समर्थ नसल्यामुळें, उभारलेलें भांडवल समाधानकारकपणें न खपल्यामुळें आम्हीं व कांहीं डायरेक्टर्सनी त्या कंपनींत घातलेले पैसे जवळ जवळ पाण्यांतच गेल्याप्रमाणें झाले आहेत. मीं त्या कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावरून निवृत्त झालों आहें.

## फिल्ड इंजिनियरिंग कंपनी

मीं १९५४ सालीं माझ्या धंद्याव्यतिरिक्त दुसऱ्या एका धंद्यांत शिरलों होतों. माझे जांवई श्री. अ. म. भिडे यांना यंत्रसामुग्रीच्या धंद्यांतील एक गृहस्थ श्री. व्ही. बी. परळकर हे भेटले. श्री. परळकर यांच्याबरोबर माझे जांवई त्यांच्या कंपनीचे भागीदार झाले. दोघांच्याहि जवळ भांडवल नसल्यानें त्यांनीं मला भांडवल देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें 'फिल्ड इंजिनियरिंग कंपनी' या भागीदारीच्या धंद्याचें लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. मी त्या कंपनीचा चेअरमन झालों व भिडे आणि परळकर हे डायरेक्टर झाले. भिडे यांना तेलाच्या धंद्याबद्दल माहिती होती म्हणून कंपनीनें तो धंदा सुरू केला व रॉकेल तेल विकण्याची पांचसहा जिल्ह्यांची एजन्सी मिळवली. परळकर यांना मशिनरी लाईन माहीत होती. म्हणून पंप, जॅक इलेक्ट्रिक मोटारी वगैरेंची एजन्सी कंपनीनें मिळविली. तेलाचा धंदा नीट चालला नाहीं व त्यांत बरेंच नुकसान आलें म्हणून श्री. भिडे कंपनींतून निघून गेले. नंतर परळकरांनीं फक्त मशिनरी विभाग चालू ठेवला त्यांनीं पालघर येथें एक फाउन्ड्री काढली. कंपनीचा धंदा व्यवस्थित चालेना म्हणून मी जुलै १९५९ मध्यें कंपनीची चेअरमनशिप सोडली व परळकर हे एकटेच त्या कंपनींत राहिले. ते तो धंदा अजून करीत आहेत.

कोंकण नॅव्हिगेशन व ही वरील कंपनी या दोन कंपन्यांत लाख सव्वालाख रुपयांची बूड घेतल्यानंतर माझी अशी ठाम समजूत झाली कीं, कोणीहि मनुष्य पुष्कळसे धंदे चालवूं शकणार नाहीं. मी साधारणपणें दुकानें व इमारती या दोन व्यवसायांत जरी यशस्वी झालों असलों तरी या दोन कंपन्यांच्या व्यवहारांत मला यश मिळालें नाहीं. त्यावरून आपल्याला ज्या धंद्याची माहिती आहे, त्या धंद्या व्यतिरिक्त इतर कोणत्याहि धंद्यांत न पडण्याचा मी तेव्हांपासून निश्चय केला आहे.

## नोकरवर्गासाठी तरतूद

१९२८ सालीं मी गांवीं गेलों असतां एके दिवशीं खाडींतील पडावांतून आजोळीं जाण्यास निघालों होतो. त्या पडावांत मला एक वृद्ध गृहस्थ भेटले. हे कोचीन येथें एका पेढीवर वयाच्या अगदीं लहानपणापासून सुमारें पन्नास साठ वर्षें नोकरीस होते. जेवणखाणाची सोय पेढीच्या मालकांकडेच असल्यामुळें त्यांना इतर विशेषसा खर्च नव्हता. खर्चवेंच भागून उरणारे सर्व पैसे ते पेढीवरच जमा ठेवीत. पुढें कांहीं कारणानें ती पेढी बंद झाली व त्यांत यांचेहि पेढींत जमा असलेले सर्व पैसे बुडाले. अगदीं निष्कांचन स्थितींत ते तदनंतर आपल्या गांवीं परत आले. त्यांना दोन मुलगे होते. थोरला मुलगा खुळा असून त्याचें लग्न झालेलें नव्हतें. धाकटा शहाणा होता; पण त्याचें लग्न होतांच तो वारला. गांवीं शेतीच्या येणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर ते स्वतः, त्यांचा खुळा मुलगा व सून यांची गुजराण ते कशीबशी करीत होते.

ही सर्व परिस्थिति मला समजल्यावर माझें मन अतिशय विषण्ण झालें व मी मुंबईला आल्यानंतर आपल्या नोकरांच्या बाबतींत कांहींतरी विचार करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें प्रॉव्हिडंट फंडाच्या धर्तीवर अलावन्सची पद्धत सुरूं केली व त्या पद्धतीमुळें कोणी नोकर नोकरी सोडून गेला तरी त्याला अल्पस्वल्प सहाय्य होतेंच अगर कोणी स्वर्गवासी झाला तर त्याच्या अलावन्सची रक्कम त्याच्या मागें त्याच्या कुटुंबियांस मिळते.

या बाबतींत सरकारी कायदा हल्लीं झाला आहे. पण आम्हीं १९३१ सालापासून ही पद्धत सुरूं केली आहे. साधारणपणें नोकरीला राहून एक वर्ष झाल्यानंतर आम्हीं ही अलावन्सची पद्धत त्या नोकराला लागूं करतो. यापूर्वी नोकरांचे विमे उतरण्याची पद्धत सुरूं करून पाहिली होती. परंतु कांहीं कांहीं नोकर नोकरी सोडून जात असल्यामुळें त्यांचे विमे बंद पडतात असें दिसून आलें म्हणून ती पद्धत पुढें मी बंद केली.

अनुक्रम ३०७८ ... दि: ...
क्रमांक ... नों दि: ...

# १० माझे कांहीं वैद्यकीय अनुभव

## ऑपरेशनवर आलें होतें; पण लोणच्यावर निभावलें !

**पूर्वी** आमच्या दुकानाची जागा जुनी असतांना उंदरांचा फार त्रास असे. एक दिवस आम्हीं दरवाजाचें कुलुप काढून दुकान उघडतों, तों आंत एक स्पिरीटची बाटली उंदरांनीं पाडल्यामुळें फुटलेली आढळली. तेव्हां प्रथम सगळया कांचा भरल्या. सर्व जागा साफसूफ केली व दुकान उघडलें. संध्याकाळीं माझ्या उजव्या पायाचा तळवा दुखूं लागला. दुसऱ्या दिवशीं ठणका फारच वाढला. म्हणून त्या फुटलेल्या बाटलीची कांच पायांत भरली असावी असा मला संशय आला. पाय तर मला जमिनीवर टेकवेना. त्यावेळचे आमचे एक कारकून श्री. गणपतराव लिमये हे डॉ. मंडलिकांकडे मला हळुंहळूं चालवीत घेऊन गेले. मंडलिकांचा दवाखाना त्यावेळीं मांगलवाडीसमोर चिवडेवाले वेलणकरांच्या शेजारीं होता. डॉक्टरांनीं पाय तपासून पाहिल्यावर 'ओपन' करून पाहिलें पाहिजे; असें म्हणाले व मला त्यांच्या ऑपरेशन टेबलावर त्यांनीं आडवें झोंपविलें. डॉक्टर हातांत मोजे घालून तोंडावर फडकें बांधून तयार झाले नि कपाटांतील हत्यारें काढण्यास गेले. एवढ्यांत मी लिमयांना विचारलें, 'ओपन करायला पाहिजे म्हणजे काय करणार ते ?' लिमये म्हणाले, 'जरा चाकूनें कापून आंत काय आहे तें बघणार. कारण त्यांना आम्हीं कांच भरली असावी असा संशय असल्याचें बोललों होतों !' तेवढ्यांत डॉक्टरांच्या हातांतील कांहीं हत्यारें घेण्यास लिमये गेले नि त्या दोघांची माझ्याकडे पाठ झाली; त्या संधीचा फायदा घेऊन टोपी व वहाणा तेथेंच ठेवून जो माझ्यानें जातांना चालवत देखील नव्हतें तो मी पळत दुकानांत येऊन बसलों. इतकी मला त्या 'कापून पहाणार' या शब्दांची भयंकर भीति वाटली. त्यानंतर दुकानावर आलेल्या एका गिऱ्हाईक बाईनें मला सहज विचारलें, 'पायाला काय झालें ?' तेव्हां मी तिला कांच भरली असावी असें बोललों.

जर कांच भरली असेल तर ती बाहेर येण्यासाठीं लोणच्यांतल्या लिंबाचें एक अर्धुक पायाला सूज आलेल्या ठिकाणीं घट्ट बांधून ठेवण्यास तिनें सांगितलें. 'जर कांच असली तर ती या उपायानें नक्की बाहेर येईल' असेंहि ती म्हणाली. त्याप्रमाणें मी केल्यावर तास दोन तासानें ठणका जरा कमी झाला व त्या रात्रीं मला झोंपहि चांगली लागली. दुसऱ्या दिवशीं पाय सोडून पहातों तों त्या लिंबाच्या फोडीवर कांचेचा तुकडा बाहेर आलेला मला दिसला व त्यानंतर दोनचार दिवसांनीं पाय पूर्णपणें बरा झाला.

पायांत कधीं कांच भरली तर त्यावर लिंबाच्या लोणच्याची फोड बांधली असतां ती कांच बाहेर येते याचा मी नंतर अनेकदां पडताळा पाहिला आहे.

★

## त्रयस्थ गिऱ्हाईक, पण मित्राहून मित्र

अशाच एकदां संध्याकाळीं मी दुकानावर बसलों असतांना गल्ल्यावर मला सरळ बसतांच येईना. एकसारखा तोल जाऊं लागला. तेवढ्यांत एका गिऱ्हाइकाला पुडी देत असतां माझ्या हाताचा स्पर्श त्याच्या हाताला लागला. तेव्हां तो म्हणाला, 'कायरे, तुझा हात किती गरम लागतो, ताप आला काय ?' परंतु ताप आल्याची कल्पना मला नव्हती. पण त्यानें पिच्छा पुरवून शेजारच्या फोंडेकर डॉक्टरच्या दवाखान्यांतून तो थर्मामिटर घेऊन आला. व मला त्यानें कांखेंत थर्मामिटर धरण्यास सांगितलें. थोड्या वेळानें त्यानें तो काढून पाहिला तों त्या थर्मामिटरनें दोन ताप दाखविला. त्यावर तो गिऱ्हाईक माझ्यावर रागावून म्हणाला, 'वात होऊन मरशील, आत्तांच्या आत्तां झोंप जा, दुकानावर बसूं नको; तुला ताप पुष्कळ आलेला आहे.' तेव्हां मी त्याला म्हटलें, 'मला बसवत नाहीं खरें, सारखा तोल जात आहे!' तरीपण त्यानें मला रागावून तावडतोब घरीं जाऊन झोंपण्यास सांगितलें. त्यावेळीं रात्रीचे सुमारें ७–८ वाजले असावे. म्हणून मी तसाच घरीं गेलों नि गड्याला दुकान बंद करून चाव्या आणून देण्यास सांगितलें. कारण त्यावेळीं दुकानांत इतर कोणीच नोकर हजर नव्हता. पाठोपाठ त्या गिऱ्हाइकानेंच फोंडेकर डॉक्टरकडून औषध घेऊन आमच्या गड्याबरोबर घरीं पाठवून दिलें. दोनतीन दिवसांनीं माझा ताप साफ निघाला. व मी पुन्हां कामावर रुजूं झालों. अगदीं त्रयस्त मनुष्य पण केवळ आमचें गिऱ्हाईक म्हणून त्यानें माझी जी काळजी घेतली तिचें मला कधींहि विस्मरण होत नाहीं.

★

## कोळणीच्या रूपानें धन्वंतरीच भेटला !

आमच्या गोड्या मसाल्यांतील खोबरें बारीक करण्यासाठीं आम्ही 'क्रशर' या नांवाचें एक मशीन आणलें होतें. एक दिवस त्यांत खोबऱ्याचा तुकडा सारखा करीत असतांना माझ्या उजव्या हाताचा आंगठा मशीनमध्यें अडकला. व चेंगरून अगदीं रक्तबंबाळ झाला. सुदैवानें तें मशीन हातानेंच फिरविण्याचें असल्यामुळें मशीन फिरविणारा तावडतोब थांबला. व मीहि माझा हात त्वरित काढून घेतला. पण लागलीच मला भोंवळ आली व मी एकदम खालीं कोसळलों. गड्यानें डोक्यावर पाणीबिणी मारून मला सावध केलें व त्यानंतर आंगठ्याला कांहीतरी औषधपाणी लावून मी घरीं जाऊन झोपलों. दोनतीन दिवस मी कसेंतरी सहन केलें. एकसारखा ठणका लागल्यामुळें डॉ. मंडलिकांकडे आंगठा दाखविण्यास गेलों. मंडलिकांनीं आंगठा पाहिल्यावर आंगठा कापून टाकला पाहिजे, असें ते म्हणाले. त्यावर मी म्हटलें, 'आंगठा एकदां कापलांत कीं गेला, मला पुड्या बांधावयाच्या असतात, लिहिणें लिहावयाचें असतें. हीं कामें मी कशीं

करणार ? तरी तुम्ही आंगठा न कापतां दुसरें कांहींतरी औषध द्या!' त्यावर माझ्या पायांत कांच भरली असतां पाय ओपन करतेवेळची आठवण त्यांना आठवली व आंगठ्यावर लावण्याकरितां एक लोशन व पोटांत घेण्यास पातळ औषध व पुड्या देण्यास त्यांनीं सुरुवात केली. रोज मी औषध आणण्यास गेलों म्हणजे ते म्हणत, 'आंगठा कापून काढणेंच जरूर आहे. नाहींतर सेप्टिक होण्याची भीति आहे.' पण आंगठा कापून घेणें मला न पटल्यामुळें मी औषधच आणीत राहिलों. असे पंधरावीस दिवस औषध करूनहि कांहींच गुण येईना व रात्रंदिवस ठणक्यामुळें मला चैनहि पडेना. नंतर मी घायतेल म्हणून मिळतें तें लावण्यास सुरुवात केली. व डॉक्टरचें औषध सोडलें. असें सुमारें महिनाभर मी तें दुःख सहन केलें. त्या एक महिन्यांत मला निवान्त अशी झोंप कधीं लागलीच नाहीं.

पण माझ्या स्वभावांत जे कांहीं गुण दुर्गुण आहेत, तसा आपलें दुखणें वेशीवर टांगणें हाहि एक गुण अगर दुर्गुण आहे म्हणा. एक महिन्यानंतर असाच मी एकदां दुकानांत बसलों असतांना एक मासळी विकणारी कोळीणबाई मसाला घेण्याकरितां दुकानावर आली. तिला देण्याची मसाल्याची पुडी नीट न बांधतां आल्यामुळें 'पुडी चखोट बांधोन दे' असें ती म्हणाली. तेव्हां माझा आंगठा दुखत असल्याचें मी सांगितलें. काय झालें म्हणून तिनें विचारतांच मी महिन्याभरांतील सर्व हकिगत तिला सांगितली. तेव्हां ती म्हणाली, 'अरे तुझ्या कुळ्याजवळ औषध हाय. तें औषध लाव म्हणजे आंगठा चार दिवसांत बरा होईल!' त्यावर मी काय औषध असें विचारतां, त्या डब्यांतला शेंदूर लोण्यांत खलून लाव म्हणजे आंगठा चार दिवसांत बरा होईल असें ती म्हणाली. मीहि त्या दुखण्यानें अतिशय त्रस्त झालों होतों. जो कोणी सांगेल तें औषध करीत होतो. लोणी व शेंदूर हीं दोन्ही आमच्या दुकानांत होतींच. त्यांतला थोडासा शेंदूर व लोणी एका पानांत घेऊन तिच्या हातांत दिलें. तिनें तें खलून माझ्या हातावर हळुवार हातानें; पण चोळून चोळून लावलें. त्यानंतर अर्ध्या तासांतच माझा ठणका कमी पडला. त्या रात्रीं मला झोंपहि गाढ लागली व तिनें म्हटल्याप्रमाणें खरोखरच चारसहा दिवसांत तो आंगठा बरा झाला. अशा प्रकारें त्या मासे विकणाऱ्या कोळिणीनें माझें दुखणें बरें केलें. परमेश्वरच तिच्या रूपानें सहाय्याला आला अशी त्यामुळें माझी समजूत झाली.

★

## मांडीला धांवरें झालें !

एक दिवस माझ्या उजव्या पायाच्या मांडीला ठणका सुरू झाला. मांडी तेलानें रगडली, अमृतांजन लावले, शेकलें पण जों जों औषध करावें तों तों ठणका वाढतच चालला .त्यावेळेस सौभाग्यवती सहज म्हणाली, 'धांवरें तर नसेल ना ?' असें म्हटल्या बरोबर ठणका एकदम भडकला व तो मला अगदीं असह्य झाला. तेव्हां कदाचित् धांवरें असेल असें वाटून आमच्याकडील नोकर हरिभाऊ बोडस यानें आपल्या एका गांववाल्या-

कढून धांवऱ्याचें पाळ अगदीं त्वरेनें आणलें व तें उगाळून थोडें पिण्यास दिलें व थोडें मांडीवर लावलें. त्याबरोबर मला लगेच झोंप लागली. व मी एकदम दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठलों. पाळ लावल्यानंतर जेवणाचेंहि भान राहिलें नाहीं. मी तसाच उपाशी झोंपलों होतों.

★

## सापसंधीच्या पाळाचा गुण

एक दिवस गोविंदा ठाकूरद्वारच्या दुकानावरून आला. येतांना वाटेंत त्याला एक उलटी झाली. पुन्हां घरीं आल्यावरही उलटी झाली. अशा दोनचार वेळां उलट्या झाल्यावर आम्ही फारच घाबरून गेलों. त्यावेळीं मला लगेच आठवण झाली कीं, अशा कोणाला उलट्या झाल्या तर आमची आजी सापसंधीचें पाळ ताकांत उगाळून प्यावयास देई व त्यानें उलट्या थांबत. मी लगेच सर्व शेजाऱ्यांकडे सापसंधीच्या पाळाची चौकशी करतां चाळीच्या तळमजल्यांतील भास्करभटजी पटवर्धन यांच्याकडे तें मला मिळालें. तें आणून, आजी देई त्याप्रमाणें बरेंचसें ताकांत उगाळून गोविंदाला प्यावयास दिलें. त्याबरोबर गोविंदाच्या उलट्या थांबून त्याला झोंप लागली व तो बरा झाला.

★

## बॅ. जयकरांना आलेला औषधाचा गुण

आमच्या इमारतीचे दलाल श्री. झक्कास बाबुराव यांच्या पुण्यांतील घरीं झक्कास भुवनमध्यें मी एकदां त्यांना भेटावयास गेलों होतों. त्यावेळीं बाबुराव वरच्या मजल्यावरून खालीं येतांना दिसले. 'वरती कोणाकडे गेले होतेत' म्हणून विचारतां 'बॅ. जयकर हे हवा पालटण्याकरतां येथें आले आहेत, त्यांच्याकडे गेलों होतों' असें ते म्हणाले. बॅ. जयकर हे माझ्याहि परिचयाचे होते म्हणून मीहि त्यांना भेटावयास गेलों.

ही १९४३ सालची गोष्ट आहे. मी त्यांना भेटलों तेव्हां ते आपलें अंग सारखें खाजवीत होते. 'आंग कां खाजवतां' असें त्यांना विचारतां, अंगावर फार कंडू उठला आहे' असें ते म्हणाले व डॉ. भडकमकरांचें औषध त्यावर चालू आहे–असेंहि त्यांनीं सांगितलें. 'मी जर औषध दिलें तर तें तुम्ही घ्याल का', असें मी त्यांना विचारतांच, 'डॉक्टरांना विचारून घेईन' असें ते म्हणाले. 'मी मुंबईला गेल्याबरोबर तुम्हांला औषध पाठवून देतों तें तुम्हीं डॉक्टरांना विचारून घ्या, त्यानें तुमचा कंडू पूर्ण बरा होईल' असें त्यांना सांगून मी मुंबईला आल्याबरोबर सुमारें दोन रत्तल कोकमसोलें पाण्यांत कुस्करून त्याचें सरबत तयार केलें व पांचसहा पौंडाचा एक शिसा भरून पुण्याला झक्कास बाबुराव यांच्या घरीं बॅ. जयकर यांच्यासाठीं पाठविला. सोबत एकदोन रत्तल कोकमसोलेंहि पाठवून दिलीं. प्रत्येक वेळीं दोन औंसप्रमाणें दिवसांतून चार वेळ तें औषध घ्यावयाचें व आमसोलें अंगाला चोळून लावून अर्ध्या तासानें स्नान करावयाचें, असें पत्र लिहून त्याबरोबर पाठवून दिलें. भडकमकर डॉक्टरनाहि तें औषध पसंत पडून त्यांनीं तें औषध

द्यावयास जयकरसाहेबांस सांगितलें व त्या औषधानें एका आठवड्यांतच बॅरिस्टरसाहेबांचा कंडू साफ बरा झाला.

★

## पाव मण म्हणजे किती शेर ?

फार वर्षांपूर्वी बॅ. जयकर हे आमचें गिऱ्हाईक होतें. नेहमींप्रमाणें आज काय पाहिजे असें विचारावयास मी गेलों असतांना त्यांनीं पाव मण साखर आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी ती घेऊन गेल्यावर 'किती आणलीस' असें त्यांनीं विचारतां मी दहा शेर असें म्हणालों. 'अरे, तुला पाव मण सांगितली होती ना; मग दहा शेर कशी आणलीस?' असें ते म्हणाले. त्यावर काय चुकलें हें माझ्या लक्षांत येईना. पण तेवढ्यांत लक्षांत आलें कीं, पाव मण म्हणजेच दहा शेर. मणाचे शेर चाळीस व पाव मणाचे दहा, असें मी म्हटल्यावर ते जरासे हंसले व पाव मण व दहा शेर यांत कांहीं फरक नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें.

★

## खसखशीच्या बोंडाचा प्रताप

एका धनत्रयोदशीच्या दिवशीं रात्रीं १० च्या सुमारास एक घाटी बाई आमच्या दुकानावर येऊन, 'जरा गिरणींत टेलिफून कर' असें मला म्हणूं लागली. तेव्हां तिला मी म्हटलें, कुठें टेलिफोन करावयाचा आहे? काय झालं आहे? 'पोरगा मरतुया, ह्येस्नी बोलावलं हाय म्हून टेलिफून कर.' असें ती म्हणाली. मी म्हटलें, 'काय झालें तुझ्या मुलाला?' तिचा नवरा गिरणींत रात्रपाळीच्या कामाला गेला व तिचा मुलगा जो कामावरून परत आला त्याला सारखे जुलाब होऊं लागले होते आणि मुलगा अगदीं मृतवत् पडला होता. कामावरून आल्यानंतर तो जेवला सुद्धां नव्हता. तिनें सांगितल्याप्रमाणें मी त्या गिरणींत दोनतीन वेळां टेलिफोन करून पाहिला. पण त्या माणसाचा पत्ता लागला नाहीं. म्हणून दुकानचीं माणसें पाठवून आजूबाजूला डॉक्टर मिळतो का पाहिलें. पण दवाखाने सगळे बंद होते. कांहीं आजारांवर बारीकसारीक औषधांची मला माहिती आहे. डॉक्टरला शोधण्यांत अर्धा तास घालविल्यावर मी त्या बाईला विचारलें कीं, तुझ्या मुलाला इरागत होते का? त्यावर ती म्हणाली–'होते' म्हणून. मी तिला म्हटलें, 'जरा थांबा. मी औषध करून देतों, तुझा परमेश्वर असला तर गुण येईल.' नंतर मी खसखशीचीं दोन बोंडें घरीं घेऊन गेलों; त्या बोंडाचे बारीक बारीक तुकडे करून तव्यावर थोडें तूप घालून तें कॉफीइतपत भाजविलें व पाट्यावर बारीक वाटून त्या पावडरीइतकेंच तूप व तेवढाच गूळ असें मिश्रण करून त्याच्या तीन गोळ्या बनविल्या व दुकानांत येऊन तिला दिल्या आणि सांगितलें, 'यांतली एक गोळी गेल्याबरोबर त्याला खावयास दे, त्यानंतर जर पुन्हां झाड्याला झालें तर आणखी एक गोळी दे. त्याला झोंप लागली तर मात्र उठवूं नको. नाहींतर तिसरी गोळी दे. तीनहि

गोळ्या खाऊन जर झाड्याला थांबलें नाहीं तर मात्र तूं डॉक्टरकडे जा. माझ्यावर विसंबून राहूं नको.'

त्यांतल्या दोन गोळ्या त्या मुलाला खावयास दिल्यावर त्याला झोंप लागली व नंतर पुन्हां त्याला जुलाब झाला नाहीं. पहाटें पांच-सहा वाजतां आमचें दुकान उघडल्याबरोबर ती बाई आली व मला म्हणाली, 'दोन गोळ्या दिल्यावर मुलाला झोंप लागली' त्यावर मी म्हटलें, तुझा मुलगा बरा झाला आतां काळजी करूं नको; तो उठेल तेव्हां उठूं दे. आठाच्या सुमाराला ती बाई त्या मुलाला घेऊन दुकानावर आली, ज्या अर्थी तो मुलगा चालत दुकानावर आला त्याअर्थी तो बरा झालाच होता. माझ्या लहानपणीं आजी अशीं कोणाकोणाला औषधें देई. त्याच माहितीवरून मी हें औषध दिलें होतें. असे एकाएकीं जुलाब सुरू झाल्यास व त्यांत लघवीला होत असल्यास या औषधाचा चांगलाच उपयोग होतो. लघवीला होत नसल्यास मात्र या औषधाचा उपयोग होत नाहीं. कारण तो कॉलरा असण्याचा संभव असतो.

★

## कॉलऱ्यावरचें औषध

कॉलऱ्यावरहि अशाच तऱ्हेचें एक औषध मला माहीत आहे. पण त्याचा उपयोग मात्र मी करून बघितलेला नाहीं. तें असें :– जुन्यांत जुनी चिंच व थोडे बिब्बे साधारण समभाग घेऊन लोखंडी खलबत्त्यांत अगदीं बारीक कुटावयाचे. त्याच्या रिठ्याच्या बीं एवढ्या गोळ्या करावयाच्या व पाण्याच्या घोटाबरोबर एकेक अशा दोनचार घेतल्या असतां कॉलरा बरा होतो. आजीनें याप्रमाणें माझ्या लहानपणीं चारदोन वेळां औषध दिल्याचें मला स्मरतें. पण मी मात्र याचा अजून प्रयोग करून पाहिलेला नाहीं. कारण पटकीचा रोग म्हणजे जीवन–मरणाचाच खेळ आहे. त्याबाबतींत असें भलतेंच धाडस न करणें बरें. कोणाला आवश्यकता वाटल्यास याचा प्रयोग करून पाहण्यास मात्र हरकत नाहीं. कॉलऱ्यावर हें खात्रीचें औषध आहे.

लहान मुलांना दांत येतेवेळीं जे जुलाब होतात ते वरील खसखशीच्या बोंडानें बरे होतात. परंतु मुलांचे जुलाबांत शेंबडासारखा व आमांशासारखा भाग असल्यास बेलफळाच्या मुरांब्यानें ते जुलाब थांबतात. अशा शेकडों मुलांना मीं हीं दोन औषधें आजपर्यंत दिलीं आहेत. परंतु माझें दुर्दैव असें कीं, माझा पहिला मुलगा प्रभाकर हा गोंवळगांवीं आमांशाच्या आजारानें चारपांच दिवसांत वारला. मुंबईला पत्र लिहून येथून बेलाचा मुरांबा रवानाहि झाला होता. परंतु मुलाचा प्राण गेल्यावर तो माझे हातीं
आला

आम्हीं माधवदास प्रेमजीच्या चाळींत रहात असतांना आमच्या समोरच्याच चौघडेवाल्याच्या चाळींतील एका चौघडेवालीचा दीड दोन वर्षांचा मुलगा आमांशानें आजारी झाला होता. त्याला डॉक्टरांचें औषध चालू होतें, पण मुलाला गुण पडेना

व जुलाब कांहीं केल्या थांबेनांत. डॉक्टरनें व त्या माणसांनीं मुलाची आशा सोडली होती. तिला कोणीतरी शेजाऱ्यानें, 'बेडेकरांकडून औषध आणून बघ' असें सांगितल्यावरून ती माझ्याकडे आली. मी मुलाला पाहून आलों. पण तो फारच अशक्त झाला होता.

परमेश्वरी कृपा झाली तरच तो वांचण्याचा संभव होता. मी घरीं येऊन खसखशीच्या बोंडाच्या सौभाग्यवतीकडून वाटाण्याएवढ्या गोळ्या बनवून घेतल्या. 'अर्ध्या अर्ध्या तासानें यांतली एक एक गोळी मुलाला दे' असें तिला सांगितलें. दोन गोळ्या पोटांत गेल्यावर त्या मुलाचे जुलाब होण्याचे कमी झाले व त्याला झोंप लागली. दोन तीन तासांनीं तो उठल्यानंतर त्याची आई मला विचारण्यास आली व मुलाला दोन तास झोंप लागली असें म्हणाली. तेव्हां पुन्हां जुलाब झाल्यास आणखी एक दोन गोळ्या दे, असें मी तिला सांगितलें. परंतु त्यानंतर त्याला जुलाब झालेच नाहींत व त्याला उतार पडला.

गोळ्या खाऊन जर झाड्याला थांबलें नाहीं तर मात्र तूं डॉक्टरकडे जा. माझ्यावर विसंबून राहूं नको.'

त्यांतल्या दोन गोळ्या त्या मुलाला खावयास दिल्यावर त्याला झोंप लागली व नंतर पुन्हां त्याला जुलाब झाला नाहीं. पहाटें पांच-सहा वाजतां आमचें दुकान उघडल्याबरोबर ती बाई आली व मला म्हणाली, 'दोन गोळ्या दिल्यावर मुलाला झोंप लागली' त्यावर मी म्हटलें, तुझा मुलगा बरा झाला आतां काळजी करूं नको; तो उठेल तेव्हां उठूं दे. आठाच्या सुमाराला ती बाई त्या मुलाला घेऊन दुकानावर आली, ज्या अर्थी तो मुलगा चालत दुकानावर आला त्याअर्थी तो बरा झालाच होता. माझ्या लहानपणीं आजी अशीं कोणाकोणाला औषधें देई. त्याच माहितीवरून मी हें औषध दिलें होतें. असे एकाएकीं जुलाब सुरू झाल्यास व त्यांत लघवीला होत असल्यास या औषधाचा चांगलाच उपयोग होतो. लघवीला होत नसल्यास मात्र या औषधाचा उपयोग होत नाहीं. कारण तो कॉलरा असण्याचा संभव असतो.

★

## कॉलऱ्यावरचें औषध

कॉलऱ्यावरहि अशाच तऱ्हेचें एक औषध मला माहीत आहे. पण त्याचा उपयोग मात्र मी करून बघितलेला नाहीं. तें असें :– जुन्यांत जुनी चिंच व थोडे बिब्बे साधारण समभाग घेऊन लोखंडी खलबत्त्यांत अगदीं बारीक कुटावयाचे. त्याच्या रिठ्याच्या बीं एवढ्या गोळ्या करावयाच्या व पाण्याच्या घोटाबरोबर एकेक अशा दोनचार घेतल्या असतां कॉलरा बरा होतो. आजीनें याप्रमाणें माझ्या लहानपणीं चारदोन वेळां औषध दिल्याचें मला स्मरतें. पण मी मात्र याचा अजून प्रयोग करून पाहिलेला नाहीं. कारण पटकीचा रोग म्हणजे जीवन–मरणाचाच खेळ आहे. त्याबाबतींत असें भलतेंच धाडस न करणें बरें. कोणाला आवश्यकता वाटल्यास याचा प्रयोग करून पाहण्यास मात्र हरकत नाहीं. कॉलऱ्यावर हें खात्रीचें औषध आहे.

लहान मुलांना दांत येतेवेळीं जे जुलाब होतात ते वरील खसखशीच्या बोंडानें बरे होतात. परंतु मुलांचे जुलाबांत शेंबडासारखा व आमांशासारखा भाग असल्यास बेलफळाच्या मुरांब्यानें ते जुलाब थांबतात. अशा शेकडों मुलांना मीं हीं दोन औषधें आजपर्यंत दिलीं आहेत. परंतु माझें दुर्दैव असें कीं, माझा पहिला मुलगा प्रभाकर हा गोंवळगांवीं आमांशाच्या आजारानें चारपांच दिवसांत वारला. मुंबईला पत्र लिहून येथून बेलाचा मुरांबा रवानाहि झाला होता. परंतु मुलाचा प्राण गेल्यावर तो माझे हातीं आला.

आम्हीं माधवदास प्रेमजीच्या चाळींत रहात असतांना आमच्या समोरच्याच चौघडेवाल्याच्या चाळींतील एका चौघडेवालीचा दीड दोन वर्षांचा मुलगा आमांशानें आजारी झाला होता. त्याला डॉक्टरांचें औषध चालू होतें, पण मुलाला गुण पडेना

व जुलाब कांहीं केल्या थांबेनांत. डॉक्टरनें व त्या माणसांनीं मुलाची आशा सोडली होती. तिला कोणीतरी शेजाऱ्यानें, 'बेडेकरांकडून औषध आणून बघ' असें सांगितल्यावरून ती माझ्याकडे आली. मी मुलाला पाहून आलों. पण तो फारच अशक्त झाला होता.

परमेश्वरी कृपा झाली तरच तो वांचण्याचा संभव होता. मी घरीं येऊन खसखशीच्या बोंडाच्या सौभाग्यवतीकडून वाटाण्याएवढ्या गोळ्या बनवून घेतल्या. 'अर्ध्या अर्ध्या तासानें यांतली एक एक गोळी मुलाला दे' असें तिला सांगितलें. दोन गोळ्या पोटांत गेल्यावर त्या मुलाचे जुलाब होण्याचे कमी झाले व त्याला झोंप लागली. दोन तीन तासांनीं तो उठल्यानंतर त्याची आई मला विचारण्यास आली व मुलाला दोन तास झोंप लागली असें म्हणाली. तेव्हां पुन्हां जुलाब झाल्यास आणखी एक दोन गोळ्या दे, असें मी तिला सांगितलें. परंतु त्यानंतर त्याला जुलाब झालेच नाहींत व त्याला उतार पडला.

गोळ्या खाऊन जर झाड्याला थांबलें नाहीं तर मात्र तूं डॉक्टरकडे जा. माझ्यावर विसंबून राहूं नको.'

त्यांतल्या दोन गोळ्या त्या मुलाला खावयास दिल्यावर त्याला झोंप लागली व नंतर पुन्हां त्याला जुलाब झाला नाहीं. पहाटें पांच-सहा वाजतां आमचें दुकान उघडल्याबरोबर ती बाई आली व मला म्हणाली, 'दोन गोळ्या दिल्यावर मुलाला झोंप लागली' त्यावर मी म्हटलें, तुझा मुलगा बरा झाला आतां काळजी करूं नको; तो उठेल तेव्हां उठूं दे. आठाच्या सुमाराला ती बाई त्या मुलाला घेऊन दुकानावर आली, ज्या अर्थी तो मुलगा चालत दुकानावर आला त्याअर्थी तो बरा झालाच होता. माझ्या लहानपणीं आजी अशीं कोणाकोणाला औषधें देई. त्याच माहितीवरून मी हें औषध दिलें होतें. असे एकाएकीं जुलाब सुरू झाल्यास व त्यांत लघवीला होत असल्यास या औषधाचा चांगलाच उपयोग होतो. लघवीला होत नसल्यास मात्र या औषधाचा उपयोग होत नाहीं. कारण तो कॉलरा असण्याचा संभव असतो.

## कॉलऱ्यावरचें औषध

कॉलऱ्यावरहि अशाच तऱ्हेचें एक औषध मला माहीत आहे. पण त्याचा उपयोग मात्र मी करून बघितलेला नाहीं. तें असें :– जुन्यांत जुनी चिंच व थोडे बिब्बे साधारण समभाग घेऊन लोखंडी खलबत्त्यांत अगदीं बारीक कुटावयाचे. त्याच्या रिठ्याच्या बीं एवढ्या गोळ्या करावयाच्या व पाण्याच्या घोटाबरोबर एकेक अशा दोनचार घेतल्या असतां कॉलरा बरा होतो. आजीनें याप्रमाणें माझ्या लहानपणीं चारदोन वेळां औषध दिल्याचें मला स्मरतें. पण मी मात्र याचा अजून प्रयोग करून पाहिलेला नाहीं. कारण पटकीचा रोग म्हणजे जीवन–मरणाचाच खेळ आहे. त्याबाबतींत असें भलतेंच धाडस न करणें बरें. कोणाला आवश्यकता वाटल्यास याचा प्रयोग करून पाहण्यास मात्र हरकत नाहीं. कॉलऱ्यावर हें खात्रीचें औषध आहे.

लहान मुलांना दांत येतेवेळीं जे जुलाब होतात ते वरील खसखशीच्या बोंडानें बरे होतात. परंतु मुलांचे जुलाबांत शेंबडासारखा व आमांशासारखा भाग असल्यास बेलफळाच्या मुरांब्यानें ते जुलाब थांबतात. अशा शेकडों मुलांना मीं हीं दोन औषधें आजपर्यंत दिलीं आहेत. परंतु माझें दुर्दैव असें कीं, माझा पहिला मुलगा प्रभाकर हा गोंवळगांवीं आमांशाच्या आजारानें चारपांच दिवसांत वारला. मुंबईला पत्र लिहून येथून बेलाचा मुरांबा रवानाहि झाला होता. परंतु मुलाचा प्राण गेल्यावर तो माझे हातीं [illegible]

आम्हीं माधवदास प्रेमजीच्या चाळींत रहात असतांना आमच्या समोरच्याच चौघडेवाल्याच्या चाळींतील एका चौघडेवालीचा दीड दोन वर्षांचा मुलगा आमांशानें आजारी झाला होता. त्याला डॉक्टरांचें औषध चालू होतें, पण मुलाला गुण पडेना

व जुलाब कांहीं केल्या थांबेनांत. डॉक्टरनें व त्या माणसांनीं मुलाची आशा सोडली होती. तिला कोणीतरी शेजाऱ्यानें, 'बेडेकरांकडून औषध आणून बघ' असें सांगितल्यावरून ती माझ्याकडे आली. मी मुलाला पाहून आलों. पण तो फारच अशक्त झाला होता.

परमेश्वरी कृपा झाली तरच तो वांचण्याचा संभव होता. मी घरीं येऊन खसखशीच्या बोंडाच्या सौभाग्यवतीकडून वाटाण्याएवढ्या गोळ्या बनवून घेतल्या. 'अर्ध्या अर्ध्या तासानें यांतली एक एक गोळी मुलाला दे' असें तिला सांगितलें. दोन गोळ्या पोटांत गेल्यावर त्या मुलाचे जुलाब होण्याचे कमी झाले व त्याला झोंप लागली. दोन तीन तासांनीं तो उठल्यानंतर त्याची आई मला विचारण्यास आली व मुलाला दोन तास झोंप लागली असें म्हणाली. तेव्हां पुन्हां जुलाब झाल्यास आणखी एक दोन गोळ्या दे, असें मी तिला सांगितलें. परंतु त्यानंतर त्याला जुलाब झालेच नाहींत व त्याला उतार पडला.

गोळ्या खाऊन जर झाड्याला थांबलें नाहीं तर मात्र तूं डॉक्टरकडे जा. माझ्यावर विसंबून राहूं नको.’

त्यांतल्या दोन गोळ्या त्या मुलाला खावयास दिल्यावर त्याला झोंप लागली व नंतर पुन्हां त्याला जुलाब झाला नाहीं. पहाटें पांच-सहा वाजतां आमचें दुकान उघडल्याबरोबर ती बाई आली व मला म्हणाली, ‘दोन गोळ्या दिल्यावर मुलाला झोंप लागली’ त्यावर मी म्हटलें, तुझा मुलगा बरा झाला आतां काळजी करूं नको; तो उठेल तेव्हां उठूं दे. आठाच्या सुमाराला ती बाई त्या मुलाला घेऊन दुकानावर आली, ज्या अर्थी तो मुलगा चालत दुकानावर आला त्याअर्थी तो बरा झालाच होता. माझ्या लहानपणीं आजी अशीं कोणाकोणाला औषधें देई. त्याच माहितीवरून मी हें औषध दिलें होतें. असे एकाएकीं जुलाब सुरू झाल्यास व त्यांत लघवीला होत असल्यास या औषधाचा चांगलाच उपयोग होतो. लघवीला होत नसल्यास मात्र या औषधाचा उपयोग होत नाहीं. कारण तो कॉलरा असण्याचा संभव असतो.

★

## कॉलऱ्यावरचें औषध

कॉलऱ्यावरहि अशाच तऱ्हेचें एक औषध मला माहीत आहे. पण त्याचा उपयोग मात्र मी करून बघितलेला नाहीं. तें असें :– जुन्यांत जुनी चिंच व थोडे बिब्बे साधारण समभाग घेऊन लोखंडी खलबत्त्यांत अगदीं बारीक कुटावयाचे. त्याच्या रिठ्याच्या बीं एवढ्या गोळ्या करावयाच्या व पाण्याच्या घोटाबरोबर एकेक अशा दोनचार घेतल्या असतां कॉलरा बरा होतो. आजीनें याप्रमाणें माझ्या लहानपणीं चारदोन वेळां औषध दिल्याचें मला स्मरतें, पण मी मात्र याचा अजून प्रयोग करून पाहिलेला नाहीं. कारण पटकीचा रोग म्हणजे जीवन–मरणाचाच खेळ आहे. त्याबाबतींत असें भलतेंच धाडस न करणें बरें. कोणाला आवश्यकता वाटल्यास याचा प्रयोग करून पाहण्यास मात्र हरकत नाहीं. कॉलऱ्यावर हें खात्रीचें औषध आहे.

लहान मुलांना दांत येतेवेळीं जे जुलाब होतात ते वरील खसखशीच्या बोंडानें बरे होतात. परंतु मुलांचे जुलाबांत शेंबडासारखा व आमांशासारखा भाग असल्यास बेलफळाच्या मुरांब्यानें ते जुलाब थांबतात. अशा शेकडों मुलांना मीं हीं दोन औषधें आजपर्यंत दिलीं आहेत. परंतु माझें दुर्दैव असें कीं, माझा पहिला मुलगा प्रभाकर हा गोंवळगांवीं आमांशाच्या आजारानें चारपांच दिवसांत वारला. मुंबईला पत्र लिहून येथून बेलाचा मुरांबा रवानाहि झाला होता. परंतु मुलाचा प्राण गेल्यावर तो माझे हातीं आला.

आम्हीं माधवदास प्रेमजीच्या चाळींत रहात असतांना आमच्या समोरच्याच चौघडेवाल्याच्या चाळींतील एका चौघडेवालीचा दीड दोन वर्षांचा मुलगा आमांशानें आजारी झाला होता. त्याला डॉक्टरांचें औषध चालू होतें, पण मुलाला गुण पडेना

व जुलाब कांहीं केल्या थांबेनांत. डॉक्टरनें व त्या माणसांनीं मुलाची आशा सोडली होती. तिला कोणीतरी शेजाऱ्यानें, 'बेडेकरांकडून औषध आणून बघ' असें सांगितल्या-वरून ती माझ्याकडे आली. मी मुलाला पाहून आलों. पण तो फारच अशक्त झाला होता.

परमेश्वरी कृपा झाली तरच तो वांचण्याचा संभव होता. मी घरीं येऊन खसखशीच्या बोंडाच्या सौभाग्यवतीकडून वाटाण्याएवढ्या गोळ्या बनवून घेतल्या. 'अर्ध्या अर्ध्या तासानें यांतली एक एक गोळी मुलाला दे' असें तिला सांगितलें. दोन गोळ्या पोटांत गेल्यावर त्या मुलाचे जुलाब होण्याचे कमी झाले व त्याला झोंप लागली. दोन तीन तासांनीं तो उठल्यानंतर त्याची आई मला विचारण्यास आली व मुलाला दोन तास झोंप लागली असें म्हणाली. तेव्हां पुन्हां जुलाब झाल्यास आणखी एक दोन गोळ्या दे, असें मी तिला सांगितलें. परंतु त्यानंतर त्याला जुलाब झालेच नाहींत व त्याला उतार पडला.

११ • ल हा न प ण च्या आ ठ व णी

## बोली केली होतीस; मग आलास कां ?

**मला** अगदीं लहानपणापासूनच आजोळीं रहाणें आवडत नसे. कारण आजीचा लळा मला आईपेक्षांहि जास्त होता. प्रत्येक वेळीं आजोळीं जातांना माझ्याजवळ बोली करावी लागे कीं, "मी रडणार नाहीं, नीट राहीन." पण आजोळीं गेल्यावर चार दिवसांतच मी, 'घरीं जातो' म्हणून आईला त्रास देऊं लागे; किंवा मी अजिबात आईबरोबर जातच नसे.

असाच एकदां मी बहीणा व सीताराम लहान असतांना आईबरोबर आजोळीं गेलों, व नेहमींप्रमाणें चार–सहा दिवसांनीं घरीं जाण्यासाठीं हट्ट धरला. तो श्रावण महिना होता व आई पण महिनाभर माहेरीं रहावयाची होती. परंतु आमचे थोरले तात्यामामा असे बोटीनें (पडाव) पावसाळ्यांतच राजापूरला यावयास निघाले. माझा हट्ट पाहून त्यांना आईनें 'याला घरीं पोंचवा' असें सांगितलें.

बोट सुरूं झाल्यावर आमच्या घरापासून दोन मैलांवर पलीकडच्या किनाऱ्यावर 'डोंगर' येथें बोट लागली. नदीला पूर आल्यामुळें जर या तडीला लावण्याचा प्रयत्न झाला असता तर बोट उलट खालीं गेली असती. नेहमीं तीन चार तासांत येणारें राजापूर गांव आलें नाहीं म्हणून सगळे पॅसेंजर उतरून चालत गेले. मामांनीं जातांना मला आमच्या घरासमोर पण नदीपलीकडे रामभाऊ काळे यांच्या घरीं ठेवलें. त्यांनीं मोठ्यानें हांका मारून मी आलों असून नेण्याची व्यवस्था करा असें आमच्या आजीला सांगितलें. खाडीला पूर आलेला असल्यामुळें लगेच कोणी पलीकडे येणें शक्यच नव्हतें. म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं डोंगर येथील तरीवरून आजीनें आमचा घरगडी धकट्ट गुरव याला पाठविलें. तो आलेला दिसतांच मी त्याचेबरोबर निघालों व तेथून डोंगरपर्यंत दोन मैल व तेथून तरीनें पलीकडे गेल्यावर दोन मैल असे चार मैल अंतर पांच वर्षांच्या वयांत चालायला मला कठीण पडूं लागलें. धाकट्ट गुरव अतिशय म्हातारा असल्यामुळें त्यालाहि मला उचलून घेतां येईना. तरीपण कसेंतरी रखडत आम्हीं घरीं येऊन पोंचलों. त्यावेळीं आजी म्हणाली, 'अरे, तुझ्याजवळ पहिल्यांदा बोली करून घेतलेली होती ना, कीं, मी आजोळीं राहीन, हट्ट करणार नाहीं, लवकर परत येणार नाहीं मग आलास कसा ?'

★

## आपला हात उताणा नको, उपडाच असला पाहिजे !

माझ्या वयाच्या सहाव्या सातव्या वर्षीं आमच्या गांवांत दोन लग्नें एकाच दिवशीं होतीं. मी दादांबरोबर गेलों. एका लग्नस्थळीं मला बसवून दुसरीकडे दादा स्वतः गेले. लग्न लागल्यानंतर खेडेगांवांतून सर्व ब्राह्मणमंडळींना मंत्राची दक्षिणा देण्याचा रिवाज असे.

लग्न लागल्यावर यजमान व उपाध्ये मंत्राची दक्षिणा द्यावयास लागले. त्यावेळीं माझी मुंज झालेली नव्हती. इतरांना दक्षिणा देत देत ते माझ्यापर्यंत आले. 'याला एक आणा द्या' असें उपाध्यायांनीं यजमानाला सांगितलें, तेव्हां 'मला दक्षिणा नको' असें मी म्हणतांच उपाध्ये म्हणाले, 'अरे तुला आयते पैसे मिळतात ते घेत कां नाहींस? बाकीच्यांनीं नाहीं का घेतले?' पण त्यावेळीं आजी आम्हाला नेहमीं सांगत असे तें मला आठवलें. 'आपण गृहस्थ असल्यामुळें आपण केव्हांहि दक्षिणा घ्यावयाची नसते. फक्त जेवतांना ठेवलेली पात्री दक्षिणा घ्यावयास हरकत नाहीं. आपण कधींहि हात उताणा करावयाचा नाहीं, आपला हात नेहमीं उपडाच असला पाहिजे !'

याचा अर्थ आपण कोणाकडून दान घ्यावयाचें नसून शक्य असल्यास आपण दान द्यावयाचें. म्हणून मी ती दक्षिणा घेत नव्हतों.

त्यानंतर दादा परत आल्यावर यजमान व उपाध्यायांनीं दादांना सांगितलें कीं, 'अरे तुझा मुलगा दक्षिणा घेत नाहीं' तेव्हां दादांनीं त्या दोघांना सांगितलें कीं, 'अहो तो गृहस्थाचा मुलगा आहे ;तो दक्षिणा कशी बरें घेईल!'

## वडील घराण्याचा अक्षतीचा मान

बनांतील शाळेंत असतांना असाच मला एकदां लग्नाला जाण्याचा योग आला. लग्नाच्या वेळीं वधूवरांना अक्षता लावावयाची असते व ती जोडप्यानें लावावयाचा रिवाज आहे. प्रथम गांवच्या मानकऱ्यांनीं अक्षता लावावयाची असते.

पहिला मान बखले यांचा. पण बखले हजर नव्हते. दुसरे देसाई; त्यांनीं अक्षता लावली. तिसरा मान बेडेकरांचा. आमचेच भाऊबंद पन्नाशीच्या वयाचे गोविंद भाऊ बेडेकर हे त्यावेळीं लग्नाला आलेले होते; त्यांना अक्षता लावण्यास उपाध्यायांनीं बोलाविलें. पण माझ्याकडे बोट करून ते म्हणाले, 'अरे त्या विश्वनाथाच्या मुलाला सांगा, त्याचा मान आहे तो!' कारण ते जरी माझ्यापेक्षां वयानें मोठे होते, तरी मी वडील घराण्यांतील होतो. म्हणून अक्षता लावण्याचा मान माझा होता. त्याप्रमाणें अक्षता लावून तो मी मिळवला.

★

## आमची वारणी गाय

आमच्या आईला माहेराहून वारणी या नांवाची एक गाय आंदण मिळालेली होती. ती बरीच वर्षें आमच्या गोठ्यांत नांदली. आई स्वर्गवासी झाल्यानंतर व आजी घरांत एकटीच असतांना पावसाळ्यांत या एका गाईसाठीं कोणी राखणा मिळत नसे व

लोक आपल्या गुरांच्या कळपांतून तिला नेऊं देत नसत. अशा वेळीं आजी नाईलाजानें तिला एकटीच सोडी व सोडतेवेळीं तिला सांगे, 'कोणाच्या शेता परसवांत जाऊं नको, कुणाची आगळीक करूं नको व माझी हांक एकल्याबरोबर घरीं ये.' असें ज्या दिवशीं आजी सांगे त्या दिवशीं ती हांकेच्या टप्प्यांत व अगदीं नजीक चरत राही व संध्याकाळीं आजीची हांक ऐकली म्हणजे मोठ्यानें हंबरून अगदीं धांवत पळत घरीं येई. मुक्या जनावराचा शहाणपणा किती कौतुकास्पद असतो हें मला माझ्या लहानपणींच पहावयास मिळालें आहे. एखादे दिवशीं जर आजी सांगण्यास विसरली तर मात्र ती एखाद वेळ कोणाच्या शेताबितांत जाई नि आगळीक आणी.

★

## आजीनें सांगितलेली दादांची आठवण

आमच्या दादांची लहानपणींची एक आठवण आजी आम्हाला सांगे. दादा सुमारें चारपांच वर्षांचे असतांना ते बहिणीबरोबर अंगणांत खेळत होते. एका माणसानें दादांना खाऊ देण्याच्या मिषानें आपल्या घरीं नेलें. त्यावेळीं दादांच्या गळ्यांत दोन पुतळ्या व चंद्रकोरीसारखा घागऱ्या लावलेला असा सोन्याचा ताईत होता. तो त्यानें काढून घेतला. त्यावेळीं माजघरांत हातभर रुंद, दोन हात लांब व कंबरभर खोल असा खड्डा खणलेला होता. दादांच्या तोंडावर हात दाबून धरून या चोरीची ओरड होऊं नये म्हणून दादांना खड्डयांत टाकण्यासाठीं तो वांकला. एवढ्यांत दादांनीं जरा धडपड केल्यामुळें त्याचा तोंडावरचा हात सटकतांच दादा मोठ्यानें ओरडले. तोंच घरांतील इतर मंडळी तेथें जमा झाली. व दादांची सुटका झाली. व ते पळतच घरीं आले. सदरहू इसमाचें घर आमच्या घरापासून दहा फुटांवरच होतें. या गोष्टीबद्दल पुढें केव्हांहि बोलणें निघालें तर ती आठवण होऊन दादांना फारच भीति वाटे.

★

## लहानपणींच्या चैनीच्या कल्पना

मी १९१० पर्यंतच गांवीं होतों. मधल्या वेळच्या खाण्यासाठीं म्हणून केव्हांतरी आमच्या घरांत थालीपीठ व फोडणीचे पोहे नरम किंवा सुके असे खाण्यास करीत. त्या काळीं थालीपीठ व फोडणीचे पोहे या वस्तू चैनींत गणल्या जात असत व शेजारीपाजारी म्हणत, 'बघा एडली गरीबी से; पण बघावी तेव्हां थालीपीठांपोहे खाचत.

## दादूभटजींचा व्यापार

आमच्या गांवीं दादूभटजी काळे या नांवाचे आमचे उपाध्ये होते. ते फेरीनें धंदा करीत. त्यांच्या व्यापाराच्या वस्तु म्हणजे खजूर, खोबरें, भुईमुगाच्या शेंगा, ओवा, मोहोरी, मेथी, सुंठ, हळकुंडें अशा दहाबारा वस्तु असत. प्रत्येक वस्तूच्या फडक्यांत पुरचुंड्या बांधून ते त्या एका गोणांत भरीत व गांवांत फेरी करीत विकीत. फेरी करण्यास जातांना ते १०–१२ शेरपर्यंतच ओझें वाहूं शकत. प्रत्येक वस्तूचे पैसे निराळ्या पंचपात्रींत ते ठेवीत. एकदां मी शाळेंतून परत आलों त्यावेळीं नवराबायकोचें कडाक्याचें

भांडण चाललेलें होतें. बराच वेळ भांडण ऐकल्यानंतर त्याचें कारण मला समजलें. दादूभटजी चारीला गेले असतांना त्यांच्या बायकोनें दोन पैशांचा खजूर विकला होता व ते पैसे खजुराच्या पंचपात्रीऐवजीं दुसऱ्याच पंचपात्रींत टाकले होते व याच कारणावरून त्यांचें भांडण चाललें होतें. मी त्यावेळीं शाळेंत जाण्यासाठीं त्यांच्या घरीं राहिलों होतों.

★

## एका दिडकींत मिर्च्या, कोथिंबीर, आलें, लिंबू

मी कोंकणांतून मुंबईत प्रथम आलों तेव्हां रेकल्यांतून घरीं आलों. सदरा, टोपी काढून सहज गॅलरींत आलों. त्यावेळीं मला दहावें वर्ष होतें. तेवढ्यांत शेजारची एक बाई येऊन मला म्हणाली, 'ए पोऱ्या, ही दीडकी घे आणि नाक्यावर जाऊन अर्धीच्या मिर्च्या कोथिंबीर, अर्धीचे लिंबू व अर्धीचें आलें घऊन ये.' मी पहिल्यानेंच मुंबईला आलों असल्यामुळें दिडकी, अर्धी, मिर्च्याकोथिंबीर, आलें, लिंबू व पोऱ्या या तिच्या शब्दांचा मला कांहींच बोध झाला नाहीं. त्यावर ती मला दरडावून म्हणाली, 'ए पोऱ्या, एवढेंसुद्धां तूं काम ऐकत नाहींस?' तेवढ्यांत आई बाहेर आली. तिला त्या बाईनें सांगितलें कीं, 'हा पोऱ्या माझें काम ऐकत नाहीं.' त्यावर आई जरा हंसली व तिला म्हणालीं, 'तो आत्तांच कोंकणांतून आलेला आहे. त्याला अजून इथली कांहीं माहिती नाहीं. तरी दुसऱ्या कोणाला तरी सांगा. त्यावेळीं पैला अर्धी, दोन पयांना दुगाणी, तीन पयांना दिडकी, चार पयांना फद्या व पांच पयांना सव्वा फद्या असें म्हणण्याचा मुंबईला प्रघात होता.

★

## पहिला नंबर; पण जागा तिसरी !

मी मुंबईला प्रभु सेमिनरी शाळेंत देसाई मास्तरांच्या हाताखालीं मराठी चौथींत शिकत असतांना वर्गांतील मुलगे मला 'डें. डें. भटजी' म्हणून चिडवीत. कारण त्यावेळीं माझ्या बोलण्यांतील प्रत्येक शब्दाचा उच्चार त्यावरील अनुस्वारासहित असे. परंतु त्याचा फायदा मला असा मिळे कीं, शुद्धलेखनांत माझी कधींच चूक होत नसे. व देसाईमास्तर मला शुद्धलेखनांत कधींच कमी गुण देत नसत. क्वचित् न तपासतांहि पुरे गुण देऊन टाकीत. आमच्या देसाई मास्तरांचे विद्यार्थी बरेच लाडके होते. ते म्हणजे राजाराम पराडकर व पळसुले. कारण ते पहिलीपासून चौथीपर्यंत त्यांचेच विद्यार्थी होते. दर वर्गाला देसाईमास्तरांना पुढला वर्ग शिकविण्यास दिला जाई. पास झालेलीं मुलें पुन्हां त्यांच्याच हाताखालीं येत व हे दोन्हीं मुलगे पहिल्या व दुसऱ्या नंबरांत असत. मी शाळेंत गेल्यापासून मीहि त्यांच्या लाडकेपणांत भरती झालों होतों. त्याकाळीं तोंडी प्रश्न विचारण्याची पद्धत असे व ते प्रश्न चालू अभ्यासांतील असत. चालू अभ्यास मी कसून करीत असे. उजळणीच्या प्रकारांत तिरक; चौक, पंचक असे माझे घरच्या शिक्षकांजवळ तोंडपाठ झालेले होते. त्यामुळें तोंडी प्रश्नांत माझी चूक सहसा होतच नसे. त्यावेळीं रोजच्या गुणांच्या बेरजेवरून महिनाअखेर नंबर लावण्याची पद्धत असे. पांचव्या महिन्यांतच माझा नंबर पहिला देणें देसाई मास्तरांना भाग पडलें. त्याच्यापूर्वी माझा तिसरा, चौथा नंबर आलाच होता. बेरजेप्रमाणें माझा

पहिला नंबर आल्यामुळें देसाई मास्तरांची खेद व थोडा आनंद अशी द्विधा मनःस्थिति झाली. त्याचें कारण सतत चार वर्षें पहिला दुसरा नंबर न सोडणारे विद्यार्थी खालीं गेले व आपण ज्याला चौथींत कांहीं अभ्यास येत नसतां बसविला व मधल्या वेळांत ज्याचेकडून अभ्यास करून घेतला तो मुलगा पहिला आला! शेवटीं त्या दिवशीं नंबर न लावतां दुसऱ्या दिवशीं आमच्या तिघांच्या मतानें नंबर लावण्याचें ठरून मला पहिला 'अ' व पराडकरला पहिला 'ब' आणि पळसुले याला दुसरा नंबर देऊन मात्र मी बसावें तिसऱ्या नंबराला, असें आम्हां तिघांच्या मतानें ठरलें व त्याप्रमाणें आम्हीं बसूं लागलों.

★

## सर, एक भोपळा नसून एकावर दोन भोपळे आहेत!

इंग्रजी दुसऱ्या यत्तेच्या सहामाही परीक्षेंत गणिताचा पेपर होता. गणित हा विषय माझा हातखंडा असल्यामुळें माझा पेपर बराच लवकर सोडवून झाला. गोरे मास्तरांकडे पेपर देऊन मी जावयास निघतों तोंच मास्तरांनीं मला हांक मारली व म्हणाले, 'कायरे, एवढ्यांत पेपर झाला? भोपळाच दिसतो आहेस!' मी जरा चमकलों, पण इतर विद्यार्थी पेपर लिहीत असल्यामुळें कांहींच न बोलतां घरीं गेलों. योगायोगानें सुटीनंतर शाळा सुरू होण्याच्या वेळीं गोरे मास्तरच पहिल्या दिवशीं वर्गांत आले होते. त्यांनींच सर्वांना गणितांतील गुण सांगतांना माझ्या नांवावर पूर्ण शंभर मार्क असल्याचें सांगितलें. तेव्हां मीं उठून, उभा राहून म्हणालों, "सर, एक भोपळा नसून एकावर दोन भोपळे आहेत!"

माझ्या उत्तरांतली चतुराई पाहून गोरे मास्तर भुंवया उंचावून हंसले.

★

## काका घरचा पुतण्या वाळायचाच!

एकदां मी एका वर्तमानपत्रांत एक चुटका वाचला तो असा:

एका रस्त्यानें काका, पुतण्या बरोबर चालले होते. वाटेंत त्यांना दोन कुत्रीं दिसलीं. त्यांतलें एक अगदीं कृश झालेलें व दुसरें अगदीं तगडें होतें. तें पाहिल्यावर काका पुतण्याला म्हणाला, "हें कुत्रें किती कृश झालेलें आहे." लगेच पुतण्या म्हणाला, "तें आपल्या काकाकडे रहात असावें."

तसा मी आपल्या काकाकडे रहात असतांना मला अनुभव आला होता.

आमच्या काकांना सकाळीं ८ वाजतां जेवून कामावर जावें लागे. संध्याकाळीं ६ वाजतां ते कामावरून परत येत. त्यावेळीं ते भुकेनें अगदीं कावलेले असत. घरांत काकांचें पाऊल पडतांच काकू त्यांना माझी कांहीं तरी तक्रार सांगे व बडबडत बसे. काका कपडे काढून, हातपाय धुवून टॉवेलला हातपाय पुशीत असतांना ताट वाढून तयार असेल तर ते ताबडतोब जेवायला बसत. पण काकू मुद्दाम पान वाढायला केव्हां केव्हां उशीर करी. मग काका त्याचा राग माझ्यावर काढीत व हातांतील टॉवेलनें मला मारीत. असें बहुधा आठवड्यांतून दोनचार वेळां चाले.

असें सुमारें वर्ष सव्वा वर्ष झाल्यावर एकदां काकू आपल्या मावशीकडे गेली. तिला त्या दिवशीं यायला उशीर झाला. काकू जेव्हां आली तेव्हां तिच्या पाठोपाठच काका आले. उशीर झाल्यामुळें काकूंचा स्वयंपाक अजून व्हावयाचाच होता. तिनें माझ्याबद्दल बडबडायला सुरुवात केली. काकांनाहि सपाटून भूक लागलेली होती. व जेवण व्हायला वेळ होता. तेव्हां काकांनीं मला मारण्यास सुरुवात केली. पुष्कळ वेळ मारूनहि जेव्हां त्यांचा हात थांबेना तेव्हां शेवटीं शेजारच्या दोन तीन लोकांनीं मध्यस्थी करून मला ओढून नेलें व जवळच्याच खाणावळींत बसवून एकजण दादांना सांगावयास गेला. त्यानें दादांना सांगितलें कीं, या पोराला जर आत्तां इथेंच ठेवलांत तर एक दिवस हा मारानें मरेल. तेव्हां त्यानंतर मामा रानडे यांच्याकडे माझी रहाण्याची सोय दादांनीं केली. त्यावेळीं मी अकरा वर्षांचा होतों.

★

## जळत्या चितेजवळ काढलेली एक रात्र

मी वयाच्या बाराव्या वर्षी १९१३ च्या मे मध्यें सीतारामला आजोळीं पोंचविण्यासाठीं खाडींतील बोटीनें गेलों होतों. त्या दिवशीं बोट आमच्या बंदरांत अगदीं अस्तमानीं म्हणजे सात–आठचे सुमारास आली. आमच्या मामांना हांक मारून त्यांच्या ताब्यांत आम्हाला देण्याची बोली करून आजीनें आम्हांला बोटींत बसविलें होतें. पण मामाचें बंदर आल्यावर आमच्या समजुतीखातर बोटवाल्यानें मामांना दोनचार हांका मारल्या व आम्हीं खालीं उतरतांच तो निघून गेला. तोंपर्यंत रात्र बरीच झाली होती. आम्हीं खालीं उतरल्यावर मामांना पुष्कळ हांका मारल्या. पण ती वेळ ऐन झोंपेंची असल्यामुळें त्या हांका त्यांना ऐकूं गेल्या नाहींत. मामांचें घर बंदरापासून सुमारें एका फर्लांगावर होतें. पण अंधार असल्यामुळें आम्हाला त्यावेळीं त्याचें घरीं जाणें शक्य नव्हतें. जवळ एक लांकडाचा ढीग जळत होता. त्या उजेडांत खाडीच्या भरतीचें पाणी जेथपर्यंत येतें तेथें पाल्यापाचोळ्याची ओळच्या ओळ उठलेली आम्हाला दिसली. ओळीच्या जरा मागें आमच्याजवळचें अंथरूण घालून पाय खाडीकडे करून देवाचें नांव घेत घेत डोक्यावरून पांघरूण घेऊन आम्हीं झोंपलों. आम्हाला लगेच झोंप लागली.

सकाळीं आमचा एक मामेभाऊ काशीनाथ शौचासाठीं खाडीकिनारीं आला असतांना तेथें आम्हीं झोंपलेले पाहून तो 'भूत, भूत' म्हणून ओरडतच धांवत घरीं पळाला. त्याची बोबडीच वळली होती. जेमतेम मामांना त्याच्या बोलण्यावरून जें कांहीं समजलें त्यावरून दोघे मामा घाईघाईनें बंदरावर आले. व बंदरावर कुणीतरी झोंपलें असावें अशा समजुतीनें आमच्या अंगावरचें पांघरूण हळूंच काढून त्यांनीं आम्हाला उठविलें. कारण आम्ही वाघाकोल्ह्याच्या भीतीनें डोक्यावर पांघरूण घेऊन झोंपलों होतों. त्यांनीं आम्हाला उठवून घरीं नेलें. आमची सर्व हकिकत ऐकून मामांकडील सर्व मंडळींना आमच्या धैर्याबद्दल फारच आश्चर्य वाटलें. कारण तो नुसता लांकडांचा ढीग जळत नव्हता, तर एक प्रेतच जळत होतें. परंतु आम्ही तरी दुसरें काय करणार होतो? मामांच्या घरचा रस्ता काळोखामुळें सांपडण्यासारखा नव्हता व आमच्या हांका

त्यांना ऐकूं गेल्या नाहींत. त्यामुळें आमचा कांहीं उपायच नव्हता. बोटवाला पैसे घेऊन व आम्हाला किनाऱ्यावर उतरून केव्हांच निघून गेला होता. अशा परिस्थितींत परमेश्वरानेंच आमचें पूर्ण संरक्षण केलें होतें.

★

## छबिन्याची सोय; पण राहाण्याची गैरसोय

१९१३ सालीं मे महिन्याच्या २५ तारखेला मी व विष्णु लेले मुंबईला जाण्यासाठीं गोंवळहून निघून २६ तारखेला जैतापूरला आलों; परंतु त्या दिवशीं कुठल्याच कंपनीच्या बोटीनें बंदर केलें नाहीं. आम्ही मुंबईला ज्यांचेकडे राहात होतों ते नाना रानडे हे विष्णु लेले यांचे मामा. म्हणून मीहि त्यांना मामाच म्हणत असे. ते २८ मे रोजीं संध्याकाळचे गाडीनें पुण्याला जाणार होते. म्हणून आम्हाला ता. २८ ला मुंबईला हजर होणें जरूर होतें. ता. २७ ला बोट फक्त टपाल घेऊन गेली त्यामुळें त्या दिवशींहि आम्ही तेथेंच अडकून पडलों. या दोन दिवसांत आमच्याजवळील पैसे खाणावळींतील जेवणांतच संपले. म्हणून बोट कंपनीच्या मास्तरांस भेटून आम्हीं सर्व परिस्थिति त्यांना सांगितली. ती परिस्थिति त्यांच्या नजरेस येतांच व आम्हां दोघां लहान मुलांना पहातांच त्यांनीं 'वाटेल तें झालें तरी तुम्हां दोघां मुलांना तरी आज कस्टमच्या छबिन्यांतून नेऊन बोटीनें पाठविण्याची व्यवस्था करतों,' असें सांगून व आम्हांला कस्टमच्या छबिन्यांत बसवून बोट फक्त पैसे नेण्यासाठीं बंदरांत आली असतांना कस्टमच्या मास्तराकरवीं आम्हां दोघांनाच बोटीवर चढवून दिलें. दुसऱ्या दिवशीं २९ तारखेस दुपारीं दोन वाजतां आम्हीं मुंबईच्या धक्क्यावर उतरलों व जवळ पैसे नसल्यामुळें शेवटीं गोरेगांवकर बिल्डिंगमध्यें चालत गेलों. आम्ही बिऱ्हाडीं येतों तों घराला कुलुप. कारण मामा व मामी आदल्या दिवशींच आमची वाट पाहून पुण्याला निघून गेलीं होतीं.

मे महिना असल्यामुळें त्या मजल्यावरचे सर्वच लोक बाहेरगांवीं गेलेले होते. व आश्चर्य म्हणजे एकहि खोली उघडी नव्हती. त्यामुळें आम्हांला नुसतें हाततोंड धुण्यासहि पाणी मिळू शकलें नाहीं व आम्हीं नुसतेंच ताटकळत गॅलेरींत बसून राहिलों. मामांनीं पुण्याला जातेवेळीं आपल्या खोलीची किल्ली शेजारचे देवमास्तर नुकतेंच गांवाहून आले होते त्यांच्याकडे दिलेली होती. परंतु ते बाहेर गेले होते. आम्ही आदल्या दिवशीं दुपारीं थोडी भाकरी खाल्लेली होती. त्यानंतर नुसतें पाणीहि मिळालें नव्हतें. त्यामुळें आम्हीं भुकेनें अगदींच थकून गेलों होतों. संध्याकाळीं नळ आल्यावर आम्हीं आंघोळी केल्या व कपडे धुवून गॅलरींत वळकट्या उघडून पडून राहिलों. रात्रीं देवमास्तर आले. त्यांनीं आम्हांला उठवून किल्ली दिली. त्यानंतर दार उघडून आम्हीं घरांत गेलों व दिवे लावून कांहीं खाण्यास मिळतें का तें पाहिलें. मामीनें पुण्याला जातेवेळीं ओट्यावर तांदूळ, चण्याचें पीठ, डाळ वगैरे स्वयंपाकाचें साहित्य काढून ठेवलेलें होतें. पाणीहि भरून ठेवलें होतें. त्यांतील चहा साखर पाहून आम्ही शेगडी पेटविली व चहा केला. पण त्यांत घालण्यास दूध नव्हतें. कोराच चहा आम्हीं दोघे कपकप प्यालों व भात-पिठलें करून आम्ही जेवलों. मामामामी परत आल्यावर त्यांना सर्व हकिगत ऐकून फारच वाईट वाटलें.

★

## ति. दादांचा द्वितीय संबंध

आमच्या आईला फाल्गुन वद्य १४ शके १८३८ रोजीं ताप आला व चैत्र शु. २ शके १८३९ रोजीं तिच्या अंगावर देवी दिसूं लागल्या. परंतु देवी बाहेर न येतां त्या आंत ओढल्या गेल्यामुळें चैत्र शु. ४ रोजीं ती आम्हांला सोडून गेली. त्यानंतर शके १८३९ च्या कार्तिकांत नोव्हेंबर १९१७ मध्यें मामांचें पत्र आलें. त्यांत दादांना पुन्हां लग्न करण्याविषयीं त्यांनीं आग्रहानें लिहिलें होतें. मलाहि तें पत्र वाचावयास मिळालें होतें. दादांचा लग्न करण्याकडे कल नव्हता. त्यावेळीं मी फक्त सोळा वर्षांचाच होतों. दादांचें वय अवघें ३४–३५ वर्षांचें होतें. याचा विचार करून एकदां सहज विषय निघाला असतां मी दादांना लग्न करण्यास अनुकूल मत दिलें. सावत्र आईचें व आमचें न पटल्यास आम्हां भावंडांची जबाबदारी मी घेईन असें आश्वासन दिल्यावर दादांचें मत थोडें थोडें अनुकूल होऊं लागलें. व १९१७ च्या मार्गशीर्षांत त्यांचें दुसरें लग्न मामांचे घरीं झालें. पुढें शेवटपर्यंत आई व आमच्यामध्यें कधीं मतभेद झाले नाहींत. उभयपक्षीं मिळतें घेण्याची वृत्ति होती. थोडक्यांत म्हणजे आम्हीं आपापसांत मतभेद कधीं उत्पन्नच होऊं दिलेले नाहींत.

दिवाळीनंतर मी घरीं गेलों होतों. त्यावेळीं आमचे एक मामा दादांसाठीं एका मुलीची माहिती देण्यास आमच्या घरीं आले. ती मुलगी पहाण्याकरितां मी व मामा मुलीकडे गेलों. मुलीला आईवडील नव्हते. तिच्याहून एक मोठा भाऊ होता. ती राजापूरला एका नातेवाईकाकडे रहात असे. मुलगी अगदींच किरकोळ दिसली. लग्नाकरितां कांहीं खर्च करण्याचीहि त्यांना शक्यता नव्हती. तशांत आमची परिस्थितीहि सामान्यच, वडलांचेंहि वय ३४–३५. अशा परीस्थितींत मुलगी तरी कोण देणार? या सर्व गोष्टींचा विचार करून ती मुलगी करून घ्यावी असें मामा, आजी व मी मिळून ठरविलें. मुलीकडे साधारणपणें लग्नाचा दिवसहि ठरवून त्याप्रमाणें कळविण्याचें काम मामांनीं घेतलें. मी दादांना मुलगी पाहून आल्याचें व ती आम्हां तिघांना पसंत असल्याचें, तसेंच लग्नाचा दिवसहि कळवून 'तुम्ही त्यापूर्वी मामांकडेच निघून या' असें पत्र पाठविलें. त्याप्रमाणें दादा एकटेच मुंबईहून परभारे मामांकडे आले. दादा आल्याचें कळल्यावर मी मुंबईला आलों. या अवधींत तीन दिवस धाकटा भाऊ सीताराम यानें एकट्यानें ११ वर्षांचे वयांतहि दुकान सांभाळलें. लग्न करून दादा घरीं आले. कांहीं दिवसांनीं दादा एकटेच परत मुंबईला आले. त्या लग्नांत फक्त मामांकडील मंडळीच होती.

★

## आजारीपणांतच कोंकणचा प्रवास

१९१९ च्या पावसाळ्यांत भाद्रपद शु. १२ ला मी संध्याकाळीं ५ वाजतांचें बोटीनें घरीं येण्यास निघालों. बोट हानेरी हुनेरीचे किल्ल्याजवळ येतांच एक लाट बोटीवरून गेली. मी झोंपलेला होतों व अंगांत तापहि भरलेला होता. पण प्रभुकृपेनें मी त्या लाटेनें भिजलों नाहीं. अंगाखालची घोंगडी चालणाऱ्यांसाठीं रस्ता व्हावा म्हणून ती थोडी दुमडली होती. ती त्या लाटेबरोबर माझ्या अंगावर परतली व पाणी तीवरून गेलें. त्यामुळें मी न भिजतां सुका राहिलों. खलाशांनीं वरच्या सर्व उतारूंना खालचे

मजल्यावर जाण्यास सांगितलें. पण माझ्या अंगांत ताप असल्यामुळें मला खालीं जातां आलें नाहीं. खलाशी मला दम देत; पण त्यांनीं कोणी मला जबरीनें उचलून नेलें नाहीं. बोट तर भयंकर हालत होती. रात्रीं दोन अडीचच्या सुमारास बोट जयगड बंदरांत आली व हालायची बंद झाली. त्यानंतर मला झोंप लागली. त्यानंतर रत्नागिरी बंदर करून संध्याकाळीं ५ च्या सुमारास बोट विजयदुर्ग बंदरांत शिरली. मी मुंबईला बोटींत बसतेवेळींच विजयदुर्ग बंदर आल्याबरोबर माझी ट्रंक खपाट्यांत नेऊन ठेवण्यासाठीं एका खलाशाला चार आणे देऊन ठेवलेले होते. त्याप्रमाणें त्यानें माझी ट्रंक खपाट्यांत नेऊन ठेवली व तो मला उठविण्यास आला. मी खपाट्यांत बसलों व किनाऱ्यावर उतरलों तेव्हां धक्क्यावर तेथील खानावळवाले श्री. गोडबोले आले होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या खानावळींत गेलों. सूर्यास्तानंतर प्रवाशांना उतरविण्याचा नियम नसल्यामुळें बाकीच्या माझ्या ओळखीच्या प्रवाशांना सकाळीं उतरावें लागलें. गोडबोल्यांच्या खानावळींत गेल्यानंतर माझी अशक्त परिस्थिति पाहून त्यांना फारच वाईट वाटलें. व ते म्हणाले, 'तुला एकविसणी पाणी करून देतों त्यानें तूं आंघोळ कर.' त्याप्रमाणें मी आंघोळ केली व चहा प्यालों. नंतर जेऊन झोंपलों. अंगांत ताप भरलेला होताच. सकाळीं उठल्यानंतर चहा पिऊन घरीं येण्याकरितां निघालों. माझी ट्रंक नेण्यासाठीं एक हेलकरीण ठरविली होती. तिनें रुमीपीरापर्यंत माझी ट्रंक नेऊन द्यावयाची; परतु रुमीपिरापर्यंतचें मकाण मला न झेपल्यानें मी तिवरांबी येथें मामांच्या दुकानांत राहिलों. ट्रंक रुमीपिऱ्याला ठेवून बाई परत आली. दुसऱ्या दिवशीं मी रुमीपिरावरून पलीकडे मामांच्या घरीं गेलों. व मुम्बईहून निघाल्यापासून चौथ्या दिवशीं भाद्रपद पौर्णिमेला संध्याकाळीं घरीं पोंचलों. मामांकडून ज्या बोटीनें निघालों त्या बोटींत आमच्या प्रांतांतील एक नामांकित वैद्य आणसूरचे श्री. विठ्ठलपंत देसाई मला भेटले. माझी प्रकृति पाहून त्यांनीं माझी चौकशी केली व त्यांनींहि फार काळजी व्यक्त केली. मी गोंवळला घरीं उतरलों व ते राजापूरला गेले. आमची आई राजापूरला तिच्या नातेवाईकांकडे गेलेली होती. तिला त्यांनीं ही हकिकत सांगतांच दुसऱ्या दिवशीं ती ताबडतोब घरीं आली. मी घरीं गेल्यावर अंगांत ताप असल्यामुळें स्नान न करतां थोडेसें जेवून झोंपलों. व सकाळीं उठल्यावर प्रातर्विधि करून स्नान केलें. नंतर थोडासा मऊ भात जेऊन झोंपलों. दोन वाजेपर्यंत मला झोंप लागली व अंगांतून खूप घाम जाऊन ताप निघाला तो पुन्हां आला नाहीं. आजी माझ्या उशाजवळ चिंताक्रांत होऊन मी केव्हां उठतो याची वाट पहात न जेवतां बसली होती. मला जाग आलेली पाहतांच तिनें मला जेवणासाठीं उठविलें. मला वाढून नंतर ती जेवली. आमचीं जेवणें होतात तोंच आई नातेवाईकांकडून घरीं आली. मला आलेला ताप व खोकला हा फार जागरणामुळें व इतर त्रासामुळें भागवट्याचा होता. कोंवळया कोंवळया काकड्या व दहींभात यांनीं तो समूळ नष्ट होऊन मी आठ दिवसांत खडखडीत बरा झालों व मुम्बईस निघून आलों. तोंपर्यंत बोटी सुरू झाल्या होत्या.

१२ : मोठेपणच्या आठवणी

**माझ्या लग्नाची आठवण !**

**आम्ही** मुंबईत योजलेला माझ्या लग्नाचा मुहूर्त नक्की करण्यासाठीं दादा गांवीं गेले होते. शनिवारीं १७ तारखेला पोंचेल अशा बेतानें मुहूर्त निश्चित झाल्याचें पत्र तुला पाठवीन, असें ते म्हणाले होते. त्याप्रमाणें रविवारीं सर्व व्यवस्था करून सोमवारीं मी निघावयाचा होतों पण १७ तारखेला ठरल्याप्रमाणें दादांचें पत्र आलें नाहीं. म्हणून मला असें वाटलें कीं, हें लग्न मोडलें असावें. म्हणून मी रविवारीं जेवून नेहमींप्रमाणें अकरा वाजतां बाजारांत गेलों व जमलेल्या रुपयांची मालखरेदी केली. सर्व पैसे संपवून दुकानांत परत येतों तों ठरल्याप्रमाणें दादांचें पत्र दुपारीं बाराच्या डाकेनें आलेलें होतें. तें वाचतांच माझ्या मनाला एकदम हादराच बसला. सर्व पैसे खरेदींत संपविले आणि आतां मी उद्यां निघणार कसा, अशा सचिंत मनानें मी दुकानांत बसलों असतांना आमचे एक स्नेही भास्करराव गोठिवरेकर हे दुकानांत आले व त्यांनीं दोनशें रुपये माझ्याजवळ ठेवण्यास दिले. ते नेहमीं आमच्या जवळ शंभर-दोनशें रुपये आणून ठेवीत. परंतु ते केव्हां परत मागतील याचा नेम नसे, त्यामुळें आम्हाला त्याचा उपयोग करतां येत नसे. म्हणून मी त्यांना वस्तुस्थिति सांगितली. व तुम्हाला मधेंच पैसे लागलें तर मिळणार नाहींत कारण मी उद्यां लग्नाकरितां घरीं जाणार आहे, असेंहि सांगितलें. त्यांचा कानटोप्यांचा धंदा होता व त्या टोप्यांचा हवाला देण्यासाठींच त्यांना त्या पैशाची जरूर लागत असे. मी घरीं जाणार आहे असें सांगतांच ते म्हणाले कीं, ज्येष्ठापर्यंत मला पैसे लागणार नाहींत. सध्यां उन्हाळा असल्यामुळें कोणा दुकानदाराची ऑर्डर नाहीं. मला जेव्हां हे पैसे लागतील तेव्हां आठ दिवस आधीं मी तुला सांगेन. म्हणून ते दोनशें रुपये मी ठेवून घेतले. त्यानंतर परांजपे या नांवाचे एक खाणावळवाले आमचे गिऱ्हाईक होते; ते बाजारांतून परत येऊन आमच्या दुकानावरून आपल्या घरीं चालले होते. त्याना हांक मारून मी उद्यां लग्नाकरितां घरीं जाणार असल्याचें सांगितलें. त्यांनीं सहज खिशांत हात घालून पाहिलें तों पैसे शिल्लक होते. वास्तविक एक तारखेनंतर त्यांचें बिल यावयाचें असे. त्यांचा महिन्याचा सर्व माल आमच्याकडून गेलेला होता. त्यांच्या खिशांत दीडशें रुपये होते. ते त्यांनीं जमा करण्यास दिले. व संध्याकाळपर्यंत अशीच अनपेक्षित वसुली होऊन पुन्हां सहाशें रुपये तयार झाले.

★

## शंभर वर्षांनंतर आलेला महालक्ष्मी पूजनाचा योग

सुमारें शंभर वर्षांपूर्वी आमच्या घराण्यांत एकदां महालक्ष्मीची पूजा झाली असतां त्या रात्रीं दरोडा पडून तीनहि घरें लुटलीं गेलीं होतीं. म्हणून तेव्हांपासून आमच्याकडे महालक्ष्मीची पूजा करण्याची चाल नव्हती. त्यानंतर माझें लग्न झालें त्याचवर्षी सौभाग्यवतीची पहिलीच महालक्ष्मीची पूजा व्हावयाची होती. परंतु आमच्या अगर आजूबाजूच्या गांवांत कोणाकडेहि महालक्ष्मीची पूजा असल्याचें ऐकण्यांत आलें नाहीं. सुदैवानें त्यावेळीं मी घरीं होतों. आजी म्हणाली कीं, यंदा आपण महालक्ष्मीची प्रार्थना करून तिचें पूजन घरांत करूं या का ? कारण जवळ जवळ शंभर वर्षांत आपल्या घरांत महालक्ष्मीची पूजा झालेली नाहीं. आजीनें ही सूचना केली असल्यामुळें व तिच्यावरील माझ्या पूज्यभावनेमुळें मी पूजा करण्यास संमती दिली. त्या दिवशीं मनांत मात्र एकप्रकारची धास्तीच वाटत होती. परंतु ती महालक्ष्मीची पूजा सुरळीत, निर्विघ्नपणें व मोठ्या थाटामाटांत पार पडली. आई मात्र त्यावेळीं मुंबईला असल्यामुळें व आमचा बेत आयत्या वेळीं ठरल्यामुळें तिला हजर राहतां आलें नाहीं.

★

## दादा गांवीं रहाण्याचें 'महत्त्वाचें कारण'

मी मसाले कुटून विकूं लागलों तें दादांना तितकेंसें पसंत नव्हतें. त्या काळांत वस्तू तयार करून विकणें, हें एक प्रकारचें कमीपणाचें समजलें जाई. हॉटेलें, खानावळी हे जसें वस्तू तयार करून विकतात तसेंच हें दादांना वाटे. म्हणून सुरुवाती सुरुवातीला दादा बाहेर गेले असतील अशावेळींच मी गोडा मसाला शेर दीड शेर कुटून ठेवीत असे. दादा दुकानांत हजर असतांना कुटलेल्या मसाल्याला गिऱ्हाईक आल्यास मला सरळ नाहीं म्हणून सांगावें लागे. पण कांहीं गिऱ्हाईकें म्हणत, 'नाहीं कसा, मी परवां तर नेला होता !' तेव्हां 'पूर्वी करीत होतों आतां आम्ही मसाला करीत नाहीं' असें सांगून वेळ मारून न्यावी लागे. पण पुढें खपाचें प्रमाण वाढूं लागल्यावर तसें म्हणणेंहि जमेना. अशा स्थितींत आमच थोडेथोडे मतभेद होऊं लागले. म्हणून दादा जे १९२१ सालीं गांवीं गेले तेव्हांपासून त्यांनीं गांवीं कायम रहाण्याचें ठरविलें. तो त्यांचा निर्णय धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें अत्यंत योग्य ठरला. व माझ्या कर्तबगारीला वाव मिळाला. कारण असा निर्णय ते न घेते तर मला मसाले करतां आले नसते व धंद्यालाहि आजचें स्वरूप आलें नसतें.

★

## मसाल्याच्या जाहिरातीस प्रारंभ

लोकमान्य टिळक स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ 'श्रीलोकमान्य' या नांवाचें दैनिक मुंबईला सुरूं झालें होतें. दादा घरीं राहिल्यानंतर आपल्या मसाल्याला प्रसिद्धि मिळावी म्हणून मी त्या दैनिकांत रोजीं एक इंच या प्रमाणें प्रथमच जाहिरात द्यावयास सुरुवात केली. परंतु ती जाहिरात दादांच्या वाचनांत आल्यानंतर हा निष्कारण

खर्च आहे असें समजून त्यांनीं माझी सणसणीत खरडपट्टी काढली होती, परंतु मी एक वर्षाचा जाहिरातीचा करार केला असल्यामुळें तोंपर्यंत जाहिरात ठेवणें मला भागच होतें. तसा करार जर मी केलेला नसता तर मी जाहिरात बंदहि केली असती. परंतु त्या जाहिरातीमुळेंच धंद्याची वाढ होऊं शकली. हिंदुस्थानांत व परदेशांतहि जो हा आमच्या मालाचा खप वाढला आहे तो जाहिरातीमुळेंच वाढूं शकला. माल जरी कितीहि चांगला असला तरी तो लोकांना कळणार कसा ? नि लोक तरी विकत घेणार कसा ? धंद्याची वाढ व्हावयास हवी असेल तर मालाच्या उत्तमपणाबरोबरच जाहिरात हेंहि प्रमुख अंग आहे. श्रीलोकमान्य दैनिकाच्या पाठोपाठ श्री. काकासाहेब खाडिलकरांनीं 'नवाकाळ' या नांवाचें स्वतःच्या मालकीचें दैनिक सुरू केलें. त्या दैनिकांत अगदीं सुरुवातीपासूनच आम्हीं जाहिरात देण्यास सुरुवात केली. ती मधून मधून कां होईना, पण अद्याप चालू आहे. तशा इतत्रहि आहेतच.

★

## गोविंदाचा शाळेला रामराम !

गोविंदाला अभ्यासापेक्षां धंद्याचीच आवड जास्त. चिकित्सक हायस्कूलमध्यें गेल्यावर वर्गांतील मुलें शुक्रवारीं चणे आणीत. नारळाची वाटी व मिर्च्या–कोथिंबीर आमच्या दुकानांतून नेत. त्यांच्याबरोबर गोविंदाहि येत असे. परंतु एका शुक्रवारीं गोविंदा मुलांबरोबर नव्हता. त्यांतल्या एका मुलानें मला विचारलें कीं, 'आज बेडेकर कां नाहीं आला ?' तो घरून वेळेवर शाळेंत तर गेला होता, तसें मी त्यांना सांगतांच तीं मुलें म्हणालीं कीं, 'आज बेडेकर शाळेंत आलेला नाहीं.' नंतर शाळा सुटण्याचे वेळेवर गोविंदा घरीं आला. तेव्हां मी त्याला विचारलें कीं, 'तुझ्या वर्गांतील मुलगा आज तूं शाळेंत आला नाहींस असें सांगत होता. तूं शाळेंत गेला नव्हतास का ? गोविंदानें सांगितलें कीं, 'मी गेलों होतो.' पण त्यावरून मी काय समजायचें तें समजलों.

★

## भुताटक्या बापट

पूर्वीं आमचीं दुकानें फक्त अमावास्येला बंद असत. परंतु दुकानांत आम्हीं तसबिरीपुढें निरांजन व उदबत्ती लावण्यासाठीं संध्याकाळीं जात असूं. असेंच एका अमावास्येला आम्हीं बाहेरून फिरून दुकान उघडावयास आलों तेव्हां एक मुलगा बांकड्यावर बसलेला आम्हांला दिसला. तो मुलगा आमचा एक नोकर हरीभाऊ काळे यांच्या ओळखीचा असून त्याचें नांव रामकृष्ण बापट होतें. काम आटपून मी घरीं निघालों असतां पाठोपाठ बापटला घेऊन हरीहि बिन्हाडीं आला. आम्हीं हातींच जेवण करीत असल्यामुळें तो बापटहि आमचे बरोबरच जेवला, व झोपला. रात्रीं झोंपेंत मी कुशीवर वळूं लागलों तों वळतां येईना. म्हणून मी सरकत सरकत बाजूला होऊन उठलों व दिवा लावून पहातों तों आमच्या खोलींतलें बांक बापटासह सर्वांच्या अंगावर आडवें ठेवलेलें होतें. तें बाजूला करून आम्ही पुन्हां झोंपलों. सकाळीं नेहमींप्रमाणें

दुकानांत गेलों. कांहीं वेळानें दुकानांतला एक गडी धोंडू हा चंची उघडून पानसुपारी खात असतां त्याच्याजवळ हरीभाऊ काळेहि पानसुपारी खावयास गेला. कात न मिळाल्यामुळें "कात नाहीं का रे" असें त्यानें म्हणतांच त्याच्या पुढ्यांत एक काताचा खडा येऊन पडला.

त्यानंतर नेहमींप्रमाणें मी जेवण बनविण्यासाठीं घरीं गेलों. कुलुप काढून दार उघडलें, तों एक चांगलें रसरशीत पिवळें जर्द संत्रें पडलेलें आढळलें. आम्हीं संत्रें आणलेलें नसल्यामुळें चाळींतल्या कोणाचें तें आहे का म्हणून चौकशी केली. पण दोनचार दिवसांत कोणाकडेच संत्रीं आणलीं नसल्याचें समजलें.

दुसऱ्या दिवशीं आमच्या बिऱ्हाडांत एका कपाटाची दुरुस्ती एक सुतार करीत होता. साडेनऊच्या सुमारास मी घरीं गेलों. सहज वाजले किती हें पहाण्याकरितां म्हणून घड्याळाकडे पाहिलें तों घड्याळ जाग्यावर नव्हतें, म्हणून सुतारास विचारलें; पण त्यालाहि माहीत नव्हतें. तो सुतार विश्वासू असल्यामुळें मला त्याचा मुळींच संशय आला नाहीं. नंतर मी स्वयंपाक केला व चार ताटें व पाट मांडले व हातांत मिठाचा पेला घेऊन पहिल्याच ताटांत मीठ वाढावयास वांकलों, तोंच भिंतीला टेकून उभी केलेली सहाण जागेवरून निघून वाटोळी फिरत चालत जातांना मला दिसली. इतकेंच नव्हे, तर ती उंबरठ्यावरूनहि जाऊन सुताराच्या पुढ्यांत पडली. सुतारानें चमकून उडीच मारली. मीहि हा चमत्कार पाहून चमकलों. तेवढ्यांत जेवणारे तिघे वर आले. त्यांनाहि घड्याळाची व सहाणेची हकिकत सांगितली व आम्हीं त्या बांकावर बसलों. दोन तीन दिवसांच्या सहवासांत हा बापट भुताटकीवाला आहे असें मला समजलें होतें. त्या बापटाला मी घड्याळ तुझ्याजवळ आहे का असें विचारलें. घड्याळ लहान व खिशांतलेंच होतें. त्यावेळीं आमच्याकडे मोठें घड्याळ नव्हतें. त्यावर बापट म्हणाला, मी तुमच्याबरोबर दुकानांत गेलों; मी केव्हां घड्याळ घेणार ?'

तेव्हां हा भुताटकीचा चमत्कार असावा असें समजून त्या भुताला उद्देशून मी म्हणालों कीं, 'जर तूं खरें भूत असशील तर इथें घड्याळ आणून ठेव.' व खोलीच्या मधोमध जमिनीवर बोट टेकलें. आश्चर्य हें कीं, मी हात उचलतांच तिथें घड्याळ दिसलें. त्यानंतर आम्हीं जेवलों. 'हे परवांपासून चार चमत्कार तूं आल्यापासून झाले, तेव्हां तुला आमच्याकडे नोकरीला ठेवणार नाहीं, तूं जा.' असें मी बापटाला सांगितलें, तेव्हां तो लगेच कोट घालून निघून गेला.

★

### आश्चर्यकारक अपघात

एकदां मी कोंकणांत जाण्यासाठीं व्हिक्टोरियांतून निघालों होतों. आमच्या व्हिक्टोरियांत त्यावेळीं मी व सौभाग्यवती पाठच्या बाजूस बसलों होतों. गोविंदा व मुलगा प्रभाकर असे पुढच्या बाजूस बसले होते. गोविंदा आम्हाला धक्क्यावर पोंचवायला आला होता. आमची गाडी यलोगेटच्या पुढील वळणावर गेली. तोंच व्हिक्टोरिया डॉककडून

एक चिक्कार माल भरलेली लॉरी आली व बघतां बघतां आमच्या गाडीवर जोरानें आदळली. त्या धक्क्याबरोबर गोविंदा बाहेर फेंकला गेला. व आम्हीं तिघे आंतच राहिलों. गाडी सुमारें वीसपंचवीस फूट लांब उडाली. चारहि चाकांचा चुराडा झाला. व घोड्याच्या पाठीवरची दांडकी पण मोडून गेलीं होतीं. घोडा फेंकला गेला, व गाडीवालाहि दूर फेंकला गेला. आमची गाडी कोलांट्या उड्या घेत घेत पंचवीस फुटांवर थांबली त्यावेळीं ती उलटी होती. गाडीबरोबर आमच्याहि आंत गोलांट्या झाल्या होत्या. गोविंदा घोड्याच्या पायांखालीं उडवला गेला होता; परंतु घोड्याचा एक पाय डाव्या बाजूच्या कांखेजवळ व दुसरा पाय उजव्या बाजूच्या कमरेजवळ अशा स्थितींत गोविंदा पडला. इतक्यांत आजुबाजूला माणसें जमलीं व त्यांनीं गोविंदाला घोड्याचे पायांखालून ओढून काढलें व कांहीं माणसांनीं गाडी सुलटी करून आम्हाला बाहेर ओढून काढलें. गाडी कोलांट्या घेत असतांना चामड्याचें वरचें छत गाडीवाल्याच्या बैठकीवर अडकलें होतें. सांगण्यासारखें आश्चर्य म्हणजे इतका मोठा अपघात होऊनहि घोड्यासह इतर कोणालाहि यत्किंचितसुद्धां खरचटलें नाहीं. सौभाग्यवती त्यावेळीं सात महिन्यांची गरोदर, होती. आमचा मुलगा मात्र जरा घाबरला होता. त्यानंतर पोलीस आले व गाडीवाला लॉरीवाला व मी अशा तिघांना यलोगेट पोलीसचौकीवर घेऊन गेले. गोविंदा दुसरी गाडी करून सौभाग्यवती व मुलांसह आगबोटीवर गेला बोट दहा वाजतां सुटावयाची असल्यामुळें पोलिसांना ' माझी कांहीं तक्रार नाहीं ' असें सांगत असतांहि ते मला लवकर सोडीनात. पण बोट सुटावयास झाली, माणसें सगळीं बोटीवर गेलीं आहेत, तिकिटें माझेजवळ आहेत व माणसांजवळ सोबत कुणी नाहीं, असें सांगतांच त्यांनीं मला सोडलें व मी चपळाईनें आगबोटीवर गेलों. व बोटींत चढलों. त्याचवेळीं गोविंदा बाहेर आला. व मी आंत बसलों आणि' बोट सुटली. बोट सुटल्यानंतर बरोबरच्या कांहीं उतारूंनीं मला विचारलें, ' मी जाणार नाहीं असें तुम्ही म्हणत होतां ना ? मग आतां बोट सुटली !' पण ते असें कां म्हणतात ते माझ्या लक्षांत येईना. पण तेवढ्यांत लक्षांत आलें कीं, गोविंदा त्यांना असें म्हणाला असेल व आम्ही दोघे भाऊच असल्यामुळें व चेहऱ्यांतील बऱ्याचशा साम्यामुळें त्यांना तसें वाटलें असावें.

★

## भुताटकीचा समजूतदारपणा

जयराम कानजीचे चाळींत श्री. देवमास्तर यांची जागा आम्ही घेतल्याचें कळल्यावर त्या चाळींतील आमचे शेजारी आमच्याकडे जरा साशंकतेनें पाहूं लागले. लोक असे साशंक कां याचें आकलन मला तेव्हां झालें नाहीं. नंतर घेतलेल्या त्या खोल्या स्वच्छ साफसुफ धुवून पुसून, ऑईलपेंट लावून व त्या जागेंत उदकशांति करून मगच आम्हीं तेथें रहाण्यास गेलों. त्यावेळीं चि. बंडू ( वय ६ महिने ) व चि. ताई ( वय तीन वर्षें ) व चि. गंगू ( वय सातआठ वर्षें ) सौभाग्यवती, मी, बाळू व गोविंदा अशी मंडळी

रहावयास आलों. कांहीं दिवसांनीं आमची बहीण गंगू ही एका रात्रीं झोपेंतून ओरडत उठली नि जरा सावध होऊन झोंपलीं; पण पुन्हां अशीच भिऊन उठली. परंतु तिला कां भीति वाटली तें सांगतां आलें नाहीं. असें दोनचारदां निरनिराळ्या दिवशीं झालें. त्यामुळें ही जागा आम्हांला पाळणार कीं नाहीं अशी भीति मला वाटूं लागली. कारण नाहींतर पुन्हां दुसरी जागा पहायला लागणार होती. अशा विवंचनेंत कांहीं दिवस गेल्यावर एक दिवस सौभाग्यवतीहि स्वप्नांत भ्यायली व ओरडली. असें दोनतीन वेळां झाल्यावर तिला कसली भीति वाटतें तें तिनें सांगितलें, तें असें : पाठीमागच्या मोरीजवळच्या खिडकींतून कोणी एक बाई येते. तिच्या हातांत एक धुण्याची काठी असते. ती असें म्हणते कीं, 'तुम्हीं येथून जा. हें माझें घर आहे.' असा प्रकार दोनतीन वेळां झाल्यावर मी सौभाग्यवतीला म्हणालों कीं, पुन्हां जर तुला ती बाई दिसली तर तिला तूं असें सांग कीं, 'तुझें जें काय म्हणणें असेल तें तूं पुरुषांना सांग. मला सांगून काय उपयोग?' त्याप्रमाणें ती पुन्हां सौभाग्यवतीचे स्वप्नांत आली असतां तिनें तिला तसें सांगितलें. लगेच ती बाई माझ्या स्वप्नांत आली. मी तिला तावडतोब ओळखली. ती देवमास्तरांची पहिली बायको होती. ते आमचे गिन्हाईकच असल्यामुळें जिन्नस देण्याचे निमित्तानें माझें त्यांच्याकडे बरेंच जाणेंयेणें असे. ती वारल्यानंतर देवमास्तरांनीं दुसरें लग्न केलें होतें. त्यांच्या दुसऱ्या बायकोला ती नेहमीं स्वप्नांत येऊन भिववीत असे, त्याचप्रमाणें चाळींतल्या शेजारी बिऱ्हाडकरूंना सुद्धां अशीच स्वप्नांत येऊन भिववीत असे, व त्याचमुळें आमचेकडे ते साशंकतेनें पहात असावेत. स्वप्नांत तिची माझी भेट झाल्यानंतर व ओळख पटल्यानंतर मी तिला सांगितलें कीं, तुझे यजमान व इतर सर्व मंडळी पार्ल्यास रहावयास गेली असून त्यांनीं ही जागा सुखासमाधानानें आम्हांस रहावयास दिली आहे. हें ऐकल्यावर तीं 'बरें' असें म्हणाली व निघून गेली. त्या दिवसापासून आम्हाला तिचा पुन्हां त्रास झाला नाहीं. सकाळीं उठल्यानंतर मी शेजाऱ्यांना सांगितलें कीं, 'तुम्ही माझ्याकडे साशंकतेनें कां पहात होतेत' याचें कारण आज समजलें. पण आतां यापुढें तुम्हाला व आम्हालाहि त्या प्रकाराचा त्रास होणार नाहीं.

★

## सत्तेचें घर असावें असें कां वाटलें ?

१९२८ ते १९३३ च्या नोटिसी प्रकरणाचे वेळीं क्वचित् कायद्याच्या सल्ल्यासाठीं वकिलाकडे जावें लागे. अशा वेळीं एका सॉलिसिटरकडे जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळीं तिथें गिरगांव बॅकरोडवरील एका इमारतीचा सौदा चालू होता. विकणारा मराठी व घेणारा गुजराती होता. तो गुजराती इसम सावकार आहे हें मला माहीत असल्यामुळें मी त्याला म्हटलें, 'ही लहान व जुनी प्रॉपर्टी तुम्ही कां घेतां?' त्या काळांत जातीय-दंगे मुंबईंत वरचेवर होत. त्यामुळें गुजराती लोक रहाण्यासाठीं हिंदु–मुस्लिम संमिश्र वस्तींतून गिरगांवांत येऊं लागले होते व गिरगांवांत मिळतील तीं घरें घेत होते. माझ्या

प्रश्नावर त्या गुजराती सावकारानें उत्तर दिलें, ' या तात्यालोकला गिरगांवमधून काढून लावायचा हाय.' बोलणें थट्टेचेंच. पण त्यामुळें माझ्या मनांत असे विचार येऊं लागले कीं, आपल्याला मुंबईत पाय ठेवण्यापुरती तरी स्वतःची जागा असावी. त्यांतूनच घर घेण्याच्या प्रवृत्तीकडे माझें मन वळलें.

★

## पुणेरी टांगेवाल्याचा अनुभव

मी व गोविंदा २३ जानेवारी १९३६ रोजीं रात्रीं अकराचे गाडीनें पुण्याला गेलों होतों. ती गाडी चार वाजतां पुण्याला पोंचते. त्यावेळीं आमच्या नात्यांतील एक मुलगा ससून हॉस्टेलमध्यें वैद्यकीचा अभ्यास करण्यासाठीं रहात होता. त्याच्या खोलीवर आम्हाला जावयाचें होतें. स्टेशनबाहेर आम्हीं येतों तों एका टांगेवाल्यानें कोठें जायचें असें आम्हाला विचारलें. ससून हॉस्पिटलच्या हॉस्टेलमध्यें असें आम्ही सांगितलें. तेव्हां त्यानें अडीच रुपये भाडें सांगितलें. कमीजास्त करून आम्हीं दीड रुपया नक्की ठरविला. त्यानें आम्हाला बराच वेळ फिरवून हॉस्टेलजवळ आणून त्या मुलाची चौकशी करून त्याच्या खोलींत पोंचविलें. सकाळीं स्नान वगैरे करून आम्हीं बाहेर जाण्यासाठीं रस्त्यावर आल्यावर समोरची इमारत हें ससून हॉस्पिटल आहे असें त्यानें सांगितलें. त्यानंतर थोडें उजव्या हाताला गेल्यावर हॉटेलें होतीं. हॉटेलच्या दरवाजांत जातांच समोर दिसणारी इमारत कसली, असें त्याला सहज विचारलें, ' तुम्हीं रात्रीं उतरलेत तें पुणे स्टेशन ' असें तो म्हणाला. तेव्हां आम्हीं बुचकळ्यांत पडलों. रात्रीं स्टेशनवर उतरल्यापासून तुझ्या घरीं टांग्यानें येण्यास आम्हांला एक तासाच्यावर वेळ लागला; असें आम्हीं त्यास सांगितले. पण तो पुण्याचाच रहाणारा असल्यामुळें त्याचेंच म्हणणें ग्राह्य धरणें आम्हांला इष्ट वाटलें. व टांगेवाल्यानें आम्हाला फसविलें असल्याचें आम्हीं समजून चुकलों.

★

## हेजीवकाकांचा प्रेमळ पाहुणचार

माधवजीभाई हे जसे माझे जीवाभावाचे एक स्नेही होते, तसेच पुण्याचे हेजीबकाका हेहि माझे जीवाभावाचे स्नेही. त्यांची आमची पूर्वी नुसती ओळख होती. कारण ते आमचा माल त्यांच्या दुकानीं विकावयास नेत असत. परंतु १९३६ सालीं पौष वद्य ३० ला आमच्या दुकानाला सुटी असल्यामुळें गोविंदा व मी चतुर्दशीला रात्रीं ११ चे गाडीनें सहज म्हणून पुण्याला गेलों. तेथें आम्हीं फिरावयास गेलों असतां मंडई बघण्याकरितां निघालों. तों रस्त्यांत एका दुकानावर दत्तात्रय नारायण हेजीब अशी पाटी वाचली. म्हणून आम्ही सहज दुकानांत गेलों. त्यांनीं नुकतेंच स्वतःसाठीं घर विकत घेतलें होतें व त्यांत ते रहावयासहि आले होते. म्हणून ते आम्हाला आपल्या घरीं घेऊन गेले. चहाफराळ झाल्यावर जेवणास रहाण्याचा त्यांनीं आम्हाला अतिशय आग्रह केला. तेव्हां हेजीब हें नांव परिचित नसल्यामुळें हे कुठल्या जातीचे असावेत

अशी शंका आमच्या मनांत आली. पण ज्याअर्थी आम्ही ब्राह्मण असून ते आपणाला जेवणाचा आग्रह करताहेत त्याअर्थी ते देशस्थ ब्राह्मण असतीलहि कदाचित् अशी आमची समजूत झाली. म्हणून विशेष आढेवेढे न घेतां आम्ही जेवणास राहिलों. त्यावेळीं त्यांची स्वतःची मोटारहि होती. त्यांतून त्यांनीं आम्हांला बरेंचसें पुणें दाखविलें. रात्रीच्या गाडीनें आम्हीं मुंबईला यावयाचें होतों. तोहि बेत त्यांनीं रद्द करविला व पहांटें तीन वाजतां आम्हाला उठविलें. शौचमुखमार्जन नि चहा वगैरे करून तयार होतों तोंच दरवाजांत एक मोठी गाडी आलेली दिसली. हेजीबकाका, आम्ही दोघे, व व्याही नांवाचे त्यांचे स्नेही असे आम्हीं त्या गाडींत बसलों. चार वाजण्याचे सुमारास गाडी सुरू झाली. कुठें जावयाचें असें काकांना विचारतां, 'आपण फिरायला जात आहों' असें ते म्हणाले. कांहीं वेळानें गाडी सातारला आली. तेथून महाबळेश्वरला गेलों. तेथें जेवण केलें व दोन तीन तास तेथें थांबलों. पांचगणी येथें थोडा मुक्काम करून व वाईच्या गणपतीचें दर्शन घेऊन निघाल्यानंतर पुण्यास यावयास रात्रीं दहा साडेदहा वाजले. घरीं आल्यावर वहिनीनीं दरवाजा उघडला, तेव्हां हातांत पळी कशाला असें मी त्यांना विचारलें. तेव्हां त्या म्हणाल्या, दरवाजाच्या कडींत घालून ठेविली होती. ती कशाला असें मी विचारतां, त्या म्हणाल्या कीं, बाहेरून पुरुष मंडळी येण्यास उशीर लागला म्हणजे दरवाजाच्या कडींत पळी घालावयाची असते; म्हणजे पुरुषमंडळी 'पळत' घरीं येतात. त्याप्रमाणें वाईहून आम्हीं निघाल्यावर गाडीनें अगदीं भर वेगानें पळतच घरीं येत होतों.

हे हेजीबकाका म्हणजे 'दत्तात्रय नारायण हेजीब' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पुणें शुक्रवार पेठेंतील किराणा व सुकामेव्याचे दुकानदार असून त्यांच्याकडे आमच्या मालाची एजन्सीहि आहे. त्यांचा माझा स्वभाव अतिशय जुळल्यामुळें ते माझे अतिशय जीवाभावाचे स्नेही झालेले आहेत. वडिलांच्या पश्चात् अडीअडचणीला मी त्यांचा सल्ला घेत असतों व तेहि अगदीं आपुलकीनें योग्य सल्ला मला देत असतात.

★

## पुणेकर, पण खरा मार्गदर्शक !

१९३७ ज्या ज्येष्ठांत आम्हीं पुण्याला आमच्या मेव्हण्याच्या लग्नासाठीं गेलों होतों. शनिवार पेठेंतील नेने घाटावर कर्वे यांचे घरीं हें लग्न व्हावयाचें होतें. तेथून शनिवारवाड्याच्या दुसऱ्या बुरुजाजवळ उजव्या हाताला वळा; तो रस्ता थेट मंडईला जातो, असें आम्हाला सांगण्यांत आलें होतें. तेथून आम्हाला केळींचीं पानें आणावयाचीं होतीं. पण दुसऱ्या बुरुजाजवळ हें लक्षांत न राहून बुरुज दिसतांच आम्ही उजव्या हाताला वळलों. व पुष्कळ चालल्यावरहि मंडई कांहीं दिसेना. पुण्याचे लोक पत्ता बरोबर सांगत नाहींत असें ऐकण्यांत असल्यामुळें कोणाला विचारण्याचेंहि धाडस होईना. आणखी बरेंच चालत गेल्यावर नदी व त्यावर पूल दिसला. पूर्वी एकदां मंडईला गेलों असतां नदी अगर पूल लागला नव्हता, तेव्हां एका सायकलस्वाराला मंडई कुठें आहे म्हणून

विचारलें. त्यानें सायकलवरून उतरून तुम्ही कुठून आलेत असें आम्हाला विचारलें. तेव्हां नेने घाटावरून असें आम्ही त्याला उत्तर दिलें. तेव्हां तो मोठमोठ्यानें हंसला व तुम्ही बाहेरगांवचे का, असें त्यानें विचारलें. त्याला आम्ही एका लग्नासाठीं मुंबईहून आलों असून मंडईतून केळीचीं पानें आणावयाचीं आहेत असें सांगितलें. त्यानंतर त्यानें आमचेबरोबर चालत मंडईपर्यंत येऊन एका केळीचे पानाचे दुकानांतून केळीचीं पानेंहि घेऊन दिलीं. नंतर परत कसें जावयाचें तें बरोबर समजावून तो निघून गेला. त्यानें सांगितलेल्या वाटेनें आम्ही बरोबर लग्नघरीं पोंचलों.

यामुळें पुण्यातील सर्वच लोक कांहीं रस्ता सांगतांना फसवीत नसावेत अशी आमच्या मनाची खात्री पटली.

११६९३

## गृहस्थधर्म

१९४३ च्या १ एप्रिलला रेशनिंग सुरू झाल्यावर आमच्या असोसिएशनच्या (The Maharasthra grain and provision merchants' Association) सर्व रेशन दुकानदारांनीं नफ्याचा कांहीं हिस्सा असोसिएशनला द्यावा व तो जमा झालेला एकूण नफा असोसिएशनच्या सर्व सभासदांनीं सारखा वर्षअखेर वांटून घ्यावा असें ठरलें होतें. त्यानंतर एक वर्षानें नफा वांटणीसाठीं म्हणून सभा भरली होती. त्यावेळीं सर्व सभासदांच्या नांवाचे चेक लिहून तयार होते. आमचा क्रमांक चौथा पांचवा होता.

अध्यक्षांना सभा सुरू होण्यापूर्वी भेटून 'माझें नांव शेवटीं पुकारा' असें मी सांगितलें. प्रथम ते कबूल होईनात. पण त्यांना समजून सांगितल्यावर त्यांनीं तसें कबूल केलें. सभा सुरू झाल्यावर सर्वांना हिशोब सांगून चेक देण्यास सुरुवात झाली. त्यांत रेशन दुकानदार व इतर मेंबर दुकानदार या सर्वांना चेक मिळावयाचे होते.

अध्यक्षांसह सर्वांचे चेक दिलें गेल्यानंतर शेवटीं माझें नांव पुकारण्यांत आलें. त्यावेळीं मी त्या सभेंत असें सांगितलें कीं, " या रेशनिंगच्या दुकानदारांना रेशनिंग न घेतलेल्या दुकानदारांनीं कोणत्याही प्रकारचें भांडवलरुपानें, मनुष्यबळाचे रुपानें अगर इतर कुठल्याच प्रकारचें सहाय्य केलेलें नाहीं. अशा परिस्थितींत त्यांना झालेल्या नफ्यांत आपण भागीदार होणें हें माझ्या मनाला योग्य वाटत नाहीं म्हणून मी हा चेक स्वीकारीत नाहीं. हा चेक संस्थेकडे जमा करावा. "

आजीनें जें लहानपणीं माझ्या मनावर बिंबविलें होतें कीं आपण गृहस्थ आहोंत. आपला हात नेहमीं वर असावा खालीं असूं नये; म्हणजे आपण कष्ट केल्याशिवाय कांहींहि मोबदला स्वीकारणें उचित नव्हे. तें सूत्र मी नेहमींच अशा प्रकारें डोळ्यांसमोर ठेवीत आलों आहे.

## मुक्या प्राण्यांचें मार्गदर्शन

मी एकदां हुबळीला मावस भावाकडे गेलों होतों. ते व त्याचे वडील हे खाना-वळींत जेवत. त्यांच्याबरोबर खाणावळींत जेवावयास गेलों असतां त्या खाणावळींत मद्रास कडील एक ब्राह्मण गृहस्थ जेवावयास आले होते. व ते सोंवळें नेसून खोलींत जेवावयास बसले होते. आम्हीहि जेवून त्या खोलींत आलों. तेव्हां तो ब्राह्मण मोठमोठ्यानें कांहीं बोलत होता. वाढपी जरी कानडीच होता तरी त्या ब्राह्मणाची भाषा त्याला कळेना. म्हणून त्यानें आपल्या मालकाला बोलावून आणलें. मालक आल्यावर तो ब्राह्मण आण-खीच तावातावानें बोलूं लागला. तेव्हां त्या मालकानें स्वयंपाकघरांत जाऊन मूठभर तिखट आणून त्याच्या पानांत वाढलें. त्याबरोबर तो ब्राह्मण खूष झाला. म्हणून मी मग भावाला विचारलें, कीं तो काय म्हणतो ? तेव्हां त्यानें मला सांगितलें कीं, तो ब्राह्मण असें म्हणतो कीं, "तूं उडुपी ब्राह्मण माझ्याच जातीचा आहेस मग तुझ्या भाज्या मळ-मळीत कशा ? तिखट अगदीं कमी कां वापरतोस ?" पण मी तेथें प्रत्यक्ष जेवलोंच होतों. व त्या भाज्या आम्हाला अतिशय तिखट लागल्या होत्या. तसाच मी पुढें हॉस्पेटला गेलों व दुसऱ्या दिवशीं पुढें विजयनगरला गेलों. तेथें एक मंदिर दिसल्यावर त्याचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. तेव्हां त्या पुजाऱ्यानें सांगितलें कीं, या नदींत स्नान करून ओलेल्यानें आल्यासच दर्शन मिळेल. माझें स्नान व्हावयाचेंच असल्यामुळें मी त्या नदीवर स्नानाला गेलों. त्या नदीचें पाणी इतकें गार व काळेंभोर होतें कीं, तें किती खोल असेल याचा अंदाज येईना. अगदीं किनाऱ्यावर जाऊन मी चांचपडूं लागलों.

एवढ्यांत त्या नदीवर आडवें गेलेलें एक झाड होतें त्यावर कांहीं माकडें खेळतांना दिसलीं. मोठ्या माकडानें झाडाची फांदी धरली. त्याच्या कंबरेला एका माकडानें विळखा घातला. दुसऱ्याच्या कंबरेला तिसऱ्यानें विळखा घातला. अशा रीतीनें त्या माकडांनीं एक लोंबती ओळ केली. व नंतर पहिल्या माकडानें हात सोडून दिले तेव्हां सर्व माकडें खालीं पाण्यांत पडलीं व चालत किनाऱ्यावर येऊन परत झाडावर चढलीं. असें त्यांनी दोनतीन वेळां केल्यावर जिथें माकडें उड्या मारतात तिथें पाणी फार थोडें आहे, कारण तेथून माकडें चालत येतात असें जाणून तेथें मी जाऊन आंघोळ केली. तेथें पाणी खरोखरच थोडें होतें व जेथें मी प्रथम उभा होतों तेथें फार खोल होतें. नंतर मी स्नान करून देवदर्शन केलें. व आपल्या मार्गानें गेलों. त्या मुक्या प्राण्यांना मला पाण्यांत उतरण्याची भीति वाटते असें वाटून मला तेथें पाणी किती आहे याचा अंदाज त्यांनीं दाखविला होता. मुके प्राणीहि वेळप्रसंगीं माणसांना कसें मार्गदर्शन करतात याबद्दल त्यांचें मला फारच कौतुक वाटलें.

★

## गजाननाचें लग्न

आमचा सावत्र भाऊ चि. गजानन हा शाळा सोडून दुकानांत बसूं लागल्यावर त्याला मुली सांगून येऊं लागल्या. परंतु त्याच्या पाठच्या बहिणीहि लग्नाला झाल्या होत्या.

गजाननाचें वय २३ वर्षांचें झाल्यावर व आतां तो उद्योगधंद्यांत सामील झाल्यामुळें त्याचें लग्न करावें असें माझ्या मनांत येऊं लागलें. तसें मी दादांना पत्र पाठवून विचारलें. दादांचें उत्तर आलें कीं, आधीं मुलींचीं लग्नें झाल्याशिवाय मुलाचें लग्न करूं नकोस. म्हणून समक्ष विचारविनिमय करण्याकरितां मी गांवीं गेलों. त्यानंतर चार दिवसांतच आई प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. मी दादांना म्हणालों, 'बघा, आतांहि मुलगी झाली. हिचें लग्न होईपर्यंत गजाननची चाळीशी उलटून जाईल. तोंपर्यंत त्याचें लग्न ठेवायचें काय?' अखेर सगळ्यांशीं विचारविनिमय करून 'तूं करणार तर कर' असें दादा म्हणाले. मुंबईस परतल्यावर त्याचें लग्न जमून दोन महिन्यांतच झालें. आतां त्याच्या पाठच्या बहिणींपैकीं अजून दोघींचीं लग्नें व्हावयाचीं आहेत.

★

## नवरा मिरजेला, बायको कोल्हापुरास!

१९४४ च्या मे महिन्यामध्यें मी, आमची सावत्र बहीण गंगू, मेव्हणे मुकुंदराव चितळे व हेजीबकाका असे पुण्याहून रात्रीं ११ च्या गाडीनें कोल्हापूरला जावयास निघालों. कोल्हापूर स्टेशनवर आलों; त्यावेळीं आमच्या शेजारींच बसलेली १६–१७ वर्षांची एक मुलगी रडूं लागली. तिचा नवरा मिरजेला चहा प्यावयास उतरला असतां गाडी सुटली व नवरा मिरजेला राहिला, असें ती म्हणाली. नंतर आम्हीं तिला सामानासह फलटावर उतरवून घेतली. आम्हीं उतरल्याबरोबर मुकुंदराव व गंगू आमचें सामान घेऊन राजापूरच्या मोटारींत जाऊन बसलीं. हेजीबकाका व मी त्या मुलीची कांहीं तरी व्यवस्था करण्याकरितां म्हणून थांबलों. ती मुलगी लग्न होऊन प्रथमच सासरीं निपाणी येथें नवऱ्याबरोबर जावयाची होती. आम्हीं स्टेशनमास्तरला भेटलों व तिची हकिकत सांगूं लागलों, पण तो कानडी असल्यामुळें आमचें बोलणें त्याला समजेना. तिकीटमास्तरहि कानडीच. म्हणून शेवटीं तेथें चार नंबरचा हमाल होता, त्याला या बाईच्या चहाफराळाची व्यवस्था कर व साडेदहाच्या दुसऱ्या गाडीनें हिचे यजमान जर आले नाहींत तर राजापूरला आम्हांला तूं तार कर. म्हणजे हिची व्यवस्था करण्यासाठीं आम्हीं येऊं; असें सांगून त्याला दोन रुपये व आमचा पत्ता देऊन आम्हीं राजापूरला जावयास निघालों. साडेदहाच्या गाडीनें तिचे यजमान आले व तिला घेऊन निपाणीला निघून गेले हें आम्हांला नंतर समजलें.

★

## होडी जरा थांबवायला सांगा!

घरीं गोवळला गेल्यावर या मंडळींना समुद्र दाखविण्याकरितां म्हणून होडीनें जैतापूरला गेलों. जैतापूरहून परत येतेवेळीं होडी भरधांव चालत असतांना हेजीबकाकांच्या हातांतून सुपारी कातरण्याचा अडकित्ता पाण्यात पडला. काका मला म्हणाले, 'इथें अडकित्ता पडला आहे. होडीवाल्याला होडी जरा थांबवायला सांगा.' तेव्हां मी म्हटलें, जाऊं दे अडकित्त्याची एवढी बाब कसली, आपण दुसरा घेऊं. कारण जिथें तो

अडकित्ता पडला होता, तेथें पाणी फार खोल होतें. होडी अर्धा मैल तरी पुढें निघून गेली होती. त्यांचें म्हणणें असें कीं, मोटारींतून प्रवास करतांना जर अशी कांहीं वस्तु पडली तर मोटार थांबवून आम्हीं तीं घेऊन येतों. परंतु होडींतून पडलेला अडकित्ता मिळविणें अशक्य आहे ही कल्पना त्यांना आली नाहीं.

नंतर मग आम्हीं पुण्याला परत आलों. तेव्हां हेजीबकाकू आम्हांला म्हणाल्या, ' तुमचें गोवळ गांव म्हणजे अंदमान आहे. तुमच्याकडे तार होत नाहीं, पत्र नाहीं, टेलिफोन नाहीं. त्यामुळें कांहीं बातमी कळायला मार्ग नाहीं. अशा अंदमानांत त्यांना कुठें घेऊन गेलेत ? '

★

## दुकानदारींतले चोरांचे अनुभव

दादा व मी दोघेंच दुकानांत असतांना घडलेली गोष्ट आहे. पहांटेस जाग आल्याबरोबर आम्हीं दुकान उघडलें व दादा दुकानावर बसले. मी शौचमुखमार्जन व आंघोळ करून, पाण्याचें पातेलें भरून घेऊन दुकानांत आलों. तोंच एका मुलानें दोन पैशांच्या सुपाऱ्या मागितल्याचें ऐकलें. दादांना गल्ल्यावरून उठून खालीं उतरून सुपाऱ्या काढून द्यावयास हव्या होत्या. त्या मुलानें सुपाऱ्या मागितल्यामुळें मला त्याचा संशय आला, व मी त्या मुलाकडे पाहिलें. तों तिथल्या नारळाच्या राशींतले चारपांच नारळ त्यानें रस्त्यावरील बांकाखालीं टाकलेले मीं पाहिलें. मी तसाच बाहेर आलों व त्या मुलाची शेंडी धरून त्याच्या दोन मुस्कटांत दिल्या. रस्त्यावर गर्दी जमली व या मुलाला कां मारतोस, असें लोक मला विचारूं लागले. एवढ्यांत त्या मुलानें टाकलेले नारळ घेऊन त्याच्याबरोबरचा दुसरा मुलगा पसार झाला होता. परंतु सुदैवानें आमच्या-समोरील एक गुजराती दूधवाल्याची नजर त्या नारळ घेऊन पळणाऱ्या मुलावर गेली व त्यानें त्या मुलाला नारळासह पकडून आमच्या दुकानावर आणलें. जमलेल्या लोकांनीं हें पाहिल्यावर ते निघून गेले. व आमचे नारळ मिळाल्यामुळें आम्हीं त्या मुलांना सोडून दिलें,

असेंच एकदां डालडा वनस्पतीच्या डब्यांचा मागवलेला माल देऊन ते लोक जातांच दोन मुलगे दुकानावर चढले व एक एक डालडाचा दहा रत्तली डबा उचलून ते मागल्या दारानें पसार झाले. पाठोपाठ धांवत जाऊन पोरांना धरण्यास आम्हाला काकडवाडीपर्यंत जावें लागलें, व डबे घेऊन आम्हीं परत आलों.

कांही मुलें राणी छापाच्या चवल्या मागावयास येत. या चवल्या जुन्या पैच्या आकाराच्या असत. गल्ल्यांतील राणी छापाच्या चवल्या बाजूला काढून घेतां घेतां हीं मुलें राजा छापच्या चवल्या चलाखीनें दाबून ठेवीत. व जेवढ्या राणी छापाच्या चवल्या मिळतील तेवढ्या बाजूला काढीत. व त्या मोजून तेवढ्या आमच्याचकडील मुठींत दाबून ठेवलेल्या चवल्या देऊन राणी छापाच्या चवल्या घेऊन जात. अशा तऱ्हेनें

आमच्याच राजा छाप चवल्यांचे बदलीं आमच्याच राणी छाप चवल्या तीं घेऊन जात. अशा तऱ्हेनें ते आम्हाला फसवीत. पुष्कळ दिवसांनीं आमच्या लक्षांत ही फसवणूक आली. अजूनहि सुटे रुपये व मोड देतेवेळीं फसगत होण्याचा पुष्कळदां संभव असतो.

★

## भाडेकरूंच्या पेंचांतून सुटका

१९४२ च्या पळापळींत मुंबईंतील बऱ्याचशा राहत्या जागा रिकाम्या झाल्या होत्या व राहिलेले भाडेकरू घरमालकाजवळ कांहीं भाडें कमी कराल तर आम्हीं रहातों; नाहीं तर आम्हीं पण जातों, असें सांगू लागले होते. अशावेळीं कांहीं घरमालकांनीं भाडीं पंचवीस टक्क्यांपर्यंत कमीहि केला होती. त्याच सुमारास आमच्या इमारतीमधील भाडेकरूंनींहि सर्व रहिवाशांची सभा भरवून आमच्याकडे याच प्रकारची विनंती केली. परंतु त्यावेळीं आमची परिस्थिति अशी होती कीं, इमारतीवरील कर्ज फिटलेलें नव्हतें.

चाळी उत्तमपैकीं अगदीं मोक्याच्या ठिकाणीं होत्या व चाळींतील एकहि भाडेकरू जागा सोडून गेलेला नव्हता. तरी पण मला भाडेकरूंचें म्हणणें बरेचसें पटूं लागलें. कारण ते असें म्हणत होते कीं, तुम्हीं जर भाडें कमी केलें नाहींत तर आम्ही जागा खालीं करून दुसरीकडे जाऊं. म्हणून मी त्यांना असें म्हणालों कीं, भाडें कमी केलें तर तुम्हीं सर्वजण रहाणार असें ठरलें. परंतु जर भाडें कमी केलें नाहीं तर कोण जाणार व कोण रहाणार त्याची जर यादी दिलीत तर मला तें विचार करण्याच्या दृष्टीनें सोईचें पडेल. जे जाणार असें म्हणतील त्यांची ती मी नोटीसच समजेन व नोटिसीकरतां त्यांना अडवणार नाहीं. तरी तुम्हीं मला अशी यादी द्या! त्याप्रमाणें एक आठवड्यानें भाडेकरूंनीं मला यादी दिली. त्यावेळीं मी त्यांना सांगितलें कीं, भाडें कमी न केलें असतां जागा सोडून जाणार म्हणून ज्यांनीं लिहून दिलें आहे, त्यांची ही नोटीस आहे असें पूर्वीच्या बोलण्यावरून मी समजतों.

ही एप्रिल महिन्यांतील गोष्ट आहे. ती यादी पाहिल्यावर मला असें दिसून आलें कीं, जवळ जवळ निम्मे भाडेकरू भाडें कमी न केल्यास जागा सोडून जाणार आहेत. त्यामुळें मला मोठा प्रश्न पडला. तुम्हाला एका आठवड्यांत काय तें कळवतों, असें सांगून चहापाणी देऊन त्यांची मी रवानगी केली. दोन–तीन दिवस हा प्रश्न मला भेडसावीत होता. त्याचबरोबर इमारतीवरील असलेलें कर्जहि भेडसावीत होतें. म्हणून दोन–तीन दिवसानंतर असा विचार मनांत आला कीं, आपल्या जागेचें महत्त्व काय आहे हें लोकांना कितपत पटतें याचा पडताळा पहावा. म्हणून एक बोर्ड तयार केला. त्यावर असें लिहिलें कीं, आमच्या इमारतीमधील खालीं लिहिलेल्या नंबरच्या खोल्या रिकाम्या व्हावयाच्या असून ज्यांना त्या घ्यावयाच्या असतील त्यांनीं जागा समक्ष पाहून त्यांना पसंत पडल्यास अनामत रक्कम आमच्या दुकानीं आणून भरावी. अशा तऱ्हेचे तीन फलक करून ते आमच्या इमारतीमध्यें एक, दादर दुकानावर एक, व मुगभाट

दुकानावर एक असे लावले. जरी या पळापळींत पुष्कळसे लोक जागा सोडून गेले होते तरी कांहीं धूर्त लोकांनीं आपल्या कसल्या तरी जागा सोडून चांगल्या इमारतींतून जागा घेतल्या होत्या. मला स्वतःला आमच्या इमारतीचें ठिकाण मुंबईच्या दृष्टीनें मध्यवर्ति वाटतें. तें आमच्या भाडेकरूनाहि तसेंच वाटतें किंवा नाहीं याचाहि पडताळा मला माझ्या या धोरणामुळें घ्यावयाचा होता. त्याप्रमाणें असें तीन फलक लावल्यानंतर त्या इमारतीमध्यें शें दोनशें लोकांनीं तरी येऊन जागा पाहिल्या. त्यांना त्या लगेच पसंत-पडून त्या जागा घेण्यासाठीं आमच्याकडे अनामत रक्कम भरण्यास अनेकजण आले. आमच्याजवळ जागा तर थोड्याच होत्या व त्यांतूनहि जुन्या कोणा भाडेकरूंचा विचार बदलला असल्यास त्यांच्यावर अन्याय होऊं नये म्हणून मी कांहीं थोड्याशाच लोकांच्या अनामत रकमा घेतल्या होत्या; तरीपण त्यांना नक्की खोली देण्याचें आश्वासन दिलेलें नव्हतें. एकंदर माणसांचीं रीघ लागलेली पाहिल्यावर सर्वच भाडेकरूंनीं आपण दिलेल्या नोटिसा परत घेत असून आम्ही जागा सोडीत नाहीं असें कळविलें. त्यावेळीं मात्र माझें सांगणें भाडेकरूंना पटलें असावें अशी माझी समजूत झाली. त्यानंतर एकहि खोली खालीं न होतां पूर्वींचेंच भाडेकरू कायम राहिले.

★

## गिरनार आणि द्वारकेची यात्रा

माझे अगदीं जिवाभावाचे स्नेही स्वर्गवासी माधवजीभाई जोशी यांचें नळबाजारांत दुकान असून काठेवाडांतील जुनागढ संस्थानांत केशोद गांवीं त्यांचें रहाण्याचें घर आहे. जिवाभावाचे स्नेही असें म्हणण्याचें कारण प्रत्येकाला स्नेही असतात. परंतु ज्याच्या जवळ आपण अगदीं खाजगी गोष्टीहि बोलूं शकतो व जे अगदीं मित्रावरचें संकट तें आपल्यावरचें संकट असें समजणारे आहेत, अशापैकीं माधवजीभाई हे माझे स्नेही होते. त्यांचीं मुलें लहान असल्यामुळें त्यांनीं मला आपल्या कुटुंबाचा एकमेव ट्रस्टी नेमला आहे. आम्ही पहिल्या दोन मालमत्ता जेव्हां खरीदल्या त्यावेळीं एकदां दहा हजार व दुसऱ्यांदा वीस हजार रुपये देणारे ते हेच माझे मित्र.

एकदां ते गांवीं गेले असतांना मला त्यांनीं त्यांच्या गांवीं येण्यास अगदीं आग्रहाचें पत्र पाठविलें. त्याप्रमाणें मी त्यांच्या घरीं गेलों. एक आठवडा राहून आम्ही दोघेहि मुंबईला परत येणार होतों. त्यांच्या घरीं गेल्यावर चार दिवसांनीं गिरनार पर्वतावरती जाण्याचा आमचा विचार ठरला. त्याप्रमाणें आम्हीं गिरनारला निघालों. केशोदहून गाडीनें जुनागढला येऊन सुमारें दोन मैलांवर असलेल्या गिरनारच्या पायथ्याच्या धर्मशाळेंत आम्ही राहिलों होतों. मी, माधवजी, मोहनलाल लोडिया व त्यांचा पुतण्या असे त्यावेळीं आम्हीं चौघे होतों.

डोलीचा दर १४० पौंडापर्यंतच्या माणसाला ९ रुपये व त्याच्याहून जास्त वजन असल्यास १५ रुपये होता. १४० पौंडापर्यंत दोन माणसें डोली नेत. पण त्याहून जास्त वजन असल्यास चार माणसें लागत. माझें १४० पौंड वजन असल्यामुळें मला

९ रुपये खर्च पडला. पण मोहनलालचें १६० पौंड वजन झाल्यामुळें त्याला १५ रु. खर्च पडला. अगदीं शेवटच्या टेकडीपर्यंत जाऊन, मध्यंतरीं दोनचार दिवस वाटल्यास मुक्काम करूनहि खालीं परत आल्यावर ते पैसे द्यावयाचे असत. हे डोलीवाले अरब होते.

मोहनलाल लोडिया व मी डोलीनें व इतर दोघांनीं पायीं गिरनार चढावयास सुरुवात केली. दोनतीन हजार पायऱ्या चढल्यावर भयंकर थंडी व गार वारा यामुळें फार त्रास होऊं लागला व गरम चहा कोठें मिळाला तर फार बरें होईल असें वाटूं लागलें. चौकशी करतां चहा मिळण्याची कांहीं सोय तेथें नाहीं असें समजलें. तोंच समोरून एक मनुष्य आमचेकडेच येत होता. तो मुंबईतील एका व्यापाऱ्याकडे उग्राणीचें काम करीत असून तो आमच्या दुकानांत बऱ्याच वेळां उग्राणीसाठीं आलेला होता. तो माझ्या व माधवजींच्या ओळखीचा निघाला. तोहि रजेवर गांवीं आला असतांना गिरनारवर एका आठवड्यासाठीं आला होता आणि एक खोली घेऊन राहिला होता. मला पहातांच त्यानें मिठीच मारली व 'चालो' म्हणून आपल्या खोलींत घेऊन गेला व सर्वांना मोठाले पेले भरून त्यानें चहा दिला. नंतर तो म्हणाला, 'तमे उपर जई दर्शन करी आवो त्यासुधी हूं रसोई तैयार करीश, तमे जमवा जरूर पधार शो.'

त्याचें आम्हांला मोठें कौतुक वाटलें. नंतर आम्हीं आणखी एका टेकडीवर जाऊन तेथील जैनांचीं मंदिरें पाहून परत त्या मित्राकडे आलों. त्यानें जेवण तयारच करून ठेवलें होतें. चुरम्याचे लाडू, भजीं, भात, एकदोन भाज्या असा मोठा सुंदर जेवणाचा बेत त्यानें केला होता. त्यानंतर वामकुक्षी करून आम्हीं गिरनार उतरलों व रेल्वेनें केशोदला आलों.

रविवारचा दिवस विश्रांति घेऊन सोमवारीं आम्हीं मुंबईला जावयास परत निघायचें होतों. मुंबईस येतांना माधवजीभाईच्या कापड दुकानासाठीं कांहीं कापड खरेदी करण्याकरितां मध्यंतरीं जामनगरला जावयाचें होतें. ती यादी व पैसे जवळ घेऊन आम्ही रात्रीं झोंपलों. सकाळीं सहाची गाडी होती. झोंपतेवेळीं माधवजीभाई मला म्हणाले, 'बैरांओ काले निकलवा माटे ना पाडे छे, काले सोमवार सामे चंद्रमो त्यारे दक्षिणतरफ केम निकलाय?' त्यांच्या धर्मोप्रमाणें दक्षिणेकडे प्रवासाला जाण्यास सोमवार हा दिवस चांगला नाहीं. तेव्हां मी त्याला विचारलें, 'कधीं चालेल?' तेव्हां 'परमदाढे निकळसूं' असें तो म्हणाला. तेव्हां सोमवारीं न निघतां मंगळवारीं सकाळीं मी, माधवजी व दुकानचा नोकर छगन असे निघालों.

त्यांच्याकडे असा रिवाज आहे कीं, बाहेर निघतेवेळीं सवाष्ण बाईनें पाण्याचे बेडे म्हणजे एक डोक्यावर व एक कडेवर पाण्याचे हंडे घेऊन समोरून आलें पाहिजे. त्याप्रमाणें एक बाई पाणी आणण्यास गेली होती. आम्ही दरवाजापर्यंत आलों तरी ती आली नव्हती. दोन मिनिटांनीं ती आल्यानंतर तिला डावी घालून आम्ही घरांतून बाहेर पडलों, म्हणजे तो शकून झाला. आम्हीं संध्याकाळीं जामनगरला उतरलों व एका धर्मशाळेंत रहावयास गेलों.

दुसऱ्या दिवशीं कापड बाजारांत जाऊन त्यांनीं नमुने पाहून ऑर्डर दिली. नंतर तेथील प्रसिद्ध सोलेरियम पाहिले. सूर्यप्रकाशाद्वारें निरनिराळे रोग बरे करण्याची सोलेरियम ही एक वैद्यकीय प्रयोगशाळाच आहे. नंतर दाढ्या करावयाच्या असल्यानें आम्ही एका सलूनमध्यें गेलों. त्यांत माझी दाढी करावयास आलेला एक लहानच मुलगा होता. तो गोरा गोमटा व अगदीं देखणा होता. तेव्हां आमच्या बरोबरचा छगन म्हणाला, " वासूभाई, तमने कन्हयो भाळयो, हवे तमे द्वारका जजो " त्यानंतर आम्हीं तिकीटें काढतांना मुंबईची न काढतां द्वारकेचीं काढलीं व तिघेहि द्वारकेला गेलों. तेथें दर्शन करून संध्याकाळीं थेट द्वारकेला जाण्यासाठीं वास्तविक ओख्याच्या सोईस्कर मार्गानें जावयाचें; पण तेथूनच होड्या सुटत असल्यामुळें आम्ही होडीनें निघालों. आमच्यासारखीं पांचएकशें माणसें दर्शनाला जावयाचीं होती. होड्याहि पन्नास–पाऊणशें होत्या. त्यामुळें आमच्या होडींत आम्ही तिघेंच होतों. दोन होडीवाले होते, ते एक १२ व दुसरा १४ वर्षांचा असे पोरगेच होते. द्वारका बेट समोर जवळ दिसत असूनहि उलट्या वाऱ्यामुळें तेथें पोचायला आम्हाला चार तास लागले. रात्रीं आठ वाजतां आम्हीं दर्शनाकरितां गेलों. देऊळ आठ वाजतां बंद करून पुजारी त्यावेळीं बाहेरच पडत होते. त्या पुजाऱ्यांची पुष्कळ विनवणी करून सर्व लोकांनीं प्रत्येकीं एक रुपया त्य पुजाऱ्यांना देऊं करून सुद्धां त्यांनीं दरवाजा उघडण्याचें नाकारलें. तेव्हां माधवजी भाई म्हणाले, वासुभाई, " पाछा हालो, द्वारकाधीशनें अमने दर्शन आपवुं नथी " असें म्हणून आम्हीं परत फिरलों. नंतर एका हॉटेलमध्यें चहाफराळ करून तो होडीवाला धक्यावर होताच त्याला पलीकडे नेऊन लावण्यास सांगितलें. होडींत आम्ही बसण्यापूर्वी त्या होडींत बडोदें राज्यांतील एक सेनाधिकारी एका खुर्चीवर व त्याचा आर्डरली खुर्चीखालीं बसले होते. होडींत आम्ही बसलों व होडी सुटली. शेंपन्नास फूट जातांच होडी भयंकर हलूं लागली. त्यामुळें आम्ही त्या सेनाधिकाऱ्यास म्हटलें कीं तुम्ही खुर्चीवर न बसतां खालीं बसा. नाहींतर पडायला होईल. पण तो लष्करी तोऱ्यांत असल्यामुळें त्यानें आमचें ऐकलें नाहीं. नंतर थोड्याच वेळांत आमची होडी आडवी तिडवी झाली. त्यामुळें तो सेनाधिकारी गडगडला. पाण्यांतच पडायचा पण तो थोडक्यांत बचावला. मग ते दोघेहि आमच्या समोरच खालीं येऊन बसले.

त्यानंतर लाटा अधिकच जोरदार येऊं लागल्या. तेव्हां माधवजीभाई अतिशय भयभीत झाले व आपण आतां बुडणार असें त्यांना वाटूं लागलें. मी त्यांची पुष्कळ समजूत घातली. ' ज्या वाहनांत आपण बसतों तें वाहन सुरक्षित आपणांला ठिकाणावर पोंचवील अशी खात्रीच मनांत बाळगावयाची असते. तेव्हां आपण प्रत्यक्ष होडींत बसलेले असतांना तुम्हीं तिला नांवें ठेवूं नका. ती आपल्याला सुरक्षित तडीला पोंचवील. ' असें मी त्यांना म्हणालों. परंतु त्यानंतर लाटा आणखीच वाढल्या व होडीहि फारच हलूं लागली व मलाहि थोडी भीति वाटूं लागली. माधवजी छगनभाईला म्हणाला, " आपणे मरवानुं ए चोकसच कारण त्रण ब्राह्मण साथे निकळ्या, आपणे जिवता

किनारे जासुंज नहीं, आपणे आ फुकटना मरी जवाना छिए आपणा बैराओ के बालबच्याने कई खबरभी पडशे नहीं." त्याचें कारण असें होतें कीं, आम्ही वास्तविक द्वारकेला जावयाचें नव्हतों. केशोदहून निघतांना आम्हीं मुंबईला जावयाचें या हिशेबानेंच निघालों होतों. त्यामुळें केशोदचे लोक समजले असते कीं आम्ही मुंबईला गेलों आहोंत व मुंबईकर समजले असते कीं आम्ही केशोदला आहोंत. त्यामुळें पुष्कळ दिवस आमचा पत्ता लागला नसता. त्यामुळें आम्ही मेलों हें कुणाला कळणार नाहीं याचें त्यांना जास्त वाईट वाटत होतें.

त्यानंतर आम्हीं रात्रीं साडेआठ वाजतां निघालेलीं माणसें दीड वाजतां ओख्याच्या धक्क्याला पोंचलों. किनाऱ्याला लागतेवेळीं माधवजीभाईंनीं वरच्या बळाणीवर चढून वांदर जसा उडी टाकतो, तशी एकदमच लांब किनाऱ्यावर उडी मारली. त्या जागीं उतार होता, पण त्या नावाड्या मुलानें पाठोपाठ उडी मारून त्यांना धरल्यामुळें ते गडगडले नाहींत. माधवजी व छगन यांना पाण्यांतल्या प्रवासाची संवय नव्हती म्हणून ते जास्त भ्याले होते. मी कोंकणचा असल्यामुळें वादळाचा अनुभव मला होता. म्हणून मी कमी भ्यालों.

नंतर सकाळच्या गाडीनें आम्ही मुंबईचीं तिकिटें काढून निघालों. गाडींत माधवजींनीं घडलेली हकिकत कांहीं लोकांना सांगितली. तेव्हां कांहीं प्रवाशांनीं आम्हाला अशी माहिती सांगितली कीं, "वडोदरामा बेट द्वारकाजेवीच मूर्तीनु मंदिर छे तेनु दर्शन करी माफी मांगजो" आम्ही बेट द्वारकेंतून दर्शन न घेतां निघालों म्हणून हा प्रसंग आमच्यावर आला अशी भीति आम्हाला वाटून आतां आम्ही मुंबईला सुखरूप पोचतों कीं नाहीं अशी शंका उत्पन्न झाली.

बडोदा १५० मैलांहून जास्त असल्यामुळें रेल्वेप्रवास खंडित करतां येत होता. म्हणून आम्ही बडोद्यास उतरलों. त्यावेळीं बरीच रात्र असल्यामुळें फलाटावरच बिस्तरे पसरले व आपापल्या ट्रंका उशाखालीं घेऊन आडवे झालों. माधवजीभाईंनीं आपल्या 'होल्डाल'चा पट्टा ट्रंकेच्या हँडलमध्यें व नंतर क्लीपमध्यें घालून अडकवून ठेवला. मी त्याला विचारलें की हें काय करतां? तेव्हां कोणी चोर जर माझी ट्रंक न्यावयास आला तर मला समजेल म्हणून मीं असें करून ठेवतों असें माधवजी म्हणाले.

कांहीं वेळानें स्टेशनवर सामसूम झाल्यावर एका माणसानें माधवजीची ट्रंक उचलली. तो हिसका माधवजीला समजला. त्याबरोबर त्यांनीं उठून त्या ट्रंक उचलणाऱ्याला म्हटलें, 'आ ट्रंक तमने जोयती होय तो खुशीथी लई जा, हूं पट्टो काढी आपूं.' एवढ्यांत मीहि जागा झालों. परंतु तो चोर इतका खजील झाला कीं तो गुपचूपपणें पसार झाला.

दुसऱ्या दिवशीं बडोदें पाहून व एका नातेवाईकाकडे जेवण करून संध्याकाळीं देवाचें दर्शन करण्याकरितां त्या नातेवाईकांबरोबर मंदिरांत आलों. त्यावेळीं तेथें कीर्तन चालू होतें. म्हणून जोडे बाहेर काढून दर्शनासाठीं आंत जाऊं या असें म्हणून आम्ही

स्लीपर काढले. माधवजींनीं पायांतले स्लीपर काढतांच जवळच्या एका माणसानें लगेच ते आपल्या पिशवीत टाकले. तेव्हां माधवजी त्याला म्हणाले, 'तमने जोता होय तो लई जाव; पण मारे पहेरवा माटे जुना फाटेला तुटेला आपजो.'

तेव्हां तो माणूस खजील होऊन पळून गेला. त्यानंतर आम्ही देवदर्शन करून रात्रीच्या गाडीनें मुंबईस येण्यास निघालों.

माधवजी विनोदी स्वभावाचे असल्यानें प्रवासांत कांहींच गैरसोय होत नसे.

हे माझे जीवाभावाचे स्नेही ३१ डिसेंबर १९४९ रोजीं स्वर्गवासी झाले. परंतु त्यानंतरहि त्या कुटुंबाचे व आमचे संबंध पूर्वीसारखेच प्रेमाचे आहेत.

## चित्तपावन संघाची सभा

१९४७ मध्यें चित्तपावन संघाकरितां एक इमारत खरेदी करण्याचें घाटत होतें. व लाख सव्वालाखापर्यंतची निकदवारी लेनमधील एक इमारत आढळल्यावरून त्याकरितां पैसा उभा करण्यासाठीं जवाहीराचे व्यापारी श्री. गणेशपंत व वामनराव पेठे यांच्या घरीं चित्तपावनांतील कांहीं प्रतिष्ठितांची सभा भरली होती. त्या सभेला मीहि गेलों होतों. त्यावेळीं सुमारें ३०–३५ माणसें जमलीं होतीं व तोच विषय चालू असून आंकडे घालण्याच्या कामाला सुरुवात झाली होती. अध्यक्षांनीं पहिला आंकडा घातला पण तो सर्वांना न पटून त्यांत कांहींतरी वाढवा असा लोकांनीं आग्रह धरला. परंतु बराच वेळ प्रयत्न करूनहि त्यांनीं आपल्या आंकड्यांत वाढ केली नाहीं. त्यानंतर त्या सभेंतीलच एक सज्जन गृहस्थ प्रत्येक व्यक्तीपुढें कागद नेऊन त्याचा आंकडा म्हणून आपणच आंकडा घालून त्याचें नांव लिहूं लागले. असें करतां करतां ते गृहस्थ माझ्यापर्यंत आले त्यावेळी माझ्यापूर्वी २१ लोकांचे आंकडे पडलेले होते. वरील ग्रहस्थ माझ्याजवळ आले व मलाहि त्यांनीं इतरांप्रमाणेच पुढील उपदश केला, "तूं घरून इथें आलास त्यावेळीं तुझ्याजवळ काय होतें व आतां तुझी परिस्थिति काय आहे याचा नीट विचार करून काय आंकडा घालूं तो सांग." त्यावेळीं मी तो कागद माझ्या हातांत घेतला व आंकड्यांची बेरीज करून पाहिली ती सात हजार दिसली. त्यावेळीं मी त्या सद्‌गृहस्थांना असें म्हणालों कीं, तुम्ही म्हणतां ती परिस्थिति बरोबर आहे. मी आलो त्यावेळीं फक्त बोटीचे पैसे माझ्याजवळ होते. माझे वडील येथें येतेवेळीं तर त्यांच्या तिकिटाचे पैसेहि त्यांच्या बरोबर येणाऱ्या दुसऱ्या गृहस्थांनीं खर्च केले होते. अशीच जरी नाहीं तरीपण आपण येथें जमलेल्यापैकीं बहुतेकांची परिस्थिति, ते घरून मुंबईला आले त्यावेळीं साधारणपणें सामान्यच असणार. त्यामुळें त्याची आठवण करून देण्याची आवश्यकता नाहीं. ही द्यावयाची देणगी आपल्या ज्ञातीच्या हितसंवर्धनाकरितां असल्यामुळें प्रत्येकानें मोकळया मनानें व सढळ हातानें स्वतः आपलें नांव लिहून त्या देणगीचा आंकडा स्वतःच घालावा. ज्याअर्थी तुम्ही मला काय आंकडा घालूं म्हणून विचारतां त्याअर्थी मी जो आंकडा घालीन तेवढा तरी तुम्ही घातला पाहिजे हें तुम्हांला कबूल असेल तर माझा

आंकडा मी स्वतः घालतों. त्यानंतर या कागदावर घातलेले आंकडे हे ज्यानें त्यानें स्वतः घातलेले नसल्यामुळें तो एक प्रकारें त्यांच्यावर जुलूमच आहे; तसें न व्हावें म्हणून हा कागद रद्द करून दुसरा कागद हाच मजकूर लिहून तयार करा. त्या कागदावर प्रत्येकानें स्वतःचें नांव लिहून आपल्या मनाला वाटेल तो आंकडा घालावा व आंकडा स्वतः लिहिल्यामुळें ती रक्कम देण्याचें नैतिक बंधन त्या माणसावर रहातें व तो आंकडा दुसऱ्या माणसानें घातल्यास ते नैतिक बंधन रहात नाहीं.' असेंहि मी त्यावेळीं सभेंत सांगितलें.

असें माझें भाषण झाल्यानंतर तो कागद रद्द करून त्यांनीं दुसरा कागद तो मजकूर लिहून तयार केला व तुम्हीच प्रथम आंकडा घाला असें म्हणून तो कागद माझ्या हातांत दिला. कोणावर अन्याय होऊं नये म्हणून मी एकपासून बावीसपर्यंत नंबर लिहून बाविसाव्या नंबरावर माझें नांव लिहिलें व त्याच्यापुढें पांच हजार रुपयांचा आंकडा घातला.

त्यापूर्वींच माझें भाषण ऐकून सभेचा नूर एकदम बदलला होता. अध्यक्षांनीं माझा आंकडा पाहिल्यावर आपणहि नांव लिहून तेवढाच आंकडा टाकला. त्यानंतर हें काम चालू असतानांच सभेंतील कांहीं लोकांनीं आंकडे लिहून घेण्याच्या कामीं प्रारंभास पुढाकार घेणाऱ्या व्यक्तींपुढें तो कागद केला त्यांनींहि माझ्या एवढाच आंकडा घातला. त्यानंतर दुसऱ्यानें आंकडे घालण्याच्या पद्धतीमुळें सभेंत जें एक प्रकारचें वातावरण निर्माण झालें होतें त्याला माझ्या भाषणानें एकदम कलाटणी मिळून जेथें दोनतीन तासांत मोठ्या मिनतवारीनें सात हजार रुपये जमण्याचा रंग दिसत होता, तेथें सुमारें अर्ध्या तासांत ७००० ची रक्कम ७०००० रुपयांपर्यंत वाढली.

★

## गांधींचा खून आणि ब्राह्मणांवर संकट

१९४८ च्या २५ जानेवारीस माझी सावत्र बहीण सौ. गंगू फार आजारी असल्याचें मला समजलें म्हणून मी तांतडीनेंच विमानानें नागपूरला गेलों. मी गेल्यानंतर ३–४ दिवसांनीं तिची प्रकृति सुधारली. इतक्यांत ३० तारखेस संध्याकाळीं पांच साडेपांचचे दरम्यान आपले पूजनीय पुढारी महात्मा गांधी यांचा खून झाल्याची बातमी समजली. त्यानंतर रात्रभर रेडियोवरूनहि गांधीजींच्या जीवन-चरित्राची हकीगत सांगितली जात होती. एकंदरींत ती बातमी फारच दुःखदायक होती. गंगूला बरें वाटलें होतेंच.जातांना मी परतीचें तिकीट काढून गेलों होतों.विमान कंपनीच्या ऑफिसमध्यें टेलिफोन करून सकाळच्या विमानांत जागा राखून ठेवली व साडे अकराच्या सुमारास विमानतळावर आलों. तेथें मुंबईकडे जाणाऱ्या विमानाला तास दीड तास उशीर लागेल असें समजलें. जवळ जवळ दोन तास उशीरानें साडेतीन वाजतां विमान सुटलें व सहा वाजतां मुंबईला आलें. मी सहज दुकानांत फोन केला. विल्सन कॉलेजजवळ गडी पाठवणें शक्य असल्यास पाठवा असें

गोविंदाला सांगतांच तो म्हणाला, 'मी कांहीं कामाकरितां आतांच दुकानांत आलों होतों परंतु आमचीं सर्व दुकानें आज बंद असून वातावरण चमत्कारिक आहे. त्यामुळें कुणी गडी जवळ नाहीं. व आम्हांपैकीं कुणी येऊं शकणार नाहीं. कारण आम्हाला बाहेर पडणें फार मुश्कीलीचें आहे;' असें म्हणून त्यानें फोन ठेवला. नंतर कांहीं वेळानें विमान कंपनीच्या बसनें आम्ही निघालों. परंतु आतां उतरावें कोठें असा सर्वच प्रवाशांना विचार पडला. कित्येकांनीं परभारें ऑफिसमध्येंच जावयाचें ठरविलें. परंतु बसला त्या दिवशीं अशी सूचना होती कीं, आपल्या मार्गावरतीं पण उतारू सांगतील तेथें त्यांना उतरा. विमानतळाहून निघून कँप कॉर्नरला येईपर्यंत रस्त्यामध्यें टॅक्सी अगर खाजगी वाहन दिसलें नाहीं. फक्त पोलिसांच्या गाड्या फिरत होत्या. कोठें उतरावें असा विचार माझे मनांत चालू असतांनाच बस विल्सन कॉलेजजवळ आली. पण मी तेथें न उतरतां कैवल्यधामाजवळ उतरलों व बिस्तरा हातांत घेऊन ठाकूरद्वारचे नाक्यापर्यंत आलों. तों तेथील वातावरण भीतिदायक व चमत्कारीक दिसलें. तसाच कडणीकडणीनें सरकारी तबेल्याजवळ येतांच गिरगांवकडून एक मोठी मिरवणूक येत असलेली दिसली. त्यावेळीं ते करीत असलेल्या घोषणा ऐकून मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाली. म्हणून मी आगबोटीच्या तिकीटऑफिसमध्यें शिरलों. तिकीटमास्तरांनीं मला पहातांच माझा बिस्तरा बाजूला ठेवून मला आंतल्या खोलींत बसावयास सांगितलें. ती मिरवणूक पुढें निघून गेल्यानंतर मला घरापर्यंत पोंचविण्यासाठीं ते स्वतः व बरोबर एक गडी असे आले. त्यावेळीं ओवळवाडी व आंग्रे यांची चाळ यांत जोरानें दगडफेक चालली होती. तिकीटमास्तर व गडी हे बोरभाट गल्लीपर्यंत आल्यावर त्यांना मी परत जावयास सांगितलें. कारण सात वाजतां कर्फ्यू असल्याचें ते बोलले होते. सात वाजण्यास त्यावेळीं पांचदहा मिनिटेंच कमी होतीं. जीवनजी महाराज चाळीच्या दरावज्यांत दोन सार्जंट व तीन पोलीस उभे असल्याचें मी पाहिलें. त्या धीरावर मी पुढें येत असतांना दुकानापासून पिंपळापर्यंत शंभर फूट जाईपर्यंत जी जी व्यक्ति मला दिसली त्यांची माझ्यावर खिळलेली दृष्टि मला फारच भयानक वाटली. परंतु परमेश्वरकृपेनें मी सुरक्षित घरीं पोंचलों. घरीं पोंचल्यावर घसा कोरडा पडल्यामुळें पाणी पिण्यास घेतलें. परंतु पाण्याचा आंवढा मला गिळतांच येईना. लगेच चहा आला; पण तोहि माझ्या घशाच्या खालीं जाईना इतका मी गर्भगळीत झालों होतों. कारण इथल्या परिस्थितीची मला कांहींच कल्पना नव्हती.

पुढें दोनतीन दिवस वातावरण बरेंच तंग होतें. त्या तंग वातावरणांत आमचें परळचें दुकान फोडून सर्वस्वी लुटलें गेलें. तसेंच दादरचें दुकानहि थोडेसें फुटलें. आमच्या मुगभाटच्या दुकानावरहि दगडफेक झालीच होती. त्याचप्रमाणें ठाकुरद्वारचें दुकान फोडण्याचा प्रयत्न झाला; पण तो यशस्वी झाला नाहीं. कोटांतल्या दुकानाला मात्र कांहीं दगाफटका झाला नाहीं. पुढें तें वातावरण फारच चिघळलें. पुणें, सातारा सांगली, वाई, वगैरे भागांतून खेडोपाडीं कैक ब्राह्मणांचीं घरें जाळलीं गेलीं व पुष्कळसा ब्राह्मणवर्ग निर्वासित झाला. हें एक ब्राह्मण समाजावर मोठें अरिष्टच आलेलें होते!

★

## आम्हीं सारे भाऊ वेगळे असूनहि एकत्र आहोंत!

आम्हीं ज्यावेळीं बेडेकर सदन नं. ३ व ४ वर राहण्यासाठीं मजले घेतले तेव्हां मी आम्हा सर्व बंधूंना जवळ जवळ रहातां येईल अशा विचारानें दोन मजले घेण्याचें ठरविलें होतें. त्यावेळीं पांचव्या मजल्यावर पाणी चढत नसल्यामुळें चौथ्या मजल्यावर स्वयंपाकघरें व पांचव्या मजल्यावर झोंपण्याच्या खोल्या व एक हॉल ठेवावा असें योजिलें होतें. परंतु भाऊ वर राहावयास येण्यास कबूल होईनात. तेव्हां त्यांना मी असें सांगितलें कीं, जर आम्हीच एकटे वर रहावयास गेलों तर लोक मला ठपका देतील व आपली तेवढी सोय करून घेतली; भावांची सोय केली नाहीं, असें लोक मला म्हणतील. तरीपण ते कबूल झाले नाहींत म्हणून एका मजल्याचें काम आमच्या रहाण्यासाठीं आमच्या सोईप्रमाणें करून घेतल्यावर वरचा मजला घ्यायचें आम्हीं तहकूब केलें. आम्ही गुरुवार तारीख २१ जून १९५१ शके १८७३ रोजीं रहावयाला यावयाचें ठरविलें होतें. त्याच्या आधींच्या सोमवारीं गोविंदा वर कसें काय काम झालें आहे तें पहाण्यास पहिल्यानेंच वर आला व शेवटची खोली मला पसंत आहे, मी रहायला येऊं का असें त्यानें विचारलें. तेव्हां तूं येतोस तर मला आनंदच आहे; तूं अवश्य ये असें मी त्याला म्हणालों. ती खोली आम्ही चि. बंडूसाठीं झोंपण्याची खोली म्हणून ठरविली होती. पण ती गोविंदाला द्यावयाची ठरवून गुरुवारपर्यंत त्यांत ओटा वगैरे घालून तयार केली. गुरुवारीं आम्हीं ठरल्याप्रमाणें शांति वगैरे करण्यासाठीं वर आलों. पाठोपाठ सामान येत होतें. आमच्या बरोबरच येऊन गोविंदाहि आमच्याकडे जेवून आपल्या खोलींत जाऊन राहिला. परंतु त्याच्या बायकोला येथें रहावयास येणें मनापासून पसंत नव्हतें. त्यानंतर ती कांहीं काळानें तेथें येऊन राहिली. त्यावेळीं आमची सावत्र आई तेथेंच होती. तिला मी पुष्कळ समजावून सांगितलें कीं, गजाननानें वास्तविक येथें रहायला यायला हवें; पण तो ऐकत नाहीं. पण कांहीं दिवसानंतर आईनें समजूत घातल्यामुळें रहावयास येण्यास तो कबूल झाला. पावसाळा संपल्यानंतर वरचाहि मजला घेतल्यावर तो वर रहावयास आला व गोविंदाहि वरच्या मजल्यावर रहावयास गेला. त्यावेळीं बाळू हा कोंकणांत होता. बाळूला मात्र ‘ मी तोंडघशीं पडलों ’ असें वाटलें. तो पुढें मुंबईस आल्यावर आमची खालची जागा एका बहिणीला व एक सरकारच्याहातीं ( ॲकोमोडेशन डिपार्टमेंट ) गेल्यामुळें त्याची एकदोन वर्षे रहावयाची गैरसोय झाली. नंतर १९५६ सालीं बाजूची सदन नं. ५ ही चाळ आम्ही दुरुस्त केली तेव्हां बाळूला तीन खोल्या देऊन तेथें त्याची रहाण्याची सोय केली.

अशा तऱ्हेनें सर्वभाऊ जवळ जवळ पण निराळे रहाण्याची माझी इच्छा परमेश्वरानें पुरी केली.

★

## मुंबईच्या गोदींत झालेला स्फोट

१४ एप्रिल १९४४ चैत्र वद्य ६ रोजीं दुपारीं तीन वाजतां आम्हीं चहा पिण्याकरितां दुकानांतून घरीं गेलों. सौभाग्यवतीनें चहाचा कप हातांत आणून दिला. तोंच

खालून एका गृहस्थानें मला हांक मारली. कोण हांक मारते हें पहाण्यासाठीं मी कप खालीं ठेवून गॅलेरींत आलों. तेव्हां पोस्ट ऑफिसचे एक गृहस्थ खालीं उभे दिसले. त्यांच्या बरोबर आमचे एक मित्र कै. पुरुषोत्तम लक्ष्मण खांडेकर यांचा मुलगाहि दिसला. त्यानेंच मला हांक मारली होती. पोस्टांतून आलेले गृहस्थ खांडेकरांचे पगाराचे पैसे त्यांच्या-बायकोला देण्याकरितां त्यांच्या घरीं जात होते. व पैसे दिल्यानंतर साक्ष घालण्या-करितां म्हणून मला त्या मुलानें बोलाविलें होतें. म्हणून चहा न पितां तसाच मी खालीं उतरून सदन नं. ५ मधील त्यांच्या घरीं जाण्यास निघालों. तेथें जात असतांना वरून एक विमान गेलें. तें मलबारहिलकडून गोदीकडे गेलेलें दिसलें. पुढें आम्ही खांडेकरांच्या घरीं गेलों. आलेल्या गृहस्थानीं खांडेकरांच्या बायकोला पैसे दिले. तिची सही घेतली व मला साक्षीदार म्हणून सही करण्याकरितां तो फॉर्म दिला. त्यावर मी सही करून पेन परत त्यांच्या हातांत देत असतांना कांहींतरी मोठा आवाज झाला व आम्ही बसलेली चाळ एकदम इतकी हादरली कीं माझ्या हातांतलें पेनच उडालें. यापूर्वी दोनतीन वेळा आम्हीं मुंबईकरांनीं धरणीकंपाचा थोडासा अनुभव घेतला होता. धरणीकंप झाला असतां ताबडतोब खालीं उघडया जागेंत यावें असें त्या त्या वेळीं ऐकलें होतें. ती चाळ एवढ्या मोठ्यानें हादरली कीं त्यावेळीं मला धरणीकंपामुळेंच चाळ हादरली असावी असें वाटलें. म्हणून पायांत वहाणाहि न घालतां मी मैदानांत आलों. परंतु तो हादरा बसल्यानंतर जमीन हालत नव्हती म्हणून तसाच दुकानांत गेलों. तों दुकान समोरच्या मुगभाट क्रॉसलेन मधून व ट्राम रस्त्यावरून प्रत्येक मनुष्य धांवत कांदेवाडीकडे जात असल्याचें दिसलें. तेवढ्यांत एकदोन माणसें दुकानांत शिरलीं. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, मघाशीं जें विमान गेलें त्यानें गोदी भागांत बॉंब टाकले असावेत. तिकडे भयंकर आग लागलेली दिसते. म्हणून मी त्या इमारतीच्या गच्चीवर गेलों. तेव्हां गोदीभागाकडे प्रचंड धूर व आग भडकल्याचें दिसलें. थोड्या वेळानें खालीं उतरून घरीं गेलों.

घरीं येतों तो खोल्यांतील कांहीं दरवाजांचीं झडपें एकमेकांवर चढून बंद झालीं असून आंत माणसें अडकलीं आहेत. व त्यांना ते दरवाजे उघडत नाहींत असें दिसलें. म्हणून आम्हीं दोघां तिघांनीं जोर करून ते दरवाजे उघडले. त्यानंतर सौ. नें पुन्हां चहा करून कप माझ्या हातांत दिला. एवढ्यांत पुन्हां कानठळ्या बसविणारा आवाज झाला. पहिला आवाज साडेतीन पावणेचारच्या सुमारास व दुसरा आवाज सव्वाचारचे सुमारास झाला असावा. तेव्हां तो कप खालीं ठेवून मी चहा न पितांच खालीं आलों. पहातों तों रस्त्यावर माणसें सैरावैरा धांवत होतीं. आमच्या बिऱ्हाडाचे वर चौथ्या मजल्यावर रहाणारे श्री. वर्तक हे अतिशय त्वरेनें वाडींत शिरतांना दिसले. त्यांना गोदींत नोकरी असल्याचें आम्हाला माहीत होतें.

म्हणून 'विमानानें बॉंब टाकलें काय' असें त्यांना विचारतांच ते म्हणाले कीं, व्हिक्टोरिया डॉकमध्यें घड्याळासमोरच्या गोदींत एका दारूगोळा असलेल्या बोटीला

आग लागली असून पहिला आवाज हा त्या दारूगोळ्याचा स्फोट होता. परंतु अशा आणखी दोन बोटी तेथें आहेत. जर यांतली ठिणगी उडून त्या बोटींना आग लागली तर या मुंबईची काय स्थिति होईल सांगता येत नाहीं, असें सांगून ते आपल्या घरीं गेले व मी दुकानांत गेलों. पण पुन्हां चहा न घेतल्याची आठवण झाल्यामुळें पुन्हां घरीं आलों. पुन्हां सौ. नें. नवा चहा करून कप हातांत दिला. तो कप मी हातांत घेतों तोंच आमचीं पापड करणारीं माणसें आमच्या दरवाजांत येऊन उभीं राहिलीं. तीं अगदीं घाबरलेलीं व भयभीत झालेलीं होतीं. त्यांच्या रहात्या घराचे जिन्यावर एक मोठा थोरला लोखंडाचा जळता तुकडा येऊन पडला होता व जिने जळत होते. त्यामुळें भयभीत होऊन कसेंबसें घर बंद करून मुलाबाळांसह पंधरा सोळा माणसें धांवत पळत आमच्या घरीं आलीं होतीं. कारण तीं आमचींच पापड करणारीं माणसें होतीं व मालक या दृष्टीनें आधार म्हणून आमच्याकडेच तीं आलीं. त्यामुळें मी तिसरा कपहि खालीं ठेवला. असा चहाचा कप तीन वेळां हातांत घेऊनहि मला खालीं ठेवावा लागला. त्या माणसांना पाणी वगैरे देऊन पुन्हां १५–२० कप चहा करून त्यांच्यासह मी चहा प्यालों.

हीं माणसें वडगादीवर रहात असत. त्यानंतर मी दुकानांत जाण्याकरितां खालीं आलों, तो वडगादीं, मशीदबंदर या भागांतील व्यापाऱ्यांच्या वखारींतील घाटी माणसें कांहीं बायकामुलांसह आश्रयार्थ आमच्याकडे आलेलीं दिसलीं. त्यांची विचारपूस करून त्यांना शेजारच्या हॉटेलमधून चहापाणी देवविलें.

दादरच्या दुकानांत पाठविण्याकरीतां म्हणून शेगड्या, तवे, गाळ्या वगैरे माल त्याच दिवशीं आणविला होता. दुकानांत गव्हाचें, तांदळाचें व चण्याचें पीठ होतेंच. पाण्याचीहि सोय होतीच. एक दोन गोणी कोळसे आणवून त्यांना रात्रीचें जेवणाकरितां गव्हातांदुळाचें पीठ, तवे, शेगड्या व कोळसे देऊन रात्रीं त्यांना जेवण करून जेवण्यास सांगितलें. त्याप्रमाणें रात्रीं पांच पन्नास माणसें भाकरी-पोळी व झुणका जेवलीं. सकाळीं परत तीं वडगादीच्या भागाकडे न जातां गांवीं जातों असें सांगून निघून गेलीं. पण पुढें पापड बनाविणारें कुटुंब मात्र वर्ष दीड वर्ष आमच्या घराच्या गच्चीवरच रहात होतें. कारण त्यांच्या घराचे जिने जळून गेल्यामुळें वर जाण्याचा मार्गच नव्हता. त्यांतच त्यांतली मुख्य बाई बाळंत होऊन तिला मुलगा झाला.

त्या स्फोटाचा परिणाम हजारों माणसांच्या मरणांत व बाजाराकडील भाग उध्वस्त होण्यांत झाला.

★

## सासूबाईंना देवाघरची चिठ्ठी !

आमच्या सासूबाईंना जवळ जवळ २० वर्षें आम्लपित्ताचा विकार होता. त्यावेळीं राजापूर येथील सरकारी दवाखान्यांत मराठे या नांवाचे डॉक्टर होते. सासूबाईंना तपासल्यानंतर त्यांनीं असें सांगितलें कीं, यांचें ऑपरेशन करावें लागेल.

हें आम्लपित्त नव्हे. त्यानंतर दोन महिन्यांनीं १९३३ च्या भाद्रपद शु. १५ ला ५९ व्या वर्षी तिच्या मुलानें तिला मिरजेच्या हॉस्पिटलांत नेलें. तेथील डॉक्टरांनीं तिला ठेवून घेऊन त्यांच्यावर शस्त्रक्रियाहि केली. त्यावेळीं असें दिसून आलें कीं, त्यांचें लहान आंतडें सुमारें दीड फूट चिंबलेलें होतें, तें त्यांनीं कापून काढलें व बाकीचें आंतडें जोडून दिलें. हें पोटांतलें आंतडें बरेंच लांब असतें. तोंपर्यंत कांहीं खाल्ल्याबरोबर उलट्या होणें म्हणजे आम्लपित्त अशी समजूत असे व याप्रमाणें तिला २० वर्षें औषधोपचार चालू होते. परंतु डॉक्टर मराठे यांना बरोबर परीक्षा झाल्यामुळें अगदीं अंथरुणांत पडलेल्या आमच्या सासूबाई खडखडीत बऱ्या होऊन आपल्या घरीं आल्या व अशा रीतीनें त्यांची देवाघरची चिठ्ठी परतली.

ऑपरेशनला जातेवेळीं ती सर्वांचा शेवटचा म्हणून निरोप घेऊन गेली होती. व मुलानें मिरजेस गेल्यावर तसें पत्रहि मला पाठविलें होतें. म्हणून आम्हीं उभयतां तिला भेटावयास गेलों होतों.

★

## सासूबाईंची देवाघरची चिठ्ठी पुन्हां परतली

१७ नोव्हेंबर १९५७ रोजीं सासूबाईंना जुलाब होऊं लागले व त्यांतच ताप भरला. ताप भरल्यानंतर त्यांचा डॉक्टर नातू गोविंद महादेव दांडेकर याचें औषध सुरूं केलें. परंतु ताप अगर जुलाब याला उतार पडेना. डॉ. दांडेकर हे पोद्दार हॉस्पिटलमध्यें असल्यामुळें येथील धामणकर डॉक्टरांना त्यांनीं इंजेक्शनें द्यावयास सांगितलें होतें. ता. २० रोजीं तिचा आजार जास्तच बळावला. म्हणून संध्याकाळीं ब्राह्मण बोलावून प्रायश्चित्तसुद्धां घेऊन झालें. दुसरे दिवशीं २१ तारखेस कार्तिक वद्य ३० ला आजार आणखीनच बळावला. रात्रीं आठ वाजतां धामणकर डॉक्टर इंजेक्शन द्यावयास आले. परंतु त्यावेळीं त्यांची नाडीहि सांपडेना व सबंध दिवसांत लघवीहि झाली नव्हती. म्हणून ते इंजेक्शन देण्यास तयार होईनात. एवढ्यांत दांडेकर डॉक्टर आले व दोघांनीं चर्चा करून इंजेक्शन दिलें. परंतु ते मला म्हणाले, हिची आशा आतां सुटलेली आहे. पण एक उपचार अजून करून पहाण्यासारखा आहे. पण त्यासाठीं तिला हॉस्पिटलमध्यें नेणें भाग आहे. तो उपाय काय म्हणून विचारतां जर सलाइन दिलें गेलें तर अजूनहि ती बरी होऊं शकेल असें ते म्हणाले. सध्यां त्या आमचेकडेच रहात असल्यामुळें त्यांचा मुंबईतील सर्व परिवार त्यावेळीं आमचेकडे हजर होता; परंतु तिला हॉस्पिटलमध्यें नेण्याची कल्पना कोणालाच पसंत पडली नाहीं. कारण हॉस्पिटलपर्यंत पाळी येईल अशी कोणालाच खात्री नव्हती. त्या दिवशीं रात्रीं साडेनऊपर्यंत अमावास्या होती. म्हणून मी डॉक्टर दांडेकरांना म्हटलें कीं, सलाईनचें इंजेक्शन घरीं मिळविण्याची खटपट करा. साडेनऊ वाजून कांटा जरा पलिकडे जातांच सलाईनच्या इंजेक्शनची सामुग्री मिळविण्याच्या खटपटीस मुलगे व डॉ. दांडेकरहि लागले. रात्रीं अकरा वाजतां सलाईनच्या इंजेक्शनचे दोन सेट आमचे घरीं हजर झाले. व लगेच तें इंजेक्शन देण्यास सुरुवात

झाली. व त्यांनाहि जरा आराम वाटूं लागला. म्हणून मी जरा लवंडलों तों पांच वाजतां जागा झालों. त्यावेळीं डॉक्टरसह सर्व माणसें होतीं तिथेंच झोपलेलीं असून इंजेक्शनहि काढून ठेवलेलें होतें. मी उठल्यानंतर सगळ्यांना जागे करून चौकशी करतां जरूर तेवढें इंजेक्शन दिलें गेलें असल्याचें समजलें व नंतर त्यांना गुण पडूं लागला व त्या पुन्हां खडखडीत बऱ्या झाल्या व अशा तऱ्हेनें त्यांची देवाघरची दुसरी चिठ्ठीहि परतली. सासूबाईचें वय ८६ वर्षांचें असून त्यांच्या परिवारांत दोन मुलगे, दोन मुली, दोन सुना, पंधरा नातू, आठ नाती, तेरा पणतू व पांच पणत्या; दोन जांवई, पांच नातसुना, पांच नातजांवई व त्या स्वतः मिळून साठ माणसें आहेत.

## १३ संकीर्ण आठवणी

### सत्संगतीचा लाभ

**एक** दिवस असाच मी दुकानांत बसलों असतांना संन्यास वेषांतील एक गृहस्थ दुकानांत आले. त्यांना पहातांच माझ्या मनांत त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न झाला चार शब्द एकमेकांचे झाल्यानंतर तो वाढला. तेव्हां यांचा कांहींतरी आदरसत्कार करावा म्हणून मीं त्यांना आमच्या बिऱ्हाडीं घेऊन गेलों. त्यावेळीं आम्हीं हातों जेवण करीत असून दुसरें कोणी घरांत नव्हते. मी त्यांना म्हटलें, 'तुम्ही कांहींतरी घ्यावें अशी माझी इच्छा आहे. चहा, कॉफी, दूध काय देऊं ?' ते म्हणाले, 'चहा, कॉफी मी घेत नाहीं व दूध आतां नको. कांहीं फळ असल्यास चालेल; पण बाहेरून आणूं नको !' त्या दिवशीं आम्हीं हापूसचे एक डझन हिरवे आंबे सकाळींच घेतलें होते. तेव्हां त्यांना मी म्हटलें, 'फळ बाहेरून आणावयाचें नाहीं असें तुमचें जर म्हणणें असेल तर तसें तयार खाण्यासारखें फळ कांहीं माझ्याकडे नाहीं. परंतु हिरवे आंबे एक डझनभर आज सकाळीं पिकविण्याकरितां म्हणून घेतले आहेत. त्यातलें फळ दिले तर घ्याल ना ?' त्यावर ते 'प्रभूची मर्जी चालेल !' असें म्हणाले. त्यामुळें मी परडींतले आंबे पाहिले. सकाळीं मी आंबे घेतले ते अगदीं हिरवे होते. त्यांना जरासुद्धां पिवळसर झांक आलेली नव्हती. पण आतां परडींत पाहिलें त्यावेळीं त्यांतला एक आंबा पिवळा रसरशीत व पक्व झालेला आढळला. मला आश्चर्य वाटलें. म्हणून मी त्यांना ती आंब्याची हकिकत सांगितली. त्यावर ते पुन्हां 'प्रभुकी मर्जी' म्हणाले. त्यावर मी तो आंबा कापून बशीत घालून त्यांच्यापुढें ठेवला. त्यांनीं फक्त एक फोड घेतली व बाकीचे 'सब लोक खाव' असें म्हणून ते जाण्यासाठीं उठलें. तो झालेला चमत्कार पाहून माझा त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित झाला; परंतु त्यांच्याजवळ काय बोलावें हें सुचण्यापूर्वीच ते उठून निघून गेले. ते जिने उतरून जाईपर्यंत मी त्यांच्याकडे पाहातच होतों. त्यांना हांक मारण्याचेंहि मला भान राहिलें नाहीं.

अशा तऱ्हेनें मला माझ्या आयुष्यांत अल्पकाळ तरी कां होईना, पण सत्संगतीचा लाभ झालेला आहे.

★

### अण्णा, प्रश्न बघा

आमच्या दुकानाच्या समोरील माधवदास प्रेमजीचे चाळीच्या तळमजल्यांत बाबुराव वर्तक या नांवाचे एक गृहस्थ रहातात. तीस वर्षांपूर्वी एकदां त्यांची बहीण

येसूबाई ही सकाळीं सात साडेसातच्या सुमारास दुकानांत आली व म्हणाली, 'अण्णा, प्रश्न बघा' मी तिला विचारलें, 'काय झालें?' ती म्हणाली, 'माझ्या हातांतील आंगठी काल रात्रीं झोंपतांना कुठें काढून ठेवली ती सांपडतच नाहीं. आम्हीं घरांतील ट्रंका, फळ्या, डबे, केर सर्व तपासले पण कुठेंच मिळत नाहीं.' त्यावर मी घड्याळाकडे पाहून त्यावेळेप्रमाणें प्रश्न बघितला. त्यावर आंगठी 'अंतरिक्षांत' किंवा अधांतरी आहे असें उत्तर आलें. म्हणजे माझ्या दृष्टीनें जमिनीवर अगर कोणत्या डब्यांत नाहीं एवढें निश्चित ठरलें. कुठें तरी ती उघड्या स्थितींत पण उंचावर असली पाहिजे. सर्व फळ्या तपासल्या असें ती म्हणत होती. म्हणजे फळीवर असेल असेंहि म्हणतां येईना. त्याकाळीं पुष्कळ लोकांकडे दत्ताच्या तसबिरी असत. त्याला निरांजन लावण्यासाठीं पुढें बारीकशी दोन तीन इंचाची फळी मारलेली असे. म्हणून मी तिला विचारलें कीं, 'तुझ्याकडे पुढें फळी मारलेली दत्ताची तसबीर आहे का?' त्यावर ती 'हो' म्हणाली. 'मग त्या फळीवरच आंगठी आहे बघ जा' असें मी म्हणतांच ताबडतोब ती धांवत गेली व दोन तीन मिनिटांत धांवत परत येऊन तिनें मला ती आंगठी दाखविली. अशा तऱ्हेनें त्यांना हरवलेली आंगठी सांपडली.

प्रश्न पाहिल्यानंतर उत्तर सांगतांना सुद्धां थोडें तारतम्य वापरावें लागतें हें त्यावेळीं माझ्या अनुभवास आलें.

★

## सात मुलींनंतर मुलगा झाला

ता. २०–४–३३ रोजीं संध्याकाळीं पांचचे सुमारास आमच्या दुकानांत एक मुलगी नारळ घेण्यासाठीं आली. तिच्याबरोबर एक हमाल असून त्याच्या डोक्यावर खाट होती. ती खाट पाहिल्यावर मी तिला सहज विचारलें, 'ही खाट गो कशाला?' त्यावर ती म्हणाली, 'माझ्या आईचें बाळंतपणाकरतां'

या मुलीचें त्यावेळचें आडनांव 'पडते' असें असून सासरचें नांव नाईक आहे. तिचे वडील उरणकर वाडींत रहात. खाट नेण्याचें कारण मला कळल्यावर अंकशास्त्राप्रमाणें मी तिला सांगितलें कीं तुझ्या आईला मुलगा होईल. त्यावर ती ठसक्यतांच म्हणाली, 'काय सांगतां, आमची आई बाळंत व्हायची म्हणजे मुलगीच व्हायची, आम्ही सातजणी' त्यावर मी पुन्हां प्रश्न पाहिला. तों तेंच उत्तर आलें. म्हणून मी तिला निक्षून म्हटलें, 'एकदां तोंडातून शब्द आले ते आले. मुलगाच होईल. जा.' ती बाई रात्री दहा अकराचे सुमारास बाळंत होऊन तिला मुलगा झाला. तोंपर्यंत ती वरील संवाद कुणाजवळ बोलली नव्हती. पण मुलगा झाल्याचें समजतांच ती वडिलांना म्हणाली, 'आत्ताच्या आत्ता पेढे घेऊन या. ते मला बेडेकरला द्यायचे आहेत' मुलगी खनपटीस बसल्यामुळें व त्यांनाहि मुलगा झाल्याचा आनंद झाला असल्यामुळें लगेच ते पेढे घेऊन त्या मुलीसह दुकानावर आले. पण त्यावेळीं आमचें दुकान बंद होतें. पहांटे पांच साडेपांचला आम्हीं दुकानचा दरवाजा उघडतों तोंच हीं दोघेजणें दुकानावर हजर झालीं. मला

पहातांच त्यांनीं मला विचारलें, 'बेडेकर, तुम्ही माझ्या मुलीला काय सांगितलेंत?' तेव्हां मी जरा चमकलों. व म्हटलें कीं, 'प्रश्नाचें जें उत्तर आलें तें मी सांगितलें; पण मुलगा झाला आहे का?' तेव्हां ते म्हणाले कीं, 'हो, मुलगा झाला व मुलगा झाल्याबरोबर मुलीनें सांगितल्यावरून पेढ्याची पुडी घेऊन तुमच्या दुकानावर चारपांच फेऱ्या मारल्या. सगळीं दुकानें बंद. त्यामुळें तुमचें घर कुठें आहे तें समजून शकलें नाहीं.' त्यानंतर ते पेढ्यांची पुडी देऊन निघून गेले.

★

## प्रश्न बघण्याचा नाद सुटला

वरीलप्रमाणें मी पुष्कळ लोकांचे प्रश्न पहात असे. व ते निरपेक्ष व विनामूल्य असत. तरी कोणी पेढे वगैरे आणून देईच. तो मला एक व्यापच होऊन बसला. एक दिवस एक गृहस्थ मला मुलगा होईल कीं मुलगी तें विचारावयास आले. त्यांची बायको प्रसूत व्हावयाची होती. त्यावेळेप्रमाणें गणित करून मी प्रश्नाचें उत्तर बघितलें. तों बाकी शून्य आली. ज्या गुरूपासून मी हें शिकलों होतों त्यानें मला शून्य बाकी म्हणजे काय तें शिकविलें नव्हतें. त्या दिवसापर्यंत मी शेकडों प्रश्न पाहिले असतील. पण शून्य बाकी कधीं आलीच नव्हती. म्हणून मी त्यांना प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. व 'पुढें पुन्हां केव्हांतरी प्रश्न बघूं' असें सांगितलें. परंतु त्यानंतर त्याची बायको प्रसूत झाल्यावर मूल मृत स्थितींत जन्मलें व तें मला समजल्यापासून आपलें ज्ञान अगदींच तुटपुंजें आहे, असें वाटून मी प्रश्न पहाण्याचा नाद जो सोडला तो कायमचाच.

★

## जेवून खाऊन नोकरी

आमच्यासारखे किराणा मालाचे दुकानदार नोकरलोकांची आपल्याच घरीं जेवणखाण व रहाण्याची सोय करीत. कारण त्यावेळीं आमच्यासारख्या दुकानदारांना नोकर मिळणें कठीण असे. जे थोडे बहुत शिकलेले असत ते सरकारी नोकरी करीत. जे अशिक्षित असत ते गांवीं भिक्षुकी अगर शेतीवाडी करीत. म्हणून आपण ठेवलेला नोकर जर टिकावयास हवा असेल तर जेवून खाऊन व रहाण्यासह ठेवणेंच इष्ट ठरे. त्यामुळें तो चोवीस तास आपल्या ताब्यांतहि राही. तसेंच कपड्यालत्त्याचा जास्त खर्च पडूं नये म्हणून डोक्यावर टोपी व नेसावयास धोतर, अंगांत सदरा नाहीं, अशा पोषाखांत मालक व नोकरहि दुकानांतील कामें करीत. बाहेर जावयाच्या वेळीं सदरा घालावयाचा. मीहि लहानपणीं दुकानांत अशाचप्रकारें काम करीत असे. धोतरापूर्वी तुमान व टोपी असे.

नरूकाका काळे नांवाचे एक दुकानदार तर मुठींत पैसे घेऊन सदरा घातल्याशिवायच बाजारांत जात व माल घेऊन तसेच परत येत. एकदां एका सरकारी नोकरीवाल्या गृहस्थानें त्यांना सहज विचारलें कीं तुम्हीं असे उघडे कुठपर्यंत जाऊन

याल ? बाबुलनाथला जाऊन याल ? बाबुलनाथापर्यंत जाऊन आलांत तर तुम्हाला एक पैसा देईन. नाहींतर तुम्हीं मला एक पैसा द्यावयाचा, अशी पैज ठरली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां जावयाचें ठरलें. त्याप्रमाणें ते ऑफिसवाले गृहस्थ आठचे आधींच बाबुलनाथाचे मंदिरांत जाऊन बसले. पैज ठरल्याप्रमाणें नरूकाका बरोबर आठ वाजतां बाबुलनाथाच्या देवळांत हजर झाले नि पैज हरल्याबद्दलचा पैसा त्यांनीं ठरल्याप्रमाणें आमचे दुकानीं येऊन आमचे समोर दिला.

★

## जुनी दुकानदारी व जुनीं गिऱ्हाईकें

१११५–१६ चे मानानें घडलेली ही गोष्ट आहे :– एकदां आमच्या दुकानांत पिठीसाखरेला एक गिऱ्हाईक आलें. पण त्यावेळीं ती संपलेली होती. आपण नेहमीं दुकानांत ठेवत असलेल्या वस्तूंपैकीं एखादा जिन्नस संपला व गिऱ्हाईकाला नाहीं म्हणण्याची वेळ आली तर तें आम्हांला अतिशय कमीपणाचें वाटे. त्यावेळीं दुकानांत मी एकटाच होतों. शेजारच्या दुकानदाराकडून आणली तर तो विक्रीच्या भावापेक्षां पैसाभर आमच्याकडून जास्तच घेत असे. 'गुर्जर आणि गडबोले' हे वाजवी भावानें वस्तू देत. पण त्यांच्याकडे जावयाचें म्हणजे दुकानाच्यापुढून उतरून जावें लागणार होतें. दुसरे मॅजेस्टिक सिनेमा समोरचे कृष्णाजी नारायण जोशी हेहि वाजवी भावानें वस्तू देत. पण त्यांच्याकडे जावयाचें म्हणजेहि दुकानांतून पुढच्या दरवाजानें उतरावयास हवें होतें. म्हणून त्या गिऱ्हाईकाला 'जरा थांबा' असें सांगून शक्य तितक्या चपळतेनें, पण धांवत नव्हे. मी नळबाजारांत गेलों. तेथून पिठीसाखर आणून त्या गिऱ्हाईकाला दिली. मी परत यावयास जवळ जवळ अर्धा तास लागला. पण तें गिऱ्हाईक तोंपर्यंत तर थांबलें होतेंच; पण मी येईपर्यंत आलेलीं इतर दोनचार गिऱ्हाईकेंहि त्यानें थांबवून धरलीं होतीं.

म्हणजे त्याकाळीं गिऱ्हाईक दुकानदार यांचा एकमेकांवर अशातऱ्हेचा विश्वास असे.

★

## धंदेवाल्यांना समाजांत कमी मान

कांहीं नातेवाईक परिचित मंडळी आमच्या दुकानावरून जातांना आमच्या दुकानच्या विरुद्ध बाजूनें जात; पण आमच्या दुकानच्या बाजूनें कधीं जात नसत. तसेंच त्या काळांतले कांहीं दुकानदारहि कधीं भेट झाल्यास एकप्रकारें कुत्सित भाषेंत बोलत. लग्न समारंभांत अगदीं नजीकच्या व चांगल्या स्नेह्यांकडून सुद्धां आम्हाला आमंत्रण नसे. त्या लग्नाला आमच्याकडून माल मात्र गेलेला असे.

पण पुढें आमचें आमच्या धंद्यांतील स्थान जसजसें सुधारूं लागलें तसतसें या स्थितींत फरक पडूं लागला. पण याला बराच अवधी लोटावा लागला.

★

## घरीं नाहीं तें दारींहि नाहीं

मी पूर्वी मालखरेदीसाठीं बाजारांत जात असे. घरून निघतांना चहा पिऊन निघत असे. बाजारांत गेल्यानंतर बऱ्याचशा व्यापाऱ्यांकडे थोडा थोडा चहा होई.

एक दिवस जरा घाईनें बाजारांत जावयाचें असल्यामुळें मीं घरून चहा न घेतांच बाजारांत जावयास निघालो. पण बाजारांत त्या दिवशीं पुष्कळ व्यापाऱ्यांकडे जाऊनहि कोणीच व्यापारी चहा मागवीना. म्हणून कांहीं वेळानंतर काम झाल्यावरहि थोडा वेळ जास्त बसायचें असें कांहीं व्यापाऱ्यांकडे करून पाहिलें. पण त्या दिवशीं एकाहि व्यापाऱ्यानें माझ्यासाठीं चहा मागविला नाहीं. मला स्वतःला हॉटेलांत जाऊन चहा घेतां आला असता; परंतु तसा हॉटेलमध्यें जाऊन चहा घ्यावयाचाच नाहीं असें ठरवून आणखीहि दोनचार व्यापाऱ्यांकडे मी पुन्हां जास्त जास्त वेळ बसलों. तरीहि कोणी चहा मागविला नाहीं. घरीं आल्यावर सौभाग्यवतीला चहा करावयास सांगून चहा घेतला. तिनें विचारलें आज कुठें चहा झाला नाहीं का? तिला 'नाहीं' असें सांगितलें. त्याचवेळीं मला आजीची आठवण झाली. लहानपणीं ती आम्हाला नेहमीं सांगे कीं, "आपल्याजवळ आहे तें दुसऱ्याजवळ आहे व आपल्याजवळ नाहीं तें दुसऱ्याजवळ नाहीं" त्याचा पडताळा मला त्या दिवशीं आला. वडील माणसांनीं लहानपणीं सांगितलेलीं सुभाषितें पुढें आपल्याला अशीं पटतात.

★

## दक्षिणी दुकानदारांवर अविश्वास !

एकदां माझ्या लहानपणीं एका शुक्रवारीं एका गिऱ्हाईकाकडून अर्धा मण तेल पाठविण्याची ऑर्डर आली. दुकानांत दहा बारा शेर तेल शिल्लक होतें. दुकानांत नोकर नसल्यामुळें आमच्या नेहमींच्या तेलवाल्याकडे मी दुकान बंद करून गेलों. जातांना गल्ल्यांत पैसे नसल्यामुळें एका परिचित दुकानदाराकडे एक रुपया मागितला. पण त्यानें रुपया तर दिला नाहींच; उलट एक रुपयासुद्धां जवळ नसतांना व्यापार करताहेत अशी माझी कुचेष्टा केली. मग मी तसाच तेलवाल्याकडे गेलों व अर्धा मण तेल मागितलें. त्या तेलवाल्याकडे आमचें अशा तऱ्हेचें खातें होतें कीं, सव्वा मण गोडें व अर्धा मण खोबरेल असें तेल आणावयाचें. ते पैसे देऊन पुन्हां दुसरें आणावयाचें. त्यामुळें तो म्हणे कीं अर्धा मण तेल कांहीं मी देणार नाहीं. त्याची मी पुष्कळ समजूत घातली. उद्यां सकाळीं पैसे आणून देतों म्हणून सांगितलें. पण तो कांहींच ऐकेना. त्यावेळीं अर्ध्या मणास पावणेदोन रुपये पडत. माझ्याजवळ एक रुपया होता. पण त्याचे बारा आणे देणें रहात होतें. नंतर मी दहा शेरच तेल मागितलें. कारण दहा शेर दुकानांत शिल्लक होतें. पण तें दहा शेर तेल रोकडीनेंहि द्यायला तो तयार होईना. 'आमी मोटा व्यापारी असा छुटा तेल ओपते नाय, छुटा पाहिजे तो दोन आणे शेरप्रमाणें मिळेल.' पण मला दोन रुपयांत अर्धा मण तेल द्यावयाचें होतें. मी पूर्वी भेंडीबाजारांत तेलाच्या कांहीं वखारी पाहिल्या होत्या. त्यांतील एका वखारींत मी गेलों. पण माझें मराठी त्या मालकाला

समजेना. थोड्या वेळानें त्याचा मेथाजी (कारकून) आला. मालक म्हणाला, 'तेला बोल, तेला बोल' म्हणून मी त्या मेथाजीला माझें म्हणणें समजावून सांगितलें व तो दुकानवाला मला दहा शेर तेल रोखसुद्धां द्यावयास तयार नसल्याचें सांगितलें. तेव्हां त्यानें मला विचारलें, "तुझा दुकान कुठें हाय?" तेव्हां मी त्याला दुकानचा पत्ता सांगितला व व्यापाऱ्यांचे हिशेब दिल्याची सह्या असलेली चोपडी काढून दाखविली. तेव्हां तो म्हणाला, "तूं किती तेल नेते हंमेश" तेव्हां मी त्याला सांगितलें कीं सव्वा मण गोडें व अर्धा मण खोबरेल असें तेल नेतो व त्याचे पैसे देऊन पुन्हां नेतो. व म्हणून तो मला रोकड व उधार कसेंच तेल द्यावयांस तयार नाहीं. तेव्हां तो म्हणाला "तूं दुकानावर ज्या मी तुला तेल पाटवते." त्याप्रमाणें मी दुकानांत येऊन दुकान उघडून बसलों. थोड्या वेळानेंच गोडें व खोबरेल तेल असें घेऊन त्या वखारवाल्याच्या गड्यानें आमच्या दुकानांत आणून ठेवलें व तो आंकड्यावर माझी सही घेऊन निघून गेला. नंतर कांहीं वेळानें आमच्या दुकानासमोरील रस्त्यावरून तो मेथाजी जातांना दिसला. मी त्याला हांका मारल्या; पण तो जलद निघून गेला. तो कांहीं दुकानावर आला नाहीं. तो मेथाजी बहुतेक आमचें दुकान पहाण्यास आला असावा. पुढें मी पैसे द्यावयास गेलों तेव्हां त्याला विचारतां तें त्यानें कबूलहि केलें. त्याकाळीं बरेचसे गुजराथी व्यापारी आम्हां दाक्षिणी दुकानदारांना व्यापारीच समजत नसत. पण त्यांतलेच कांहीं लोक आम्हां दाक्षिणी लोकांबरोबर सहानुभूतीनेंहि वागत.

★

## एका अजब वाण्याची गोष्ट !

आमचें एक गिऱ्हाईक आम्हांला एका वाण्याची गोष्ट सांगत असे. 'एक होता वाणी. तो कांहीं कामाला बाहेर गेला असतांना त्याच्या मुलानें एका गिऱ्हाईकाला दहा शेर (सात रत्तल) साखर उधारीनें दिली. वाणी परत आल्यावर त्याला ती साखर मांडून ठेवण्यास सांगितली. परंतु मुलानें त्या गिऱ्हाईकाचें नांव विचारलेलें नव्हतें. तेव्हां त्या वाण्यानें आपल्या उधारीच्या सर्व गिऱ्हाईकांच्या नांवावर प्रत्येकीं दहा शेर साखर मांडून ठेवली. पुढें हिशेबाचे वेळीं दहा–बारा गिऱ्हाईकांनीं आपण ही साखर नेली नसल्याचें सांगितलें. तेवढ्यांचे पैसे त्यानें काढून टाकले. पण इतर शें–दीडशें गिऱ्हाईकांकडून त्या साखरेचे पैसे वसूल झाले.'

त्या वाण्याच्या मुलासारखाच एक प्रकार मी शाळेंत जात असतांना घडला होता. एका सुटीचे दिवशीं दादा बाजारांत गेले असतांना एका गिऱ्हाइकानें माझ्याकडून पांच शेर (साडेतीन रत्तल) तूप नेलें. परंतु मी त्या मुलाला नांव विचारण्याचें विसरलों. तो जातांना 'मांडून ठेवा' म्हणून सांगून गेला. दादा आल्यावर तें पांच शेर तूप मांडून ठेवण्यास मी दादांना सांगितलें. परंतु तें तूप कोणी नेलें हें विचारतांच मी त्याचें नांव ठाऊक नसल्याचें सांगितलें. परंतु त्याची खूण मी

दादांना सांगितली. सगळी गिऱ्हाईकें तूप नेतेवेळीं 'खाण्याचें तूप' असें मागत. पण हें एकच गिऱ्हाईक असें होतें कीं, त्यांच्याकडील कोणीहि मनुष्य आला तरी 'जेवायचें तूप' मागत. ती खूण दादांना पटली. तरीपण आपल्या हातून कांही चूक होऊं नये म्हणून त्या गिऱ्हाइकाचे घरीं दादा गेले व त्यानें तूप नेल्याची खात्री करून घेतल्यावर त्यांनीं तें त्याच्या नांवावर मांडलें. त्या गोष्टींतल्या वाण्याप्रमाणें दादांनीं कांहीं सर्व गिऱ्हाइकांच्या नांवावर तूप मांडून ठेवलें नाहीं.

★

## वाण्याचें बिल आपलें कायमच

एकदां आमच्या नातेवाईकांकडे मी गेलों होतों. त्यावेळीं त्यांचा वाणी त्यांच्या घरगुती सामानाचें बिल नेण्याकरितां आला होता. तेव्हां तें कुटुंब मोठें असल्यामुळें साधारणपणें चारशें तें साडेपांचशेंच्या दरम्यान त्यांचें बिल होत असे; असें कित्येक वर्षें चालू होतें. एकदां अशी वेळ आली कीं, त्या कुटुंबांपैकीं पुष्कळशीं माणसें सुमारें पंधरा दिवस बाहेरगांवीं गेलेली होती.

नंतर एकदां अशी वेळ आली कीं, त्याच कुटुंबांतील कांहीं माणसें पाऊण महिना तेथें नव्हती. पण अशा दोन्हीं वेळीं वाण्याचें बिल नेहमींप्रमाणेंच झालें. तेव्हां त्या मालकिणीच्या सहज लक्षांत आलें कीं, 'यावेळीं जवळ जवळ एक महिना आम्ही बरीच माणसें बाहेरगांवीं होतों; मग एवढे पैसे कसे झाले?' तेव्हा तो वाणी म्हणाला, 'तुमी तुमच्या दोन वरस तीन वरसचा हिसाब बघा, एवडा तो बिल होतेच!'

## १४ : माझ्या हातून घडलेली लोकसेवा

### जळितांना मदत

**महात्मा** गांधींच्या खुनानंतरच्या काळांत महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं वर्तमानपत्रांतून घरें जळल्याची जी माहिती प्रसिद्ध होई ती वाचून माझ्या मनाला अतिशय यातना होऊं लागल्या. या जाळितांत निर्वासित झालेल्या लोकांना कांहीं सहाय्य करावें असे विचार माझे मनांत येऊं लागले. परंतु मार्ग सांपडेना. म्हणून मार्ग शोधीत असतानांच आंग्रेवाडींतील श्री. घारपुरे यांच्या घरीं जाळितांतील निर्वासितांना आर्थिक सहाय्य करण्यासाठीं म्हणून एक सभा बोलाविली होती. मी त्या सभेला गेलों. तेथें मदत करण्यासाठीं म्हणून फंड जमवावा व त्यांतून या लोकांना कांहींतरी सहाय्य करावें अशी कल्पना निघाली. कागदावर या सभेचें वर्तमान लिहून खालीं आंकडे घालण्यास कोणीच धजेना. असा तास दीड तास गेल्यावर आंकडे न लिहितांच सभा विसर्जित झाली. आंग्रेवाडींतून बाहेर पडतेवेळीं श्री. पुराणिक वैद्य व देवबुवा असे आम्हीं एकत्र चाललों होतों. मी त्यांना सहज म्हटलें कीं, मला या लोकांना सहाय्य करण्याची इच्छा आहे; पण तें कसें करावें हा मलाहि प्रश्न पडलेला आहे. तेव्हां ते दोघेहि माझ्याबरोबर आमच्या दुकानांत आले. त्यांनीं असें सुचविलें कीं, स्वतः जाऊन मदत करणें जवळ जवळ अशक्य आहे. तेव्हां नांवें व पत्ते मिळविण्याची आपण खटपट करूं. त्यावेळचें 'केसरी'च्या संपादकांचे बंधू श्री. गोखले हे त्या भागांत गांवोगांव फिरून घरें जळलेल्या लोकांचीं नांवें व पत्त्यासह यादी घेऊन आल्याचें मला दुसऱ्या दिवशीं समजलें. वाईचे टांगेवाले काळे यांनींहि कांहीं माहिती गोळा केल्याचें श्री. देवबुवांनीं कळविलें. पुराणिक वैद्य, देवबुवा व मी अशा तिघांनीं मिळून अनुक्रमें अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार असे तिघेंच पदाधिकारी राहून एक हिंदु धर्मसंवर्धक मंडळ नांवाची संस्था स्थापन केली. गोखले व काळे यांच्याकडून याद्या मागविल्या. त्या याद्या चारपांच दिवसांत त्यांच्याकडून आल्यावर प्रत्येकाचे नांवानें पंचवीस रुपये या प्रमाणें मनीऑर्डरीनें रकमा पाठविल्या. त्या त्यांना गणपतीच्या पूर्वी मिळाल्या. त्यावेळीं त्यांचेंपैकीं कांहींकडून जीं पत्रें आलीं त्यावरून असें दिसून आलें कीं, आमच्याकडची मदत प्रथम मिळालेली मदत असून त्यांना तोंपर्यंत इतर कुठूनहि मदत मिळालेली नव्हती. आपली दाद घेणारा कोणीतरी आहे याबद्दल त्यांना समाधान वाटलें. ब्राह्मणांच्या घराजवळ असल्यामुळें कांहीं इतर ज्ञातीचीं घरेंहि या जळितात जळालीं होतीं. त्यांनाहि आम्हीं सर्वांप्रमाणेंच मदत पाठवली होती. त्यानंतर पुन्हां दिवाळीपूर्वी प्रत्येकीं वीस

रुपये प्रमाणें पाठविले. त्यानंतर त्यांना सरकारकडून व इतरांकडूनहि सहाय्य मिळालें. माझ्याप्रमाणेंच आणखी कांहीं लोकांची अशाप्रकारें सहाय्य करण्याची इच्छा होती. त्यांनीं वरील संस्थेला पैसे दिले. त्यावेळीं हायस्कूलमध्यें शिकणारांना मॅट्रिकपर्यंत व कॉलेजमध्यें शिकणाऱ्या मुलांना त्यांचा अभ्यासक्रम संपेपर्यंत अशी मदत केली. त्यानंतर या जळितांतील लोकांचीं लहान मुलें व मुली यांना प्रत्येकीं चड्डी व एक सदरा आणि परकरपोलकें अथवा पांचवारी पातळें मिळून पांचसहाशें मुलांना वाई येथें आम्हीं उभयतां व स्नेही श्री. हेजीब, देवबुवा व पुराणिक यांचे समक्ष जाऊन कऱ्हाडचे श्री. बाबुराव गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं हे कपडे त्या मुलांना दिले. जीं मुलें हजर राहूं शकलीं नव्हतीं त्यांना तें पाठवून देण्याची व्यवस्था केली. यांत प्रामुख्यानें जरी आम्हीच पैसे खर्च केले होते तरी त्यांत इतरांच्याहि कांहीं देणग्या होत्या. कपडे देण्याचें कार्य आटोपल्यावर व शिक्षणांकरितां मदत करीत असलेल्या मुलांचीं शिक्षणें पुरीं झाल्यावर ती संस्था आम्ही बंद केली.

★

## आयुर्विद्या प्रसारक मंडळास सहाय्य

'आयुर्विद्या प्रसारक मंडळ' हें आमच्या गल्लींतच मंत्र्याचे बंगल्यामध्यें आहे. त्याचे मुख्य व्यवस्थापक श्री. अभ्यंकर वैद्य हे १९४८ च्या आश्विनांत आमच्याकडे आले व मला म्हणाले कीं, 'आमची संस्था जवळ जवळ बंद पडण्याच्या मार्गाला आलेली आहे. तरी कांहींतरी सहाय्य होईल या अपेक्षेनें मी तुमच्याकडे आलेला आहे.' तेंव्हा मी त्यांना म्हणालों कीं, सध्यां मी दुसऱ्या कामांत गुंतल्यामुळें तुमचें म्हणणें लक्षांत घेण्यास मला सवड नाहीं. दिवाळी जवळच आलेली आहे. आमचें वर्षअखेरचे हिशोब पुरे झाले म्हणजे मी परिस्थिति पाहीन व मला कांहीं विचार करणें शक्य असल्यास करीन. जाळिताच्या लोकांना मी सहाय्य करीत असल्याचें त्यांना माहीत असल्यामुळें 'या आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्ही कांहींतरी सहाय्य कराच' असें सांगून ते गेले. ऑक्टोबर ३१ ला आमचा वर्षबदल झाल्यानंतर त्या वर्षाचे हिशेब पुरे होण्यास चौदा तारीख उजाडली. धंद्याचे एकंदर हिशेब पाहून त्यांना कांहींतरी सहाय्य करण्याचें मी ठरविलें. गांधी खुनानंतर झालेल्या दंगली व जाळपोळींत आम्हालाहि थोडीशी झळ लागली होती. त्यामुळें झालेल्या एकंदर मनःस्तापामुळें थारेपालट करण्यासाठीं म्हणून मी पुण्यास जण्याचें ठरविलें. १५ नोव्हेंबरला सकाळीं मला भेटण्याबद्दल मी अभ्यंकरांना निरोप पाठविला. ते येतांच त्यांना मी पांच हजारांचा चेक लिहून दिला. तो पांच हजार रुपयांचा चेक पाहिल्यावर त्यांनीं अत्यंत समाधान व्यक्त केलें. सुमारें महिना दोन महिने प्रयत्न करून कांहींच उपयोग होत नव्हता व आमची संस्था नामशेष होण्याची भीति वाटत होती. पण तुमचा हा पांच हजार रुपयांचा चेक पाहून मला आतां संस्था नामशेष होणार नाहीं अशी खात्री वाटूं लागली आहे. तुमचे कडून फारतर ५०० ते

१००० रु. मिळतील एवढीच माझी अपेक्षा होती; पण हा ५००० रु. चा चेक देऊन तुम्ही माझें फारच मोठें काम केलें आहे. असें ते त्यावेळीं मला म्हणाले.

सध्यां त्यांचें इथें एक सूतिकागृह असून सायन येथें हॉस्पिटल व वैद्यकीय शिक्षणाचें कॉलेज चालू आहे. हीहि आमची देणगी चांगलीच सत्कारणीं लागल्याचें समाधान मला लाभलें आहे.

★

## गोवळ बंदराची डागडूजी

मी फेब्रुवारी १९५० मध्यें गांवीं गेलों होतों, त्यावेळीं पडावांतून आमच्या बंदरावर उतरतांना चिखलांत पाय घसरून खाडीकिनारीं पडलों.

त्यानंतर एक दिवस रेशन दुकानचा माल आला असतां तो उतरून घेण्याची त्याच बंदरावर कशी अडचण पडते हेंहि मला पहावयास मिळालें. त्यामुळें घर बांधते वेळीं जे दोन चारशें चिरे उरले होते, त्या चिऱ्यांचा उपयोग या ठिकाणीं धक्का बांधण्यासाठीं करावा असे विचार मनांत आले व ती. दादांनाहि हा विचार पसंत पडला. म्हणून बांधकाम करणारीं माणसें पैदा करून व ते चिरे वापरून पडावांतून कांठावर उतरण्याकरितां चिऱ्यांचा धक्का बांधून घेतला.

★

## आसाम जलप्रलय सहाय्य

सन १९५० च्या ऑगष्टांत आसाममध्यें पावसाळयांत धरणीकंप व जलप्रलय झाला; यावेळीं लोकांचें अतिशय नुकसान झालें. त्या पूरपीडित व भूकंपानें त्रासलेल्या जनतेला आर्थिक सहाय्य करण्यासाठीं भारताचे प्रधानमंत्री श्री. जवाहरलाल नेहरू यांनीं भारतीय जनतेला आवाहन केलें होतें. आम्हीं सर्व बंधूंनीं एकत्र जमून या गोष्टीचा विचार केला व पांच हजार रुपये द्यावे असें ठरविलें व सोमवार, ता. २८–८–५० रोजीं पांच हजार रुपयांचा चेक लिहून सचिवालयांत त्यावेळीं हजर असलेल्या श्री. वैकुंठभाई मेहता (अर्थमंत्री) यांच्याजवळ दिला. या चेकची रक्कम आजच जवाहरलालजींना मिळाली तर बरें होईल असें त्यांना सांगितल्यावर त्यांनीं बँकेमार्फत जवाहरलालजींचे सेक्रेटरींचे हातीं ती रक्कम त्याच दिवशीं पडण्याची व्यवस्था केली.

नंतर चौकशीअंतीं असें समजलें कीं, आमच्या देणगीपूर्वी फक्त टाटा कन्सर्नकडून दहा हजार रुपयांची देणगी आलेली होती. टाटाकडून आलेल्या दहा हजार रुपयांच्या मानानें आम्हां बेडेकरांकडून आलेले पांच हजार रुपये म्हणजे भरपूरच होत.

★

## व्यापार धंद्यांत पिढ्या गेल्या पाहिजेत

आम्हां महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांबद्दल जनतेचा एक आक्षेप आहे व तो पुष्कळ अंशीं खरा आहे, असें प्रांजळपणें कबूल करण्यास मलाहि कांहीं हरकत वाटत नाहीं. आमचें

काय होतें कीं आम्ही वस्तु साधारण योग्य भावानें विकतो व मोठ्या माणसापासून लहान-पर्यंत सर्वांना एकच भाव सांगतो. अशा वेळीं एखादें गिऱ्हाईक आम्हाला म्हणतें कीं, अमक्या दुकानांत अमुक भाव आहे, तमक्या दुकानांत तमुक भाव आहे. तर ते त्यावेळीं आम्हाला न पटून आम्हीं त्या गिऱ्हाईकाची फारशी समजूत घालण्याचा प्रयत्न करीत बसत नाहीं व त्याबद्दल आम्ही ग्राहकांच्या रोषाला थोडें पात्र होतों. परंतु याला जीं कारणें आहेत त्यापैकीं महत्त्वाचें कारण म्हणजे इतर व्यापारी पिढीजाद व्यापारी असतात. कित्येक पिढ्या त्यांचे घराण्यांत व्यापारच चालू असतो. त्यामुळें घरीदारी नेहमी व्यापाऱ्याच्याच भाषा चालतात व त्या अगदी गर्भावस्थेपासून तो ते मूल व्यापारांत पदार्पण करीपर्यंत त्या धंद्याच्या सर्व खांचाखोचा आडाखे इत्यादींचें ज्ञान बहुतेक तो मुलगा ज्यावेळी व्यापारांत पदार्पण करतो त्यावेळी त्याला झालेलें असते. आमच्यात तसा प्रकार नसल्यामुळें साधारणपणें आमची पिढी हीच पहिल्यानें व्यापारांत पडलेली पिढी आहे. अशी माझी समजूत आहे.

आपल्या मुलांबाळांना नेहमीं नोकरपेशाच्या लोकांचें संघटण लाभतें व त्यांत प्रामुख्यानें चर्चिले जाणारे विषय 'साहेब डॅमफुल म्हणाला', 'सुवर' म्हणाला, तसेंच हेडक्लार्क कांहींतरी म्हणाला, 'मी कामांत कशी चुकवा चुकव करतों' असल्या प्रकारच्याच गोष्टी नेहमीं कानावर येतात. त्यामुळें नोकर पेशाच्या व्यवसायांतील खांचाखोंचा जरी सहजपणें कळत असल्या तरी व्यापार धंद्यांतील खांचाखोंचा लहानपणापासून कळत नाहींत म्हणून आम्ही पिंडाचे व्यापारी नसून व्यापारांत पडलों असल्यामुळें हे एकदोन पिढ्या असें होणारच. माझी तरी अशी समजूत आहे कीं माझ्यापासून तिसरी पिढी, ही व्यापारांतले बरेचसे ज्ञान संपादन केलेली निघेल. मला दुसरें असेंहि वाटते कीं, ही पिढी थोडी ज्ञाती निघेल व ती आमच्याप्रमाणेंच सत्प्रवृत्तीचीहि असेल अशी माझी भावना आहे.

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

आम्ही दोघे



सौ. रखमाबाई व श्री. अण्णासाहेब

# गोविंदराव व कुटुंबीय



सौ. रमाबाई, श्री. गोविंदराव उर्फ नानासाहेब, कन्या सौ. उषा पटवर्धन,
नात चि. वैजयंति व भाचा चि. चंद्रकांत जोशी.

## विष्णुपंत व कुटुंबीय



सौ. सुशीलाबाई. चि. अशोक. श्री. विष्णुपंत उर्फ आबासाहेब,
चि. नीला. चि. सुधा. चि. अरुण व चि. मोहन.

# गजाननराव व कुटुंबीय



उभ्या : चि. उषा व चिं. प्रभा.
बसलेले : सौ. विजयाबाई, श्री. गजाननराव, चि. विश्वास व
चि. महेश ( मांडीवर )
चि. गीता व चिं. विद्या.

## बेडेकर, सौ. बेडेकर व सासूबाई



[ डावीकडून ] श्री. वा. वि. बेडेकर. सौ. रखमाबाई
आणि श्रीमति सत्यभामाबाई गोखले ( सासूबाई वय वर्षे ८६ )

## माझ्या थोरल्या मुलाचा संसार



*चि. संध्या, सौ. शैलजा, श्री. त्रिंबक उर्फ बंडोपंत व चि. अलका.*

# श्रीधरचा संसार



श्री. श्रीधर, चि. संजय व सौ. पद्मजा

## माझे वडील आणि सावत्र आई




स्व. वा. विश्वनाथपंत उर्फ दादा




स्व. वा. पार्वतीबाई

## आम्ही पांच भाऊ



बसलेले ( डावीकडून ) श्री. रमेश. श्री. गोविंदराव, श्री. अण्णासाहेब, श्री. विष्णुपंत व श्री. गजाननराव
उभ्या ( डावीकडून ) सौ. रमाबाई, सौ. रखमाबाई, सौ. सुशीलाबाई व सौ. विजयाबाई.

## माझ्या कुटुंबातील मंडळी



उभे: [डावीकडून] प्रकाश भिडे (नातू). सौ. मंगला भिडे (कन्या), सौ. शैलजा (सून) चि. सुरेश (मुलगा), सौ. मीनाक्षी आठवले (कन्या), चि. वसंत (मुलगा), सौ. पद्मजा (सून), चि. सुनंदा (कन्या) बसलेले : चि. त्रिंबक (मुलगा), सौ. रखमाबाई, श्री. अण्णासाहेब, चि. श्रीधर, चि. दिलीप भिडे, चि. संध्या, चि. संजय व चि. अलका (नातवंडें)


# दोन जिवाभावाचे मित्र



स्व. वा. माधवजी दयाराम जोशी



श्री. दत्तात्रय नारायण हेर्जीब, पुणे



ब्रेडेकर सदन नं. १ दादर

# आमची मूळ वास्तू




गोवळचें घर

# मुंबईंतील आमचें मूळ दुकान



मुगभाट स्ट्रीट, मुंबई ४

# धाकट्या भावांनीं केलेला बहुमान



श्री. वासुदेवराव बेडेकर यान्च्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त त्यांच्या बहुमान करण्यासाठीं त्यान्च्या चौघा बंधूंनीं पुणें येथील चिपळूणकर रोड एरंडवणा येथें एक बंगला घेऊन तो आहेरादाखल दिला. त्याचें 'बंधुप्रेम' हें यथोचित नांव ठेवण्यांत आलें आहे.

# आमच्या बेडेकर कुटुंबाची वंशावळ

**आमचें** घराणें चित्तपावन कोंकणस्थ ब्राह्मणाचें असून गोत्र गार्ग्य आंगिरस शैन्य त्रिप्रवर असें आहे.

- रामचंद्रपंत
  - सदाशिवपंत
    - विश्वनाथ
    - रामचंद्र
    - त्रिंबक
      - वासुदेवशास्त्री
        - कृष्णाजीपंत
      - सदाशिवपंत
        - रामचंद्रपंत
      - पर्शरामपंत
        - विश्वनाथपंत (सौ. जयंती, सौ. पार्वती) लीला, शांता, कमल, प्रभा, उषा या पांच मुली
          - वासुदेव (सौ. रखमाबाई)
            - त्रिंबक (सौ. शैलजा)
              - अलका
              - संध्या
            - श्रीधर (सौ. पद्मजा)
              - संजय
            - सुरेश
            - वसंत
            - यशोमती
            - मीनाक्षी
            - सुनंदा
          - गोविंद (सौ. रमाबाई)
            - विमल
          - विष्णु (सौ. लक्ष्मी, सौ. सुशिला)
            - सुधा
            - अशोक
            - नीला
            - मोहन
            - अरुण
          - गजानन (सौ. विजया)
            - विश्वास
            - विद्या
            - गीता
            - महेश
          - रमेश (अविवाहित)
        - गोपाळपंत (सौ. राधाबाई)
          - राजाराम
          - सौ. द्वारकाबाई
          - लक्ष्मण

# १५ आमच्या कुटुंबांतील व्यक्ति

**येथपर्यंत** माझ्या जीवनांतील लहानपणापासूनच्या बऱ्यावाईट आठवणी सांगितल्या. आतां आमच्या कुटुंबीय मंडळींची थोडीबहुत माहिती मला या माझ्या आत्मचरित्राच्या निमित्तानें सांगावीशीं वाटते. कुटुंब हें एखाद्या मोठ्या वृक्षासारखें असतें. मूळ बीजाला पाणी घालून त्यास लहानाचें मोठें करण्यापासून तों त्या वृक्षाचीं फळें चाखणारांपर्यंत सर्वच त्या वृक्षाच्या भव्यतेचें, यशाचे, आनंदाचे, दुःखाचें, सुखाचें वाटेकरी असतात. वाटेकरी या शब्दापेक्षां हक्कदार शब्द बरा. संकटांतून भीति निर्माण होते आणि वैभवांतून असूया. पण उन्हातान्हांत, थंडीवाऱ्याला, वीजवावटळीला एखादा प्रचंड वृक्षराज सतत तोंड देतो, तोच वसंत ऋतूंत, वर्षाऋतूंत पानाफुलांनीं मोहोरून जातो. जें कुटुंब संकटांतहि एकसंघ राहातें आणि भरभराटीच्या काळांतहि धरणीवर आपले रोंवलेले पाय अधांतरी होऊं देत नाहीं तेंच वृक्षाप्रमाणें टिकून राहतें. यादृष्टीनें मला माझ्या घराण्याचा, कुटुंबियांचा, भावांचा आणि माझ्या पुढच्या पिढीचा अभिमान वाटतो. मी सामान्यतः निगर्वी आणि निराभिमानी आहे. धंद्यांत गर्वाला आणि अभिमानाला मुळांतच स्थान नाहीं. नम्रता हें कोणत्याहि धंद्यांचे पहिलें भांडवल आहे. या दृष्टीनें आमची सर्व कुटुंबीय मंडळी प्रगतीपथावर आहेत असें मला वाटतें आणि म्हणूनच धंदेवाईक म्हणून निर-भिमानी असूनहि मी माझ्या कुटुंबियासंबंधीं अभिमानी आहे असें सांगण्यांत मला, मी मर्यादेचें उल्लंघन करतों आहे असें वाटत नाहीं.

## माझी आजी

आमची आजी ही फारच धीराची बाई होती. ती २२ वर्षांची असतांनाच आजोबा स्वर्गवासी झाले व आजीवर आकाशींची कुऱ्हाडच कोसळली. त्यावेळीं ती सहा महिन्यांची गर्भवती होती. त्यावेळीं तिला मोठ्या दोन मुली व अडीच वर्षांचे आमचे वडील अशीं तीन मुलें होतीं. पतिनिधनाच्या या मोठ्या दुःखांत भरीस भर म्हणूनच कीं काय तिचे श्वशूर म्हणजे माझे पंजोबा पुढें सात वर्षांनीं थोरल्या नातीचा विवाह करून व घरांत एक विधवा मुलगी होती तिला बरोबर घेऊन १८९३ सालीं कायमच्या वास्तव्यासाठीं काशीला गेले. थोरले दीर आपट्यांचा उद्योगधंदा वांटणीस आल्यामुळें कायमचें वास्तव्य करण्यासाठीं आपट्याला गेले होतें. दुसरे दीर सदाशिवपंतहि विभक्त झालेले होते. त्या काळांत भाऊबंदांत फार वैमनस्य असे. त्याप्रमाणें आमच्या घराण्यांतहि होतें. आजीचें माहेर दहाबारा मैलांवर कोल्यांत गोखले यांचेकडे होतें. पण

तेथून तिला कांहीं मदत होण्याची शक्यता नव्हती. अशा कष्टाच्या परिस्थितींत लहान तीन मुलांचें संगोपन करून त्यांना वाढवून मार्गाला लावण्याची फार मोठी जबाबदारी अगदीं लहान वयांतच तिच्यावर येऊन पडली होती; ती तिनें मोठ्या धैर्यानें नीट पार पाडली.

मी आजीजवळ साधारण दहा वर्षेंच होतों. इतक्या लहान वयांतहि तिनें मला लावलेलें वळण व माझ्या मनावर केलेले संस्कार याचा मला वेळोवेळीं अडीअडचणींचे प्रसंगीं उपयोग झाला आहे आणि अजूनहि होत आहे. मुलाचें लग्न झाल्यावर व सून घरांत आल्यावर तिला थोडें स्वास्थ्य मिळालें. परंतु ती सूनहि आजीच्या वयाच्या ५२ व्या वर्षी स्वर्गवासी झाली. तो आघात तिला फारच जाणवला. परंतु अशा परिस्थितींतहि धीर न सोडतां त्या सुनेचा अकरा महिन्यांचा मुलगा म्हणजे तिचा नातू चि. बाळू याचें संगोपन तिनें घरांत अगदीं हलाखीची परिस्थिति असतांनाहि चांगल्या तऱ्हेनें केलें. तिची दुसरी सून मुंबईला कायम असल्यामुळें तिच्यापासून आजीला फारसें सुख मिळालें नाहीं. आमच्या जीवनांत आलेल्या अनेक अडीअडचणी आम्ही सहन करूं शकलों याचें कारण तिनें लहाणपणीं आमच्या मनावर केलेले संस्कारच होत.

तिचें अल्पसें स्मारक म्हणून राजापूर येथील म्युनिसिपल दवाखान्याला आम्हीं देणगी देऊन सूतिकागृहाची जोड दिली आहे, त्या गृहाला तिच्या स्मरणार्थ 'श्री भागिर्थीबाई पर्शराम बेडेकर सूतिकागृह' असें नांव दिलें आहे.

तिनें आमच्या मनोभूमिकेवर व्यापारधंद्याचे जे संस्कार केले ते आम्हां पितापुत्रांना फारच मार्गदर्शक ठरले आहेत. तिनें वारंवार सांगितलेल्या पंजोबांच्या व्यापारविषयक गोष्टींमुळें आम्हांला व्यापार धंद्यांतच पडण्याची स्फूर्ति मिळाली व आमच्या पुढील पिढींतील मुलांनातवंडांनीं व्यापार धंद्यांतच आयुष्य घालवावें असें जें मी मनोगतांत लिहिलें आहे, त्याचा उगम आजीच्या मार्गदर्शनांतच आहे.

कधीं सहसा आजारी न पडल्यामुळें दुसऱ्याकडून सेवा करून घेण्याची पाळी आजीवर कधींच आली नाहीं. चौसष्टाव्या व पासष्टाव्या वर्षी तिला अर्धांगाचे दोन झटके आले. त्यांतून पुष्कळशी सुधारून ती हिंडूफिरूं लागली होती. पण तिसरा झटका वयाचे सदुसष्टाव्या वर्षी आला व तो तिचा अखेरचा आजार ठरला. १९३० च्या आश्विन वद्य १४ ला ती स्वर्गवासी झाली व त्यामुळें आमचा मागील पिढीशीं असलेला दुवा तुटला.

★

## बाई ( माझी चुलत चुलती )

सदाशिवपंतांचा मुलगा रामचंद्रपंत याची ही द्वितीय पत्नी व माझे श्वशूर श्री. कृष्णाजीपंत गोखले यांची चुलत पुतणी. तिचें अकराव्या वर्षी लग्न झालें. तिच्या वयाच्या अठराव्या वर्षी तिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. त्यानंतर तिचें श्वशुरांशीं

न पटल्यामुळें ती आमच्याकडे राहूं लागली. दोनचार वर्षांनीं तिचे श्वशूर परांगदा झाल्यामुळें त्यांच्या जमिनीचें उत्पन्न दादांनीं खटपट करून तिला मिळण्याची व्यवस्था केली. त्यानंतर ती स्वतंत्रपणें आपल्या घरांत राहूं लागली. पुढें माझें लग्न झालें त्यावेळीं आम्हाला जेवण करून घालायला मुंबईस येतेस का असें विचारलें असतां ती आमच्या-बरोबर मुंबईला आली. तेव्हांपासून ती आमच्याकडेच असे. पण सुमारें तीन साडेतीन वर्षांनीं भाद्रपद शु. १५ ला तिला ताप आला; लगेच दुसऱ्या दिवशीं डॉ. फोंडेकरांचें औषध तिला सुरूं केलें. ४–५ दिवसानंतरही ताप उतरेना. त्यांतच डॉ. फोंडेकर स्वतः आजारी पडले. त्यांचा कंपाऊंडर ठरलेलें औषध देई; परंतु त्यानें कांहीं गुण आला नाहीं. आणखी ५–६ दिवसांनीं आम्ही डॉ. देशमुख यांचें औषध सुरूं केलें पण कांहीं गुण न येतां १९२३ सालीं भाद्रपद वद्य ३० ला ती वयाच्या तेहतिसाव्या वर्षी स्वर्गवासी झाली. तीन साडेतीन वर्षें मूळ विभक्त असूनहि ती आमच्या कुटुंबाशीं समरस झाली होती.

ती मुंबईला येतेवेळीं आपले देव बरोबर घेऊन आली होती. ते देव आमचे वडि-लार्जितच असल्यामुळें आम्हीं त्यांची भक्तिभावानें पूजा करतों व त्यांचीही आमचेवर सतत कृपा आहे.

★

## आमचे काका व काकू

आमच्या काकांना पितृमुखसुद्धां पहावयास मिळालें नाहीं. परंतु वडील बंधु व आई यांच्या छत्राखालीं त्यांचें बाळपण गेलें. घरांत पंतोजीकडून शिक्षण घेतल्यानंतर त्यांचें मराठी शिक्षण राजापूर येथील शाळेंत झालें. इंग्रजी २–३ यत्ता रत्नागिरी येथें झाल्या. परंतु त्यानंतर आर्थिक स्थितीमुळें जास्त शिक्षण त्यांना मिळूं शकलें नाहीं. आमच्या गांवांतीलच श्री. रामभाऊ खोत ( गोखले ) यांच्या द्वितीय कन्येबरोबर त्यांचा विवाह वयाच्या पंधराव्या वर्षी झाला. त्यानंतर उद्योगधंद्याकरितां ते जे मुंबईला आले ते येथेंच स्थायिक झाले. पुढें २–३ वर्षांनीं त्यांनीं काकूलाहि मुंबईंत आणलें. ती शेवटपर्यंत मुंबईतच राहिली. क्वचित केव्हांतरी ती दोघे गांवी जात. त्यांची मिळकत बेताचीच असल्यामुळें मूळ कुटुंबाला आर्थिक हातभार लावणें त्यांना शक्य झालें नाहीं.

मध्यंतरी १९१० ते १२ दोन वर्षें दोघे बंधू एकत्र राहिलें होते. परंतु दोन वर्षांनंतर उद्योग भिन्नतेमुळें पुन्हां दूर झाले, त्यानंतर ते पुन्हां कधींच एकत्र आले नाहींत.

★

## दादा ( माझे वडील )

आषाढ शुद्ध ६ सोमवार ता. १४ जुलै १८८४ रोजीं माझे वडील ति. विश्वनाथपंत यांचा जन्म झाला. ते अडीच वर्षांचे असतांनाच पितृसुखाला आंचवले. त्यांचे आजोबा त्रिंबकपंत त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीच काशीला गेल्यामुळें घरांत वडीलधारें माणूस

दुसरें कोणी नव्हतें. पांच वर्षानंतर पंतोजीकडून त्यांच्या शिक्षणास सुरुवात झाली. त्यावेळीं शाळा नसल्यामुळें शालेय शिक्षण त्यांना मिळालें नाहीं.

वयाच्या बाराव्या वर्षीं त्यांचें लग्न झालें व त्यांना पहिलें अपत्य होण्यापूर्वीच त्यांच्या आजोबांनीं ठेवलेले रुपये जवळ जवळ संपले. म्हणून कांहींतरी उद्योगधंदा करण्याचा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. ते आपटे येथील आपल्या चुलत्याकडे उद्योगधंद्याची व्यवस्था होते का हें बघण्याकरितां गेले. परंतु चुलत्यांनीं भाताचा व्यापार बंद करून फक्त देवघेवीचा व शेतजमिनी घेण्याचा एवढाच व्यवसाय ठेवल्यामुळें तेथें कांहीं उद्योगधंद्याची सोय झाली नाहीं. नंतर असेच कांहीं प्रयत्न त्यांनीं केले. पण १९१० पर्यंत कसल्याच प्रयत्नांत त्यांना यश आलें नाहीं. त्या वर्षी मात्र त्यांचा दुकानदारीचा व्यवसाय सुरू झाला.

१०–११ वर्षें दुकानदारींत कष्ट केल्यावर १९२१ सालीं घराची दुरुस्ती करण्याकरितां म्हणून ते जे गांवीं गेलें ते आजीचा वृद्धापकाळ झाल्यामुळें चार पांच वर्षें येऊन जाऊन व नंतर जवळ जवळ कायमचेच घरीं राहूं लागले. साधारणपणें वयाच्या पंधराव्या वर्षापासून छत्तीस सदतीसाव्या वर्षापर्यंत त्यांना आर्थिक अडचणींना सतत तोंड द्यावें लागलें. त्यांच्या वयाच्या चौतीसाव्या वर्षी प्रथम पत्नी निवर्तल्यामुळें तेंहि दुःख त्यांना असह्य झालें. प्रथम दुसरें लग्न करण्याचा त्यांचा विचार नव्हता. परंतु योगायोगानें तें झालें. सावत्र संबंधानें प्रपंचांत कांहीं विघ्नें येतील कीं काय याची त्यांना कांहीं काळ काळजी वाटत असे. पण ८–१० वर्षांच्या अनुभवानंतर अशी चिंता करण्याचें कारण नाहीं अशी त्यांची खात्री पटली. पुढें त्यांचे दिवस सुखासमाधानांत जाऊं लागले. व योग्यकाळीं म्हणजे १९४२ चे सुमारास त्यांच्या वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी मुलामुलांत कांहीं मतभेद होऊं नयेत म्हणून मुलांचे उद्योगधंद्यांतील हक्कसंबंध त्यांनीं नक्की केले. त्यानंतर द्वितीय संबंधाच्या मोठ्या मुलाचें व एका नातवाचें लग्न झाल्यावर ते सहासात महिन्यांनीं स्वर्गवासी झाले. त्यांनीं प्रत्यक्ष धंद्यांत आम्हाला दिलेलें शिक्षण व केलेलें मार्गदर्शन आम्हांला अत्यंत उपयुक्त झाले असून आम्हीं केलेलीं मोठमोठीं धाडसें हीं त्यांच्या शिक्षणामुळेंच यशस्वी झालीं आहेत. अंत्यकाळींहि दुसऱ्याचे हातून सेवा करून न घेतां हृदयक्रिया बंद पडून ते १४ सप्टेंबर १९५१ भाद्रपद शु. १४ या दिवशीं गणपतीचें विसर्जन करून रात्रीं साडेदहा वाजतां वयाच्या अडुसष्टाव्या वर्षी स्वर्गवासी झाले. त्यांची एकच इच्छा सौभाग्यवती भेटावी अशी होती. परंतु ती आजारी असून मुंबईला औषधपाण्यासाठीं आलेली असल्यामुळें अंत्यकाळीं ती त्यांच्याजवळ हजर राहूं शकली नाहीं. तें एक शल्य आमच्या मनास नेहमीं डांचत असतें.

आमच्या वडिलांना दमा व श्वास लागण्याचा विकार सुमारें २०–२५ वर्षांपासून होता. १९५० सालानंतर त्यांना वारंवार श्वास लागून जास्त त्रास होत असे. त्यांच्या आवडीचें काम म्हणजे आमच्या गोवळांच्या घराजवळील शेतांत जाऊन तास दोन तास तेथें बसणें व चाळा म्हणून तेथील कांहींतरी साफसफाई करीत राहणें हें होतें. त्या ठिकाणीं

जाण्यास सुमारें आठदहा फुटांचा चढणीचा रस्ता आहे. तोहि त्यांना चढण्याचा त्यावेळीं त्रास होऊं लागला होता. त्यामुळें ते जरासे अस्वस्थ मनःस्थितींतच असत. तशांत त्यांची थोरली बहीण आमच्या घरींच चालतांना तोल जाऊन पडली व त्यामुळें तिच्या जांघेचें हाड मोडलें होतें; त्या दिवसापासून ती सर्वस्वी परस्वाधीन झालेली होती. तें दुःख त्यांना प्रत्यक्ष पहावें लागत होतें.

त्यांतच आमची सावत्र आई बरीच आजारी झाल्यामुळें त्या आषाढांतच तिला औषधोपचाराकरितां मुंबईला आणली होती. तिचें दुखणेंहि जरा भीतीदायकच होतें. हा घरच्या दोन माणसांचा आजार पाहून त्यांचें मन बरेंच वेळां अस्वस्थ होई. आमच्या सावत्र आईला आहे तशीच घरीं पाठवावी असें मला त्यांचें पत्रहि आलें होतें. परंतु तिला कोल्हापूरमार्गें अगर मोटारमार्गें नेतां येण्याइतपत तिच्या प्रकृतींत सुधारणा झालेली नव्हती. त्यामुळें बोटीनें जाण्याचें ठरवून बुधवारच्या बोटीचीं तिकिटेंहि आम्हीं काढलेलीं होतीं; परंतु वादळी हवेमुळें त्या दिवशीं बोटी सुटल्या नाहींत. त्यामुळें आम्हीं आईसह घरीं जाऊं शकलों नव्हतों. त्या आमच्या न जाण्यामुळें आई जास्त आजारी असावी असें दादांना वाटलें व थोडी त्यांची निराशाही झाली.

आमच्या वडिलांना एका सात्विक माणसानें अडुसष्ठाव्या वर्षीं भाद्रपद शुद्ध १४ रोजीं तुझा काळ आहे असें सांगितलें होतें व तसें ते माझे व चि. बाळूजवळहि पूर्वीं ४।६ वेळा बोललेले होते. पण आम्हांला तें तितकेसें खरें वाटलें नव्हतें. तरीपण त्या चतुर्दशीपूर्वीं आम्हीं घरीं मात्र जाण्याचें ठरविलेलें होतें.

आईच्या आजाराचे औषधपाण्यासाठीं डॉक्टरहि तिला गांवीं नेऊं देण्यास कबूल नव्हते; तरीहि आम्हीं जाण्याचें ठरवून त्याप्रमाणें बोटीचीं तिकिटेंहि काढलीं होतीं. पण विधिघटना तशी नव्हती. आमच्या भेटीपूर्वींच आमचे वडील श्री. नारायण महाराजांचे चरणीं भाद्रपद शुद्ध १४ शुक्रवार शके १८७३ रोजीं विलीन झाले. अगदीं शेवटच्या मिनिटापर्यंत ते पूर्णपणें सावध होते.

आम्हीं येत असल्याचें पत्र पाठविलें असल्यामुळें दादांनीं आमची गुरुवारीं वाट पाहिली व शुक्रवारीं अनंत चतुर्दशीचे दिवशीं ते आमची वाट पहात होते. परंतु बोट न सुटल्यानें आम्हीं दोन तीन दिवस जाऊं शकलों नव्हतों. म्हणून संध्याकाळपर्यंत वाट पाहून दादांनीं गणपतीचें विसर्जन करून आल्यावर रात्रीं ते नेहमींप्रमाणें जेवले व रात्रीं साडेदहाचे सुमारास सर्व मंडळी झोंपली असतांना त्यांचे सर्व शरीराला कंप सुटला. सर्व मंडळी झोंपलीं होती. पण आमच्याकडे स्वयंपाकाला असलेल्या बाईच्या हें निदर्शनास आल्यावर तिनें आमचा भाऊ बाळू याला उठविलें. तो उठून त्यांचेजवळ आला व शेजारचे दत्तूकाकाहि बाईनें बोलाविल्यावरून आले. ते आल्यावर आपल्या दोन्हीं हातांत त्या दोघांचे हात घेऊन 'मी आतां जातों. पाठीमागें सांभाळा' असें म्हणतांच त्यांचें देहावसान झालें.

त्यानंतर त्यांनीं आपल्या हातांतील सल्ले, जोडी व जानव्यांतील आंगठी अगोदर काढून ठेवली असल्याचें दिसलें. त्याचप्रमाणें आम्हीं मुलांनीं कसें वागावें अशा मजकुराचा एक कागद लिहून ठेवलेला दुसऱ्या दिवशीं मिळाला.

★

## माझी आई

देवाच्या गोठण्याच्या घोडेपई वाडींतील श्री. रामचंद्रपंत लेले हे माझ्या आईचे वडील. माझी आई ५–६ वर्षांची असतांनाच ते वारले. तिला सहा भाऊ व एक बहीण होती. राजापूरचे धोंडोपंत शेवडे यांचेकडे तिचें आजोळ. तिच्या वयाच्या अकराव्या वर्षी तिचा विवाह झाला. दादा तिच्याहून सहा महिन्यांनीं मोठे. त्यावेळीं इतर कांहीं मुली सुद्धां दादांना सांगून आल्या होत्या. म्हणून आजीनें पंजोबांना काशी येथें पत्र पाठवून कुठची मुलगी करावी असें विचारलें असतां त्यांनीं लेले यांची मुलगी करण्याचें लिहिल्यावरून ती मुलगी आजीनें करून घेतली. यावेळीं घरची परिस्थिति ठीक होती. पण पुढें सहा वर्षांनीं माझ्या जन्माचे सुमारास कर्ज होण्यास सुरुवात झाली. यांत काकांचे शिक्षणाकरितां बराच पैसा खर्च झाला होता. यामुळें आई व आजी यांना चिंता उत्पन्न झाली.

आर्थिक आपत्तीमुळें दर वर्षीं दोघींना नवीं लुगडीं घेण्याचीहि आमची सांपत्तिक परिस्थिति नव्हती. अशा परिस्थितींत दिवस चालले असतांना दादांची दुकानदारी सुरू झाल्यानंतर आई मुंबईला आली असतां दादांनीं तिला हौशीनें एक चार रुपयांचें काळें लुगडें घेतलें होतें. त्या लुगड्याचें वैशिष्ट्य म्हणजे त्याचे दोन कांठ जांभळ्या व हिरव्या रंगाचे असून त्याला 'गंगाजमनी लुगडें' म्हणत. परंतु पुढें सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे पूर्वीच ती स्वर्गवासी झाल्यामुळें तिचें बहुतेक उत्तरायुष्य दुःखांत व अडचणींच्या परिस्थितींतच गेलें. तिच्या मृत्यूचेवेळीं आम्हीं कर्जांत बुडालेलें होतों.

आजीप्रमाणेंच आईनेंहि लहानपणींच आम्हांला अतिशय चांगलें वळण व शिक्षण दिलें. त्याचा फायदा आम्हांला अजूनहि मिळत आहे. लग्नानंतर तिची पांचसहा वर्षेंच सुखासमाधानांत गेली. पुढचीं १६–१७ वर्षें आमच्या सांपत्तिक अडचणींमुळें तिला कष्टाचीच गेलीं.

१९१७ च्या फाल्गुन वद्य १४ ला तिला ताप आला. चैत्र शु. २ चे दिवशीं तिच्या अंगावर देवी दिसूं लागल्या; परंतु देवी बाहेर न येतां आंत ओढल्या गेल्यामुळें चैत्र शु. ४ ला ती आम्हांला सोडून गेली.

★

## माझी सावत्र आई ( पार्वतीबाई )

आमच्या सावत्र आईची जन्मतारीख अगर मिती आम्हाला माहीत नाहीं. लग्न-समयीं तिचें वय बारा वर्षांचें होतें. तिचे आईवडील तिच्या लहानपणींच निवर्तल्यामुळें लहानपणापासूनच पोरकेपणाचें दुःख तिला सहन करावें लागलें होतें. लग्न झाल्यावर

ती आमच्या आजीजवळ अतिशय प्रेमानें व आपुलकीनें राहिली. त्याचप्रमाणें मी व आमची बहीण तिच्यापेक्षां वयानें मोठीं असल्यामुळें ती बहिणीला अक्का व मला अण्णा असें आमच्या इतर भावंडांप्रमाणेंच म्हणे. सर्व आयुष्यांत सावत्रपणाची जाणीव तिनें आम्हाला कधींच होऊं दिली नाहीं. एरवींहि नेहमीं भारदस्त व शहाणपणाची तिची वागणूक असे. आल्यागेल्याचा व पैपाहुण्यांचा परामर्ष ती आपुलकीनें घेत असे. फार वरचेवर मुलें झालीं तरीहि ती कधीं त्रासलेली दिसली नाहीं. तिची अंगकाठी अगदींच किरकोळ होती. आमच्या कुटुंबांत चौतीस वर्षें तिनें वास्तव्य केलें. तिच्या चेहेऱ्यावर नेहमीं समाधानाची वृत्ति दिसत असे. तिच्या अंत्यकाळीं केवळ एक वर्षाकरितां तिला पतिविरहित जीवन कंठावें लागलें. तें जीवन असह्य होऊन एक वर्षांतच ती स्वर्गवासी झाली. आपल्या सावत्र सुनांबरोबर ती खेळीमेळीनें वागत असे. सासूपणा तिनें कधींच दाखविला नाहीं व ती घरांत आल्यापासून आमच्या सांपत्तिक परिस्थितींत थोडी थोडी सुधारणा होण्यास सुरुवात झाली.

★

आमचा सावत्र भाऊ गजानन व थोरला मुलगा बंडू यांचे विवाह २१-२-१९५१ रोजीं झाले. त्यानंतर वडील व मातोश्री दोघे गांवाला गेलीं. पण पावसाचे सुरुवातीला मातोश्रींची तब्येत फारच बिघडली. ती इतकी जास्त बिघडली होती कीं, तिला कोल्हापूर-मार्गें आणण्याची परिस्थिति नव्हती. म्हणून आम्ही दुकानची गाडी पाठवून तिला इकडे आणली व औषधपाणी सुरूं केलें. मुलांचे लग्नाचे वेळीं दादा येथें आले असतांना सर्व मुलांनीं निरनिराळें रहावें असे ठरलें होतें. त्याप्रमाणें गजानन पूर्वीच्याच जागेंत, मालिनी ब्लॉकमध्यें रहात होता.

आई आजारी असल्यानें तिला चार जिने चढण्याचा त्रास झेंपण्यासारखा नव्हता. म्हणून ती गजाननजवळच राहिली होती. त्यानंतर तिला पुष्कळसें बरें वाटलें होतें व दादांचेंहि तिला घरीं पाठविण्याबद्दल पत्र आलें होतें. त्याप्रमाणें गणपती होतांच आम्हीं आईसह घरीं जाण्याचें ठरवून त्याप्रमाणें बोटीचीं बुधवारचीं तिकिटेंहि काढलीं होतीं. परंतु हवामान ठीक नसल्यानें त्या दिवशीं बोट सुटली नाहीं.

पुढें शनिवारपर्यंत हवामान न सुधारल्यामुळें शनिवारपर्यंत बोटी सुटल्याच नाहींत. रविवारीं बोट सुटावयाची असें समजलें होतें. विधिघटनेप्रमाणें आई दादांना भेटावयाची नव्हती.

शुक्रवारीं अनंत चतुर्दशीचे दिवशीं संध्याकाळपर्यंत आमची वाट पाहून वडिलांनीं गणपतीविसर्जन केलें व रात्रीं साडेदहा वाजतां ते स्वर्गवासी झाले. ती तार आम्हाला शनिवारीं आली व रविवारचे बोटीनें आम्हीं गेलों व वाडिलांचे दिवसवार करून आम्हीं परत आलों.

दादांच्या स्वर्गवासाचा व अंत्यकाळीं त्यांची भेट न झाल्याचा धक्का आमच्या सावत्र आईला फारच जाणवला. औषधोपचार व्यवस्थित चालू असूनहि तिला गुण

पडलाच नाहीं. वर्षभरानें आम्हीं सर्व मंडळी वर्षश्राद्धाकरितां कोल्हापूरवरून गांवी गेलों. त्यावेळीं आईची प्रकृती पुन्हां बरीच बिघडली होती. श्राद्धापूर्वीचें मासिक कसें तरी झालें. श्राद्धाचे दिवशीं तिची प्रकृति फारच बिघडली व श्राद्ध तडीला जाण्याची चिंता उत्पन्न झाली. परंतु प्रभुकृपेनें निर्विघ्नपणें श्राद्ध तडीला गेलें व संध्याकाळपासून आईच्या तब्येतीला किंचित उतार पडला. त्यानंतर आम्हीं सर्वच मंडळी गांवीं गेलों असल्यामुळें व इकडे धंद्याचा व्याप पुष्कळ असल्यामुळें आम्हाला लवकर परत येणें भागच होतें. तसेंच बापट, पाटणकर, वेलणकर वगैरे व्याही मंडळीं आलेली होती. यांनाहि आपापल्या गांवीं जाणें भागच होतें. व दुसरे दिवशीं आईच्या प्रकृतींत किंचित सुधारणाहि दिसली. म्हणून गजानन व बाळू यांना सहकुटुंब घरीं ठेवून व्याही मंडळी व सौ. लीला दुसऱ्यादिवशीं, व बाकीची मुंबईची मंडळी तिसऱ्या दिवशीं मुंबईला येण्याकरितां बोटीनें निघालों. आमचा खपाटा जैतापूरांतून बाहेर पडतेवेळीं समुद्राची एक लाट त्यांत शिरून बुडत होता. परंतु परमेश्वरकृपेनें आम्हीं त्यांतून निभावलों. बोट फार हालली व सर्वांना लागली. तरीहि आम्ही सुखरूप कसेंतरी मुंबईला पोहोंचलों.

लगेच तिसऱ्या दिवशीं म्हणजे भाद्रपद वद्य ६ चें दिवशीं आई स्वर्गवासी झाली. आम्ही सर्व मंडळी घरीं अडकून पडूं नयेत याकरितांच परमेश्वरानें श्राद्धाचे दुसरे व तिसरे दिवशीं तिला थोडा गुण दाखविला असावा.

★

## सीताराम

हा माझा पाठचा भाऊ माझ्यापेक्षां पांच वर्षांनीं लहान. याचें बहुतेक आयुष्य हालअपेष्टांतच गेलें. अगदीं लहान वयांतच त्याला दादांच्या मावशीकडे सांगली येथें जावें लागलें. कांहीं काळ मामांकडे शिक्षणाकरितां जावें लागलें. मुंबईला आल्यावरहि आम्हीं हातीं जेवण करून जेवत असल्यामुळें त्याचे अन्नपाण्याचेहि हाल झाले. त्याला दुभत्याचे पदार्थ चालत नसत. त्याचें जेवण म्हणजे आमटी व भात. परंतु दुकानदारींतून फुरसद मिळत नसल्यामुळें रोज त्याच्याकरितां आमटीहि करणें आम्हाला जमत नसे. त्यामुळें नुसताच भात जेवून रहावें लागे.

बुद्धिमत्तेंत तो अतिशय हुशार होता. शाळेंतहि त्याचा पहिला अथवा दुसरा नंबर असे. इतक्या लहान वयांतहि दुकानदारींत तो आम्हाला मदत करी. दादा लग्नाला माझे आजोळीं गेले त्या सुमारास मी घरीं असल्यानें तीन दिवस त्यानें एकट्यान दुकानदारी सांभाळली होती. यावेळीं तो पुरता बारा वर्षांचाहि नव्हता पुढें आई ( दुसरी ) मुंबईला आल्यानंतर तिला मुंबईतील शेगडी व स्टोव्ह पेटविणें, पाणी भरणें, आमटी, भात, भाजी, शेगडीं किंवा स्टोव्हवर करणें वगैरे गोष्टी त्यानें शिकविल्या.

१९१९ च्या माघांत दादांनीं त्याची मुंज केली. व नंतर सोडमुंज झाल्यावर लवकरच तो कॉलऱ्याच्या आजारानें स्वर्गवासी झाला. हा माझ्यापेक्षांहि अतिशय बुद्धिमान

होता व धंद्यांत त्याचें माझ्यापेक्षांहि अतिशय लक्ष होतें. गिऱ्हाईक पटविण्यांत या वयांतहि त्याचा हातखंडा असे.

पहांटे चार वाजतां त्याला पहिल्यानें जुलाब झाला व रात्रीं दहा वाजतां तो निधन पावला. त्याला औषधपाणी करण्यासहि वेळ मिळाला नाहीं. सांथीच्या पहिल्याच दिवशीं कॉलऱ्यानें त्याला गांठलें होतें. आई स्वर्गवासी झाली त्यावेळींहि देवीची सांथ नुकतीच सुरू झाली होती.

आमच्या आईप्रमाणेंच तो गेल्यामुळेंहि आम्हांला बराच हादरा बसला.

★

## गोविंदा ( नाना )

गोविंदाचा जन्म १–११–१९१० मंगळवार दिवाळीचे दिवशीं झाला. त्याचे जन्माचे कांहीं काळ आधीं वडील उद्योगधंद्यानिमित्त मुंबईला आले होते. तो सहा महिन्यांचा असतांनाच त्याला मुंबई पहाण्याचें भाग्य लाभलें. तो मातृसुखाला वयाच्या सातव्या वर्षींच अंतरला. गांवांतील शाळा जवळ नसल्यामुळें व पंतोजीचे शिक्षणाची पद्धत बंद झाल्यामुळें त्याच्या शिक्षणाला लवकर सुरुवात झाली नाहीं. आठव्या वर्षी शाळेंत जाण्यासाठीं तो मुंबईला आला, पण शाळेंत न जातां तो महिन्याभरांतच पुन्हां गांवीं गेला. नवव्या वर्षी त्याच्या शिक्षणास सुरुवात झाली. पुढें ५–६ वर्षें त्यानें शिक्षण घेतलें. पण शिक्षणाकडे त्याचें लक्ष तितकेसें वेधलें नाहीं. व तो वयाच्या सोळाव्या वर्षी धंद्यांत सामील झाला. दुकानदारीचे कामांत त्यानें आपली हुशारी दाखविण्यास सुरुवात केली. वयाच्या अठराव्या वर्षी त्याचा विवाह झाला. १९२८ सालाचे अखेरीस आम्हीं ठाकूरद्वारचें दुकान सुरू केल्यावर त्याची नेमणूक त्या दुकानांत केली. तिथेंहि त्यानें आपल्या बुद्धीचा वकूब चांगलाच दाखविला व तेथें आमचा चांगला जम बसविला. पुढें १९३१ सालीं दादरचें दुकान सुरू झाल्यावर अगदीं पहिल्या दिवसापासून आजतागायत त्याच दुकानांत तो काम करीत आहे. लहानपणीं तो अगदीं किरकोळच होता. पण कांहीं दिवस व्यायामशाळेंत गेल्यावर त्यांची प्रकृति सुधारली. व्यायामाचें शिक्षण बंद झाल्यावर त्याच्या प्रकृतींत स्थूलपणा आला आहे. पण एकंदरींत प्रकृति चांगली आहे. त्याच्या अक्कलहुशारीमुळें आमचें दादरचें दुकानहि कांहीं बाबतींत वैशिष्ट्यपूर्ण झालें आहे. माल तयार करण्याच्या कामांत जरी त्यानें भाग घेतला नसला तरी विक्रीच्या कामांत तो चांगलीच हुशारी दाखवीत आहे. मुंबईला आल्यापासूनच त्याला दुकानदारीची आवड उत्पन्न झाली, ती आजतागायत कायम आहे. त्याचें स्वभाववैशिष्ट्य म्हणजे आपलें काम करणें व कमी बोलणें.

धंद्याच्या कामांत त्याची सल्लामसलत फारच उपयुक्त ठरली आहे. स्वतःच्या प्रपंचाचा पसारा फार नसूनहि त्याचें आपलें कामधंद्याकडे जरासुद्धां दुर्लक्ष नाहीं. त्याचप्रमाणें वडील भाऊ म्हणून माझ्या आज्ञेच्या बाहेर त्यानें कधींहि वर्तन केलेलें

नाहीं. त्याचा स्वभाव थोडासा विनोदी व गोडबोल्या आहे. त्यामुळें कोणीहि मनुष्य त्याचा मित्र होऊं शकतो.

★

## दुसरा बंधु बाळू (विष्णु ऊर्फ आबा)

याचा जन्म ७ मे १९१६ रविवार वैशाख वैशाख शु. ५ रोजीं झाला. त्याच दिवशीं योगायोगानें आमच्या बहिणीचें लग्नहि ठाण्यास झालें. तो अकरा महिन्यांचा असतांनाच मातृसुखाला अंतरला. परंतु आमच्या आजीनें त्याचें उत्तम प्रकारें संगोपन केलें. गांवची शाळा दूर असल्यामुळें त्यांचेंहि शिक्षण योग्य वयांत सुरू झालें नाहीं. वयाच्या नवव्या वर्षीं त्याच्या शिक्षणाला सुरुवात झाली. ५–६ वर्षें शिकल्यानंतर १९३१ सालीं तोहि धंद्यांत सामील झाला. त्याचा विवाह १९३५ सालीं झाला. परंतु एक मुलगी झाल्यावर त्याची पत्नी स्वर्गवासी झाली. त्याचा दुसरा विवाह ३१ डिसेंबर १९४७ सालीं झाला.

प्रथम पत्नीच्या आजारामुळें २–३ वर्षें त्याची मनस्तापांतच गेलीं व दुसरा विवाह होऊन एक मुलगा झाल्यावर तीहि आजारी झाली होती. परंतु ऑपरेशन करून त्या आजारांतून ती बरी झाली व त्यानंतर आतां तिला आणखी तीन मुलें झालीं आहेत. तोहि माझ्याजवळ पूर्णपणें आज्ञाधारकपणें वागत असून, मोठी जबाबदारी अंगावर न घेतां पडेल तें काम दक्षतापूर्वक करण्याची त्याची नेहमींच तयारी असते. एकंदरींत धंद्यांतील आपला वांटा त्यानें पूर्णपणें सांभाळला आहे.

माझ्या भावांना दुसरीकडे नोकरीसाठीं जावें लागूं नये अशी जी माझी इच्छा मनोतांत लिहिली आहे, त्याप्रमाणें गोविंदा व बाळू हे दुकानांतच काम करूं लागल्यामुळें ती इच्छापूर्ती होण्यास सुरुवात झाली.

★

## गजानन (भाऊ)

आमचा सावत्र भाऊ गजानन याचा जन्म २२–२–१९२९ माघ शु. १४ ला झाला. याचें वयाचे आठव्या वर्षापर्यंतचें बालपण वडील–मातोश्रींच्या कृपाछत्राखालीं गेलें. त्यानंतर तो शिक्षणाकरितां मुंबईला आमचेजवळ आला. मराठी चार व इंग्रजी पांच यत्तापर्यंतचें शिक्षण झाल्यावर तोहि १९४७ पासून धंद्यांत सामील झाला आहे. त्याचा विवाह २१–२–५१ रोजीं दिवेआगर येथील अण्णासाहेब ( महादेव चिंतामण ) बापट यांची दुसऱ्या क्रमांकाची मुलगी शांता हिचेबरोबर झाला असून त्याला दोन मुलगे व दोन मुली आहेत. तोहि धंद्यांत समरस झाला असून आपल्या वांट्याचें काम चोख तऱ्हेनें पार पाडीत आहे.

★

## रमेश ऊर्फ काका

याचा जन्म २६–९–१९४० भाद्रपद शु. १३ ला झाला. तोहि ७–८ वर्षांचा होईपर्यंत आई–वडिलांजवळ होता. त्यानंतर तो शिक्षणाकरितां मुंबईला आमच्याजवळ आला. शिक्षण चालू असतांना त्याला वरचेवर आजारपण आल्यामुळें मध्यंतरीं त्याची

शिक्षणाचीं कांहीं वर्ष फुकट गेलीं. वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं तो एस्. एस्. सी. पास झाला व गेल्या मे १९६० पासून पुढील शिक्षणाचा नाद सोडून तोहि धंद्यांतच सामील झाला आहे व धंद्यांतच चिकाटीनें काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. अजून त्याचा विवाह झालेला नाहीं. त्याचा स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळें धंद्यांत तो चांगली प्रगति करील असें दिसतें. आशाधारकपणाचा गुण इतर भावांप्रमाणें त्यानेंहि उचलला आहे.

★

## सौ. रमा

माझा पाठचा भाऊ गोविंदा याची ही पत्नी. हिनें आम्हीं एकत्र रहात असतांना सगळ्या कुटुंबाच्या खस्ता काढल्या आहेत. तिला एकच मुलगी आहे. कांहीं वर्षें एकत्र राहिल्यानंतर गोविंदा तिचेसह स्वतंत्र राहूं लागला. त्याचा संसार ती दक्षतेनें चालवीत आहे. तिच्या मुलीचें लग्न झालें त्यावेळींहि मला त्यांनीं स्थळ शोधण्याचा त्रास पडूं दिला नाहीं.

## सौ. सुशिला

माझा भाऊ बाळू याची ही द्वितीय पत्नी. तिला चार मुलें असून एक सावत्र मुलगी आहे. तिच्या एका मुलाची मुंज झाली असून सावत्र मुलगी लग्नायोग्य झालेली आहे. दोन तीन वर्षे एकत्र राहिल्यावर हीहि उभयतां आपल्या मुलांसह स्वतंत्र रहात असून ती आपल्या पतीचा संसार दक्षतेनें करीत आहे.

## सौ. विजया

माझा सावत्र भाऊ गजानन याची ही पत्नी. याचें लग्न होण्यापूर्वी गजानन हा अगदीं लहानपणापासून आमचे जवळच होता. याचा विवाह झाल्यानंतर लवकरच रहाण्यासाठीं स्वतंत्र जागा झाल्यामुळें हिला फारच थोडे दिवस एकत्र रहावयास मिळालें. हीहि आपला संसार दक्षतेनें करीत आहे. तिला दोन मुली व दोन मुलगे असून एक धाकटा दीर व दोन नणंदाहि तिच्याजवळ रहात असून त्यांचाहि ती योग्य तऱ्हेनें परामर्ष घेते.

★

## माझी सौभाग्यवती

आतां राहिली सौभाग्यवती. कुटुंबांतील बहुतेक सर्वांबद्दल लिहिलें; पण तिच्याबद्दल कांहींच जर लिहिलें नाहीं तर तो माझा अक्षम्य गुन्हाच ठरेल. म्हणून चार शब्द तिच्याबद्दलहि लिहितों.

आषाढ वद्य १ शके १८३१ रविवार ता. ५-७-१९०९ रोजीं गोवळ येथें हिचा जन्म झाला व त्यानंतर तिचें तिच्या वयाच्या अकराव्या वर्षी ता. २७ एप्रिल १९२० मंगळवारीं वैशाख शु. ९ चे दिवशीं माझेबरोबर लग्न होऊन ती त्या दिवसापासून माझी सौभाग्यवती झाली. आमचें लग्न ती अगदीं लहान असतांना ठरलें असल्याचें मी वडिलांच्या तोंडून ऐकलें होतें व लहानपणीं मी तिला पाहिली तेव्हांपासूनच ती मला

पसंतहि होती. पण मध्यंतरीं कांहीं गडबड होऊन हिचेबरोबर माझें लग्न होईलच अशी मला खात्री वाटत नव्हती.

माझेवर परमेश्वराची कृपादृष्टि असल्याचा जो मला वेळोवेळीं अनुभव येत आहे तो हिचे माझेशीं लग्न झालें तेव्हांपासूनच.

तिनें माझ्या संसारांत एकंदर सात मुलांची भर घातली आहे. हीं सात अपत्यें माझा संसार आनंदी करीत आहेत.

तिचे माझ्याबरोबर जरी क्वचित् मतभेद झाले असले तरी ती ते मनावर न घेतां विसरून जाते. तशीच ती कधींहि नाखूष दिसत नाहीं. त्यामुळें माझें मन नेहमींच आनंदी राहूं शकते. ती फारशी कधीं आजारी पडत नसल्यामुळें तिच्या आजाराची मला फारशी विवंचना तिनें कधींच करावयास लावली नाहीं.

माझ्या भावांबरोबरहि ती कधींच गैर वागली नाहीं. जावांबरोबरच्या वागणुकीबद्दल जरी त्यांचें मत कांहींहि असलें तरी ती कधींच जावांबरोबर तोऱ्यानें वागलेली मला दिसली नाहीं. तरी पण जावा म्हणजे चार ठिकाणच्या मुली एकत्र जमल्यानें त्यांचे मतभेद झाले तर तें साहजिकच आहे. दोघी सुनांबरोबरहि ती खेळीमेळीनें वागत असल्याचें नेहमींच मला दिसते, अर्थात् सुनाहि सुशिक्षित असून प्रेमळ व आज्ञाधारक आहेत हेंहि त्याला कारण आहेच. नातवंडेंहि तिचेजवळ मोठ्या खुषीनें रहातात. त्यामुळें तिच्यांत मला कांहीं न्यून असें दिसतच नाहीं.

दोघांची कथा रौप्यतुला झालेली ऐकिवांत नसूनहि जो मी आम्हा उभयतांची रौप्यतुला करण्याचा संकल्प केला आहे, त्यांतच तिच्या सर्व गुणांचे सार सांठविलेलें आहे.

★

### प्रभाकर

माझा थोरला मुलगा प्रभाकर याचा जन्म १९२७ अखेर मार्गशीर्षांत झाला. हा माझ्या आजीचा पणतू असल्यामुळें १९२८ च्या माघांत त्याचें 'मावंदें' झालें. हा पुढील पिढींतील दुवा असल्यामुळें हा सर्वांचाच आवडता होता. वयाच्या पांचव्या वर्षी १९३२ च्या भाद्रपदांत आम्हीं घरीं गेलों असतां त्याला आमांशाचा विकार होऊन तो २-३ दिवसांतच तडकाफडकीं स्वर्गवासी झाला. हें दुःख मला अतिशय जाणवलें. पहिला मुलगा सुवेरांतच गेला होता. व दुसरा मुलगा हा असा गेला. त्यामुळें माझें एकंदर चित्त धंद्याकडे लागेनासें झालें. पाठोपाठ पहिले दोन मुलगे गेल्यामुळें पुन्हां एकदां मनांत फारच निराशा झाली. त्यांतच सौभाग्यवती आठ महिन्यांची गरोदर होती. व तिलाहि आमांशाचा विकार झाला. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें औषधाव्यतिरिक्त कांहींहि द्यावयाचें नसे. असे दोन तीन दिवस गेल्यावर एक रात्रीं अकराच्या सुमारास ती अत्यंत अशक्त व गलित झाली. तेव्हां अन्नापाण्या-वांचून जाण्यापेक्षां पोटांत कांहींतरी अन्न जावें म्हणून परमेश्वराची प्रार्थना करून रात्रीं १-२ वाजतां तिला थोडा पातळ भात व अदमुरें खावयास दिलें. त्यानंतर मात्र तिला

उतार पडला व बरें वाटलें. त्याचवेळीं गजानन व ताईहि त्याच विकारानें आजारी होती. त्यांनाहि थोडा थोडा भात व अदमुरें देण्यास सुरुवात केली. त्यानें त्यांनाहि उतार पडण्यास सुरुवात झाली.

डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें मी त्यांनाहि अन्नाशिवाय ठेवलें असतें तर काय झालें असतें हें परमेश्वरालाच ठाऊक! तिघांहि जणांना चांगलें बरें वाटल्यावर मी मुंबईला आलों. हा मुलगा गेल्याचें दुःख मला वारंवार जाणवत असे. पण विधिघटनेप्रमाणें होणारच अशी मनाची समजूत घालून पुन्हां मी उद्योगधंद्यांत लक्ष केंद्रित केलें.

### माझे मुलगे

माझ्या मुलांनाहि आतां धंद्याची आवड उत्पन्न झालेली आहे. थोरला मुलगा चि. बंडू ( त्रिंबक ) याचें B. A. B. com.; LL. B. पर्यंत शिक्षण झालें असून सध्यां तो धंद्यांत व्यवस्थापक ( मॅनेजर ) म्हणून काम करतो.

दुसरा मुलगा श्रीधर यांचेंहि शिक्षण B. Sc.; Assoc C. F. T. R. I; पर्यंत झालें असून तोहि आतां धंद्यांत सामील झाला आहे. धाकटे दोन मुलगे चि. सुरेश व चि. वसंत अद्याप शिकत असून त्यांनाहि दुकानदारीची आवड असल्यामुळें फावल्या वेळांत ते दुकानांत काम करतात.

त्याप्रमाणें माझे सर्व भाऊ या धंद्याशीं समरस झाले आहेत. एक मुलगा या धंद्यांतच समरस झाला असून दुसरा मुलगाहि सामील झाला आहे. धाकटे दोन मुलगे जरी अजुन शिकत असले तरी त्यांच्या मनोभूमिकेंत धंद्याच्या आवडीचें बीज रुजलेलें दिसत आहे. मी जें मनोगतांत म्हटलें होतें कीं, आपल्या सर्व कुटुंबियांचा या धंद्यांत समावेश व्हावा तें आतांपर्यंतच्या अनुभवानें यशस्वी झालें असून पुढील पिढ्यांतील नातवापणतवंडांनीं या धंद्यांतच समरस व्हावें, अशी माझी श्रीप्रभूजवळ प्रार्थना आहे.

### माझ्या मुली

मला मुली एकंदर तीन. थोरली मुलगी चि. सौ. यशोमती ऊर्फ ताई हिचा जन्म १३-६-१९३० रोजीं झाला. ही दोन वर्षांची असतांना आमचा मुलगा प्रभाकर याच्या-प्रमाणेंच तिला आमांशाचा विकार झाला होता त्यांत मोठ्या शिकस्तीनें ती वाचली. नंतर पुन्हां दोन वर्षांनीं तिच्या पायावरून व्हिक्टोरियाचें चाक जाऊन तिचा पाय बराच दुखावला होता. त्यांतूनहि ती चांगल्याप्रकारें बरी झाली. तिचें शिक्षण दहा यत्तापर्यंत झाल्यावर ज्येष्ठ व. २ ता. १९-६-१९४९ रोजीं तिचा विवाह जामसंडे येथील अनंत-राव भिडे यांचेबरोबर झाला. तिला तीन मुलगे असून थोरला अनिल व धाकटा दिलीप तिचेबरोबर गांवीं रहातात व मधला चि. प्रकाश सध्यां आमचेजवळ असतो.

### मधली मुलगी मीनाक्षी

हिचा जन्म १९-१०-१९३८ रोजीं झाला. हिच्या जन्मानंतरच सहा महिन्यांतच आमचें गोवळ येथील पूर्वीचें घर मोडून त्याच जागीं माडीचें चिरेबंदी घर बांधून पुरें

झालें. हा तिच्या जन्मानंतरचा चांगलाच योग म्हणावयास हरकत नाहीं. पुढें यथाक्रम ती शिकत असून सध्यां M.A. ला आहे. तिचा विवाह दादरचे कापडवाले आठवले यांचे चिरंजीव रामचंद्रपंत ( राजाभाऊ ) यांचेबरोबर दि. २७ ऑक्टोबर १९६० रोजीं झाला.

## धाकटी मुलगी सुनंदा

हिचा जन्म ४ ऑक्टोबर १९४० रोजीं झाला. ही सध्यां एस. एन्. डी. टी. कॉलेजांत दुसऱ्या वर्षांत शिकत आहे.

## सौ. सुधा ऊर्फ शैलजा

माघ शु. १५ ता. २१–२–१९५१ रोजीं आमचा थोरला मुलगा चि. बंडू याचेबरोबर सौ. सुधा हिचा विवाह झाल्यानंतर ती आमची सून झाली. हिचा जन्म ३०–११–१९३४ कार्तिक शु. ९ रोजीं साखरी आगर येथें झाला. श्री. सीताराम ( दादा ) त्रिंबक पाटकर यांची ही जेष्ठ मुलगी. ही आमचे घरांत आल्यानंतर आम्ही भाड्याच्या घरांत रहात असूनहि थोड्याच दिवसांत स्वतःच्या मालकीच्या घरांत रहाण्याचा योग आला. हिला विजयालक्ष्मी ऊर्फ अलका व जयलक्ष्मी ऊर्फ संध्या अशा दोन मुली आहेत. सुधा ही माझ्या घराची शोभा आहे. घरांतील प्रत्येक माणसाबद्दल तिची वागणूक आपुलकीची असते. ती नेहमीं हंसतमुख असून कधींहि रंजीस अशी दिसलेली नाहीं. घरांत कोणतेंहि कार्य अगर कसलाहि समारंभ असला तर त्या त्या वेळीं ती नेहमींच पुढाकार घेत असते. आमचे स्नेही अगर नातेवाईक हे आमच्या घरीं आले असतांना त्यांचाहि योग्य परमर्ष ती मोठ्या आपुलकीनें घेत असते. सुधा हें तिचें माहेरचे नांव असून आमचेकडील ( सासरचें ) नांव शैलजा असें आहे.

## सौ. मंदा ऊर्फ सौ. पद्मजा

९–६–१९५७ रविवार ज्येष्ठ शु. १२ या दिवशीं हिचा विवाह श्रीधरबरोबर झाल्यामुळें त्या दिवसापासून ती आमची सून झाली. हिचा जन्म २८–११–१९३८ मार्गशीर्ष शु. ६ रोजीं झाला. श्री. विष्णु ( अप्पा ) नारायण पोंक्षे, मुक्काम डोंबिवली यांची ही थोरली मुलगी. ही आमच्या मोठ्या सुनेप्रमाणेच मनमिळाऊ स्वभावाची असून नेहमीं हंसतमुख असते. आपल्या जावेप्रमाणें हीहि आमचे कुटुंबियांबरोबर सदा आदरानें व लीनतेनें वागत असते.

माझ्या या वृत्तान्ताची पक्की प्रत लिहून काढण्याचें काम तिनेंच केलें आहे. आमचे स्नेही अगर नातेवाईक आले असतां त्यांचाहि परामर्ष आपुलकीनें ती घेत असते.

## नातवंडें

चि. अलका, चि. टिंगी ( संध्या ) व चि. संजू तसेच अनिल, आबा ( प्रकाश ) व दिलीप. ही माझी नातवंडे आहेत. अनिल व दिलीप हे आपल्या घरीं जामसंडे येथेंच असतात. प्रकाश अगदीं लहानपणापासूनच आमच्याजवळ मुंबईला आहे. गेल्याच वर्षी अनिल व प्रकाश यांच्या मुंजी झाल्या असून दिलीपची मुंज अजून व्हावयाची आहे.

अलका–हिचा जन्म दसऱ्याच्या दिवशीं झाल्यानें तिचें नांव आम्हीं विजयालक्ष्मी असें ठेवलें आहे. सध्यां ती शाळेंत शिकत असून आमची सर्वांची करमणूक करण्यांत पटाईत आहे.

टिंगी व संजू–या दोघांचा जन्म एका महिन्याच्या अंतरानें झाला. हीं दोघें सर्वच कुटुंबियांची फारच करमणूक करतात. माझी एक अशी इच्छा होती कीं, साधारण एकाच वयाचीं अशीं दोन मुलें असलीं तर त्यांच्या अगदीं लहानपणीं त्यांच्या स्वभावांत असलेला फरक आपणास समजेल. त्याप्रमाणें तीहि माझी इच्छा पूर्ण झाली असून जवळ जवळ बरोबरचीच अशीं तीं असल्यामुळें दोघेंहि एकमेकांना खेळविण्याचा प्रयत्न करतात व आमची भरपूर करमणूक करतात. तीं एकमेकांना 'भाऊ' व 'ताई' असें म्हणतात. आज तीं आमच्या करमणुकीचीं व कौतुकाचीं विषय होऊन राहिलीं आहेत.

दोघें एकाच वयाची मुलें एकत्र असल्यामुळें त्यांच्या स्वभावांतील फरक दिसून येत आहे. एकाला गोड पाहिजे, तर दुसऱ्याला गोड नको. नातीला बाहुली खेळायला पाहिजे, नातवाला नको. एकाला पोळी पाहिजे तर एकाला भात. नातीला सर्व आंबट व तिखट हवें; तर नातवाला सगळें गोड हवें. नातवाचें खेळणें नातीनें मागितलें तर तो देऊन मोकळा होतो.

१६

# निकटवर्तीयांचे दोन शब्द

**माझ्या** या आत्मचरित्राच्या निमित्तानें माझ्या संबंधी दोन शब्द लिहून आपला लोभ व्यक्त करण्याची इच्छा ज्या माझ्या निकटवर्तीयांना झाली त्यांचे मन मोडणें शक्य नाहीं. या दृष्टीनें या पुस्तकांत माझे पाठचे दोन भाऊ, सौभाग्यवतीच्या मातोश्री—माझ्या सासुबाई, मित्र श्री. द. ना. हेजीब, माझे दुसरे मित्र कै. माधवजी यांचे पुत्र रसिकलाल आणि प्रवचनकार काशिनाथ शास्त्री जोशी यांनीं लिहिलेल्या छोट्या पत्रवजा मजकुरांचा मी या आत्मचरित्रांत अंतर्भाव करीत आहें.

**ति. अण्णांबद्दल मला काय वाटतें?**

|| श्री गजानन प्रसन्न ||

मी सुमारें दहा महिन्यांचा असतांना ती. आई स्वर्गवासी झाली; तेव्हांपासून ९ वर्षांचा होईपर्यंत माझें संगोपन आमच्या आजीनें गोवळ गांवीं केलें. नंतर मला ती. अण्णानें शिक्षणासाठीं मुंबईस आणला. बाळपण खेडेगांवीं गेल्याकारणानें व तिकडे फक्त ती. आजीशिवाय दुसरा मनुष्य बऱ्याच दिवसांत दिसत नसल्यामुळें बुद्धीची वाढ माफक झाली. त्यामुळें शाळेंत बुद्धि फारशी चालत नसे. म्हणून थोडें शिक्षण झाल्यावर पुढें शाळेंत न जातां मी दुकानदारी करूं लागलों. ती. अण्णांची देखरेख असल्यामुळें शिस्त व वळण चांगलें लागलें हें आतां नमूद करावयाला आनंद वाटतो.

त्याकाळीं आईवडील गांवीं असत व माझा सर्व काळ ती. अण्णा व सौ. वहिनी यांचेजवळ जात असे. त्यामुळें तेच आईवडिलांचे जागीं आहेत असें समजून त्यांच्या शब्दाबाहेर मी जात नसें. माझें फारसें शिक्षण झालें नाहीं. अशा स्थितींत अण्णांनीं माझ्यावर पूर्ण लक्ष ठेवून शिस्त, कामाचें वळण व सात्त्विक प्रवृत्तीची शिकवण दिली व कोठल्याहि प्रकारचा दुजाभाव कुटुंबामध्यें ठेवला नाहीं. त्यामुळेंच मला ह्या चांगल्या परिस्थितींत रहातां येऊन माझा उत्कर्ष होत गेला हें नमूद करण्याला मला विशेष आनंद होतो. ती. अण्णांच्या सान्निध्यांत मी लहानपणापासून असल्यामुळें व आजपर्यंत त्यांनीं माझें पहिलें कुटुंब व दुसरें कुटुंब व मुलें या सर्वांचेवर लक्ष ठेवून माझ्या आयुष्याला एक प्रकारचें वळण लावल्यामुळें मला त्यांचेबद्दल अभिमान व आदर वाटतो. मी त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों.

**विष्णु विश्वनाथ बेडेकर**

## आमचे अण्णा

माझा जन्म गोवळ येथें १९२९ सालीं झाला त्यावेळीं माझी आजी हयात होती; परंतु माझ्या वयाला दहा महिने होण्याच्या अगोदरच ती निधन पावल्यामुळें वडिलांचे अगोदरचे पिढींतलीं कोणीहि माणसें मला पहावयास मिळालीं नाहींत. माझे जन्माचे वेळीं कुटुंबाची सांपत्तिक स्थिति चांगली असल्यामुळें माझें बाळपण मातापित्यांचे छत्राखालीं कोडकौतुकांत व आनंदात गेलें. वयाच्या सातव्या वर्षी आमच्या घराजवळ शाळा नसल्यामुळें मी बनांत (खालचे गोवळांत) ती. सौ. मोठे वहिनींचे माहेरीं ती. तात्या गोखले यांच्याकडे शाळेंत जाण्याकरितां राहिलों. तेथें वहिनींचे वडील ती. तात्या व आई (ती. आजी) अशी दोघेंच असल्यामुळें तेथेंहि माझें कोडकौतुक झालें. तेथपर्यंत ती. अण्णा वर्षांतून केव्हां घरीं येतील तेव्हांच त्यांना मी पाहात असे. त्यानंतर वयाच्या नवव्या वर्षी मी मुंबईत शिक्षणाकरितां आलों तेव्हांपासून ती. अण्णांचा व माझा संबंध आला व त्यांच्या सहवासांत मी आलों. आम्ही त्यावेळीं कुटुंबांत बरींच माणसें होतों; परंतु त्यांची वागणूक नेहमीं समतेची असे. हीं माझीं मुलें, हे भाऊ हा भेद त्यांनीं केव्हांहि दाखविला नाहीं. एकादें काम सांगावयाचें असो अगर एकादी वस्तु घ्यावयाची असो; सर्वांना सारखे कपडे शिवावयाचे असले तरी एकाच प्रकारचें कापड आणून आपल्यापासून लहान मुलांपर्यंत सारखे शिवावयाचे, तसेंच ती. वहिनीहि घरांत जें काय असेल तें सर्वांना सारखें द्यावयाची. त्यामुळें त्या दोघांबद्दल माझ्या मनांत आदर कायम आहे व आज माझ्याजवळ माझा लहान भाऊ व दोन बहिणी राहत आहेत. त्यांच्याशीं वागतांना मला वरील गोष्टी उपयोगी पडत आहेत. माझे वडील माझे जन्माचे सुमारासच धंद्यांतून निवृत्त झाल्यामुळें त्यांनीं कुटुंबाकरितां व धंद्याकरितां काय कष्ट केले ते व त्यानंतर ती. अण्णांनीं धंदा उर्जितावस्थेंत आणण्याकरितां काय काय श्रम घेतले ते मला पहावयास मिळाले नाहींत त्यामुळें इंग्रजी पांचवींत शाळा सोडून धंद्यांत येईपर्यंत मला धंदा म्हणजे काय व त्याकरितां काय कष्ट करावे लागतात ह्याची कल्पना नव्हती; परंतु धंद्यांत काम करूं लागल्यानंतर धंद्यात कोणत्या अडचणी येतात व त्यांना कसें तोंड द्यावें लागतें हें मला पहावयास मिळालें. ज्या ज्या वेळीं संकटें किंवा अडचणी येतील त्या त्या वेळीं त्याला अण्णांनीं धैर्यानें तोंड दिलेलें आहे व एकादी चांगली संधी चालून आली कीं त्याचा तावडतोब फायदा आपल्या सुखदुःखाची पर्वा न करतां केवळ सर्व कुटुंबाच्या कल्याणाकरितां त्यांनीं घेतला आहे. ह्याचें उदाहरण म्हणजे आम्ही आज जेथें रहात आहों तें घर (बेडेकर सदन नं. ३). तें जेव्हां विकावयास निघालें तेव्हां पैशाची पुरेशी तरतूद नसतांना व वडिलांचा विरोध असतांनाहि त्यांनीं दूर दृष्टि ठेवून व कदाचित् नुकसान आल्यास त्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेऊन तें घर त्यांनीं त्वरित घेतलें. सध्यां त्याच इमारतींत आमचा धंदा व आम्ही सर्व बंधू सुखासमाधानानें राहत आहोंत.

त्यांची कुटुंबांतील समानतेची वागणूक, धार्मिक आचरण व सत्यप्रियता ह्यामुळें मला नेहमीं त्यांच्याबद्दल दरारा व आदर वाटत असतो. क्वचित् प्रसंगीं मतभेदामुळें कटुता निर्माण होते; परंतु कोणतीहि गोष्ट मनांत ठेवून कुढत राहणें त्यांच्या स्वभावांत नसल्यामुळें आमचें प्रेम कायम आहे. त्यांच्या उभयतांच्या कृपाछत्राखालीं मी, माझें कुटुंब व भावंडें आनंदांत व वैभवांत आहोंत. आम्हां भावंडांची माता व पिता आमच्या लहानपणीं निर्वतल्यामुळें ती उभयतां आम्हांला त्यांचे ठिकाणीं आहेत असें आम्ही मानतों.

आतां त्यांचे वयाला साठ वर्षें होत आहेत. वयाच्या तेराव्या वर्षापासून त्यांनीं केलेले कष्ट व कुटुंबांतील सर्व घटक आपलेच समजून त्यांच्या सुखाकरितां केलेली धडपड त्यांचें मोठेंच ऋण आमच्यावर आहे; परंतु वाडवडील, मातापिता, गुरु ह्यांचें ऋण हें परतफेड करतां येणारें नसतें; ते अभिमानानें शिरावर वाहावयाचें असतें. तसेंच हें 'बंधू' ऋणहि मी समजतों. त्यांच्या सद्गुणांचें आचरण करणें हाच त्यांतून उतराई होण्याचा मार्ग आहे. दयाघन परमेश्वराजवळ एवढीच प्रार्थना कीं, त्यांना दीर्घायुरारोग्य द्यावें व त्यांचें मार्गदर्शन आम्हां सर्वांस सतत मिळावें.

**गजानन विश्वनाथ बेडेकर**

★

## सासुबाईंचे आशिर्वाद

आमचा व आमचे व्याही विश्वनाथपंत ऊर्फ दादासाहेब बेडेकर यांचा गांव एकच. त्यामुळें त्यांचा व आमचा परिचय आमच्या मुलीच्या लग्नाआधींपासूनच होता. यापूर्वी आमच्या शेजारच्या घरांतील मुलगी त्यांच्या घरांत दिली होती. तेव्हां त्यांचें जाणेंयेणें आमच्या शेजारच्या घरांत असे. तेव्हां आमच्याकडेहि त्यांचें येणें अधून मधून होई.

एक दिवस दुपारचे ते आमच्याकडे आले होते. त्यांनीं पाणी पिण्यास मागितलें; परंतु मी उष्टीं काढीत असल्यामुळें चि. मथूला म्हटलें, 'त्यांना पाणी नेऊन दे' ते पाणी पीत असतांना मी सहज म्हटलें, 'सून बघून ठेवा.' तेव्हां दादा म्हणाले, 'ठीक आहे.' तेव्हांपासून मुलीबद्दलचा तो विषय त्यांच्या मनांत होता.

त्यांच्या घरीं मुली सांगून येत; पण दादांची आई म्हणे, 'गोखल्यांनीं नाहीं म्हटलें, म्हणजे मग आम्हीं इतर मुली बघूं.' त्यानंतर दादांनीं चि. मथूच्या वडिलांजवळ पत्रव्यवहार करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं आमचा मुलगा चि. सखाराम याची मुंज करण्याचें ठरविलें होतें. मुलाची मुंज व मुलीचें लग्न हीं दोन कार्यें आम्हांला त्याच वर्षी झेंपण्यासारखीं नव्हतीं. म्हणून यंदा मुलीचें लग्नकर्तव्य नाहीं, असें आम्हीं त्यांना सांगत होतों. आम्हांला स्थळ पसंत नाहीं असें मुळींच नव्हतें. पण प्रश्न खर्चाच्या दृष्टीचा होता! स्थळाबाबत आजूबाजूच्या लोकांचीं मतें अनुकूल नव्हतीं.

मध्यंतरीं आमच्या वन्सचा मुलगा चि. लक्ष्मण परांजपे हा आमच्याकडे आला होता. त्याला चि. मथूच्या वडिलांनीं 'पांडू परांजपे यांच्याकडे दादा बेडेकरांचा मुलगा

आलेला आहे तो कसा काय आहे.' असें विचारलें. तो म्हणाला, 'मुलगा चांगला आहे, डोळे मिटून मुलगी द्या.' असें त्यानें सांगितल्यावर चि. मथूच्या वडिलांचें मत निश्चित झालें.

दुसऱ्या दिवशीं दादांचें पत्र आलें, त्यांत आम्हांला यंदा कार्यकर्तव्य आहे; तरी तुमचा निश्चित जबाब कळवा' असें होतें. चि. मथूच्या वडिलांनींहि होकारार्थी पत्र पाठवून लग्नाचें निश्चित ठरलें.

चि. बाबूराव लग्ना नंतर मुंबईला गेले. तेथून पुन्हां घरीं आल्यानंतर चि. सौ. मथूचे वडील त्यांना जेवावयास बोलावण्यासाठीं त्यांच्या घरीं गेले. तेव्हां बाबूरावांची आजी म्हणाली, "सल्लेजोडी देणार असलेत तर बाबू जेवायला येईल; नाहींतर येणार नाहीं." सल्लेजोडी देणें हें अर्थातच आम्हांला झेपण्यासारखें नव्हतें. तेव्हां जेवावयास बोलाविण्याचा नाद आम्हीं सोडला. मुंबईहून ते कधीं गोवळला येत तेव्हां आमचे घरीं येत व फराळ करून जात असत.

त्यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांची आजी निवर्तल्यावर आजीची अट आजीबरोबर गेली असें त्यांनीं आम्हांला कळविलें. त्यानंतर आम्हीं त्यांना जेवावयास बोलाविलें व ते येतहि असत.

माझ्या वयाच्या ७५ व्या वर्षांपर्यंत मी गोंवळगांवीं आपल्या घरीं होतें. पण पुढें वय झाल्यामुळें माझ्या मुलांनीं मला मुंबईला आणली. मी मुलांकडे व बाबुरावांकडे जाऊन येऊन राहात आहे.

मुलांची जागा लहान असल्यामुळें हल्लीं पांच वर्षे मी येथेंच बाबुरावांकडेच आहे. मुलीला या घरीं दिली त्यावेळीं येथील सांपत्तिक स्थिति खाऊन पिऊन सुखी इतपत होती. पण दिवसेंदिवस बाबुरावांची कर्तबगारी व त्यांचें वैभव पाहून मला अतिशय समाधान वाटतें.

अशीच उत्तरोत्तर त्यांची भरभराट होवो हा माझा त्यांना आशिर्वाद!

**श्री. सत्यभामाबाई गोखले**
(सासूबाई)

★

## जिवलग मित्राचा पाठिंबा

॥ श्रीव्यंकटेश प्रसन्न ॥

श्री. रा. रा. बेडेकर ( वा. वि. बेडेकर ) यांचा जीवन वृत्तान्त तयार होऊन छापत आहे याबद्दल परमेश्वरकृपाच म्हणावयाची. त्याच्या कृपेनें व वडिलांचे पुण्याईनेंच हा योग येत आहे बेडेकरांचा व माझा परिचय तीसएक वर्षांचा आहे. वडिलांचें नंतर ह्यांनीं

वडिलांच्या दुकानाच्या आर्थिक परिस्थितींत आपल्याच कर्तबगारीनें सर्व बंधूंच्या सहाय्यानें फारच फरक घडवून आणून आपला व वडिलांचा लौकिक व व्ही. पी. बेडेकर सन्स या फर्मचें नांव सर्वतोमुखीं केलें. ते दुकानच्या सुरुवातीस वडिलांचे आज्ञेनें सर्व कामें करीत होते. माझ्या समजुतीनें १९११ सालीं त्यांच्या वडिलांनीं कर्ज काढून दुकान स्थापिलें. वाडिलांच्या मर्जीप्रमाणें कामें करून १९२१ सालीं वडिलांस पेन्शनरूपानें कोंकणांत गोंवळ गांवीं ठेवून मुंबईत स्वतःच्या बुद्धीनें दुकानचा कारभार सुरू केला. त्यावेळपर्यंत वडिलांचे कडून जें ज्ञान मिळालें तेवढेंच त्यांचे खरें भांडवल. वडिलांकडून दुकानचा कारभार पाहूं लागले त्यावेळेस त्यांची आर्थिक स्थिति साधारणच होती. खाऊन पिऊन एवढीच म्हणा. आतां त्यांनीं जो व्याप वाढविला आहे तो दक्षिणी ब्राह्मण मंडळीस व इतर व्यापारी वर्गास थक्क करतां येईल, आश्चर्य वाटेल असाच आहे. त्यांची मुंबईस चार पांच दुकानें मसाले, लोंणचीं यांचे कारखाने, स्वतःच्या मसाले दळण्याच्या गिरण्या व परदेशीं लोणचे, मसाले, पापड पाठविणें एवढा त्यांचा पसारा आहे. यांच्याच कर्तबगारीचें फळ म्हणजे आज मुंबईस त्यांच्या १०–१२ चाळी मालकीच्या आहेत.

यांचें गुणवर्णन मी स्नेहीरूपानें जितकें करावें तितकें थोडेच होणार. माझ्या आठवणींत तरी इतक्या धडाडीचा, रात्रंदिवस हलकें काम, भारी काम, कमीपणा मोठेपणा न आणतां करणारा, निगर्वी, निर्मळ सल्ला घरींदारीं स्नेहीसोयरे यांना देणारे, निर्व्यसनी मला पहाण्यास मिळाले नाहींत. मी यांची अनेक प्रकारें कसोटी ताडून पाहून यांच्या वर्तनाची, खरेपणाची, योग्य खर्चाची, धर्मदायपणाची ( यांनीं पुष्कळच दानधर्म केला आहे. ) खात्री करून घेतली. या सर्व गुणांमुळेंच देवानें त्यांच्या हाताला धंद्यांत त्यांना यश दिलें व लाभलें.

त्यांनीं अनेकांवर परोपकारबुद्धि ठेवूनच सल्लामसलत दिलेली आहे. मला तरी त्यांचे धंद्यांत अगर इतर ठिकाणीं हेवामत्सरी वर्तन दिसलें नाहीं. प्रपंचांत राहून त्यांनीं प्रत्यक्ष चांगल्या वागणुकीनें परमार्थच साधला व साधत आहेत असेंच म्हणावें लागेल.

कोठेंहि अडचणीच्या वेळीं योग्य व हितकर असाच सल्ला देऊन ते मदत करीत असतात. हें सर्व माझी खात्रीच आहे म्हणून लिहून काढीत आहे. लोभ व स्नेही किंवा कांहीं कारण नसतांना जी स्थिति आहे तीच थोडक्यांत लिहीत आहे. माझ्या बुद्धीनें चार शब्द प्रत्यक्ष जे अनुभव ते लिहितो. मी त्यांची माहिती स्पष्ट शब्दांत स्वभावचित्र लिहिलें तर तें एक बुक होईल. ते मुंबई कोंकणचे. मी पुण्याबाजूचा. परंतु मला मात्र श्रीव्यंकटेश कृपेनें अमोल मित्र मिळाले आहेत. परमेश्वर त्यांचे सदैव भलें करो व त्यांचा जीवन वृत्तांत सर्वच ठिकाणीं स्फूर्तिदायक उपदेशक ठरो हे विनंति

—द. ना. हेजीब पुणें २.

## प्रिय मित्राच्या पुत्राचें पत्र

रा. रा. श्री. वासुभाई विश्वनाथ बेडेकर साथे मारा पिताश्री जोशी माधवजी दयाराम नो संबंध बत्रीसथी पात्रीस वर्षोंसुधी चालो आव्यो हतो. मारा पिताश्री अने वासुभाई ए सगा भाईना जेवोच प्रेम राखता हता. अने एक बिजानी खानगी अने वेपारनी वातों स्पष्टताथी करता हता. कोई पण वातों छुपावतां नही.

त्यारबाद १९४२ नी नासभाग अने १९४६ नी हुल्लडमां पाछी नासभाग थयी हती. त्यारे हमारी दुकान छ मास सुधी बंद रहेली हती. अने वरसादमां दुकानमां पाणी भरवाथी मालनी नुकसानी पण थयी हती. ते वखतमां दुकाननो माल भिजाई गयो. त्यारे वासुभाई ए अमारो बद्धो माल आपनी पोतानी दुकान जाणी अपनी दुकाने मंगावी लिधो अने मालना पुरा पैसा आप्या. अने अमोने मोटी नुकसानीमाथी बचाव्या. जे वखतमां मारा पिताश्री बीमार पड्या हथा अने ते वखत घरना खर्चा काढवा पण मुश्कील थई पडती हती, तेथी मारा पिताश्रीए दुकान वेची नाखवानो विचार नक्की कर्यो. ते वखत वासुभाईए दुकान बेचवां दिधु नही. अने पोतानी बुद्धीथी दुकान भागीदारीनी योजना करी. पोताना देखरेख नीचे राखी. अने दुकाननो माल मंगावता रह्या. अने ते खाली देखरेख राखता हता. मारा पिताश्री स्वर्गवासी थया. त्यारे मारी उमर ९ वरसनी हती. अने मारा कुटुंबमा कोई मोटुं नही होवाथी. पोते विमानद्वारां आमारा गामे केशोद आवी. अमारा कुटुंबने धीरज अने आश्वासन आप्युं अने अमारी मिळकतनी बराबर व्यवस्था करी हती. अने हजीपण तेमज अमारेउपर वालीतरीके ध्यान राखे छे. ते टाईमथी तेओ ट्रस्टी तरीके अमारुं काम करे छे.

अत्यारे पण ए दुकान एवुंज चाले छे. अने पचास करता पण बधु माणसोनुं गुजराण तेमाथी अमो चलावीए छिये.

अने अत्यारे पण वासुभाईए एवोज संबंध अमारा तरफ राख्यो छे. अने एवोज संबंध वासुभाईनो अमारा पासे रहे एवी अमारी प्रभुपासे मागणी.

लि. **जोशी रसिकलाल माधवजी**
( खुशाल )

## श्रीगुरुजी काशिनाथ शास्त्र्यांचे आशिर्वाद

सुमारें पांच वर्षांपूर्वी मी मुंबईस प्रवचनास आलों असतां श्री. अण्णासाहेब बेडेकर यांचा व माझा परिचय झाला. तो घरगुती नात्यानें झाला व त्याचें पर्यवसान प्रत्यक्ष नात्यांत झालें. प्रत्यक्ष मनुष्याला दोन प्रकारचें जीवन असतें. एक ऐहिक व दुसरें पारलौकिक व त्या प्रत्येक जीवनाचा गुणांमुळें विकास होत असतो. श्री. अण्णासाहेब यांचेमध्यें अनेक गुण आहेत. ईश्वराचे ठिकाणीं श्रद्धा, निरलसपणा, दीर्घोद्योग, प्रत्युत्पन्न मति, निराभिमान, सर्वांविषयीं दया, पूर्वज व कुटुंब यांच्या उत्कर्षासाठीं

सतत प्रयत्न, प्रसंग व मदतीची आवश्यकता यांचा विचार करून त्यावेळीं सढळ मदत करण्याची वृत्ति व व्यापारासंबंधीं योग्य तो विचार करून कामें लवकर उरकण्याची हातोटी इत्यादि गुणांनीं त्यांनीं आपलें ऐहिक जीवन विकसित केलें आहे व त्यांचा जाहीर गौरव करण्यासारखी कामगिरी त्यांनीं केली आहे व ईश्वरकृपेनें त्यांचा षष्ठयब्दि समारंभ सर्व अनुकूल परिस्थितींत येत आहे हें एक भाग्य आहे. त्यावेळीं त्यांचा सत्कार व्हावा अशी माझी इच्छा आहे. त्याचप्रमाणें त्यांचें पारलौकिक जीवन विकसित होण्याचा आरंभ त्यांनीं केला आहे. त्यामध्यें संतसंगति, अध्यात्मशास्त्राचें चिंतन, व्रतें, भक्ति व सदाचार या व आणखी कांहीं गुणांचा विकास होऊन त्यांचें दुसरें जीवन समृद्ध होवो अशी प्रार्थना ईश्वराजवळ करून ईश्वर त्या उभयतांना आयुरारोग्य देवो व त्यांच्या सर्व कुटुंबांचा उत्कर्ष होवो अशी प्रार्थना करून मी माझे दोन शब्द पुरे करतों.

**प्रवचनरत्न काशिनाथशास्त्री जोशी**

# १७ • उपसंहार

**आमचें** घराणें मूळ शास्त्री व धंदा पुराण सांगण्याचा. आमचे चुलत आजोबा वासुदेवशास्त्री हे हाच व्यवसाय करीत व थोडे व्यापारांतहि लक्ष घालीत. त्यांचेपर्यंत प्रत्येक पिढींतील वडील मुलगे शास्त्र शिकून पुराण सांगण्याचा धंदा करीत आले. तशीच त्यांचीहि पुढील पिढींतील प्रत्येक वडील मुलानें शास्त्र शिकून पुराण सांगण्याचा व्यवसाय करावा अशी इच्छा होती. जर त्यांची इच्छा सफल झाली असती तर आमचे आजोबांच्या वडील मुलाचा मीहि वडील मुलगाच आहे. म्हणून पुराण सांगण्याचा धंदा मी करीत राहिलों असतों.

परंतु परमेश्वरी इच्छा तशी नसल्यामुळें मी अगदीं लहान वयांतच १३ वे वर्षी १९१४ सालीं वडिलांचे किराणामालाचे धंद्यांत योगायोगानें प्रविष्ट झालों व सुरुवातीचीं सात-आठ वर्षें त्या धंद्यांत अतिशय हाल व कष्ट सोसूनहि टिकलों. परंतु तेवढ्या धंद्यांत होणाऱ्या प्राप्तीवर मी समाधान मानून न घेतल्यामुळें महाराष्ट्रीय ब्राह्मणांनीं न केलेला असा व ज्या काळांत मी हा धंदा सुरू केला त्या काळीं व त्या समाजांत एक टीकेचा विषय होऊनहि मी मसाले, लोणचीं, पापड या धंद्यालाच चिकटून राहिलों. व लोकांच्या टीकेचे प्रहार सोसूनहि या धंद्याची थोडीथोडी वाढच करीत गेलों. (परमेश्वरी कृपेनें ही वाढ होत गेली असून अशीच त्याची उत्तरोत्तर जास्त वाढ होत राहील अशी मला उमेद आहे) कांहीं काळानंतर पाठचे माझे भाऊहि या धंद्यांतच सामील झाले व आज त्यांत कौटुंबिक धंद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. माझ्या भावांनीं माल तयार करण्याचे कामांत लक्ष घातलें नसलें तरी त्यांची विक्री करण्याचे कामांत मात्र पूर्णपणें लक्ष घालीत आहेत. क्वचित कांहीं कांहीं बाबतींत त्यांनीं जरी थोडा विरोध दाखविला असला तरी वडील बंधु म्हणून माझी आज्ञा पाळण्यांत त्यांनीं केव्हांहि कसूर केलेली नाहीं. या मसाले, लोणचीं, पापडाच्या धंद्याबरोबरच मुंबईसारख्या शहरांत स्वतःच्या इमारती बांधण्याचें व घेण्याचेंहि मी धाडस केलें. (इमारती बांधण्याचें धाडस म्हणण्याचें कारण यांतील शेवटीं घेतलेल्या सदन नं. ८ ते १२ या चाळींशिवाय इतर चाळी अगदीं तुटपुंज्या भांडवलांत घेण्याचें व बांधण्याचें धाडस मी केलेलें आहे.) त्याचप्रमाणें किरकोळ मालाचें एक दुकान चालविणेंहि फार त्रासाचें व दगदगीचें असतें. अशा स्थितींत मुंबईतच पांच दुकानें चालविणें हेंहि एक धाडसच म्हणावयास हवें व तेंहि परमेश्वरकृपेनें माझे हातून घडलें आहे. तसेंच अगदीं लहान वयांत किराणा मालासारख्या धंद्यांत उधारीनें विक्री

करण्याचें बंद करणें हेंहि धाडस माझ्या हातून झालें आहे व त्यांतहि मी यशस्वी झालों अशी माझी समजूत आहे. तसेंच अगदीं लहानपणापासून माझ्या भावांना नोकरीसाठीं दुसरीकडे जावें लागूं नये अशी जी माझी इच्छा होती तीहि स्वतःचीं पांच दुकानें असल्यामुळें आम्हीं पांचहि भाऊ दुकानांतच काम करीत आहोंत म्हणून तीहि माझी ईच्छा यशस्वी झाली आहे असें म्हणावयास मला संकोच वाटत नाहीं.

त्याचप्रमाणें पुढील पिढींतील माझे मुलगे हे उच्चशिक्षित असूनहि त्यांना या धंद्याची आवड उत्पन्न झालेली आहे. व तेहि आपली हुषारी त्यांत दाखवूं लागले आहेत.

सध्यां मला साठावें वर्ष असून यंदाच मला तीर्थयात्रेला जाण्याचा योग आला व दुसरी एक परमेश्वरानें मला सद्बुद्धि दिली. माझे साठावें वर्षी साठीशांत व आम्हां उभयतांची रौप्यतुला करून त्या तुलेचे होणारें धन कांहींतरी समाजाचे उपयोगाकरतां व माझ्या परमपूज्य वडिलांचें स्मारक म्हणून कोणत्यातरी संस्थेकडे देण्याची प्रेरणा माझे मनांत परमेश्वरानें केली आहे व त्याच्या कृपेनें ती तडीस जाईल अशी मला उमेद वाटत आहे.

आम्ही ज्या ज्या वस्तु बनविल्या त्या त्या प्रत्येक वस्तु वापरणारांना आवडत आहेत व त्यांच्या किंमती माफक ठेवून सुद्धां परमेश्वर आमचा उदरनिर्वाह व्यवस्थितपणें चालवीत आहे.

## आपलीं घरें स्वतः बांधावीत

मुंबईतील इमारती या नेहमीं कॉंट्रॅक्ट पद्धतीनें बांधल्या जातात व कॉंट्रॅक्टरचीं बिलें देणें यापलीकडे मालकाला त्यांत फारसें लक्ष द्यावें लागत नाहीं. म्हणून मी आपल्या गोवळ गांवीं स्वतःच्या देखरेखीखालीं माडीचें चिरेबंदी घर बांधून बघितलें. परंतु हे खेडेगांवांतलें घर होतें. मुंबईला असें काम आपल्याला करतां येईल काय याचा अनुभव मला घ्यावयाचा होता. म्हणून सदन नं. ३ व ४ या दोन इमारतीवरील दोन मजले हे अगदीं कंट्रोलच्या अडचणीच्या परिस्थितींत मजूर लावून स्वतःचे देखरेखी-खाली बांधून घेतले. व ते बांधल्यानंतर मुंबईत घर स्वतः बांधणें हें फारसें कठीण नाहीं असें अनुभवानें मला पटलें आहे. आमची मुंबईत बारा घरें आहेत त्यांची दुरुस्ती वगैरेची व्यवस्था इतर पुष्कळशा घरांपेक्षां चांगल्या पद्धतीची आहे. सध्यांच्या परिस्थिती-प्रमाणें घरमालक व भाडेकरू यांच्यात बरेचसे मतभेद असतात; परंतु आमचे बाबतींत ते पुष्कळसे कमी आहेत. त्याचप्रमाणें आमचे धंद्यांत काम करणाऱ्या नोकरवर्गाला आमची वागणूक चांगली मिळत असावी अशी माझी समजूत आहे. कारण पंचवीस पंचवीस तीस तीस वर्षेंहि आमच्या दुकानांत माणसें काम करीत आहेत. सरकारी कायदे होण्याच्या फार पूर्वींपासून नोकरांच्या, स्वास्थ्याची व त्यांच्या कुटुंबियांची काळजी घेण्याचें काम आम्ही सुरू ठेवलेलें आहे.

सध्यां सरकारी कायदे फारच जिकिरीचे झालेले आहेत. ते कितीहि जिकीरीचे असले तरी ते आत्मसात करण्याची आम्ही खबरदारी घेतों. नुकतेच १ ऑक्टोबर १९६० पासून मुंबई शहरांतील वजनामापांत तिसऱ्यांदा बदल झाला व तो बदल १ ऑक्टोबरपासून करावयाचा असूनहि आम्ही तो एक आठवडा अगोदरच अंमलांत आणला.

हल्लीची कर पद्धति हीहि फार जिकीरिची झालेली आहे. आपण मिळविलेला पुष्कळसा फायदा सरकारकडेच जात असतो; तरीपण कर वसूल करतेवेळीं जी वागणूक मिळते ती समाधानकारक म्हणतां येणार नाहीं. व या कर पद्धतीमुळें व्यापाऱ्यांचा धंदा वाढविण्याचा हुरूप नाहीसा होण्याच्या मार्गाला लागला आहे.

## व्यापाराचा उत्कर्ष हाच राष्ट्रोत्कर्ष

व्यापार धंद्यांत जितकीं वाढ होईल तितकीं वाढ ही देशाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. आपल्या मराठीं मंडळींना व्यापाराचें अंग कमी आहे असें म्हणण्यांत येतें. ते कांहीं पूर्णांशानें खोटें नाहीं. व्यापार धंद्यांत लांडीलबाडी असते असाहि एक गैरसमज आपल्यांत आहे. तथापि लबाडीशिवाय, फसवेगिरीशिवायहि व्यापार धंदा होऊ शकतो इतकेच नव्हे तर तोच खरा व्यवसाय होय याची मराठी लोकांना एकदा खात्री पटली म्हणजे प्रयत्नांती महाराष्ट्रहि व्यापार धंद्याचे क्षेत्र होईल असा मला विश्वास वाटतो. व्यापाराची मक्तेदारी नव्या जगांत कोणा एका समाजाकडे राहाणार नाहीं आणि राहूंहि नये.

मराठी लोक तिखट जिभेचे, भडक डोक्याचे आणि एक घाव कीं दोन तुकडे या दृष्टीचे आहेत. व्यापार धंद्याच्या दृष्टीनें पाहिले तर हे इतरत्रचे गुण येथें मात्र अवगुण ठरतात. गुजराती दुकानदार जेथें दुकान असेल तेथील भाषा अवगत करून घेतो, तेथले रीतीरिवाज अंगवळणी पाडतो, तेथल्या समाजाशीं एकसंध बनण्याचा प्रयत्न करतो. मराठी माणसांनीं याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. व्यापार म्हटला कीं आपल्या डोळ्या-समोर मारवाडी आणि गुजराती माणसें येतात. गुजराती, मारवाडी, कच्छी या भारतातील व्यापारी जमातीच्या भाषा आहेत. व्यापार धंद्यातील व्यक्तींना यापैकीं एखादी भाषा चांगली अवगत असणें जरुरीचे आहे. भाषेच्या मदतीनें अनेक कठीण व्यवहारहि सुलभ होऊ शकतात.

'ऐकावे जनाचे करावे मनाचे' अशीं आपल्याकडे म्हण आहे. व्यापार धंद्यांत गिऱ्हाईके, जनता ह्यांचे प्रेम हेच खरे भांडवल असते. लोकांना दुखवून कोणाचा धंदा चालायचा नाहीं. पण तुमच्या मालात भेसळ असेल आणि केवळ जिभेवर साखर असेल तर तेवढ्या बळावरहि तुम्हांला आपल्या गिऱ्हाईकांना फार काळ झुलवीत ठेवतां येणार नाहीं. चांगला माल, चांगली भाषा आणि योग्य किंमत ही चांगल्या व्यापाराची गुरु किल्ली आहे. तसें असेल तर प्रसिद्धीचीहि जरुरी नाहीं. जाहिरातीशिवाय गिऱ्हाईकांच्या तोंडोतोंडी तुमची जाहिरात होत राहाते.

## व्यावसायिक नातें निर्माण करा!

महाराष्ट्रीय लोकांकडे भांडवलाचा जोर कमी आहे, व्यापारी दृष्टी नाहीं आणि त्यामुळें अनेक उलाढाल्या करून खिशांत रुपया नसतांना लाख रुपये उभे करण्याची युगत त्यांच्याजवळ नाहीं. इतर देशीय व्यापारी मंडळींत एक वेगळे नाते असते. आमच्यांत तसे व्यावसायिक नाते निर्माण झाले पाहिजे. याचा अर्थ मराठी लोकांत व्यावसायिक वैमनस्य आहे असा मात्र नव्हे. आणि क्वचित ठिकाणीं तसे असले तरी ते इतरांच्या फायद्याचे ठरते याचे विस्मरण कोणी होऊं देऊ नये. आज व्यापार धंद्यातील मंडळींना सरकारच्या व्यापारविषयक कायद्यांचे ज्ञान असणेंहि आवश्यक झालें आहे. या कायद्यांच्या जाळयामुळें आणि विचित्र प्रकारच्या करपद्धतीमुळें खरे पहायला गेले तर व्यापार धंद्यांत आपले लक्ष केंद्रित करणें सर्वांना जमत नाहीं. नवीन धंदेवाल्यांना तर हा एक अडथळाच आहे. परंतु अनेक अडचणीपैकीं हीहि एक अडचण समजून व्यापारी वर्गानें पुढें गेले पाहिजे. आज ना उद्या सरकारलाहि आपल्या करपद्धतीमुळें आणि कायदेबाजपणामुळें आपण आपल्या, व्यापाऱ्यांच्या आणि लोकांच्याहि फायद्याची नुकसानी करतो आहोत असें कळल्याशिवाय राहाणार नाहीं आणि मग आपोआप कायदे आणि व्यावसायिक नियमांत सुटसुटीतपणा आल्याशिवाय रहाणार नाहीं.

## राष्ट्रीय वृत्ति आणि आस्तिक्य दृष्टि


माझी स्वतःची स्वधर्माच्या स्वदेशाच्या आणि परमेश्वराच्या ठायी पूर्ण श्रद्धा आहे. आस्तिक्य दृष्टी ही मी सर्व दृष्टीतली थोर समजतो. आपण आज आहोत उद्यां नाहीं, परमेश्वर मात्र अनंत आहे आणि तो आहे म्हणूनच आपणहि आहोत या भावनेनें मी वागणारा आहे. ज्यानें त्यानें आपल्या वाट्याचे करावे, तीच त्याची ईश्वरसेवा असे मला वाटते. ईश्वराचे साह्य फक्त त्याच्या लाडक्यांनाच मिळते असे नव्हे तर जो मागेल त्याला मिळते. राष्ट्रीय दृष्टीकोन हा व्यापारवृत्तीत सचोटी आणि सज्जनपणा निर्माण करण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. सारा देश हे जो कुटुंब मानील त्यांस कुटुंबातील सर्वांचे कल्याण व्हावे याची वेगळी शिकवण घ्यावी लागणार नाहीं.

## कल्पकतेची जोड हवी!

व्यापारांत कल्पकतेची जोड मिळाली म्हणजे मातीचे सोने होऊ शकते. आपल्या महाराष्ट्रांत संपत्ती कमी असली तरी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत शौर्य आणि बुद्धीचे पीक अमाप आहे. शौर्य म्हणजे कांहीं नेहमीच तलवार बहाद्दरी नव्हे. तुम्ही तुमच्या गुणांनींहि जग जिंकू शकता. तसा प्रयत्न मराठी व्यापारी मंडळींनीं करावा म्हणजे त्यांची कल्पकता त्यांना निश्चित व्यापार धंद्याच्या क्षेत्रांत प्रगतीपथाचा मार्ग दाखविल. मी कांहीं फार शिकलेला नाहीं. तथापि मला माझ्या अल्पमतीप्रमाणें मसाले, लोणची यांच्या कारखानदारीची कल्पना सुचली तसे संसारोपयोगी वस्तूंत दुसरेहि अनेक प्रकार कारखानदारी स्वरुपांस उपयुक्त असें असूं शकतील.

आजकाल धंद्याला कारखानदारीची जोड असल्याशिवाय त्याचा व्याप वाढणें कठीण आहे. माझ्या नशिबानें मला एकदिलाचे भाऊ दिले व चांगला नोकरवर्ग दिला त्यामुळें हा एवढा पसारा उभा राहूं शकला. धंद्याच्या दृष्टीनें चांगली माणसें एकत्र येणें, एकत्र आणणें हेंहि महत्वाचें आहे. आमच्या जुन्या काळांत आम्ही हा व्यवसाय सुरू केला तेव्हां बराच काळ आमची लोकांनीं टिंगलच केली. ' मसाले कुटणें, लोणची घालणें हा काय धंदा आहे ? ' असें लोक कुत्सितपणें म्हणत. आज व्यापाराचे दृष्टीनें लोकांना बरीच व्यापक दृष्टी आलेली आहे. कोणताहि धंदा जो लक्ष्मीची सेवा करतो तो हलका नाहीं. लक्ष्मी आणि सरस्वतीचे कधीं जमत नाहीं असें म्हणायची पद्धत आहे. सद्धर्मानें सचोटीनें आणि न्यायानें वागणाऱ्या व्यापारी वर्गाला लक्ष्मी तर कधीं अंतर देणरा नाहींच पण त्यांच्याकडे सरस्वतीहि पाठ फिरवणार नाहीं अशीं मला मनोमन खात्री वाटते.

—समाप्त—



श्री. अण्णासाहेब व सौ. रखमाबाई यांची संयुक्त रौप्यतुला



बेडेकर सुवर्णमहोत्सव सभेत पुण्याचे माजी महापौर श्री. गोगटे अण्णासाहेबांना
पुष्पहार अर्पण करीत असतांना



मुंबईच्या ब्राह्मण सभेंतील गोखले हॉल मध्यें झालेल्या **बेडेकर पतिपत्नी रौप्यतुला** व **बेडेकर मसालेवाले** यांचा **सुवर्ण महोत्सव**
सभेस जमलेला स्त्रीपुरुष समुदाय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# माझी व माझ्या पत्नीची रौप्यतुला

**श्री प्रभुकृपेनें** मनांत संकल्प केल्याप्रमाणें आम्हां उभयतां पतिपत्नींची मीठ, गूळ, तांदूळ, गहूं, चण्याची डाळ, आम्हीं बनवीत असलेल्या प्रमुख वस्तु (म्हणजे तिखट, हळद, गोडा मसाला, संडे मसाला, आंब्याचें व लिंबाचें लोणचें आणि पापड) मिळून सहा आणि सातवी रौप्यतुला २६ जानेवारी १९६१ रोजीं झाली असून हा संकल्प माझ्या मनाप्रमाणें पूर्ण झाला आहे.

या समारंभाचे वेळीं मला पूज्य असलेले, ज्यांना मी चालू काळातले ऋषी म्हणून मानतो, असे पंडित सातवळेकर, सांगली येथील श्री. विष्णुपंत वेलणकर, धनी गजानन मिल्स, सांगली–ज्यांनीं आपली सुवर्णतुला पूर्वींच केली आहे–तसेंच मुंबईचे ज्ञानसागर लिथो प्रेसचे मालक दानशूर श्री. बाबुराव जोशी–ज्यांनीं रौप्यतुला केलेली आहे–व माझे शालेय शिक्षक श्री. फणसे गुरुजी, श्री. भागवत गुरुजी व श्री. देशमुख गुरुजी, व्याही मंडळी, मामेभाऊ, बहिणी, मुली, मुलगे, ग्रामस्थ, स्नेही, आप्त, सुहृद मंडळी, सुवर्ण महोत्सव व रौप्यतुला समितीचे पदाधिकारी व आम्हां बेडेकर मंडळीबद्दल आस्था व प्रेम असणारे असंख्य बंधुभगिनी यांच्या सान्निध्यांत हा समारंभ सुव्यवस्थितपणें, शांतपणें व आनंदानें साजरा झाला, याबद्दल माझ्या मनाला समाधान वाटत असून हा सर्व समारंभ प्रभुकृपेनेंच साजरा झाला, त्याची इच्छा होती म्हणूनच हें होऊं शकलें; अशी माझी मनोमन भावना आहे.

बुधवार, तारीख २५ जानेवारी १९६१ रोजीं आम्हीं समारंभ स्थळीं गिरगांव ब्राह्मणसभेमध्यें बंधुभगिनी, सर्व कुटुंबीय आप्त व स्नेही मंडळीसह एकत्र भोजन केलें व सर्व सामुग्रीची जमवाजमव केली.

## समारंभ स्थळीं आगमन

गुरुवारीं प्रातःकाळीं बरोबर सहा वाजतां घरचीं सर्व मंडळीं अगदीं लहानग्या नातवंडांसह स्नानें करून, घरच्या देवांची पूजा व प्रार्थना करून, वडिलांच्या तसबिरीला नमस्कार करून, तसेंच प्रभुकृपेनें मला लाभलेल्या माझ्या वयोवृद्ध सासूबाई यांच्या व इतर आप्त मंडळींच्या पायां पडून आमचे गुरुजी श्री. बाळंभटजी भावे यांच्यासह आम्हीं सर्व कुटुंबीय पुन्हां समारंभ स्थळीं जाण्यास निघालों. प्रभुकृपेनें आम्हांला वाहनांची अनुकूलता असल्यामुळें त्वरित आम्हीं सर्व मंडळी समारंभस्थळीं येऊन पोहोंचलों.

तों त्या ठिकाणी सर्व सिद्धता होतीच. लगेच रेशमी वस्त्रें नेसून बरोबर साडेसहा वाजतां पुण्याहवाचनास सुरुवात झाली. पुण्याहवाचन साडेसात वाजतां पुरें झालें. प्रथम घरचा अहेर बंधूंनीं केला व त्यानंतर उग्ररथशांतीला सुरुवात करून दुसऱ्या दालनांत आप्त व मित्रमंडळींनीं बहुमोल अहेर केले. त्यांचा थोड्याशा नाखुषीनेंच पण आनंदानें मी स्वीकार केला.

नाखुषीनें म्हणण्याचें कारण यावेळीं फक्त माझी साठीशांत व धंद्याचा सुवर्ण-महोत्सव या प्रीत्यर्थ उभयतां पतिपत्नीची रौप्यतुला करून कांहींतरी अल्पस्वल्प दान करण्याचा माझा हेतू होता व त्याप्रमाणें मी निमंत्रण पत्रिकेचा मसुदा तयार केला. त्यांत तसा उल्लेखहि केला होता. कारण लग्नमुंजींतील अहेरांची देवाणघेवाण नेहमींच चालू असते; पण साठीशांतीचे अहेरांची देवाणघेवाण चालू रहाणार कशी ? आतां आपलें वय झाल्यामुळें व बंधू आणि मुलगे यांचें हिस्से कायदेशीर निराळे करून दिलेले असल्यामुळें आपल्या डोक्यावर अहेराप्रीत्यर्थ कोणाचें ऋण नसावें अशी माझी भावना होती.

माझ्या धाकट्या चार बंधूंनीं मला विश्रांति मिळावी व ती उपभोगतां यावी यासाठीं पुण्यांत एक बंगला विकत घेऊन तो मला अर्पण करण्याचा त्यांचा विचार असल्याचें मला सांगितलें. येथेंच अहेर न घेण्याचा माझा विचार थोडा डळमळण्यास सुरुवात झाली. म्हणजे स्वार्थ आडवा आला असें नव्हें; तर माझ्या बंधुंनीं जें माझेवरील प्रेमानें हें बंधुप्रेमाचें दिग्दर्शन केलें त्याचें कौतुक वाटून, कांहीं लोक जे आम्हांला पांडव म्हणतात व मला धर्मराज म्हणतात त्याची आठवण होऊन माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. माझें अंतःकरण त्यावेळीं अगदीं भारावून गेलें होतें.

## हे अहेर नव्हेत, ही सन्मान–पूजा आहे

तसेंच दुसऱ्या एकानें अहेराच्या बाबतींत माझी अशीं समजूत घातली होती कीं यावेळीं जे लोक अहेर करतील ती देणगी नसून तुम्हां उभयतांची पूजा आहे व त्यांचा विरस न व्हावा म्हणून त्यांचा स्वीकार तुम्ही केला पाहिजे.

पूजा या उदात्त भावनेनें मी अहेर न घेण्याबद्दलची निमंत्रण–पत्रिकेंतील ओळ रद्द केली व बंधुनीं प्रेमानें दिलेल्या या बंगल्याचें नांवहि 'बंधु प्रेम' असें देण्याचें ठरविलें व दिलेंहि.

त्यानंतर आप्त व स्नेही मंडळींनीं केलेल्या अहेरांचा स्वीकार मी आनंदानें व प्रेमानेंच केला आहे व या अहेरांचे काय करावयाचें तेंहि मनांत योजून ठेवलें आहे. अहेरांतून आलेल्या सर्व वस्तू मी आनंदानें व प्रेमानें वापरणार आहे. पण ऋण नसावें म्हणून त्यांचे किंमतीचा अंदाज घेऊन त्यांचाहि देणगी देण्यांकडेच विनियोग केला आहे.

अहेर घेण्याचें काम सुमारें तासभर सुरू होतें. तें आटोक्यांत आल्यावर उग्ररथ म्हणजे साठीशांतीची पूर्णाहुति करून व ब्राह्मणांच्या मंत्राक्षतांचा स्वीकार करून

सर्वारिष्ट शांति म्हणून काकड्यासह बळी ओवाळून झाल्यावर आम्हीं बरोबर दहा वाजतां पहिल्या मजल्यावरील गोखले हॉलमध्यें प्रत्यक्ष तुला समारंभ व्हावयाचा होता त्या ठिकाणीं ब्राह्मणांसह प्रवेश केला. उग्ररथशांत व रौप्यतुला समयीं वेदमूर्ति बाळंभटजी भावे, (मुख्य गुरुजी,) गोविंद भटजी भिडे शास्त्री ( पार्ला ), अनिरुद्ध शास्त्री जोगळेकर सदाशिव भटजी पाटणकर, विनायक भटजी केळकर, वासुदेव भटजी फणसळकर, नरसिंह भटजी साने, नारायण भटजी देवधर, काशिनाथ शास्त्री जोशी, केशव भटजी आगरकर, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरचे बाळशास्त्री पाटणकर, गजानन भटजी घैसास, भास्कर भटजी गोखले, भालचंद्र शास्त्री कानिटकर, श्रीक्षेत्र नाशिकचे अंबादास भटजी पाराशरे इत्यादि ब्राह्मण आले होते. यापैकीं वेदमूर्ति बाळंभटजी भावे आणि गोविंद भटजी भिडे शास्त्री यांनीं पौरोहित्य केलें.

यानंतर तुला, देवता व कर्पूरगौरी ( पार्वती ) यांची यथासांग पूजा अत्यादरानें करून सर्व वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करून उभयतां पतिपत्नी भावनोत्कट मनानें तुलेमध्यें स्थानापन्न झालों.

तोलनाची योजना प्रतिथयश काट्याचे कारखानदार श्री. भाऊसाहेब सापळे यांनीं फारच कुशलतेनें व आत्मीयतेनें सुमारें महिनाभर अगदीं समरस होऊन केली होती. आम्हीं उभयतां त्या तुलेमध्यें सुमारें एक तास मोठ्या आनंदानें बसलों व सहा वस्तूंच्या यथाक्रम तुला झाल्या.

## माझ्या थोरल्या मुलाची दूरदृष्टी

सुमारें चार दिवस अगोदर सहज गंमत म्हणून आमच्या दुकानाच्या प्लॅटफॉर्म काट्यावर चिं. बंडूनें आमचे वजन करविलें होतें. व त्याचें कारण त्यानें मला असें सांगितलें कीं, तुम्हांला हल्लीं जागरणें वगैरे मुळें बराच त्रास झाला आहे व त्यामुळें तुमचीं वजनें कमीं झालीं असतील तर वजन करून पाहूं या. खरोखर वजन कमी झालें असलें तर आपला फायदाच आहे. पण माझें म्हणणें असें पडलें कीं जरी वजन कमी झालें असलें तरी त्यांत भर घालून ब्राह्मणसभेला पंचवीस हजार रुपये पुरे करूनच मी देणार ना ? मग फायदा कसला ? त्यावेळीं माझ्या थोरल्या मुलाचा ( बंडूचा ) हेतू माझ्या लक्षांत आला नव्हता. वजनीह कमी झालेलें नव्हतें. पण तुला करण्यास सुरुवात झाली त्यावेळीं मला त्याच्या हेतुचा उलगडा झाला. त्यानें तुलेमध्यें पोती, गुळाचे रवे वगैरे घालावे लागूं नयेत म्हणून प्रत्येक वस्तूच्या दोन किलो प्रमाणें पॉलिथिनच्या पिशव्या अगोदरच तयार करून आणलेल्या दिसल्या. सध्यां त्याचेकडे मी धंद्याचें मॅनेजरपद सोपविलें आहे. पण जेव्हां त्यानें वजन केलें त्यावेळीं माझें अंगावर नुसताच सदरा, धोतर व टोपी होती व सौभाग्यवतीनेंहि नुसतेंच पातळ पोलकें घातलेले होतें. पण तुलेच्यावेळीं मी सर्व कपडे घातले होते. आमचे गुरुजी डोक्याला पगडी घाला असेंहि म्हणत होते पण पगडी आमचे घरीं नाहींच, ( पण तीहि त्यादिवशीं संध्याकाळचे

अहेरांत एकानें दिली होती ) तुम्हीं म्हणत असाल तर फेटा बांधतो; असें मी त्यांना म्हणालों. त्यावर ते बरें म्हणाले व सौभाग्यवतीलाहि त्यांनीं सोन्याचे व मोत्यांचे सर्व दागिने अंगावर घालावयास सांगितलें. त्याप्रमाणें तिनेंहि ते घातले. त्यावेळीं तिचें म्हणणें होतें कीं, दागिने थोडेसेंच घालावेत पण त्यावर त्यांचे म्हणणें पडलें कीं हा तुमच्या आयुष्यांतला मोठ्यांत मोठा आनंदाचा दिवस आहे, हें कांहीं दागिन्यांचें प्रदर्शन म्हणून नव्हे. व त्यावर मीहि तिला म्हटलें कीं, खुशाल घाल, देवाची आपणावर पूर्ण कृपा आहे व त्यानेंच ते दिले आहेत. तेव्हां सर्व दागिने घाल ! त्याप्रमाणें तिनेंहि ते घातले. म्हणून आतां बंडूचा हिशोब चुकणार होता. कारण, त्यानें आमच्या वजनाचा अंदाज जरी अगोदर करून घेतला होता तरी आतां आमचें वजन सहजच थोडेसें जास्त होणार ! चांदीचा प्रश्न नव्हता. ती जास्त मागविलेलीच होती पण वस्तूंचें काय ? म्हणून मला थोडा संशय आला कीं, वस्तु पुन्हां आणाव्या लागणार कीं काय ? पण प्रथम मिठाची तुला सुरू झाली. ती बरोबर होऊन कांटा नमतांच झाला. मला थोडेसें आश्चर्य वाटलें. गुळाचेंहि तसेंच. पुढें तांदूळ, गहूं, डाळ, मसाले, लोणचीं, पापड यांचेंहि तसेंच. मग मात्र माझा जीव भांड्यांत पडला. पुढें चौकशी केली; त्यावेळीं समजलें कीं, जरी आम्हां उभयतांचें वजन २८० पौंड होतें तरी बंडूनें प्रत्येकीं तीनशें पौंड वस्तू आणलेल्या होत्या. त्यावरून मॅनेजरगिरीला बंडू योग्य आहे अशी माझी खात्री पटली व पुड्या करून आणल्यामुळें उगाचच जास्त वेळहि लागला नाहीं. त्यांचे सारखे चार भाग करून वांटप करण्यासहि सोईचें झालें व दुसऱ्या दिवशीं पेट्या भरून एक भाग श्रद्धानंद हिंदु अनाथ महिलाश्रम माटुंगा, दुसरा अंध उद्योग गृह वरळी, तिसरा पुणें अनाथ विद्यार्थी गृह पुणें व चौथा हिंगणें स्त्री शिक्षण संस्था, यांच्याकडे आमच्या खर्चानें पाठविण्यांत आला.

## रौप्यतुलेचा समारंभ

तदनंतर मुख्य म्हणजे रौप्य ( चांदीची ) तुला समारंभास सुरुवात झाली. प्रत्येक वस्तूची तुला होण्यापूर्वी त्यासंबधीची माहिती मराठी व इंग्रजींतून दूरध्वनीवरून देण्यांत येत होती. पहिल्या प्रथम श्री. वल्लभदास वसनजी मरीवाला, अध्यक्ष इंडियन मर्चेटस् चेंबर व सौ. मरीवाला यांनीं पहिला चांदीचा पाट तुलेंत ठेविला. दुसरा श्री. भाऊसाहेब आपटे व सौ. मनोरमाबाई आपटे यांनीं ठेविला. तिसरा, सांगलीचे श्री. गजानन मिल्सचे धनी श्री. विष्णुपंत वेलणकर यांनीं ठेविला व चौथा या समारंभाचे सन्मान्य अध्यक्ष श्री. कृ. ह. ढमढेरे यांनीं ठेविला. नंतर एक लहान तुकडा सौ. मरीवाला व दुसरा सौ. आपटे यांनीं घालतांच काटा बरोबर होऊन थोडासा नमला. त्यावेळीं सर्व सभागृह आनंदोत्सित हास्यानें व टाळ्यांनीं निनादून गेलें. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. सौ. मरीवाला या बाई मोठ्या देवभक्त आहेत. त्यांचे सकाळीं दहा वाजेपर्यंत मौन असतें. आम्हांला त्या आमच्या मातोश्रीच भासल्या. त्यानंतर आम्हीं ८–१० मिनिटें तुलेंतच बसून राहिलों. व नंतर चांदी तुलेंत तशीच ठेवून आम्हीं

त्यांतून उतरून प्रार्थना, पूजा वगैरे करून सर्व वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार केले. यावेळीं सभागृहांत बोट शिरण्यास वाव नाहीं एवढी गर्दी झाली होती. सन्मान्य निमंत्रितांखेरीज इतरहि मोठा समाज मोठ्या कुतुहलानें उपस्थित राहिला होता. पुढील व बाजूचें गॅलरींतहि चिक्कार गर्दी झालेली होती. त्यांतच कांहीं परदेशस्थ पाहुणे मंडळींहि आलेली दिसली व त्यांनीं कांहीं कुतूहल म्हणून फोटो घेतले.

## तेल पोळ्यांचें जेवण

तुलेचा समारंभ पूर्ण झाल्यावर सर्व स्त्री पुरुषांना प्रसाद म्हणून पेढे व स्त्रियांना हळदीकुंकू देऊन सभागृह मोकळें झाल्यावर ब्राह्मणांसह सर्व निमंत्रितांचें भोजन पेशवाई थाटानें केशरी भात, तेलपोळी, बर्फी, सुंदर भाज्या, चटण्या, कोशिंबिरीसह थाटांत झालें. तेलपोळी हें पक्वान्न समारंभाचे भोजनांत पुरें पडत नाहीं; पण मोठ्या समाधानाची गोष्ट म्हणजे तीनही दिवस तेलपोळीचा पुरवठा श्री. चक्रदेव यांनीं भरपूर प्रमाणांत केला. ती टिकाऊ असल्यामुळें दोन दिवस आगाऊ करतां येते. हे गृहस्थ तेलपोळी, खजूर पोळी करण्यांत मोठे कुशल व वाकबगार आहेत. त्याचप्रमाणें आमचे बल्लवाचार्य श्री. सदुभाऊ जोशी हे पाक निष्पत्ति करण्यांत मोठे कुशल आहेत. पदार्थ उत्तम, नासधूस नाहीं, अंदाज बरोबर पण यावेळीं मात्र तो थोडासा चुकला. कारण तेलपोळी व तुलेच्या नैवेद्याची मधुर बर्फी सर्वांना भरपूर वाढण्यांत येत होती.

सर्वांचीं भोजनें झाल्यावर मुंबई आणि उपनगरें यांतील बहुसंख्य भिक्षुक ब्रह्मवृंदाचे समंत्रक आशीर्वाद घेऊन त्यांना प्रत्येकीं दोन रुपये प्रमाणें दक्षिणा व उपनगरांतील ब्रह्मवृंदाना रेल्वेभाडें निराळें देऊन सुमारें तासाभरांत तो समारंभ गंध लावून, पेढे देऊन संपला.

त्यानंतर कांहीं परदेशस्थ पाहुणे मंडळींनीं तुला समारंभ पहाण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावरूनच त्यांना निमंत्रणें दिलीं होतीं. त्या मंडळींनीं तुला व त्याचें प्रतीक पाहून त्याची माहिती घेतली. त्यांचा योग्य तो सत्कार करून तोहि समारंभ पुरा झाला.

## सायंकाळची सुवर्णमहोत्सवी सभा

त्यानंतर साडेपांच वाजल्यापासून सभेसाठीं उपस्थिति सुरू झाली. या सभेचें अध्यक्षपद श्री. कृ. ह. ढमढेरे, सुगंधी मालाचे निर्माते व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष यांनीं भूषित केलें होते.

प्रथम सुवर्ण महोत्सव व तुलासमितीचे अध्यक्ष श्री. सोन्याबापू ऊर्फ प्रभाकरपंत जोशी यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली व त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. त्यांनीं अध्यक्षस्थान भूषित केल्यावर सभेच्या कामाला सुरुवात झाली. ब्राह्मणसभेचा हॉल या पूर्वीच अगदीं चिक्कार भरून गेला होता

व पुढील बाजूची गॅलरीहि गच्च भरून गेली होती. जरी थोडीशी कल्पना आम्हांला अगोदर आली होती तरी पण तो दिवस २६ जानेवारीचा, रोषणाईनें मुंबई नटलेली ! ती पहाण्याचा मोह ! गाडीलाहि चिक्कार गर्दी ! त्यामुळें लग्न कार्यांत जसे निमंत्रितहि सर्व लोक कांहीं येऊं शकत नाहींत; त्याप्रमाणें या सभेला अतिशय गर्दी होईलच असा अंदाज नव्हता. पण निमंत्रित व आमचे असंख्य ग्राहक मोठ्या प्रेमानें व अत्यंत आपुलकीनें या सभेला मोठ्या संख्येनें आले होते. त्यांना सभेच्या हॉलमध्यें तर सोडाच पण वरहि येतां आलें नाहीं. आमच्या दुकानांतहि अशी गर्दी होते पण शक्य त्या कुशलतेनें आमचा नोकरवर्ग सेवातत्पर असतो. त्यामुळें गर्दीचा उतारा होतो परंतु तसें येथें कांहींच जमलें नाहीं. एकंदरीत माणूस एकांगीच असतो. दुकानदारी करणाऱ्याला सभेची माहिती कशी असणार ?

सभेच्या बाबतींत बंडूचें व्यवस्थापन व सोन्याबापूंची समयसूचकता कमी पडली ! बंडूवर तर बाजूलाच जाऊन बसण्याची पाळी आली! पण आमच्या सूनबाई मात्र प्रत्येकाला सामोऱ्या राहून त्यांचें स्वागत करीत होत्या. ब्राह्मण सभेच्या स्वयंसेवक शाखेनें यावेळीं पादत्राणें सांभाळण्याची व्यवस्था चोख ठेविली होती. त्यामुळें पादत्राणें हरवल्याची मात्र एकहि तक्रार आमच्या कानीं आली नाहीं. पादत्राणें सांभाळण्याचें काम जरी सामान्य वाटलें; तरी एखाद्याचें पादत्राण गहाळ झालें तर त्याला भुर्दंड पडतोच. ब्राह्मणसभेच्या स्वयंसेवकांनीं ही काळजी दूर करण्याचें काम केलें होतें. त्याचप्रमाणें राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनींहि सभास्थानीं व प्रवेशद्वारीं सभेस येणाऱ्या लोकांना कॅलडरें, गुलाबाची फुलें व बर्फीची डबी व कांहीं पत्रकें वगैरे देण्याचें काम चोख तऱ्हेनें केलें. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर सभेच्या कामास रीतसर सुरुवात झाली. सुरुवातीला पं. सातवळेकर व इतर चार विद्वान ब्राह्मण यांनीं वैदिक आशीर्वाद दिले. त्यानंतर श्री. सी. ना. शेवडे यांनीं संदेश वाचून दाखविले. अभिष्टचिंतनपर संदेश शेंकड्यांनीं आले होते व येत होते.

## संदेशांचा पाऊस

सर्व संदेश वाचले गेले असते तर सभेचा वेळहि कदाचित् पुरला नसता पण पन्नास एक संदेश वाचून होतांच संदेश वाचन पुरें करण्यांत आलें. त्यानंतर भाषण करणारांची फारच मोठी यादी व मारख्या येतच असलेल्या चिठ्या पाहून यादींतील एक गृहस्थ हजर नाहींत असें दिसतांच अध्यक्ष महाशयांनीं भाषणांना कुशलतेनें कात्रीच्या प्रयोगास सुरुवात केली. मी त्यांचें जवळच असल्यामुळें मला तें सहजच समजलें. वक्त्यांनीं केलेल्या भाषणांत माझे गुणवर्णन व स्वभावांतील कांहीं बारकावे सांगितले. हीं वर्णनें व बारकावे जरी पटत होते, तरी त्यांची मला पूर्वी कल्पना नव्हती. त्यावेळीं ती माहिती प्रथमच कळली. यावेळीं माझ्यातले दोष कोणी सांगितलें नाहींत. मी कांहीं पूर्णांशानें दोषरहित नाहीं. पण यावेळीं कोणीतरी ते काम केलें असतें तर

मला माझे दोष दूर करण्याचा प्रयत्न तरी मला पुढील जीवनांत खचित करतां आला असता.

## हारतुऱ्यांचा वर्षाव

एकंदरींत सर्वांचा सूर माझें गुणवर्णन करण्याकडेच दिसला. त्यांतच हारतुरे व देणग्यांचा नुसता वर्षावच सुरूं झाला. आम्हीं उभयतांहि तर अगदीं भारावूनच गेलों. मला असें वाटूं लागलें कीं; आम्हीं काय केलें ? आम्हीं कांहीं मोठीशी देशभक्ती वा पुढारीपण केलेलें नाहीं. केवळ पोट भरण्यासाठीं धंदा करतों. जादा नफेबाजी किंवा अयोग्य माल जास्त किंमतीला विकणें असें मात्र आम्ही कांहीं करीत नाहीं. पण त्याचा एवढा सत्कार कशाला ? जनता चिकित्सक व चोखंदळ आहे. एकानें केलें म्हणून दुसऱ्यानें केलें असेंच केवळ म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं हार कांहीं तेथल्या तेथें घेतलेले नव्हते. ते अगोदरच घेऊन आलेले होते. म्हणजे त्यांच्या मनांत आधीं पासूनच प्रेम भावना होती. त्याचप्रमाणें ज्यावेळीं देणग्यांचाहि वर्षाव सुरू झाला त्यावेळीं मी तर अगदींच संभ्रमात पडलों. रौप्यतुला करून व धंद्याचे सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ आम्हीं देणग्या देणार आहोंत कीं लोक आम्हांला देणग्या देणार ? त्यावेळीं माझी स्थिति मात्र फारच अनुकंपनीय झाली. माझी वृत्ति लोभी नाहीं. जें आहे तें स्पष्ट सांगण्यास मला भीड वाटत नाहीं; पण कांहीं वेळां जर स्पष्टवक्तेपणा कोणाला गैर वाटत असला तरी जो स्वभाव आहे तो दडवून दडणार कसा ? यावेळीं माझ्यावर लोभ ठेवणारांनीं मोठ्या प्रेमानें व सद्‌भावनेनें मला देणग्या दिल्या असल्या तरी मी त्यांची सव्याज फेड मला माहित असलेल्या कांहीं संस्था व व्यक्तींना देणग्या देऊन करणार आहे.

जरी मला देणगी देण्यांत आपणाला पुण्य लाभणार नसलें तरी त्या तुमच्या पुण्याचा अपहार मी वा आम्हीं करणार नाहीं. त्याचें पुण्य जर मिळणारच असेल तर तें तुमच्यासाठींच परमेश्वराला रुजूं करण्यांस सांगणार. फक्त दलाली म्हणून कांहीं सूक्ष्म अंश माझ्या नांवें जमा केला गेला तर तो तेवढाच जमा होऊ द्या.

## कष्टाशिवाय धन नको

लोभाच्या मोहांतून, तावून सुलाखून मी वाटावलों आहे. कष्टाशिवाय मिळणाऱ्या कसल्याहि धनाचा मी जन्मांत कधींहि स्वीकार केला नाहीं व करणारहि नाहीं. लग्नांत जरी मुलांमुलींना अहेर येत असले तरी माझें कांहीं आतांच लग्न झालेलें नाहीं. तें चाळीस वर्षांपूर्वींच झालेलें आहे व त्यावेळीं रूढीप्रमाणें मिळणारें अहेर मी स्वीकारलेहि होते.

रौप्यतुलेच्या निमित्तानें लोकांनीं दिलेल्या अहेरांचा, पैशांचा अगर वस्तूंचा ते प्रेमाचें प्रतीक म्हणून मी मोठ्या प्रेमानें व आदरानें उपभोग घेईन; कुटुंबीयांना देईन; पण त्यांचें मुल्यमापन अंदाजानें व सढळ हातानें करून सव्याज तें मी देणग्याच्या स्वरूपांत समाजाकडे सुपूर्द करणार आहे. माझें कर्तव्यच आहे तें ! तुम्हीं विश्वासानें व

प्रेमानें ती ठेव म्हणून परत न घेण्याच्या बोलीनें माझे कडे ठेविली आहे; त्याचा विनीयोग उत्तमप्रकारें करणें हें माझें कर्तव्यच नाहीं कां ?

मुडीबाजारच्या असोसिएशनतर्फे जो संदेश वाचला गेला तो जरी अगदींच लहान असला तरी त्यांत चालकांनीं केलेले मूल्यमापन सूक्ष्मपणें दर्शविलें आहे. त्याचप्रमाणें आमचे समव्यवसायिकांनीं दिलेलें मानपत्र उद्‌बोधक आहे; तसेंच सभेंत कांहीं हितचिंतकानीं जीं कांहीं पत्रकें वाटलेलीं मला मागाहून मिळालीं तीं वाचूनहि मला अगदीं संभ्रम झाला.

आमच्या नोकरमंडळींनीं मला जें मानपत्र दिलें आहे; तें वाचीत असतांना मला नुसता गहिंवर आला होता. जर त्यावेळीं मला बोलण्याची जरूर भासली असती तर खरोखर रडूंच आलें असतें. नोकर मंडळींनीं दिलेल्या मानपत्रांतील आश्वासन ऐकून तर मला खरोखरीच परमानंद झाला आहे व मला वाटूं लागलें आहे कीं; मला परमेश्वरानें नोकर माणसेंही किती सुस्वभावी दिलीं आहेत. मी मालकच असल्यानें त्यांना केव्हांच रागावत नसेन का ? हें कसें शक्य आहे ? पण जशी माझी सौभाग्यवती माझें रागावणें मनावर घेत नाहीं, अगदीं त्याचप्रमाणें आमचे नोकरहि माझें रागावणें मनावर न घेतां या कानानें ऐकून त्या कानानें सोडून देत असावेत. दुसरें काय म्हणणार ? श्रीप्रभु ही त्यांची सेवा मान्य करो व त्यांचेवर नेहमीं स्निग्ध नजरेची पाखर ठेवो.

मला आणखी एक प्रकारचें समाधान वाटतें व तें म्हणजे सर्वच नोकर कांहीं कायमचे राहातात असें नाहीं; पण स्वतः धंदा करण्याच्या विचारानें किंवा कांहीं अन्य कारणानें नोकरी सोडून जातात. त्यांतलेहि कांही आमचेकडे समारंभ असला म्हणजे आपुलकीनें आपला धंदाउद्योग बंद ठेवून येऊन अगदीं समरस होतात. कुतूहलाची गोष्ट म्हणजे कांहीं बाहेरगांवीं असलेलेही अशावेळीं अचानकपणें हजर होतात. ही प्रभुची कृपा !

यानंतर पुण्याचे एक विद्वान गृहस्थ श्री. वसंतराव गाडगीळ, संपादक, शारदा पाक्षिक यांनीं संस्कृतमध्यें भाषण केलें. ज्यांना ते कळलें त्यांनीं त्यांची खूपच स्तुति केली.

सभेचें काम नऊ वाजेपर्यंत चालू होतें. सर्वच वक्त्यांना जरी बोलता आलें नसले तरी जे वक्ते बोलले त्यांनीं मोकळेपणानें भाषणें केलीं होतीं. सभा विसर्जन होऊन सभागृह मोकळें झालें. साडेनऊ वाजतां प्रा. न. र. फाटक यांचें "जीवन योग" या विषयावर व्याख्यान वजा प्रवचन झालें. त्यांनीं कांहीं दाखले देऊन उत्तम विवरणहि केलें.

## दुसऱ्या दिवशीं समारोप

तुला झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीं आमच्या दुकानचे सर्व नोकर, आमचें समव्यवसायी दुकानदार बांधव आणि आम्हांला माल पुरविणारे मोठे व्यापारी यांची जेवणावळ झाली. सकाळीं बरीच मंडळी आमच्या घरीं भेटावयास येत होती. त्यांतच नऊ वाजले.

मला पुण्याचे माजी महापौर श्री. गोगटे व त्यांच्या सौभाग्यवती यांच्याबरोबर स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांचेकडे जावयाचें होतें. जरी त्यांचेकडे जाण्यास मला मज्जाव नसला, माझी व त्यांची ओळख असली तरी त्यांच्या जास्त ओळखीच्या माणसाबरोबर जाणें केव्हांहि इष्टच ! त्यांतून महापौर गोगटे हे आमचे थोडे दूरचे जांवईच आहेत. त्यांच्याबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याकडे जाऊन त्यांना अल्पशी भेट मी भक्तिभावानें अर्पण केली. त्यावेळीं त्यांनीं मलाच हार घातला. मीहि त्यांना हार घातला पण तो मागाहून. मला मोठें कौतुक वाटलें कीं हें आहे तरी काय ?

## सर्व जेवले पण मला मात्र उपास

वीर सावरकरांकडून ब्राह्मणसभेंत आलों तों दुसरी पंगतहि उठली होती. कांहींतरी तोंडांत टाकण्याची अनिवार इच्छा झाली. मी स्वयंपाक घरांत गेलों तों सदुभाऊ वांग्याची भजीं तळीत होते. तोंडाला पाणीच सुटलें. तोंच माझें कानावर शब्द आले, "आज एकादशी हो" मागें वळून पहातों तो सौभाग्यवती मला एकादशीची आठवण करीत होती. मला त्याचें मोठें कुतुहल वाटलें. मला आतां श्रीप्रभु त्यागाची शिकवण देत आहे. कांहीं वेळानें थोडी खिचडी व एक केळें माझें पुढ्यांत आलें व जरी परमेश्वर त्यागाची शिकवण देत आहे; तरी उपाशी ठेऊन नव्हें हेंहि पटलें.

दुपारीं दोन वाजेपर्यंत जेवणावळ झाली. गुर्जर बांधवांना केशरीभात व बर्फी ठाऊक होती. पण तेलपोळी ठाऊक नव्हती. ती दिसण्यांत बरीच मोठी दिसते पण पापडाप्रमाणें पातळ व माफक गोड असते. अर्धी पोळी जरी पानांत वाढली तरी ते घाबरून जात. पुष्कळ समजूत घालावी लागे. पण कांहींनीं दोन दोन पोळ्याहि खाल्ल्या; तरी त्यांना तें कळलेंच नाहीं. तेलपोळी जरी जास्त महाग वाटली; तरी उत्तम व जेवणारांचें प्रकृतीला मानवेल असें अन्न दिल्याबद्दल आपलें मनाला जें समाधान मिळतें त्याची अपूर्वाई कांहीं वेगळीच असते.

## रौप्य तुलेचें स्मृतिचिन्ह

आमच्या रौप्यतुलेचें स्मृतिचिन्ह म्हणून आम्हां उभयतांचे चित्र असलेली एक सव्वा तोळ्याचे आसपास वजनाची शुद्ध चांदीची रौप्य मुद्रिका तयार करविली होती. त्यावर एका बाजूला "योगः कर्मसु कौशलम्" मध्यें आम्हां उभयतांचें चित्र व खालीं "साहसे श्रीः" व दुसऱ्या बाजूनें बेडेकर सुवर्ण महोत्सव १९६० गुरुवार तारीख २६ जानेवारी १९६१ मिति माघ शु. १० शके १८८२ व वासुदेव विश्वनाथ बेडेकर व सौ. रखमाबाई 'स्वकृत रौप्यतुला' असें छापलेलें आहे. 'स्वकृत रौप्यतुला' लिहिण्याचें कारण तुला व त्याप्रीत्यर्थ होणारा खर्च माझ्या वैयक्तिक मिळकतींतून आम्हीं केला असून, बाकीच्या देणग्या व खर्च धंद्यांतून ५१ वें वर्षाप्रीत्यर्थ होणाऱ्या सुवर्ण महोत्सवांतून व्हावयाचा आहे. या रौप्यमुद्रिकेचा छाप श्री. आचरेकर यांनीं केला होता व तो छापून देण्याचें काम श्री. पळेकर यांनीं अगदीं वेळेवर पूर्ण केलें.

रौप्यतुलेकरितां लागणारी चांदी मोहनलाल भगवानदास पेढीचे मालक श्री. वसंतभाई यांनीं आम्हीं मागणी करतांच खरेदी करून ती वेळेवर आणणें व दोन दिवस सभागृहांत ठेवून परत घेऊन जाणें ही सर्व जबाबदारी संभाळली व तीहि अगदीं माफक मोबदल्यांत

या रौप्यमुद्रिका आमचे निकटचे नातलग, मुरलेले नोकर, कांहीं संस्था वगैरेंना रौप्यतुलेची स्मृति म्हणून देण्यांत आल्या आहेत.

त्यानंतर 'बेडेकर' हे पुस्तकें आपणांपुढें आहेच. हंसक्षीर न्यायानें याचें मूल्य-मापन आपणच करूं शकाल. मला लेखनाचा अनुभव नसल्याचें मी या पुस्तकांत सुरुवातीलाच कबूल केलेंच आहे.

त्या दिवशीं सर्वांचीं भोजनें उरकल्यावर आम्हीं उभयतां व आमच्या विहीणबाई सौ. पोंक्षे अशा तिघांनीं फराळ केला व नंतर जरा आडवा झालों तों झोंप लागली. जरा गलबल्यानें जाग आली; तोंच आमचे एक नोकर श्री. केळकर पोवाडा म्हणत होते व तो आमचेवरच रचलेला असून सर्व नोकर अगदीं तल्लीनतेनें त्याचें श्रवण करीत होते. सर्व नोकरांना बोनस म्हणून एक महिन्याचे पगाराइतकीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकीटें देऊन झालेलीं होतीं. त्यानंतर सुवर्ण महोत्सवी दिवस म्हणून दुकानें बंद ठेवण्यास नोकरांचाच विरोध असल्यामुळें तीं सकाळीं उघडीं होतींच. तीं-जेवणा-पुरती बंद करून ते आले होते.

नोकर मंडळीं जेवल्यानंतर सौ. लिलुताई जोगळेकर यांनीं आपल्या भगिनी मंडळातर्फे सुमारें तासभर नादमधूर व सुश्राव्य भजन केलें. व कॉफीपान होऊन समारंभ स्थळींचा कार्यक्रम संपला.

लगेच कांहीं वेळांतच लवणादि इतर तुला झालेल्या वस्तूंचे चार भाग करून त्यांच्या पेट्या बंद करण्यांत आल्या. व आमच्या गुदामांत येऊनहि पडल्या व दुसरे दिवशीं त्या त्या संस्थांकडे आमचे खर्चानें त्यांची रवानगी झाली.

## सर्व कार्यकर्त्यांचे आभार

एकंदर या पुस्तकापासून निमंत्रण पत्रिका, पत्रकें, रौप्यमुद्रा, सर्व समारंभ यांतील दरेक बारीक सारीक गोष्टीकरितां प्रत्येकानें अत्यंत आपुलकीनें व हिरिरीनें सहाय्य केलें आहे, त्या प्रत्येकाचा नामनिर्देश करणें अत्यावश्यक आहे; याची मला पूर्ण जाणीव आहे. तरीहि मी मुद्दाम समितीचे अध्यक्षांखेरीज इतर सहाय्य कर्त्यांचा नामनिर्देश करीत नाहीं. याचें कारण प्रत्येकानेंच पूर्णपणें समरस होऊन मोठ्या प्रेमानें आमच्यासाठीं तें केलें आहे. अनवधानानें किंवा पडद्यामागें काम करणाऱ्यांवर अन्याय होऊं नये; हाच यामागील हेतु आहे. अध्यक्षांचा नामनिर्देश करण्याचें कारण इतकेंच कीं, या सर्व कामाचे सुरुवाती-पासून त्यांनीं मला नेहमींच स्फूर्ति दिली आहे.

या सर्व समारंभाकरितां जरी समिति निवडलेली होती तरी त्यांना सर्वच कामें करणें कांहीं शक्य नव्हतें, अध्यक्षांनीं त्यांचेवर सोंपाविलेलीं कामें ते करीत. स्वतः अध्यक्षांनीं तर कामें करण्याची कमालच केली. एवढी कार्यक्षमता व कुशलता माझ्या तरी पहाण्यांत नाहीं. तरीहि आमचे मुलांना व सुनांना भरपूर कामें पडतच. केव्हां केव्हां मला तर असें वाटें कीं, आपण भलताच उद्योग हाताळीत आहोंत. दुकानांत मी त्यांना म्हटलें कीं, आपला समारंभ अगदीं जवळ आला आहे तर आतां तूर्त परदेशाच्या आर्डरीची २६ तारखेनंतर डिलीव्हरी देऊं असें सांगा व घाईंत घाई करूं नका. पण व्यापारीही असले खमंग ! मी हें सांगत असतांच टेलिफोन आला व २० पेट्या मालाची आर्डर आली व त्यानंतरहि ऑर्डेरी सारख्या येतच होत्या. एकाचीच ५७ पेट्यांची होती; पण मला दाद लागूं न देतां त्या सर्व मागण्यांची डिलीव्हरी ज्यांचे त्यांचे म्हणण्याप्रमाणें पुरी केली गेली. यावेळीं सर्व नोकर व मॅनेजर म्हणून चि. बंडूची कसोटीच होती. पण ती त्यानें उत्तम रीतीनें पार पाडली. नोकरांचे व मुलांचें गुणवर्णन करूं नये. मी त्यांना तसा केव्हां केव्हां रागावतोंहि पण अशी कार्यकुशलता दृष्टीस पडल्यावर त्यांचे समक्ष जरी नाहीं तरी अपरोक्ष तरी तोंडून गुणवर्णनपर उद्‌गार येणारच.

दुसरा श्रीधर तर नुसता जीवाचें रान करीत आहे. त्याला जर म्हटलें कीं, दमलास रे तर तो पुढून सटकतो व दुसरें काम हातीं घेतो.

तिसरा सुरेश कॉलेज सोडून बाकी वेळांत सारखा धडपड करीत असतो. धाकटा वसंत याची कॉलेज व्यतिरिक्त मिळणाऱ्या वेळांत जेवढी होईल तेवढी धडपड चालूच असते. सध्या देणगी मागणाऱ्या आलेल्या ताव दोन ताव मजकुराचीं पानें वाचून त्यांतलें त्यांचें नेमकें काय म्हणणें आहे त्याचा रिपोर्ट त्या पत्राचे शेवटीं लिहिण्याचें काम त्याला दिलें आहे.

## संस्थांना एक प्रेमाची सूचना

एकदां त्यानें एक मोठें व लांबचलांब मजकुराचे पत्र वाचून मला विचारलें, 'अण्णा या सर्वच पत्रांत तुमचें अभिष्टचिंतन, धंद्याची भरभराट, शंभर वर्षें आयुष्य वगैरे लिहिलेलें आहे व देणगी देण्याची विनंतीही त्याच कागदावर आहे म्हणजे जर तुम्ही त्यांनीं मागितलेली देणगी दिलीत तरच पहिला मजकूर समजावयाचा नाहींतर तो तसा नव्हे असें समजावयाचें का ? कारण आपण देणगी दिली तरच तो मजकूर आहे असें त्यांच्या पत्रांवरून वाटतें. जर त्यांना तुमच्या बद्दल कांहीं चांगलें वाटत असतें तर निदान पेक्षां दोन निराळे कागद तरी त्यांनीं वापरायास नको होते का ? मला एकाच कागदावर दोन्ही तऱ्हेचे मजकूर लिहिणें बरोबर आहे असें वाटत नाहीं. समजा, आजच्या समारंभा प्रीत्यर्थ तुम्हीं त्यांचे संस्थेला कांहीं देणगी दिली नाहीं तरी पुन्हां त्यांना देणगी कधीं देणारच नाहीं असें नाहीं. हे जर दोन निरनिराळे कागद असते तर एक आजच्या समारंभाप्रीत्यर्थ आलेल्या अभिनंदन अगर संदेश या फायलींत घालतां आला असता व मागणीचा कागद दुसऱ्या फाईलींत घालतां आला असता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ दि: ........................
नों. दि: ........................



व पुन्हां तुम्हांला देणग्या ज्यावेळीं घ्यावयाच्या असतील त्यावेळीं अगोदरचीं पत्रें म्हणून तुम्हांला हीं पत्रें विचारांत घेण्यास ठीक पडलें असतें. तुमची जी पद्धत मला दिसते त्याला हें ठीक झालें असतें.'

त्यावर मी त्याला म्हटलें 'तुझें म्हणणें बरोबर आहे. मी पुष्कळवेळां असेंच केलें आहे. आजच जरी मला सर्वांना देणग्या देतां येण्यासारख्या नसल्या तरी मला देव बुद्धी देईल त्यावेळीं मी हींच पत्रें विचारांत प्रथम घेतलीं असतीं. पण आतां मात्र या समारंभाप्रीत्यर्थच्या देणग्या देऊन झाल्यामुळें तीं पत्रें जपून ठेवण्याचें कारण नाहीं.

असें जरी असलें तरी तीं मोठीं माणसें असून कांहीं तरी देशकार्य करीत आहेत व आपण नुसती दुकानदारी करतों. जरी आपण या समारंभाप्रीत्यर्थ कांहीं देणग्या दिल्या असल्या तरी त्यांचा त्याग मोठा आहे. त्यामानानें देणग्या देणाऱ्याचा त्याग कमीच नव्हे कां? कारण एकदां देणगी दिली कीं झालें. पण देणगी मागणाऱ्यांना संस्था चालविण्यासाठीं त्या नेहमींच मागत राहावें लागतें. एरव्ही संस्था चालणार कशी? फक्त भरघोस मागणी करणाऱ्यांनीं दोन कागद निराळे घ्यावयास हवे होते. जास्तींत जास्त मोठ्यांत मोठी असें कांहीं न लिहितां तें देणगी देणाऱ्यावरच सोंपवावयास हवें होतें. म्हणजे यातल्या कांहीं पत्रांचा विचार करतां आला असता. जास्तींत जास्त मोठ्यांत मोठी असें लिहिल्यामुळें यांना जरी कितीही दिलें तरी पन्नास हजार मागणाराला हजार म्हणजे कांहींच नाहीं; म्हणून तीं पत्रें विचारांत घेण्यासारखीं नाहींत म्हणून त्या पत्रांचा विचार तूर्त तरी करण्याचें कारण नाहीं.

त्याचप्रमाणें सर्वच भाऊ जेवढें जमेल तेवढे या समारंभाचें काम पुष्कळ धडपड करून करीतच होते. गजाननानें तर अतिशयच श्रम घेतले आहेत. काम असेल त्यावेळीं भरपूर काम जरा फुरसद मिळाली कीं दुकानदारी.

एकूण काय कीं, हा समारंभ यशस्वी व्हावा म्हणून ज्यांचा संबंध आला त्यानें अगदीं हिरीरीनें आपुलकीनें व प्रेमानें आपापलीं कामें समितीच्या सभासदांसह सर्वांनीच अगदी तन्मय होऊन केलीं.

## पूर्वायुष्याचे स्मरण करा

मला साठावें वर्ष लागलें आहे. म्हणजे आपले धर्म समजुतीप्रमाणें अर्धें आयुष्य पुरें होऊन पुढील अर्धें आयुष्याच्या उंबरठ्यावर मी आलों आहे. आतांपर्यंत गेलेल्या आयुष्याचें सिंहावलोकन करण्याची ही वेळ आहे. कोणीहि माणूस दुसऱ्याला फसवूं शकत असला तरी तो स्वतःला फसवूं शकत नाहीं. या न्यायानें मी माझ्या गतायुष्याचें सिंहावलोकन केलें असून मला स्वतःला लाजिरवाणें वाटेल असें कांहीं या जन्मीं माझे हातून झालें असल्याचें मला स्मरत नाहीं.

मी जरी पूर्वपरंपरेप्रमाणें शास्त्री न होतां दुकानदारी करीत असलों, तरी दुकानदारीतलीं पथ्यें कसोशीनें पाळण्याचा प्रयत्न माझे हातून होत आला आहे.

उद्योगधंदा करण्यांत काय किंवा साधी दुकानदारीहि करण्यांत काय कांहींच कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं. पण जो कांहीं उद्योगधंदा आपण करूं, तो इमानें इतबारें सत्य व पथ्य नेहमीं नजरेसमोर ठेऊन करावा असें मला वाटत आलें व त्याचें फळहि मला चांगले मिळालें असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. आतां माझें वयाला साठावें वर्ष सुरू झालें असून मी अर्ध्या आयुष्यांतून वाटावलों आहें व यावेळीं श्रीजगनियंत्या प्रभूनें रौप्यतुलेसारखा समारंभ घडवून आणवून त्या प्रीत्यर्थ कांहीं तरी सामाजिक ऋण फेडण्यास मला सुबुद्धि दिली, तशीच त्यानें मला यापुढेंहि सुबुद्धि देत राहावें. मनुष्याच्या आयुष्याच्या मानानें सामाजिक ऋण फार मोठें आहे.

दुकानचा सुवर्ण महोत्सव, माझी साठी शांत व उभयतांची रौप्यतुला करण्याचें योजिल्यापासून वरचेवर मला परमेश्वरानें कांहीं आदेश दिले आहेत त्यांतले एक दोनच सांगतों.

एक दिवस मी रात्रीं एक वाजतां झोपलों. मला लगेच झोंप लागली. तोंच स्वप्नांत मला एकावन एकावन असा आवाज चार पांच वेळां ऐकूं आला व मला जागहि लगेच आली. मी पुष्कळ विचार केला हा आवाज कशाकरितां असावा ? सौभाग्यवतीला भावांना, मुलांनाहि सांगितलें कीं दुकानचे सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ जे आम्हीं सात आठ हजार व रौप्यतुलेप्रीत्यर्थ पंचवीस हजार मिळून बत्तीस ते पसतीस हजार रुपये देणग्या देणार ते एकावन हजार रुपये कर असा तर याचा आशय नसेल ना ? त्यावेळीं तेवढी आम्हांला सवड नव्हती पण समारंभापर्यंत ती अगदीं सुलभपणें झाली.

तसेंच शनिवार ता. २८ जानेवारी १९६१ रोजीं ही असाच प्रकार झाला. रात्रीं एक वाजतांच झोपलों. लगेच झोंपहि लागली. तोंच आवाज कानीं आला कीं समारंभाचें वर्णन लिही. लगेच उठून मी तो लिहिण्यास घेतलाहि आणि तो मी या माझ्या आत्म-चरित्रांतहि शेवटीं घेतला आहे.

## सुवर्ण महोत्सवांत दिलेल्या देणग्या

बेडेकर पतिपत्नी रौप्यतुलेद्वारें पंचवीस हजार एक रुपयांची देणगी ब्राह्मण-सभा, गिरगांव या संस्थेकडे हुषार विद्यार्थ्यांना पारितोषिकें व गरजू विद्यार्थ्यांना विनापरतफेडीच्या शिष्यवृत्त्यांसाठीं म्हणून 'कै. विश्वनाथ पर्शराम बेडेकर यांच्या स्मरणार्थ देण्यांत आली आहे. या खेरीज मसालेवाले बेडेकर यांच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त खालीलप्रमाणें निरनिराळ्या संस्थांना देणग्या देण्यांत आलेल्या आहेत.

**प्रत्येकीं १००१ रुपये :–** एन्. एस्. डी. इंडस्ट्रियल होम फॉर ब्लाईंड वरळी, श्रद्धानंद महिलाश्रम माटुंगा, पुणें सेवासदन सोसायटी, महाराष्ट्रीय मंडळ पुणें, हिंगणें स्त्री शिक्षण संस्था, पुणें अनाथ विद्यार्थी गृह, स्वाध्याय मंडळ पार्डी, डी. जी. टी. हायस्कूल मुंबई, आर्यन हायस्कूल मुंबई, हिंद विद्यालय हायस्कूल मुंबई, युनियन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२०७४

हायस्कूल मुंबई, चिकित्सक समूह शिरोडकर हायस्कूल मुंबई, मराठा हायस्कूल मुंबई, माखजन हायस्कूल माखजन, आर. बी. शिर्के हायस्कूल रत्नागिरी, महिला विद्यालय रत्नागिरी, राजापूर हायस्कूल राजापूर, देवगड हायस्कूल देवगड, भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट पुणें, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर मुंबई.

**प्रत्येकीं ५०१ रुपये**–अनाथ हिंदू महिलाश्रम पुणें, पंढरपूर आर्फनेज पंढरपूर.

**प्रत्येकीं २५१ रुपये**–हिंदू दीनदया संघ मुंबई, शिवाजीमहाराज जयंति उत्सव समिती मुंबई, सुतिका सेवा मंदीर पुणें, प्राज्ञ पाठशाळा मंडळ वाई, कर्नाटक हेल्थ इन्स्टिटयूट घटप्रभा.

शंभर रुपयाखालील अनेक देणग्यांचा येथें उल्लेख केलेला नाहीं. त्याचप्रमाणें रौप्यतुलेच्या वेळी अनेकांनीं दिलेल्या आहेरांची रुपयांत किंमत करणें हें योग्य नाहीं.त्या आहेरां मागील प्रेमामुळें त्यांची किंमत रुपये आणे पैत होऊं शकत नाहीं. तथापि तेंही एक समाज ऋण समजून त्याबद्धल वेगळे असें पांच हजार रुपये मुके आणि बहिऱ्यांना बोलके करणारी दाते यांची धर्मार्थ शाळा, शंकराचार्यांची चार धर्मपीठे, नाना फडणवीस स्मारक, देवाचे गोठणें प्राथमिक शाळा सुधार समिती, मुंबई ब्रह्मवृंद मंडळ आंग्रेवाडी, खाजाण शालागृह, राणी लक्ष्मीबाई स्मारक समिती नासिक, रामेश्वर ऋग्वेदी ब्रह्मवृंद मंडळ पुणें, रामेश्वर जीर्णोद्धार समिती औरंगाबाद, आदी संस्था व इतर थोर व्यक्तीं मध्यें वाटण्यांत आले आहेत.

परमेश्वराच्या दयाळुपणाची प्रचिति मला वेळोवेळीं आलेली आहे. माझेवर जीं कांहीं संकटें आलीं त्यांपासून त्यानें माझें अलगद संरक्षण केलें आहे.

आपणावर जीं संकटें येतात त्याची जबाबदारी आपणावरच असते. आपले हातून या जन्मीं अगर पूर्वजन्मीं ज्या कांहीं चांगल्या वाईट गोष्टी घडलेल्या असतात त्यांचींच फळें आपणाला मिळत असतात.

परमेश्वर आपण होऊन कोणावरहि संकट आणीत नाहीं, तर तो आलेल्या संकटांतून सोडविण्याचाच प्रयत्न करीत असतो.

आतां मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, ज्या प्रभूनें मला मानव देहांत व भारतासारख्या पुण्यभूमींत जन्माला घातलें त्याला मी अनन्यभावें शरण आहें.

अनुक्रम २०५८६ दि.
REFBK-0011613
संग्रहालय

# ती. अण्णा उर्फ वासुदेवराव वि. बेडेकर

## यांना

## बेडेकर नोकर मंडळींतर्फें मानपत्र समर्पण

श्रीमंत अण्णासाहेब तथा वासुदेव विश्वनाथ बेडेकर यांसी बेडेकर व्यवसायाशीं संलग्न असलेल्या सर्व नोकर वर्गाचे सादर अभिवादन. आपल्या कुशल नेतृत्वाखालीं मुंबई शहरांत **व्ही. पी. बेडेकर ॲण्ड सन्स प्रा. लिमिटेडच्या** वतीनें चालणाऱ्या उद्योगधंद्याची उत्तरोत्तर भरभराट होत असून, आज संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाच्या सीमेपर्यंत आपण सारे पोहोंचलों आहोंत. या आनंदाच्या उत्सवांत आपण व आपल्या सौभाग्यवती रखमाबाई यांच्या रौप्यतुलेनें कळसच चढला असून या समयीं आम्हीं आपले नोकरवर्गबंधु संस्थेचें व आपलें अभिष्टचिंतन करितों.

शिक्षणाच्या वयांतच आपण आपल्या तीर्थरुपांनीं सुरू केलेल्या व्यवसायाशीं त्यांच्या आज्ञेनें शिक्षण सोडून एकरूप झालांत. गेल्या पन्नास वर्षांत आपल्या व आपल्या बंधूंच्या मार्गदर्शनाखालीं आम्हां कर्मचारी मंडळींना व्यापारधंद्याचें जें शिक्षण मिळालें तें आम्हीं आमच्या जीवनांतील मोठी प्राप्ती समजतो. प्रामाणिकपणा, चिकाटी आणि सचोटी या तत्त्वांनीं चालणारा कोणताहि धंदा कोणत्याहि काळांत यशस्वी होतो याचें मसालेवाले बेडेकरांचा व्यवसाय हें मूर्तिमंत उदाहरण आहे. आपली व आपल्या वडिलांची या व्यवसायामागील जी उदंड तपश्चर्या आहे त्यांतूनच आजचा हा सोन्याचा दिवस आम्हां सर्वांना दिसत आहे.

आपण आदर्श मालक आहात अशी आमची भावना आहे. आपल्या मुलाबाळांशीं, बंधूंशीं आपण जसे प्रेमानें वागतां तीच प्रेमाची आपुलकीची वागणूक आम्हां सर्वांना आपल्याकडून मिळाली त्यांतूनच आपल्याशीं सहकार्य करण्याचें व आमच्या धंद्याची सेवा करण्याचें भाग्य लाभलें, याबद्दल आम्हांस अत्यंत अभिमान वाटतो.

ही जागा फारच लहान म्हणजे १०'×६' ची होती. पुढें जुलै १९४८ मध्यें पाठचा कांहीं मोकळा भाग आमच्या दुकानांत ट्रस्टींनीं सामील करून दिला. लगेच सोभाराम लालजी आपल्या दुकानांत परत आले.

आम्हांला एकंदर सहा जागांना सहा नोटिसा मिळाल्या खऱ्या व जवळजवळ ४–५ वर्षें अतिशय मनस्ताप सुद्धां सहन करावा लागला पण परमेश्वरी कृपेनें रहात्या जागेपासून दुकानासह सर्व जागा पूर्वीपेक्षां सरस मिळाल्यामुळें आम्हांला मानसिक समाधान चांगलेंच लाभलें व त्यावेळीं मनाची अशीहि खात्री झाली कीं जर आपण सत्यधर्मानें वागलों तर परमेश्वर आपल्या पाठीशीं असतो. मुंबईसारख्या शहरांत घरमालकांनीं दुकानासाठीं व राहण्यासाठीं इमारती बांधून ठेवल्या होत्या. म्हणून आम्हांला जागा मिळत गेल्या. त्यांनीं जर इमारती बांधलेल्या नसत्या तर आम्ही कांहीं प्रत्येक वेळीं घरें बांधूं शकलों नसतों. म्हणून घरमालकांच्या मर्जीविरुद्ध कधींहि वागावयाचें नाहीं असा माझ्या मनाचा कल असल्यामुळें परमेश्वरानें प्रत्येक वेळीं मला सरसच जागा मिळवून दिल्या.

१९३५ सालीं सुपारीबाग रोडवर कॅंप कंपनीच्या समोर आमची पांचवी शाखा आम्ही सुरू केली. पण नंतर ती जागा गैरसोईची वाटल्यावरून १९३६ च्या मार्चमध्यें तें दुकान बंद करून पोयबावडी येथें माणकेश्वर मंदिराच्या बाहेर १५ एप्रिल १९३६ चैत्र व. ८ बुधवार शके १८५८ रोजीं दुकान सुरू केलें. आतां आमचीं एकंदर पांच दुकानें सुरू झालीं. त्यानंतर आणखी दुकानें वाढविण्याचा विचार मात्र तहकूब केला.

२१ फेब्रुवारी १९३५ ला श्रीधरचा जन्म झाला. १९३५ व ३६ साल पांचहि दुकानांची स्थिरस्थावर करण्यांत घालविलें.

एकंदर सहा जागांना नोटिसा मिळाल्यामुळें जरी आम्हांला प्रत्येक जागेच्या बदली चांगली जागा मिळाली होती तरी अतिशय मनस्ताप सहन करावा लागल्यामुळें आणखी दुकानें वाढविण्याचा विचार मी सोडून दिला.

१९३८ सालीं दादरला दोन घरें बांधलीं व १९३९ मध्यें गोवळचें घर नवीन बांधलें. १ ऑगस्ट १९३९ रोजीं मालिनी ब्लॉकमध्यें रहावयास गेलों. १ सप्टेंबर १९३९ ला दुसरें जागतिक युद्ध सुरू झालें. १९४० च्या ४ ऑक्टोबरला आमची तिसरी मुलगी सुनंदा हिचा जन्म झाला व ५ मार्च १९४१ ला माझी सावत्र बहीण गंगू हिचा विवाह झाला.

१ ऑगस्ट १९४१, श्रावण शके १८६३ मध्यें आमचें पिंपळाखालील दुकान सीताराम ब्लॉक ( आतां बेडेकर सदन नं. ३ ) या जागेंत आलें.

## बेचाळीसची पळापळ

१९४२ च्या पळापळीमध्यें आमचीं सर्व माणसें आम्ही गांवीं पाठविलीं होतीं. मी एकटाच मुंबईला राहिलों होतों. या वर्षी आम्ही आंब्याच्या ऋतूमध्यें अगदीं लहानांत

लहान भांड्यांतूनसुद्धां लोणचें भरून ठेवलें होतें. परंतु लोक जसे बाहेर पळाले होते तसे २० जून नंतर लोकांचें आगमन पुन्हां सुरू झालें. पण लोणच्याचे आंबे मिळायचे बंद झाले व आमच्याकडील वर्षाच्या बेगमीचें घातलेलें लोणचेंहि लवकरच संपणार अशीं चिन्हें आम्हांला दिसूं लागलीं. म्हणून तोतापुरी, पायरी, हापूस, रायवळ जे आंबे बाजारांत मिळतील ते घेऊन आम्ही लोणच्याचें काम सुरूच ठेवलें. हिंदुस्थानांत कोठें ना कोठें तरी आंबे मिळत. आम्हांला आंब्यांचा पुरवठा करणाऱ्या दलालांना आम्ही अशी वर्दी दिली कीं, हिंदुस्थानच्या कुठल्याहि भागांत आंबे मिळाले तरी पडेल तो भाव देऊन आणा. आंबे सहाजिकच फार महाग पडत. २८ पौंडाच्या मणाला १५ रु. पासून २५–३० रुपयांपर्यंत आंब्याचा भाव पडूनहि आम्ही लोणच्याचा भाव वाढविला नाहीं. पूर्वींचा ६ आणे रत्तलाचाच भाव कायम ठेवला. याचें कारण आजपर्यंत आमच्याकडील लोणचें विकत घेऊन लोकांनीं आमचें पोषण केलें परंतु यंदा ते इथें नव्हते व घरांतील भांडींकुंडींहि गांवीं ठेवून आले होते. कित्येक लोक हातीं जेवण करून जेवीत. त्यांना यंदा लोणच्याची उणीव भासूं नये कारण ते यंदाच लोणचें बनवूं शकले नव्हत. म्हणून कमींत कमी एक वर्षापर्यंत ६ आणे रत्तल या भावानेंच आम्ही सबंध वर्षभर लोणचें विकीत होतों. रोज नवें लोणचे मिळत असल्यामुळें त्या वर्षीं लोणचेंहि बेसुमार खपलें.

## भागीदारी व लिमिटेड कंपनी मध्यें रूपांतर

४२ च्या आश्विनांत दादा मुंबईला आले होते. त्यावेळीं त्यांना असें वाटलें कीं, मुलांच्या धंद्यांतील हितसंबंधासाठीं कांहीं तरी योजना करून ठेवावी. म्हणून ते आप्पासाहेब चितळ्यांना भेटले व त्यांच्याशीं वाटाघाटी करून कायद्याला धरून हा प्रश्न सोडविण्याचें त्यांनीं ठरविलें. ती योजना ठरवितांना त्यांत कांहीं अडचणी होत्या. त्या अशा– थोरला मुलगा ( म्हणजे मी ) बरीच वर्षें ( २८ ते ३० ) दुकानांत प्रत्यक्ष काम करीत होतों व धंद्याला मसाले, लोणचीं, पापड, बनविण्याची जोडहि मीच दिली होती. दुसरा गोविंदा हाहि माझ्या खालोखाल बरींच वर्षें ( १४ ) काम करीत होता. बाळूलाहि दुकानांत काम करायला लागून ६–७ वर्षें झालीं होतीं. यानंतर मागचे दोन मुलगे गजानन व रमेश यांचेंहि संरक्षण पाहण्याची जबाबदारी दादांच्यावर होती. म्हणून कायद्याच्या कक्षेंत बसूनहि प्रत्येकाला योग्य मोबदला मिळावा या दृष्टीनें त्यांनीं एक योजना आंखली. ती म्हणजे सर्वप्रथम त्यावेळच्या आपल्या एकंदर इस्टेटीची वांटणी करणें. त्यांत म्हणजे आम्ही पांच मुलगे पहिले तीन व दुसरे दोन व आपण उभयतां दोघें मिळून सात भाग करून सर्व मिळकतीचे सात समान हिस्से केले. म्हणजे त्यावेळीं प्रत्येकाला समान हिस्सा मिळालेला आहे.

## लिमिटेड कंपनीत रूपांतर

यानंतर दुसरी योजना त्यांनीं खालीलप्रमाणें केली:— या धंद्याचें स्वरूप लिमिटेड कंपनी या नांवानें करून आम्ही ३ मुलगे व आपण स्वतः मिळून या

मूळच्या किराणा दुकानदारीस कल्पक बुद्धीनें मसाले आणि लोणचीं तयार करण्याच्या दुकानदारीची जोड आपण दिलीत व ती स्वतःच्या हिंमतीवर यशस्वी करून दाखविलीत. धंद्याच्या या सर्वांगीण विकासाबरोबर तुम्हीं आम्हां नोकर-बंधूंना प्रथम पासून आजपर्यंत कधींहि विसरलां नाहींत याबद्दल आमचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येतें. किमान वेतन, बोनस, नोकरीसंबंधीचे नियम, प्रॉव्हिडंट फंड, सेवानिवृत्तीचें मानधन याद्वारें बेडेकर व्यवसायांतील नोकरांचें जीवन अधिक सुखावह करणाऱ्या खाजगी धंद्यांतून इतरत्र क्वचित आढळणाऱ्या सवलती देऊन आपण इतरानांहि नवी दृष्टी दिली आहे. या आनंदोत्सवांत आम्हीं आपणांस असें आश्वासन देतों कीं, आजपर्यंत आम्हीं जशी इमानें इतबारें सेवा केली तशीच यापुढेंहि करूं.

यापुढेंहि आम्हांला आपलें असेंच मार्गदर्शन लाभेल व आपली मायेची सावली आमच्या कुटुंबियांवर सदैव राहील अशी आम्हांला मनोमन खात्री आहे. या व्यवसायाची दिगंत कीर्ति आपल्या हयातींत सर्वत्र पसरो आणि त्यासाठीं आपणांस दीर्घायुरारोग्य लाभो व या व्यवसायाचा नंदादीप पिढ्यानपिढ्या चालविण्याचें महान भाग्य आपल्या कुटुंबियांना लाभो अशी आम्हां सर्वांची प्रभुचरणीं प्रार्थना आहे.

आपले प्रेमांकित,

तारीख २६-१-१९६१ **बेडेकर नोकर मंडळी, मुंबई.**